म. ग्रं. सं. ठा[illegible]
विषय [illegible]
सं. नं. २२२

११२

का।५

(बोधप्रद ऐतिहासिक
कादंबरी.)

# सती राणकदेवी

प्रकाशक

नं. ११२ म. ग्रं. सं. ठाणे
विषय कादं
लेखक विष्णु [illegible]
सन १९२६
संग्रहालय क्रमांक २२२
पुस्तकाचें नांव सती राण[illegible]

Received on the 2 Jany 1898

N. V. Bakut

Baroda 26-6-98

Presented to

Marathi ग्रंथ संग्रहालय

by Nagesh V. Bakut

रजपूत घराण्यांतील एक महान् पतिव्रता

# सती राणकदेवी.

( बोधप्रद ऐतिहासिक कादंबरी )

लेखक

रा. रा. विष्णु धोंडदेव कर्वे.

प्रकाशक

दामोदर सांवळाराम आणि मंडळी.

सन १८९७.

किंमत एक रुपाया.

वडोदें.

" पूर्णचंद्रोदय " छापखान्यांत छापिलें.

( सर्व हक्क प्रकाशकांनीं आपणाकडे ठेविले आहेत. )

# प्रस्तावना.

## आर्या.

काव्य करावें म्यां नच वचकावें दूषितोपरी लघुस ॥
कां न सदन बांधावें कीं त्यांत बिळें पुढें करिल घूस ॥

मोरोपंत.

हल्लीं ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिण्याकडे आमच्या लोकांचें बरेंच लक्ष लागलें आहे ही मोठी समाधानाची गोष्ट आहे. करमणुकेकरितां कल्पित कादंबऱ्यांपेक्षां ऐतिहासिक कादंबऱ्या जास्ती उपयोगाच्या आहेत ही गोष्ट निर्विवाद आहे. कित्येक दिवसांपासून आपण ही एक असली कादंबरी तयार करावी अशी प्रबल इच्छा होती, म्हणून ही कादंबरी लिहिण्याला सुरुवात केली. प्राचीन इतिहासांत सद्गुणी स्त्रियांचीं चरित्रें बरींच आढळतात त्यांपैकीं एखादें संविधानक घेऊन ग्रंथरचना करावी असें मनांत होतें, त्याप्रमाणें ह्या कादंबरीचें संविधानक 'रासमाला' ह्या ग्रंथांतून घेऊन माझ्या समजाप्रमाणें मीं त्यांत बरेच फेरफार केले आहेत. ऐतिहासिक पात्रांच्या गुणधर्मांत कोणत्याही प्रकारचा फेरफार केला नाहीं, परंतु गोष्टीच्या जुळ-

णीसाठीं कित्येक कल्पित पात्रें आणिलीं आहेत. आतां जे फेरफार केले आहेत ते सर्वांनाच मान्य होतील असें मी म्हणत नाहीं. कित्येकांना मूळ गोष्टच जास्ती पसंत पडेल. पण ह्या गोष्टीकडे विशेष लक्ष मी देत नाहीं. मला जें बरें दिसलें तें मीं आपल्या मनोप्रमाणें केलें आहे. ही कादंबरी सर्व तयार झाल्यावर रावबहादुर **बाळकृष्ण परशुराम करंदीकर,** बी. ए. एल्एल्. बी., रावसाहेब **काशीनाथ बाबाजी प्रधान,** बी. ए., व रावसाहेब **गणेश बळवंत आंबेगांवकर,** बी. ए. एल्एल्. बी. या त्रिवर्गास वाचून दाखविली. त्यांनीं मला ब-याच सूचना केल्या त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे. संविधानकासंबंधीं त्यांनीं सुचविल्याप्रमाणें कांहीं कांहीं फेरफार केले आहेत. इसवी सन १८९९ त मीं एक ऐतिहासिक नाटक प्रसिद्ध केलें होतें तें बरेंच लोकादरास पात्र झालें म्हणून पुन्हां हा प्रयत्न करण्याला उमेद आली. कादंबरीकार बनणें सोपें नाहीं हें मला पुरें माहीत आहे. मी कादंबरीकार म्हणवून घेण्याला अद्याप लायक नाहीं हेंही मला कबूल आहे, पण कादंबरीकार बनण्याची माझी इच्छा असून प्रयत्नही चालू आहेत. रसिक वाचकांस माझी एवढीच विनंती आहे कीं, त्यांनीं माझ्या पुस्तकाचें परीक्षण करावें व जीं दोषस्थळें आढळतील तीं मेहरबानीनें मला कळवावीं. म्हणजे माझ्या दुसऱ्या आवृत्तींत मी त्या सूचनांचा योग्य उपयोग करण्यास चुकणार नाहीं. येथील ग्रंथसंपादक व प्रका-

शक मंडळींनीं हें पुस्तक घेऊन आपल्या लोकप्रिय पत्राच्या ग्राहकांस भेट म्हणून दिलें याबद्दल मी त्यांचा फार फार आभारी आहे. ग्रंथसंपादक मंडळींनीं माझ्या पुस्तकाचा स्वीकार केल्यानें मला पुष्कळच हुरूप आला आहे. वृद्धा, बाला, मुग्धा, व तरुणी, ह्यांच्या हातांत हें पुस्तक देण्याला हरकत पडूं नये ह्याबद्दल मी योग्य खबरदारी घेतली आहे. हा प्रयत्न कितपत साधला आहे हें पाहणें वाचकांकडे आहे. कादंबरीलेखनाचा हा प्रथम प्रसंग आहे, व वाचकांसमोर येण्याची ही दुसरी खेप आहे, करितां गुणिजन हंसक्षीरन्यायानें माझ्या ह्या ग्रंथाचा स्वीकार करतील अशी उमेद आहे. माझ्या श्रमाचें साफल्य करून मला उत्तेजन दिल्याबद्दल ग्रंथसंपादक व प्रकाशक मंडळीचे पुन्हां आभार मानून ही अल्प प्रस्तावना पुरी करतों.

ग्रंथकर्ता.

# ग्रंथप्रकाशकांचे दोन शब्द.

आमच्या देशांत दिवसेंदिवस स्त्रीशिक्षणाचा प्रसार वाढत चालला आहे ही मोठी आनंदाची गोष्ट होय. अशा प्रसंगीं त्यांच्या हातांत बोधप्रद अशीं पुस्तकें देणें फार अत्यावश्यक आहे, नुसत्या कल्पित कादंबऱ्या, प्रहसनें, किंवा नाटकें वाचण्यापेक्षां बोधप्रद अशीं ऐतिहासिक चरित्रें वाचणें फार हितावह आहे, परंतु चरित्रें व इतिहास वाचण्याची गोडी लोकांस लागावी अशी लागलेली दिसत नाहीं, ती लागेपर्यंत ऐतिहासिक कथानकें कादंबरीच्या रूपानें त्यांजपुढें ठेवल्यानें बराच फायदा होईल असें समजून ह्या उद्योगास आम्हीं आरंभ केला आहे. हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास चाळून पाहिला म्हणजे त्यांत रजपूत घराण्यांतील पुष्कळ स्त्रियांचीं चरित्रें बोधप्रद व मनोवेधक असलेलीं आढळून येतात. त्यांचें तें कडकडीत पातिव्रत्य व शूरत्व आमच्या आर्यभगिनी आपल्या नजरेसमोर ठेवतील, तर आमच्या स्त्रीसमाजापासून आमच्या देशास व भावी प्रजेस अतोनात फायदा होईल असा आमचा समज आहे. व याच उद्देशानें रजपूत घराण्यांतील कित्येक शूर स्त्रियांचीं कथानकें एकत्र करून तीं केवळ लोकाभिरुचीकरितां कादंबरीरूपानें काढण्याचा आम्हीं विचार केला आहे. गुद-

स्तसालीं अशाच कथानकांपैकीं वीरमती नामक एका शूर स्त्रीचें कथानक कादंबरीच्या रूपानें आम्हीं वर्गणीदारांस भेट म्हणून दिलें होतें. यंदांचे सालीं हें राणकदेवी सतीचें चरित्र कादंबरीच्या रूपानेंच लिहिण्याचा आमचा मानस होता, परंतु हें चरित्र सदर ग्रंथाचे कर्ते रा. कर्वे यांनीं लिहिलें होतें, व तें छापण्याबद्दल आमच्या कांहीं मित्रमंमडळींनीं शिफारस केल्यामुळें तेंच छापून प्रसिद्ध केलें आहे. आतां इतकें खरें कीं, सदर ग्रंथकारानीं मूळ कथानकांत पुष्कळच फेरफार केला आहे, व तो न करितांही कादंबरीचें मनोहरत्व कायम ठेवितां आलें असतें, तथापि ग्रंथकाराच्या आग्रहास्तव साधारण वाक्यरचनादि दोषांशिवाय इतर कांहींएक फेरफार न करितां केवळ ग्रंथकाराच्या उत्तेजनार्थ हें पुस्तक जसेंच्या तसें छापून प्रसिद्ध केलें आहे. आमच्या ग्रंथमालेपैकींच हें एक पुष्प आहे, तेव्हां त्यांतील मिळेल तितक्याच सुगंधाचा स्वीकार करून आमचे सुज्ञ वाचक तृप्ति मानितील अशी आम्हांस उमेद आहे.

शंकर मोरो रानडे.

दामोदर सांवळाराम यंदे.

ग्रंथप्रकाशक मंडळीचे चिटणीस.



# राणक देवी.

## भाग १ ला.

### कारस्थानाला सुरुवात.

प्राचीन काळीं सिंधु नदीच्या कांठीं एक मोठें राजधानीचें शहर होतें. त्या शहरांतील मोठ्या बाजारांतून एक गृहस्थ संध्याकाळीं मोठ्या घाईनें चालला होता. त्याची मुद्रा मोठी प्रतिष्ठित दिसत होती. डोक्याला मोतिया रंगाचें पिळदार पागोटें असून त्याचे दोन्ही पदर मोठ्या खुबीनें खोंचलेले होते. त्याच्या अंगांत मलमलीचा, तंगदार, संजाप लावलेला व गुढग्यापर्यंत लांब, असा अंगरखा होता. पायांत सुरवार पांढऱ्या कापडाची असून खालीं निमुळती होत गेलेली होती. पायांत पातळ व नाजूक असा चढाऊ जोडा होता. कमरेला एक पांढरा शेला गुंडाळलेला होता. त्याचे पदर खालीं मोकळे सोडलेले असून त्यांत एक चांदीच्या म्यानांत घातलेला व ज्याच्या मुठीवर जडावाचें कोंदण केलें होतें असा जंबिया खोंचलेला होता. त्याचा चेहरा वाटोळा असून डोळे पाणीदार

होते. कपाळ विस्तृत होतें; गाल टवटवीत असून त्यांवर तारुण्याची निशाणी जो मुरूम तो दिसत होती; ओंठावर नुकतीच मिशी फुटूं लागली होती. त्याच्या चेहऱ्यावरून तो मोठा हुशार असावा असें दिसत होतें. तो उतावळीनें खालीं पाहून चालला होता तरी त्याच्या मनांत कांहीं तरी बेत ठरला असावा असें दिसत होतें. मधून मधून त्याचे उच्छ्वास मोठ्या जोरानें चालत होते. मधून मधून तो आपल्या त्या बारीक मिशीवरून हातही फिरवीत होता. अशी विचारांत गर्क झालेली त्या तरुणाची स्वारी मोठ्या रस्त्यावरून एका बोळांत शिरली व एका तीनमजली हवेलीजवळ उभी राहिली. त्या हवेलीचें पुढील दार बंद होतें. त्यानें दाराला दोन तीन धक्के दिल्यावर एका म्हातारीनें तें उघडलें. तिला पाहतांच त्या गृहस्थानें यजमान घरीं आहेतका, म्हणून प्रश्न केला. तिनें उत्तरही आहेत असेंच दिलें. तसा तडक तो पुढें चालला. घरांत शिरतांक्षणींच पहिल्या चौकांत दोन गाई बांधलेल्या होत्या त्या चांगल्या लठ्ठ दिसत होत्या. पुढें गेल्यावर एक बोळ लागला, त्यांतून तो पुढें गेला. तेथें एक जिना लागला, तो चढून पुढें चालला. ह्यावरून हा गृहस्थ ह्या घरांत नेहमीं येणारा असावा. तो जिना चढून वर गेल्यावर एक दिवाणखाना लागला. तो चांगला सजविलेला होता. भिंतींना पांढरा रंग दिलेला होता. वरती छत असून त्याला झालर लावलेली होती. त्या दिवाणखान्यांत एका अंगाला चार पांच फडताळें हारबंद असून त्यांना पितळेच्या कड्या असून कोयंडेही त्याच धातूचे होते. सगळ्यांना कुलुपें लाव-

लेलीं असून त्यांवर मोहोरा केल्या होत्या; सर्व दिवाणखान्यांत जाजम अंथरलेलें असून त्यावर स्वच्छ चादर घातलेली होती. मधोमध एका भिंतीशीं एक मोठा लोड स्वच्छ अभ्रा घातलेला मांडून ठेविला असून त्याच्या पुढें लहानशी गादी पसरलेली होती. त्या गादीजवळ एक लहानसर पण सुरेख अशी पेटी ठेविलेली होती. तिच्याजवळ एक शिशवी कलमदान होतें, त्याच्या जवळ पानसुपारी-चें ताट असून एक मोठी पिकदाणी होती. एका कोनांत एक पितळेची मोठी समई तेल वाती घालून तयार ठेवि-लेली होती. नवीन गृहस्थ ह्या दिवाणखान्यांत आला तेव्हां तेथें कोणी नव्हतें. आंत जाऊन तो त्या गादीवर लो-डाला टेकून वसला. कांहीं वेळ झाल्यावर एक गृहस्थ दुसऱ्या खोलींतून बाहेर आला. ह्याचें वय सुमारें पन्नाशी उलटून गेलेलें होतें. बांधा उंच असून सडसडीत आटोप-सर होता. चेहरा लांबट होता. डोळे बारीक असून रक्त-वर्ण दिसत होते. मिशा बारीक असून बहुतेक पिकलेल्या होत्या. कपाळ अरुंद होतें. ह्याच्या मुद्रेवरून हा कावेवाज असावा असें दिसत होतें. तो पांच हाती पंचाच नेसला होता, पण तो बगळ्याच्या पंखासारखा पांढरा शुभ्र व स्वच्छ होता. गळ्यांतील जानवें तेंही इतकें स्वच्छ पांढरें होतें कीं, सहज पहाणारास तें नुकतेंच परीटघडींचें घेतलें आहे कीं काय असा भास होत होता. आलेल्या गृहस्थास पाहून मोठ्या आनंदानें तो म्हणाला, 'काय बिरबल महाराज, आपण येण्याची तसदी कां घेतली? राणी साहेबांची प्रकृति तर ठीक आहेना?' हा त्याचा प्रश्न ऐकून बिरबल हंसत

हंसत म्हणाला 'वैद्यराज, तसेंच कांहीं काम पडलें म्हणजे आपलेकडे आम्हांला यावें लागतें. राणीसाहेबांची प्रकृति ठीक आहे म्हणा! वैद्यराज, मी आपणाकडे विशेष कांहीं कामाकरितां आलों आहें. आपण अगोदर खालीं बसा म्हणजे सांगेन. पण; वैद्य म्हणाला 'पण काय? आम्ही आपलें काम करणार नाहीं असें का आपणाला वाटतें?'

**बिरबल**–तसें नाहीं हो वाटत. तुमच्या हातून काम होईल अशी खात्री आहे. तरी पण.—

**वैद्यराज**–खात्री असतां 'तरी पण' कशाला पाहिजे? काय काम तें सांगा. राणीसाहेबांचें काम जर आमच्या हातून होऊं नये, तर मग त्यांच्या पदरीं राहिल्याचें सार्थक तें काय?

**बिरबल**–काम जरा नाजूक आहे म्हणून सांगण्याला शंका येते.

**वैद्यराज**–ह्या गरिबाजवळ शंका बाळगण्याचें प्रयोजन नाहीं.

**बिरबल**–आपलें म्हणणें कांहीं खोटें नाहीं, तरी पण कामाचें महत्व जाणून सावधगिरी ठेविली पाहिजे.

**वैद्य०**–मग ही शंका जाण्याला उपाय काय?

**बिरबल**–उपाय आहे. पण तुम्ही कबूल कराल तर—

**वैद्य०**–कबूल न करण्याला काय झालें?

**बिरबल**–तुम्ही आपल्या आराध्य देवतेची शपथ घ्याल तर मग सांगण्याला कांहीं हरकत नाहीं.

**वैद्यराज**—ठीक आहे. तुमच्या जवळ शपथ घेण्याला काय हरकत आहे?

**बिरबल**—मग कांहींच हरकत नाहीं.

इतकें दोघांचें भाषण झाल्यावर ते त्या दिवाणखान्यांतून उठले व त्याला लागून जवळच देवघराची खोली होती त्या खोलींत गेले. ह्या समयीं दिवे लावण्याची वेळ झाली होती. हे दोघे देवघरांत गेले तेव्हां देवघरांत एक स्त्री देवाजवळ दिवा लावीत होती. दिव्याचा उजेड तिच्या तोंडावर पडला होता. ही स्त्री सुंदर असून वयानें सुमारें अठरा वर्षांची दिसत होती. नाक डोळे वगैरे अवयव मोठे रमणीय दिसत होते. ही मोठी रंगेल असावी असें पाहतांच दुसऱ्याच्या मनांत यावें असा तिचा एकंदर पेहेराव होता. ही वैद्यबोवांची तृतीय संबंधाची बायको होती. वैद्यबुवांना गांवांतील सर्व लोक जरी वैद्यराज किंवा वैद्यमहाराज असेंच म्हणत असत, तरी त्यांचें खरें नांव करुणाशंकर असें होतें. त्यांच्या बायकोचें नांव ललितागौरी असें असून ही तिसऱ्या लग्नाची बायको असल्यामुळें हिला शेजारी पाजारी 'नवी' ह्याच नांवानें हांका मारीत असत. ललितागौरी ही मोठी विलासी बायको होती; नवऱ्याजवळ पैसे पुष्कळ होते, पण त्याचा स्वभाव फार चिक्कू असल्यामुळें एक पैसा खर्च करण्याला त्याच्या मोठें जिवावर येई. ललितागौरीला पैसे खर्च करणें म्हणजे कांहींच वाटत नसे. खानपान चांगलें असावें, वस्त्रपात्र नीटनेटकें असावें, घरांत व्यवस्था सुरेख ठेवावी, आल्या गेल्यानें बरें म्हणावें, इकडे तिचा कल जास्त असे. हें तिचें करणें नव-

ऱ्याला कांहीं मनापासून आवडत नसे, तरी तिच्या लाडा-मुळें तो फारशी हरकतही घेत नसे. हे दोघे देवघरांत शिरतांच ललितागौरी दिवा लावून दिवाणखान्यांत निघून गेली. देवघरांत आल्यावर वैद्यराजानें विचारिलें, 'बोला काय शपथ घेऊं? पण अगोदर माझें थोडेसें बोलणें आहे.'

**बिरबल**—बोला काय तें? अगोदर सगळा निकाल लागला पाहिजे.

**वैद्य०**—मागून तक्रार काय कामाची? ऐका तर महाराज. आपण शपथ घेऊन ज्या अर्थीं कांहीं कामगिरी सांगणार त्या अर्थीं ती तशीच महत्वाची असून मोठी भयंकरही असण्याचा संभव आहे. अर्थात् तिच्याबद्दल मोठीच सावधगिरी ठेवावी लागणार. रात्रंदिवस मनाला हुरहुर लागणार. तेव्हां ह्या गोष्टीचा विचार होऊन बक्षीसही मोठेंच असलें पाहिजे. एवढीच ह्या गरिबाची विनंति आहे.

**बिरबल**—ठीक बोललांत. तुह्मांला काम झाल्यावर दहा हजार रुपये रोख मिळतील. शिवाय आगाऊ खर्चाकरितां म्हणून एक हजार रुपये देण्याचा आमचा विचार आहे.

**वैद्यराज**—( मोठ्या आनंदानें ) महाराज, आपण योग्य विचार कराल ह्याबद्दल मला मुळींच शंका नव्हती; तरी पण म्हटलें एक वार बोलून टाकावें.

**बिरबल**—झालें तर आतां. शपथ घेण्याला हरकत नाहीं. शपथ अशी घ्या कीं, "तुम्ही अम्हाला कामगिरी सांगाल तिजबद्दल कोणालाही मी एक अक्षरसुद्धां बोलणार नाहीं." मी कशाला आलों हें देखील कोठें कळतां उपयोगी

नाहीं. शिवाय आमच्या कटांत तुमची सर्व प्रकारची मदत असावी. ह्यामध्यें तुमची कोणत्याही प्रकारची दगाबाजी असूं नये.

बिरबलाचें इतकें सगळें भाषण ऐकून घेतल्यावर त्यानें बेचराजी मातेचें स्मरण करून शपथ घेतली. त्याची शपथ घेऊन झाल्यावर बिरबलानें त्याच्या कानांत कांहीं सांगितलें. तो मजकूर ऐकत असतां त्याची मुद्रा कावरी-बावरी दिसूं लागली. अखेर त्याचें तोंड काळेंठिक्कर पडलें. त्याच्या चेहऱ्याकडे बिरबलाचें सारखें लक्ष होतें, त्याच्या मुद्रेंत फरक पडलेला पाहून तो त्याला म्हणाला, 'वैद्य महाराज, शपथेचें स्मरण आहेना?' आपल्या मनांतील घोंटाळा बाहेर पडला असें त्याला वाटून तो अगदीं शरमून गेला. तरी मोठें अवसान आणून तो म्हणाला, 'हें काय विचारितां? सती जाण्याला निघते ती कांहीं आगीला भीत नाहीं.

**बिरबल**–बरें तर तुम्ही आपल्या तयारीला लागा. रुपये तुमच्याकडे उद्या पोंहोचते करीन. मुदतींत काम झालें पाहिजे. बाकीची खबरदारी तुम्ही घ्यालच! आतां मी रजा घेतों.

असें म्हणून ते दोघे उठले; व दिवाणखान्यांत आले. वैद्यराजांनीं पान खाऊन जा म्हणून बराच आग्रह केला तरी आलेला गृहस्थ न थांबतां जिना उतरूं लागला. वैद्यराज त्याला खालच्या दारापर्यंत पोंहोचवून परत दिवाणखान्यांत आले, तेव्हां त्यांच्या मनाला स्वस्थपणा नव्हता असें त्यांच्या कृतीवरून उघड उघड दिसत होतें. कांहीं वेळ त्या गादीवर

बसून पुन्हां तेथून खिडकीकडे जात, तेथें कांहींवेळ थांबून त्या फडताळांकडे जात, असा त्यांचा क्रम चालला होता. इतक्यांत त्यांची पत्नी दिवाणखान्यांत आली. पतिराज गादीवर लोडाला टेकून बसले होते. तिला येऊन बरीच वेळ झाला तरी त्यांचें तिच्याकडे मुळींच लक्ष नव्हतें. आज स्वारी कांहींतरी विचारांत गढून गेली आहे असें पाहून ती कांहीं बोलली नाहीं; पण नवऱ्याची चर्या फिरलेली पाहून असें होण्याचें कारण काय, हें तिला विचारल्याखेरीज राहवेना.

अखेर ती म्हणाली—'मी केव्हांची वाट पहातें आहें कीं कांहींतरी बोलणें होईल! पण माझी अगदींच निराशा झाली. आज असा कोणता एवढा गहन विचार चालला आहे?' ललितागौरिला वाटलें होतें कीं कांहींतरी उत्तर मिळेल, पण तें वाटणें व्यर्थ होतें. तो गादीवर लोडाला टेंकून विचार करीत पडला होता. त्यानें नुसतें तिच्याकडे पाहिलें मात्र. ललितागौरी दारांत उभी होती ती त्याच्या जवळ गेली आणि शेजारीं बसून तिनें कपाळाला हात लावून पाहिला, अंगाला हात लाविला व ती पुन्हां विचारूं लागली, 'आज कपाळकां दुखत आहे? जरा तूप चोळूंका?'

आपली लाडकी अगदीं जवळ येऊन बसली असून ती आपल्या प्रकृतीची कळकळ दाखविते असा विचार मनांत येऊनच कीं काय तो तिला ह्मणाला. 'प्रिये, आज मला बरें वाटत नाहीं. बिरबल महाराज गेल्या-पासून मला अगदींच भांबावल्यासारखें झालें आहे.'

ललि०—ह्याला कारण काय पण?

**वैद्यराज**—कारण तर कांहीं विशेष आहे असें नाहीं. राणीसाहेबांची प्रकृती जरा बिघडली आहे असें ऐकल्यापासून मनाला स्वस्थपणा नाहीं. लौकर जेवण आटोपून वाड्यांत जावें असा विचार आहे. दोनप्रहरचें जेवण तयार असेलच? जा लौकर तयारी कर.

**ललि०**—मी दोनप्रहरचें अन्न कधींच ठेवीत नाहीं. तें शिळे तुकडे कोणीं खावेत? आज शिरापुरी करावी असा माझा विचार आहे. भाजी कांहींतरी चांगलीशी मागवा.

**वैद्यराज**—कालची भाजी सर्व कशी संपली? काल एक पैशाचा तांदुळजा आणिला होता; निदान चार वेळा तरी तो पुरेल असें मला वाटलें होतें.

**ललि०**—मी तो सगळा आपल्या दिवाळीला देऊन टाकिला. भिकाऱ्यासारखी तांदुळज्याची भाजी कोण खातें? कांहीं तरी फळभाजी घेऊन या.

**वैद्यराज**—लाडके, आपण कोठें असे श्रीमंत आहोंत? कसेबसे दिवस काढले पाहिजेत. ज्या त्या कामांत तुझा आपला हट्ट असतो. पैशाकरितां कोण यातायात करावी लागते हें तुला कांहीं कळत नाहीं.

**ललि०**—पण मी काय जास्ती खर्च करितें? उगाच माझे नांवाची ओरड! खाणें तें देखील नीट नको का? हातपाय तर चालले पाहिजेत ना! मिळवायाचें तें कशाला? खाण्याकरितां ना?

**वैद्यराज**—तुला कळत नाहीं तें हेंच. फक्त निर्वाहापुरतेंच खाल्लें पाहिजे.

ललि०—पण भाजी आणावयाचीना? आपण भाजी घेऊन यावें. मी स्वयंपाक करायाला जातें, पण लौकर येणें होईलना?

ह्या तिच्या बोलण्यावर तो विशेष कांहीं बोलला नाहीं. आपल्याशींच कांहीं पुटपुटत पेटींतून पैसे काढून घेऊन पागोटें घेण्याकरितां उठला. ललिता उठून चालती झाली. वैद्यराज डोक्याला पागोटें घालून व खाकेंत धोतर मारून जिना उतरूं लागले. पुढें भाजी येऊन शिरापुरीचें चमचमीत जेवण झालें असेल हें सांगण्याची विशेष जरूर नाहीं.

# भाग २ रा.

## धैर्यसिंग महाराज व भुवनसुंदरी.

शहरापासून पश्चिमेकडे अर्ध्या कोसावर सिंधु नदीच्या कांठीं राजवाडा होता. त्याच्या सभोंवार औरसचौरस तीन कोस घेराचा एक सुंदर बगिचा केला होता. त्याला तीन बाजूंनीं पक्क्या विटांचा छातीभर उंचीचा कोट असून उत्तरेकडच्या अंगानें नदी वाहत होती. तिला सुंदर मोठमोठाले दगडी घाट बांधलेले होते. त्या बागेचा मुख्य दरवाजा दक्षिणेकडच्या बाजूला असून त्या दरवाजावर हत्यारबंद लोकांचा पहारा होता. त्या दरवाजानें आंत शिरलें म्हणजे उजव्या हाताकडे कोटाबरोबर सारख्या अंतरानें पारिजातक, चंपक, गुलतुरा, हिरवाचांफा, कांचन, माचळ

वगैरे पुष्पवृक्ष सभोंवार मोठ्या खुबीनें लाविलेले होते. त्यांची व्यवस्था नीट ठेवून ते गेंदाप्रमाणें झुबकेदार दिसावेत अशाबद्दल माळीलोक फार मेहनत व काळजी घेत असावेत असें त्यांच्या आकारावरून दिसत होतें. ह्या झाडांच्या बाजूनें वर्तुळाकार सुंदर रस्ता केलेला होता. तो पुन्हा मुख्य दरवाजांत येऊन पोंहचला होता. ह्या रस्त्याच्या बाजूला डाव्या हाताला प्रथम मोगऱ्याचे ताटवे, त्याच्यापुढें दमनशेवंती, त्याच्यापुढें गुलाब, पाच, दवणा, मरवा, गुलछब्बू अशा फुलझाडांचे ताटवे कांहीं चौकोनी, कांहीं वर्तुळाकार, कांहीं तिकोनी, कांहीं अष्टकोनी असे निरनिराळ्या आकारांचे लाविले होते. ह्याप्रमाणें राजवाड्यापर्यंत एकंदर सोळा रस्ते होते. शिवाय प्रत्येक ताटव्यांतून आडवे व नागमोडी रस्ते निरनिराळे गेले होते. राजवाड्यासमोर एक वर्तुळ करून त्याच्या मधोमध एक लहानसा हौद असून त्यांत हजारी कारंज्याचे फवारे नेहमीं उडत असत. त्या वर्तुळाला वळसा घालून राजवाड्याच्या मुख्य दरवाजाकडे यावें लागत असे. ह्या बागाला पाण्याचा पुरवठा होण्याकरितां नदीचा कालवा आणून त्याचें पाणी सर्व बागेंत खेळविलेलें होतें. हा राजवाडा जुन्या चालीचा असून चार मजली होता. ठिकठिकाणीं गच्च्या व गोपुरें होतीं. ह्या राजवाड्याला सात चौक होते. शेवटच्या चौकांत राजाचा जनानखाना नदीकडच्या बाजूला होता. पुढील चौकांत सर्व कचेऱ्या होत्या, दुसऱ्या चौकांत राजाची खानगी कचेरी होती व बाकीचे चौक राजाच्या निरनिराळ्या कारखान्यांकडे रोखले गेले होते. ज्या काळचा आम्ही इतिहास सांगत आहों त्यावेळीं

यादवकुळांत उत्पन्न झालेला धैर्यसिंह नांवाचा राजा ह्या ठिकाणीं राज्य करीत होता. ह्याला दोन राण्या होत्या. परंतु धाकटी राणी एक कन्या झाल्यानंतर मृत्यु पावली होती. राजाच्या वडील राणीला कांहींच अपत्य झालें नव्हतें. ह्या वेळीं राजाचें वय सुमारें साठ वर्षांचें होतें. व त्याच्या वडील राणीचें वय चाळीस वर्षांचें होतें. राजाला जी मुलगी होती तिला नुकतेंच सोळावें वर्ष लागलें होतें. त्याकाळीं तिच्या सौंदर्याची बरोबरी करणारी अशी राजकन्या कोणीच नव्हती असा लोकांचा समज होता. राजाला दुसरें कांहीं अपत्य नसल्यामुळें मुलीवर राजाचा फारच लोभ होता. एके दिवशीं संध्याकाळीं जनानखान्याच्या मागील दारानें महाराज आंत शिरले. त्यांचा पोषाक पांढरा शुभ्र होता. त्यांची पिकलेली पांढरी शुभ्र दाढी छातीवर पसरलेली होती. त्यांच्या हातांत किनखापाच्या म्यानांत घातलेली तरवार होती. कमरेला शेला गुंडाळलेला होता. त्यांत दोन बाजूला दोन म्यानांत घातलेले जंबिये खोंचलेले होते. ह्यांचें कपाळ रुंद असून भव्य व तेजस्वी होतें. डोळे मोठे असून पाणीदार होते. नाक सरळ होतें. चेहरा लांबट व सुंदर होता. ह्यांचा वर्ण गौर असून राहणी सभ्यपणाची व साधी होती. हे मोठ्या करारी स्वभावाचे होते. ह्यांच्यापुढें कोणाचें कांहीं चालत नसे. हे मागच्या दरवाजानें आंत शिरले ते तडक तसेच पुढें चालले. कांहींसें पुढें गेल्यावर त्यांना कोंपऱ्यांत एक जिना लागला. त्या जिन्यानें वर चढले ते एका मोठ्या दालनांत दाखल झाले. तेथें हत्यारबंद लोकांचा पाहरा होता. महाराज वर येतांच सर्व पाहेरक-

ऱ्यांनीं मोठ्या आदबीनें मुजरा केला. किंचित् हंसून महाराजांनीं त्याचा स्वीकार केला, व तसेच पुढें चालले. त्या मोठ्या दालनांतून पुढें एक दार लागलें, तें ओलांडून महाराज पुढें गेले तों एक जिना लागला. तो जिना चढून महाराज वरती तिसऱ्या मजल्यावर गेले. तिसऱ्या मजल्यावर महाराजांचा जनानखाना होता. जनानखान्यावर पाहरा करणाऱ्या सर्व स्त्रिया होत्या. महाराज आले असें पाहून त्या मोठ्या मर्यादेनें उभ्या राहिल्या. महाराज जनानखान्यांत शिरतांच त्या आपल्या जाग्यावर बसल्या. महाराज महालांत येतांच राणीसाहेब आपल्या बिछायतीवरून उठून उभ्या राहिल्या. ज्या दिवाणखान्यांत राणीसाहेब बसल्या होत्या तो अष्टकोनी असून तेथील व्यवस्था फारच सुरेख होती. भिंतींना गुलाबी रंग दिलेला होता. वरती पांढरें छत असून त्या छतावर सुंदर वेलबुट्टी काढलेली होती. मधोमध वर्तुळें असून त्यांत सुंदर कृष्णलीलेचीं चित्रें काढलेलीं होतीं. खिडक्यांना मश्रूचे व भरगच्चीचे पडदे असून त्यांना मोठमोठाले रेशमी गोंडे लाविलेले होते. जमिनीवर गालिचे पसरलेले होते. त्या महालाच्या मधोमध एक सोन्याचा छप्परपलंग असून त्यावर स्वच्छ जाळीदार रेशमी कापडाची मच्छरदाणी होती, व तिला अस्मानी रंगाच्या रेशमी कापडाचा संजाप लाविलेला होता. त्या पलंगावर मखमलीची हातभर उंचीची गादी पसरलेली होती, व तिच्यावर मलमलीचा स्वच्छ पांढरा पलंगपोस हांथरलेला होता. किनखापाच्या व मश्रूच्या उशा व गिरद्या सफेद गलेफ घालून मांडलेल्या होत्या. दारांतून आंत शिरल्यावर प्रथमच एक चांदीचा

चोफाळा चांदीच्या कड्यांना लटकावून दिलेला होता. त्यावर लहानशी मखमालीची गादी असून एक भरजरीचा लहान तक्या ठेवलेला होता. चोफाळ्याजवळ खालीं पान-सुपारीचा एक डबा होता तो सोन्याचा असून त्यावर नक्षी फारच उत्तम केलेली होती. त्याच्याजवळच चांदीचें एक मोठें तस्त ठेवलेलें होतें. एका कोनांत तिवईवर पाण्याची चांदीची एक सुरई असून तीवर सोन्याचा पेला उपडा ठे-विलेला होता. दुसऱ्या कोनांत एक हस्तिदंताची फारच उत्तम नकशी केलेली पेटी होती. ती बहुतकरून वेणीफ-णी करण्याची पेटी असावी. महाराज जनानखान्यांत गेले तेव्हां राणीसाहेब चोफाळ्याच्या एका कोंपऱ्यास उभ्या रा-हिल्या होत्या. त्यांच्या हातांत एक पांढरा रेशमी हातरुमाल होता, त्याच्या घड्या करण्याचें व पुन्हां जशाचा तसा कर-ण्याचें काम चाललें होतें. त्यांचें लक्ष त्या रुमालाकडे लागलें आहे असें वर वर मात्र दिसत होतें. परंतु महा-राजांकडे त्यांचें खरें लक्ष असावें असें त्यांच्या चंचल दृष्टी-वरून वाटत होतें. ह्यांचा बांधा उंच असून निकोप होता. ह्यांचा केशकलाप काळा कुळकुळीत असून त्याचा बुचडा बांधलेला होता. मधोमध भांग असून तो मौक्तिकओळी-प्रमाणें पांढरा दिसत होता. डोक्यांत त्यांनीं कांहींही भूषणें घातलीं नव्हतीं. ह्यांचें कपाळ विस्तृत असून त्याचा रंग हस्तिदंताप्रमाणें पांढरा होता. त्यावर पिंपळपानी कुंकु-मतिलक शोभत होता. ह्यांचा चेहरा सुंदर असून राहणी सभ्यपणाची होती. ह्यांचा स्वभाव फारच मानी होता. महाराज त्यांचा मान चांगला ठेवीत असत. महाराज करारी

स्वभावाचे व राणी साहेब मानी असल्यामुळें कधीं कधीं त्यांचा एखाद्या कामांत मतभेद होऊन काम बरेंच चिरडीला जात असे. डाक्याची पांढरी मलमल त्या नेसल्या होत्या. तिला बारीक जरीची कोर लाविलेली होती. अंगांत दोरव्याची जरीकांठीं तंग कांचोळी होती. ह्यांनीं कच्छ घातला नव्हता. डोक्यावर साधारण पुढील भाग उघडा राहील, असा त्यांनीं पदर घेतला होता. नाकांत किंवा कानांत त्यांनीं कांहीं अलंकार धारण केला नव्हता. गळ्यांत एक मोत्यांचा कंठा होता त्याचीं मोत्यें करवंदा एवढालीं असून पाणीदार होतीं. हातांत मोत्याच्या पाटल्या होत्या. उजव्या हाताच्या करांगुलींत एक हिऱ्याची आंगठी होती. तिचा हिरा मोठा पाणीदार होता. त्यांचा हात हातरुमालाच्या घड्या करण्यांत गुंतला होता, तेव्हां त्याची चमक एकसारखी चालली होती. पायांत सोन्याचे तोडे असून पायांच्या बोटांत सोन्यांची रणजोडवीं होतीं. त्यांस वाड्यांतील सर्व नोकर लोक मासाहेब ह्याच नांवानें हाक मारीत असत, परंतु त्यांचें नांव भुवनसुंदरी असें होतें.

महाराज महालांत आल्यावर झोंपाळ्यावर बसले. राणी साहेब शेंजारी उभ्या होत्या. राणी साहेब उभ्या राहिल्या आहेत असें पाहून महाराज म्हणाले 'कां आतां उभ्या किती वेळ राहणार? बसा तरी.'

महाराजांनीं याप्रमाणें सांगितल्यावर त्या महाराजांच्या शेजारीं झोंपाळ्यावर बसल्या. त्या झोंपाळ्यावर बसल्यावर महाराज म्हणाले— 'काल ज्या तुमच्याकडे तसबिरा पाठ-

विल्या होत्या त्यांचें काय केलें ? राणकदेवीला दाखविल्या किंवा नाहीं ?

**राणी**–मी त्या तसबिरा दासीबरोबर तिच्याकडेच पाठवून दिल्या होत्या; त्यांतून एक तसबीर तिनें आपल्या जवळ ठेविली आहे; बाकीच्या मजकडे परत पाठवून दिल्या.

**राजा**–कोणाची तसबीर तिनें आपल्याजवळ ठेविली आहे ?

**राणी**–सौराष्ट्राच्या महाराजांचा धाकटा कुंवर खेंगारजी, ह्यांची तसबीर ठेविली आहे.

**राजा**–( आनंदानें ) मग गुर्जराधिपाची तसबीर तिला आवडली वाटतें ! आपल्या मनांत सिद्धराजाला देण्याविषयीं फार होतें नव्हे काय ?

**राणी**–आणि तें कांहीं गैर नव्हतें. शौर्य, गुण व संपत्ति ह्या कोणत्याही गोष्टींत त्यांचे ठिकाणीं न्यूनता नाहीं; पण पोरींच्या मनास तो कां आला नाहीं न कळे !

**राजा**–खेंगारही कांहीं कमी नाहीं. त्याच्या शौर्याची तर मोठी ख्याति आहे. स्वरूपही उत्तम आहे असें नव्हते का ते ब्राह्मण सांगत ? राणकदेवीनें ती गोष्ट ऐकिली तेव्हांच तिची वृत्ति चंचळ दिसूं लागली. माझा तर्क असाच होता कीं त्यांचीच तसबीर ती पसंत करील ह्मणून !

**राणी**०–पण तें स्थळ आपल्या बरोबरीचें आहे असें का आपणाला वाटतें ? खेंगार हा राजपुत्र आहे तरी सर्वांत धा-

कटा आहे. तो कांहीं राज्याचा अधिकारी नाहीं. मग त्याला देण्यांत फायदा काय?

**महाराज**—हा विचार तिनेंच करावयाचा आहे. तिला दोघांचे गुणदोष समजले आहेत. असें असून ज्या अर्थी तिनें तीच तसबीर पसंत केली, त्या अर्थी आतां आपणाला तिच्या म्हणण्याला रुकार दिला पाहिजे. आतां त्याला राज्य नाहीं तरी आपल्याला तरी संतति कोठें आहे? ह्या राज्याला तरी कोणी मालक पाहिजे. आतां कांहीं आपल्याला पुत्र होण्याची आशा नाहीं. तेव्हां कन्यादानांत जांवयांच्या स्वाधीन राज्य करावें व आपण मोकळें होऊन हरिहरि म्हणत बसावें, असा माझा विचार आहे.

**राणी**—मग दत्तकाचा विचार रहितच कां झाला?

**महाराज**—तो विचार पूर्वी होता, पण आतां दत्तक घेऊं नये असें वाटूं लागलें आहे. दत्तक घेतल्यापासून माझ्या प्रजेला सुख मिळेल असें वाटत नाहीं. एखाद्या भिकाऱ्याच्या पोराला दत्तक घेऊन त्याच्या स्वाधीन राज्य करण्यापेक्षां आपल्या जांवयाला देणें काय वाईट? माझ्या मुलीचा तरी रयतेकडे ओढा असेल. तिला जीं मुलें होतील त्यांनांही आपल्या आजोळच्या कुळाचा अभिमान वाटेल! सगळ्या सरदारांचा व मुत्सद्दी मंडळीचा देखील असाच विचार पडला आहे.

**राणी**—पण मी सांगू कां? हें करणें कांहीं बरें नव्हे. आपल्याला पाणी पाजण्याला कोणी तरी आपल्या कुळांतला पाहिजे. धर्मशास्त्रानें देखील दत्तक पुत्र घेण्याला ह्याच करितां परवानगी दिली आहे. एखादा लहानसा

मुलगा घ्यावा ह्मणजे तो वाईट निघण्याचा संभव कमी असतो. आपल्या देखरेखीखालीं त्याला शिक्षण मिळालें म्हणजे मग तो वाईट कसा निघेल?

**महाराज**—आतां ह्या प्रश्नाचा विचार करावयाचा नाहीं. ह्याचा निकाल पूर्वीच झाला आहे. सबब माझें मन वळविण्याचा प्रयत्न करणें अगदींच व्यर्थ आहे.

**राणी**—काय बाई तरी हें बोलणें? मला कशाला त्या गोष्टीची उठाठेव पाहिजे. मी कांहीं आपल्या कारितांच दत्तक घेण्याला सांगत नव्हतें. आपल्याला नाहीं आवडत तर मी तरी कशाला आग्रह करूं? माझें काय त्यांत नफानुकसान आहे? जांवयाला दिलें तरी एकच. आणि दत्तक घेऊन त्याला दिलें तरी एकच. आपलें मला वाटलें तें सांगितलें.

**महाराज**—आपल्या एकुलत्या एक मुलीचें कल्याण करणें हें आपलें कर्तव्य आहे. तशांत राणकदेवीचा तुमच्यावर लोभ तरी किती आहे! तिच्या मनांत कांहीं तरी तुमच्याविषयीं प्रतारणा आहे कां?

**राणी**—प्रतारणा पूर्वी नव्हती खरी.

**महाराज**—म्हणजे ह्याचा अर्थ काय? आतां ती तुमच्याबरोबर प्रतारणा करूं लागली?

**राणी**०—तो मदनसिंग तिचा मावसभाऊ तिच्याजवळ राहिल्यापासून तिच्या वृत्तींत कांहीं तरी फेर पडला असावा असें निदान मला तरी वाटतें. मी तिकडे विशेष लक्ष देत नाहीं म्हणा, पण आपली ओघाला गोष्टच आली म्हणून सांगितलें.

**महाराज**—अशी कोणती गोष्ट झाली?

**राणी**—परवांच संध्याकाळीं काळकामातेला जाऊं नको म्हणून मी तिला सांगितलें असतां ती निघून गेली. आजपर्यंत तिनें अशी माझी अमर्यादा कधीं केली न्हती.

**महाराज**—मला तिनें विचारिल्यावरून मीच जाण्याला परवानगी दिली होती.

**राणी**—आपण दिली काय आणि मी दिली काय एकच; पण मी नको म्हटलें असतां आपणाला विचारून जाण्याची मसलत तिला त्यानेंच दिली असली पाहिजे असा माझा तर्क आहे.

**महाराज**—मदनसिंगाविषयीं तुमचा कोणी तरी भलताच ग्रह केला असावा असें तुमच्या बोलण्यावरून मला वाटतें. खरोखरच तो मोठा योग्य मनुष्य आहे. त्याला मी दुय्यम सेनापतीची जागा देणार आहें.

**राणी**—तो चांगला असेल. त्याबद्दल माझें कांहीं म्हणणें नाहीं, पण मला शंका येते.

**महाराज**—ह्याला कारण काय? मदनसिंग हा तुमच्या सवतीच्या बहिणीचा मुलगा आहे हेंच कीं नाहीं?

**राणी**—आजबाई खोंचून बोलण्याची शिकस्तच झाली! मी कधीं तरी त्यांच्याजवळ भांडलें होतें कां? कदाचित् एखाद वेळ बोलाचालीचा प्रसंग आला असला, तरी त्याला कांहीं तरी कारण झालें असेल.

**महाराज**—पण मी तरी कारणाखेरीज सवती भांडतात असें कोठें म्हणतों आहें? त्या कारणानेंच भांडतात

व तें कारण किती पण योग्य असतें? उंदराचें व मांजराचें भांडण होण्याला जें कारण लागतें, किंवा कोंबडयाचा व खोंकडाचा कज्जा होण्याला जें निमित्त असतें, तितकेंच निमित्त सवतींच्या भांडणाला पुरतें.

**राणी**—मी आतां आपली उगाच बसतें. आपला कोटिक्रम फारच वाढला. मी कशी वागत होतें तें परमेश्वराला माहीत.

असें म्हणतांच तिच्या डोळ्यांतून पटापट अश्रु गळूं लागले; राणीकडे महाराजांची नजर असल्यामुळें त्यांच्या लक्षांत ही गोष्ट तेव्हांच आली. आपल्या शब्दांबद्दल राणीसाहेबांना दुःख झालें ह्याबद्दल त्यांनाही वाईट वाटलें. त्यांनीं आपल्या रुमालानें तिचे डोळे पुसले व म्हणाले—' मी थट्टेनें बोललों त्याबद्दल वाईट वाटण्याचें काय कारण? मी जगाची गोष्ट सांगितली. तुमचें वर्तन माझ्या स्मरणांत आहे. अजूनसुद्धां सवतीच्या मुलीवर किती प्रेम करितां हें मला पक्कें माहीत आहे. राणकदेवी वारंवार माझ्याजवळ आपल्या मायाळूपणाबद्दल तारीफ करीत असते. ह्या गोष्टी मला माहीत असतां आपणाला लागण्याकरितां मी मुद्दाम कसा बोलेन? सहज आपला विनोदानें बोललों त्याबद्दल आपल्याला इतकें वाईट वाटेल असें मला मुळींच वाटलें नव्हतें. बरें असो, झालें तें आतां कांहीं परत येत नाहीं. मी आतां देवदर्शन करण्याकरितां जातों. रजा आहेना?

**राणी**—देवदर्शनास जाण्याला प्रतिबंध करीन इतकी का मी पापी आहें?

**महाराज**—तें मला माहीत आहे, पण आज स्वारी रागांत आहे म्हणून म्हटलें.

**राणी**—आपण चालविता म्हणून राग आणि सर्व. नाहीं तर कोणत्या झाडाचा पाला आम्ही.

ह्यावर महाराज कांहीं न बोलतां विडा घेऊन देवदर्शनास जाण्याकरितां महालांतून निघून गेले.

# भाग ३ रा.

## राणकदेवी व इंदुमती.

मागील भागांत सांगितलेला प्रकार झाल्यावर दुसरे दिवशीं संध्याकाळीं राजवाड्याच्या पाठीमागच्या घाटावर चौघी स्त्रिया फिरत होत्या. त्यांत दोघीजणी पुढें असून त्या हळूहळू आपसांत कांहीं बोलत होत्या. त्यांच्या मागून बऱ्याच अंतरावर दुसऱ्या दोघीजणी येत होत्या. ज्या पुढें चालल्या होत्या त्या घाट उतरू लागल्या व पाण्यावर जी कोरडी पायरी होती तेथपर्यंत गेल्या; तेथें गेल्यावर एक दुसरीला म्हणाली, 'ही जागा चांगली कोरडी आहे, वाराही चांगला सुटला आहे, तर येथें आपण बसूं या.' ह्या तिच्या बोलण्यावर दुसरी म्हणाली बसा; ही जागा मानसिक श्रम करून थकलेल्या जनाला विश्रांति घेण्याला उत्तम आहे.' ह्यावर पहिली जरा हंसून म्हणाली, 'पुरे तुझें. तुझी मेली जेव्हां तेव्हां आपली थट्टा.' असें म्हणून त्या दोघीजणीं त्या शिलेवर पाण्याकडे तोंडें करून बसल्या.

प्रथम जी बोलली तिचें वय सुमारें सोळा वर्षांचें असून फारच सुंदर होती. हिचे केंस काळेभोर असून त्याची तिनें वेणी घातली होती. कपाळ रुंद असून त्यावर तिनें जो कुंकुमतिलक लाविला होता तो त्याला फारच शोभा देत होता. भिवया काळ्याभोर असून धनुष्याकार होत्या. डोळे मोठे असून त्यांतील बुबुळें काळीभोर होतीं. त्यांत तिनें काजळ घातलें होतें ह्यामुळें ते फारच सुंदर दिसत होते. नासिका सरळ होती. गाल टवटवीत असून चित्ताकर्षक होते. जेवणी लहान असून अधरोष्ठ पिकलेल्या तोंडल्याप्रमाणें लाल होता. चेहरा वाटोळा असून मोहक होता. छाती नुकतीच फुलूं लागली होती. हात मांसळ असून बोटें सडक होतीं. कमर सुक्ष्म असून नितंब भाग विस्तृत होता. मांड्या कर्दळीस्तंभाप्रमाणें होत्या. पायांचे तळवे लहान असून नाजूक होते. हिचा वर्ण केतकीदलाप्रमाणें असून पाहणाराला मोह उत्पन्न होईल अशी तिची कांति होती. हिचा पेहेराव तिच्या वयाला शोभण्यासारखाच होता. डोक्यांत तिनें मोगऱ्यांचा फुलांचा गजरा घातला होता त्याचा सुवास आसमंतात् पसरला होता. गळ्यांत एक पाचूचा कंठा होता. हातांत हिऱ्याच्या पाटल्या होत्या, हाताच्या बोटांत एक उत्तम माणकाची आंगठी शोभत होती. ती लफ्फेदार काळ्या रंगाचा शालू नेसली होती. अंगांत कांचोळी असून तीवर मोत्यांचें सुंदर जाळी काम केलेलें होतें. हिचें नांव राणकदेवी असें होतें. हीच आमच्या कथानकाची नायिका होय. हिच्या बरोबर जी दुसरी होती ती रूपानें हिजपेक्षां

बरीच कमी असून वर्णानें काळीसांवळी होती. ही राणकदेवीची मैत्रीण असून तिचा बाप हा महाराजांचा एक मानकरी होता. हिचें नांव इंदुमती असें होतें. इंदुमतीवर राजकन्येचें भारी प्रेम होतें. ती तिच्याजवळ आपलें हितगुज नेहमीं सांगत असे. राजकन्या व तिची मैत्रिण ह्या दोघीजणीं नदी किनाऱ्याला घाटावर बसलेल्या पाहिल्यावरून मागून ज्या दोघी दासी येत होत्या, त्या पुढें न येतां मागेंच रेंगाळत राहिल्या. आपल्या दासी मागें राहिल्या आहेत असें पाहून राजकन्या आपल्या मैत्रिणीला म्हणाली 'गडे इंदुमती, तुला कसें काय वाटतें? आमच्या मासाहेबांची वृत्ति हल्लीं पूर्वीप्रमाणें दिसते कां?

**इंदुमती**—तो नवीन मानकरी आल्यापासून मासाहेबांच्या वृत्तींत फरक झालेला दिसतो खरा. पण कारण काय तें मात्र समजत नाहीं.

**राणकदेवी**—अग वेडे, कारणाखेरीज कां असा वृत्तींत फरक पडत असतो? बाबाच्या मनांत दत्तक घेण्याचें मुळींच नाहीं. मासाहेबांना आपल्या माहेरच्या कुळांतला कोणी तरी अज्ञान मुलगा दत्तक घेण्याचें फार आहे. म्हणून जो मानकरी मासाहेबाजवळ आहे तो त्यांच्या भावाचा मुलगा. तो आल्यापासून त्यानें त्यांच्या मनांत दत्तकाची कल्पना जास्तीच भरवून दिली.

**इंदुमती**—महाराजांना दत्तक घेण्याचें कारण काय? तुम्हीं नाहीं कां राज्याला मालक?

**राणकदेवी**—त्यांचा विचार असाच आहे. माझें लग्न झाल्यावर हें राज्य स्वाधीन करून आपण हरि हरि करीत बसावें असा त्यांचा विचार आहे. हा विचार मासाहेबांना पसंत नाहीं. महाराजांच्या मनाप्रमाणें व्यवस्था झाली म्हणजे त्यांचें महत्व कमी होणार आहे. दत्तक एकादें लहानसें पोर घेतलें म्हणजे सर्व राज्यकारभार मासाहेबांच्याच हातांत राहणार! तो भाचा तर दिवाण होणार. इतके देखील त्यांचे बेत ठरले आहेत.

**इंदुमती**—पण तुह्मीं कोणती तसबीर पसंत केलीत? तें कांहीं सांगावयाचेंच नाहींना?

**राणकदेवी**—तुला मी सांगणार नाहीं असें कसें होईल! पण तुला सांगायाला सवडच आली नाहीं. मी तुला महालांत गेल्यावर दाखवीन. काय सांगू बाई, ती तसबीर पाहिल्यापासून मला गडे कसेंसेंच वाटूं लागलें. मी आपलेकडून किती तरी मन आंवरण्याचा प्रयत्न केला, पण कांहींच उपयोग झाला नाहीं. जों जों आंवरण्याचा प्रयत्न करूं लागलें, तसें तसें तें जास्तीच स्वैर सुटूं लागलें.

**इंदुमती**—मग तुम्ही तो नाद सोडून दिला असाल?

**राणकदेवी**—तर मग मी करूं तरी काय? अखेर मी सर्वस्वी त्याच्या स्वाधीन झालें ह्यापेक्षां काय सांगू?

**इंदुमती**—आतां ज्या ठिकाणीं तुमचें मन इतकें तल्लीन झालें तें स्थळही तसेंच असलें पाहिजे.

**राणकदेवी**—मला बाई कांहीं सांगतां येत नाहीं. प्रत्यक्ष तूं तसबीरच पहा, म्हणजे तुला समजेल.

**इंदुमती**—हें सर्व स्वरुपाविषयीं झालें पण गुणांविषयीं तुह्मांला काय माहिती आहे ?

**राणकदेवी**—थोड्याच दिवसांवर कांहीं फिरस्ते ब्राह्मण महाराजांना भेटावयाला आले होते. मी महाराजां-जवळ होतें. त्यांना महाराजांनीं निरनिराळ्या देशच्या पुष्कळ गोष्टी विचारल्या, त्यांचीं त्यांनीं समर्पक उत्तरें दिलीं. नंतर महाराजांनीं निरनिराळ्या देशांतल्या राजपुत्रांविषयीं चौकशी केली. त्यांत त्यांनीं गुर्जर देशच्या राजाची शौर्या-दि गुणांत फारच तारीफ केली व शेवटीं ह्मणाले कीं, सौरा-राष्ट्रांतील महाराजांचे सर्वांत धाकटे कुंवर खेंगारजी ह्यांची तारुण्य, रूप, गुण, इत्यादि गुणांत बरोबरी करणारा असा एकही राजपुत्र आमच्या पाहण्यांत आला नाहीं. हें त्यांचें भाषण ऐकल्याबरोबर माझी स्थिति अगदींच निराळी झाली. तेव्हांपासूनच मला त्यांच्या पायांचा ध्यास लागला होता. प्रत्यक्ष तसबिरीचें दर्शन झाल्यावर तर मग काय वा-टलें असेल ह्याची कल्पना तूंच कर. सखे, खरें सांग, ही माझी इच्छा पूर्ण होईल का पण ?

**इंदुमती**—हो, न होण्याला काय झालें ? महाराजांच्या मनांत असल्यावर दुसऱ्या कोणाचें काय चालणार आहे ?

**राणकदेवी**—तें सगळें खरें, पण मासाहेबांचा विचार अगदींच निराळा आहे.

**इंदुमती**—तरी पण महाराजांचा निग्रह असल्यावर त्या काय करणार आहेत?

**राणकदेवी**—त्या काय करणार आहेत ? काय पाहि-जे तें करतील. मला त्यांची फार भीति वाटत आहे.

**इंदुमती**—भीति वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. आपला निश्चय असला ह्मणजे परमेश्वर सर्व यथास्थित करतो. कांहीं सुद्धां न्यून पडूं देत नाहीं.

**राणकदेवी**—निश्चय आहे अगदीं पुरा. माझ्या मनांत जी रम्य मूर्ति वास करीत आहे, त्या मूर्तीखेरीज जगांतील सर्व पुरुष मला पित्यासमान किंवा भावासमान आहेत. ही माझी प्रतिज्ञा तो सर्वसाक्षी परमेश्वर पूर्ण करो !

**इंदुमती**—हे सगळे तुमचे विचार. पण तिकडचा कांहीं विचार कळला आहे का ? त्यांनीं तुमच्या बरोबर लग्न करण्याचें नाकारिलें किंवा त्यांच्या पित्यानें रुकार दिला नाहीं, तर मग कसें ?

**राकणदेवी**—मग कसें तें काय विचारतेस ? मी त्या पायांचें ध्यान करीत जन्मभर अशीच राहीन.

**इंदुमती**—परमेश्वर सर्व गोष्टी चांगल्याच करील. मग पण ह्या गरीब मैत्रिणीची आठवण तरी होईल का ?

**राणकदेवी**—आठवण न होण्याला काय झालें ? मीं आपल्या बाळमैत्रिणींना कधींसुद्धां विसरणार नाहीं. सखे, मी तुला एक गोष्ट विचारणार आहें, पण खरें सांगशील ना?

**इंदुमती**—ह्मणजे ! मी नेहमीं तुमच्या जवळ खोटें सांगतें असाच तुमच्या बोलण्याचा भाव ना ?

**राणकदेवी**—तसें नव्हे ग.

**इंदुमती**—न सांगायला काय झालें ? विचारा. जें मला माहीत असेल तें सर्व खरें सांगेन.

**राणकदेवी**—हल्लीं आपण मदनसिंहदादाकडे फारशा

चोरून पाहत असतां ? आमच्या वहिनीसाहेब होण्याचा बेत आहे वाटतें ?

**इंदुमती**—माझ्या मनांत असून उपयोग काय ?

**राणकदेवी**—उपयोग कां नाहीं ? मी तुझ्या करितां दादाजवळ भीड खर्च करीन, बाबांना सांगेन, मग नाहीं का काम होणार ?

**इंदुमती**—थोरांनीं मनांत आणल्यावर काय नाहीं होणार ?

**राणकदेवी**—आजपासून मदनसिंहदादांना दुय्यम सेनापतीचा अधिकार महाराजांनीं दिला, ही बातमी तुला समजली असेलच.

**इंदुमती**—मलाच काय सर्व जगाला समजली आहे. व आपल्या भिडेनेंच महाराजांनीं हा अधिकार दिला हेंही बाहेर आलें आहे.

**राणकदेवी**—आमची स्तुति कांहीं नको करायला; तुमचें काम आम्ही एरव्हींच करून देऊं. मग झालें ना !

**इंदुमती**—अशी माझी थट्टाच करण्याकरितां का मला विचारिलें ?

**राणकदेवी**—पण असली थट्टा माझ्या मैत्रिणीला भारी आवडते. जेव्हां जेव्हां मदनसिंहदादाचें नांव तोंडांतून निघतें, तेव्हां कळी कशी उमलते. वर वर मात्र मोठा राग आला असें दाखवावयाचें; मला हें सर्व कळतें बरें का !

**इंदुमती**—तुम्हांला न कळायला काय झालें ? अनुभविक गोष्टीच सांगतां, ह्यांत काल्पनिक कांहीं नाहीं.

**राणकदेवी**—वा ग बरीच आहेस. पहा पण बोलणें कसें लागलेंच फिरविलें तें!

**इंदुमती**—चला उठा आतां; मला ती तसबीर पाहण्याची फारच उतावीळ झाली आहे.

**राणकदेवी**—आणि मदनसिंहदादांना पाहण्यालाही मन आतुर झालें असेल. तेही आतां फिरून परत आले असतील.

**इंदुमती**—तसें कां म्हणाना; तुमच्याजवळ चोरी थोडीच आहे.

**राणकदेवी**—चोरी नाहींच. गडे तूं कांहीं काळजी करूं नको. थोड्याच दिवसांत मी लग्नाचा घाट बाबांना सांगून जुळवून आणीन. परमेश्वरानें कृपा केली तर आपण जन्मभर एकाच ठिकाणीं अशाच आनंदानें दिवस घालवूं.

इतकें भाषण झाल्यावर त्या वाड्यांत जाण्याकरितां निघाल्या; वाटेंत त्यांचें कांहीं भाषण झालें नाहीं. इतक्यांत एका दासीनें मदनसिंहमहाराज आपली वाट पहात महालांत बसले आहेत, अशी राणकदेवीला वर्दी दिली; तेव्हां त्या तडक महालाकडे चालत्या झाल्या.

# भाग ४ था.

## रात्रीची सफर.

रात्रीचे दहा वाजण्याचा सुमार होता. कार्तिक मासांतील वद्य पक्षांतील चतुर्दशी असल्यामुळें, ती रात्र काळोखी होती. आकाशांत अभ्रें होतीं, ह्यामुळें नक्षत्रेंसुद्धां दिसत नव्हतीं. अशा भयंकरवेळीं एक मनुष्य मोंग शहरांतील राजवाड्याच्या बागेंतून बाहेर पडला. त्याला पहारेकऱ्यानें परवर काय म्हणून प्रश्न केला. त्यानें त्याच्याजवळ जाऊन त्याच्या कानांत कांहींसें सांगितलें; खुणेचे शब्द मिळताच त्या पहारेकऱ्यानें जास्ती कांहींच चौकशी न करितां त्याला जाऊं दिलें. त्यानें शहरचा रस्ता धरिला. त्याचा सगळा पोषाक काळा होता. काळोख असल्यामुळें तो कोण मनुष्य असावा ह्याचा बोध होण्यासारखा नव्हता. तो झरा झरा चालला होता, ह्यावरून हा कांहींतरी निकडीच्या कामाकरितां जात असावा. त्यानें खुणेचे शब्द नेमके पहारेकऱ्याला सांगितले व त्याची जास्ती चौकशी न होतां त्याला बाहेर जाण्याला परवानगी मिळाली, ह्यावरून तो राजवाड्यांतलाच कोणीतरी राहणारा असावा. आम्ही आमच्या वाचकांना त्याच्यामागून येण्याविषयीं विनंति करितों. रात्र काळोखी आहे, रस्ता गैरमाहीत आहे, तरी आपणाला त्याच्यामागून जावयाचें असल्यामुळें विशेष भीति बाळगण्याचें कारण नाहीं. तो मनुष्य मोंग शहरच्या मोठ्या रस्त्यांतून पुढें चालला. त्याचें लक्ष सारखें वाटेकडे होतें. जातां जातां तो मोठ्या रस्त्याच्या

अगदीं टोंकाला आला. पुढें वांकडे तिकडे बोळ पुष्कळ लागले. त्या बोळांतलीं घरें अगदींच भिकार दिसत होतीं. रस्त्यांत पडलेली घाण पायाला लागत होती. कोठेंही बाहेर दिवा दिसत नव्हता. ह्यावरून मोंग शहरांतील अगदीं भिकार वस्तींत तो आला असावा असें वाटलें. त्याला जो प्रथम बोळ लागला त्या बोळानें तो समोर गेला; त्या बोळाच्या शेवटीं एक लहानसें बैठें घर होतें, त्या घराजवळ गेला. त्या घराचें पुढील दार लावलेलें होतें. त्यानें मोठ्यानें दारावर धक्का दिला, तेव्हां घरांतून एकानें मोठ्या भयंकर व घोगऱ्या आवाजानें 'कोण आहे बाहेर' असा प्रश्न केला.

त्या मनुष्यानें 'दार उघडा म्हणजे समजेल' असा जबाब दिला. हा शब्द ओळखीचा असावा असा भास होतांच आंतील मनुष्यानें दार उघडलें. परसा (आगटी) पेटलेला होता त्यावरून तें घर कसें होतें हें पाहण्याला संधी मिळाली. तें घर अगदीं ठेंगणें होतें. त्याला भिंती नसून गवताचाच कुड घातलेला होता. त्या घराला जो दरवाजा होता तो बांबूच्या चिपा करून त्यांचेंच कवाड केलेलें होतें. बंद करण्याला आंतून कडी व कोयंडा कांहीं नसून फक्त दोरीनें आंतून बांधून घेत असत. सरासरी दहा हात चौरसचौरस जागा त्या घरांत असेल नसेल. त्या घरांत एक आगटी पेटलेली होती म्हणून मागें सांगण्यांत आलेंच आहे. त्या आकटीजवळ एक लोखंडाचा पातळसा तवा, दोन पाण्याचीं मडकीं, एक जोगली, दोन परळ, एक तवली, लांकडाचा एक पळा, एक गुडगुडी, दोन

फाटक्याशा गोधड्या व एक घोंगडी होती. एका कोनांत एक धनुष्य असून जवळ बाणांचा भाता, व एक तरवार चामड्याच्या म्यानांत घातलेली होती. इतकाच कायतो सरंजाम होता. त्यांपैकीं एक गोधडी जमिनीवर पसरलेली असून तीवर दोन मुलें निजलीं होतीं. एक तीन वर्षांचें असून दुसरें सरासरी पांच सहा महिन्यांचें असेल. हीं दोन्हीं मुलें अगदीं काळींकुट्ट असून चांगलीं लठ्ठ होतीं. त्या मुलांच्या जवळ एक स्त्री बसली होती; हिच्या नेसूं सरासरी हातभर लांबीचा फडका होता. बाकी सर्व दिगंबर वृत्ति होती. डोक्याचे केंस पिंजारलेले असून त्यांना कधीं तेलाचा स्पर्शही झालेला दिसत नव्हता. कपाळ लहान असून डोळे बारीक होते. नाक चपटें होतें. खालचा ओंठ लांब असून दोन दांत पुढें आलेले होते. शरीरानें खुप मजबूत होती. वर्ण काळाकुट्ट होता. हिचें वय सरासरी पंचवीस वर्षांचें तरी असावें असें दिसत होतें. ज्यानें दार उघडिलें तो लंगोटी नेसला होता. ह्याची हजामत बोट बोट वाढलेली असून दाढीचे केंसही तितकेच वाढलेले होते. ह्याचे डोळे मोठे असून रक्तवर्ण होते. नाक मोठें होतें. तोंड फारच भयंकर दिसत होतें. हा ठेंगणा असून गलेलठ्ठ होता. ह्याचा वर्ण त्या बाईसारखाच होता. ह्याचें वय तीस वर्षांपेक्षां जास्त दिसत नव्हतें. ह्या मनुष्याचें नांव काळ्या असें होतें; व त्या बाईचें नांव भुरी असें होतें. ती काळ्याची बायको होती. आतां ती झोंपी गेलेलीं मुलें कोण हें सांगण्याची कांहीं विशेष जरूर दिसत नाहीं. काळ्यानें दार उघडल्याबरोबर नीट न्याहाळून एकवार

त्या येणाऱ्या मनुष्याकडे पाहिलें, व म्हणाला, बिरबल महाराज, एवढ्या रात्रीं कोणालाबी फांसावर चढवणार नाहीं. काळोख अक्षी मी म्हनुनश्यानी राहिला आहे. मोठ्या बिलंद चोरालाबी ठेंचाळत चालावं लागल, अस असून इथ येण्याची तसदी कशापायीं घेतलीन् ?

**बिरबल**–काळ्या, तुजकडे ते आले होतेना ?

**काळ्या**–कोण ? तो रडतराव वैद्य कीं नाहीं ? त्याचें मुंडकेंच कापावें असा राग आला होता.

**बिरबल**–कांबरें ? असें कां झालें ? तो कांकू करूं लागला कीं काय ?

**काळ्या**–हें बघा रावसाब, तो कनई अक्षी चिकु बघा, पई साठीबी प्राण टाकतोया. काळ्याचा जीव काय मोफत हाये होय! माझ्या कारभारणीनेंबी अगदीं नापसंत केला!

**बिरबल**–बरें तें असो, अखेर ठरलें काय तें सांग!

**काळ्या**–दहा हजार रुपये काई लई नाहींत बगा! अमालाबी दहा पांच गडी पाहिले पाहिजेत ?

**बिरबल**–त्यानें किती कबूल केले आहेत ?

**काळ्या**–तो म्हणतो पांच हजार देऊं. नी काम झाल्यावर दोन हजार.

**बिरबल**–बरें तुम्हीं काम करा. मी तुम्हाला पांच हजार आणखी देईन. मग झालें कीं नाहीं ?

**काळ्या**–मग न होण्याला काय झालें.

**बिरबल**—फार सावधगिरीनें काम झालें पाहिजे. मी तुम्हाला सुचना करीनच. त्यावेळीं उडवा बार म्हणजे झालें.

ह्याप्रमाणें दोघांचा संवाद होऊन बिरबल तेथून परत येण्याकरितां निघाला. तो वैद्यबुवाच्या घरीं जो बोळ जातो त्या बोळांत शिरला. ही स्वारी कदाचित् वैद्यबुवांच्या घरीं जात असेल तर आपणालाही त्याच्यामागून गेलें पाहिजे. तो त्या बोळांत गेला खरा, पण वैद्यबुवांच्या घरीं न शिरतां बराच पुढें गेला व एका घरासमोर उभा राहिला. तेथें जरा कानोसा घेऊन त्यानें त्या घराच्या पुढील दरवाज्या-वर थाप मारिली. कांहीं वेळानें दार उघडलें व बिरबल त्या घरांत शिरला. त्या घरांत दिवा जळत होता. ह्यामुळें तेथील व्यवस्था पाहण्यास सांपडली. तें घर बैठें असून लहान होतें. आंत दोनच भाग होते. पुढील भागांत कांहीं सामान नव्हतें. आंतले भागांत मात्र व्यवस्था बरी होती. भिंती तांबड्या मातीनें स्वच्छ सारवलेल्या असून त्यांवर चुन्याचीं कमळें काढिलीं होतीं. वर कडीपाट केलेला होता. ती जागा सुमारें दहा चौरस हात होती. सगळ्या जागेंत जाजम हांतरलेलें होतें. दारासमोरच्या भिंतीबरोबर दोन तक्ये स्वच्छ अभरे घालून मांडले होते. त्यांच्याजवळ एक पानसुपारीचें पितळेचें ताट व एक पिकदाणी होती. एका अंगाला एक पलंग असून त्यावर बिछाना घातलेला होता. तो चांगला स्वच्छ असून वरचा पलंगपोस धोब्याकडून आलेला होता. उशेगतीं एक उशी अस्तर घालून ठेव-लेली होती. पायगतीं एक दुलई होती. एका समईवर दोन वाती जळत होत्या त्यांचा प्रकाश त्या सर्व खोलींत पडला

होता. बिरबलाला दार उघडून आंत घेणारी एक स्त्री होती. ती रूपानें सुंदर होती. तिचें वय अठरा वर्षा-पेक्षां जास्त नव्हतें. बिरबल घरांत आल्यावर एका तक्याज-वळ जाऊन बसला. दार उघडणारी स्त्री त्याच्या समोर बसली. बिरबल खालीं बसल्यावर त्या तरुणीला म्हणाला, कां गुलाब, आज काय खबर आहे?

**गुलाब**–आज कांहीं विशेष नाहीं. ताईसाहेबांनीं खेंगार महाराजांची तसबीर पसंत केली आहे. मी तुमच्या सांगी-प्रमाणें वागण्याला तयार आहें, पण दिलेल्या वचनाचें स्मरण आहेना? मी एवढें पाप माथीं घेण्याला जी तयार होत आहें ती पैसा मिळविण्याकरितां नव्हे, पण ह्या पायां-करितां. दासीपणाचें काम करितें तरी माझा जन्म थोर कुळांत झालेला आहे. ह्या पायांखेरीज मी अन्यपुरुष स्व-प्नांतसुद्धां पाहिला नाहीं, हें मी परमेश्वराला स्मरून सांगतें. आपणाबरोबर लग्न करून संसार करावा ह्याचकरितां मी ह्या भयंकर कटांत सामील होतें. माझें मन मला खात आहे, तरी पुढील सुखाच्या आशेनें मी तिकडे दुर्लक्ष करत्यें.

**बिरबल**–गुलाब, मी तुला जें वचन दिलें आहे त्यांत अगदीं कमी पडणार नाहीं. असल्या सुंदर वस्तूंचा त्याग कोण करील?

**गुलाब**–भ्रमरांना काय? एका फुलांतील मकरंद चाखून झाला म्हणजे चालले. दुसऱ्या फुलांवर.

**बिरबल**–पण मी भ्रमर नाहीं, तेव्हां हें बोलणें मला

कसें लागू होईल? आपलें हें काम शेवटास गेलें म्हणजे मग लग्नाचा विचार!

**गुलाब**—महाराज साहेब शिकारीला कधीं जाणार हें नक्की समजलें का?

**बिरबल**—अजून आठ दिवस अवकाश आहे. इतक्यांत आपणाकडून सर्व तयारी झाली पाहिजे. मी सिद्धराजाला पत्र पाठविलें आहे, त्याचें उत्तर आलें कीं बार उडवावयाचाच! गुलाब, झोंप येते. आज येथेंच निजावें असें मनांत आहे. वाड्यांत जाणें चांगलें नाहीं.

**गुलाब**—मग तयारी आहे. निजावें, मी कुठें जावयाला सांगतें आहे.

**बिरबल**—पहांटेस मला लौकर उठव बरें. मासाहेब उठण्याच्यापूर्वी मला वाडयांत गेलें पाहिजे. सकाळीं मी तेथें नाहीं हें समजलें तर उगाच आमचे नांवाचा बोभाटा व्हावयाचा. हो बरी आठवण झाली. राणकदेवीकडे ती एक मुलगी रोज येत असते ती कोणाची कोण? तुला सगळी हकीकत माहीत असेल.

**गुलाब**—तुम्हाला नाहींका माहीत? आपल्या महाराजांजवळ भवानसिंग म्हणून मानकरी आहेत ते?

**बिरबल**—होय, ते मला माहीत आहेत.

**गुलाब**—त्यांची मुलगी ती. मोती चौकांत त्यांचा वाडा आहे. त्या मुलीला आई नाहीं, भाऊ नाहीं, कोणी नाहीं. बाप आणि ती. नोकर चाकर असतील ते निराळे. आई मेली तेव्हां ती पांच वर्षांची होती. बापाचा लळा तिला

जास्त. एकुलतीएक असल्यामुळें बापाचीही लाडकी आहे. लहानपणापासून तिला ते आपल्याबरोबर वाड्यांत घेऊन येत असत. पुढें ताईसाहेबांबरोबर ती खेळूं लागली. तेव्हां-पासून दोघींचा भारीच स्नेह जमला आहे. त्यांना क्षणभर-सुद्धां एकमेकींना सोडून चैन पडत नाहीं. इलाज नाहीं म्हणून इंदुमती रात्रीं तेवढी घरीं जाते. दोन प्रहरीं ताईसा-हेबांबरोबरच जेवण होतें. मुलगी पंक्तीला असल्याखेरीज आपल्यास जेवण जात नाहीं, अशी ताईसाहेबांना सबब सांगून तिच्या बापानें रात्रीची तेवढी परवानगी मिळविली आहे.

**बिरबल**—आहे मोठी मारू! वर्ण कांहीं गोरा नाहीं; पण नाक, डोळे, कपाळ, हात, पाय, वगैरे अवयव कसे रेखल्यासारखे आहेत. चालण्याची ढब तरी कशी आहे.

**गुलाब**—मदनसिंहजी उगाच का लाळ घोटीत बस-ले आहेत?

**बिरबल**—म्हणजे! मला नाहीं समजलें तूं काय म्हणतेस तें!

**गुलाब**—मदनसिंहाच्या मनांत फार आहे तिच्या बरोबर आपलें लग्न व्हावें म्हणून.

**बिरबल**—पण तिला तो पसंत आहे का?

**गुलाब**—पसंत न होण्याला काय झालें? तो तरी किती सुंदर आहे! लग्न झालें तर जोडा पण कसा दिसेल?

**बिरबल**—त्यांची प्रीति आहे असें तूं कशावरून म्हणतेस?

**गुलाब**—तें न समजण्याला काय झालें? अद्याप त्यांचें भाषण कांहीं फारसें होत नाहीं. पण परस्परांकडे चोरून

पाहणें, एकमेकांच्या बोलण्याचा कृतींनीं आदर करणें, तो महालांत असतां सलज्जपणानें वसणें, बोलणें, वारंवार खालच्या मानेनें त्यांच्याकडे पाहणें; त्याला पाहून हंसणें, इत्यादि लक्षणांवरून त्याच्यावर तिचें मन आहे असें दिसतें.

**बिरबल**—आतां फारच झोंप येऊं लागली. आतां निजलेंच पाहिजे. (असें म्हणून त्यानें अंगावरचे कपडे काढले व पलंगावर जाऊन निजला. बिरबल निजल्यावर गुलाबनें त्या खोलीच्या दाराला आंतून कडी घातली; व दिव्याची वात लहान केली.)

## भाग ५ वा.

## प्रीतीची वाढ.

मागील भागांत सांगितलेली गोष्ट झाल्यावर चार दिवसांनीं संध्याकाळीं राणकदेवी आपल्या महालांत बसली होती. तिच्या जवळ इंदुमतीही होती. राणकदेवीचा महाल भुवनसुंदरी राणीच्या महालाला लागूनच होता. ह्या महालांत तीन निरनिराळ्या खोल्या होत्या. त्या चांगल्या प्रशस्त असून त्यांतील सामान राजवैभवाला शोभेल असें होतें. नदीकिनाऱ्यास जी खोली होती, ती राणकदेवीची बैठकीची जागा होती. ह्या ठिकाणीं सर्व व्यवस्था भुवनसुंदरीच्या महालांत ज्याप्रमाणें होती त्याच तऱ्हेची होती. फक्त एक पलंग मात्र जास्त होता. ह्या खोलीला नदीकडच्या बाजूला एक खिडकी होती. त्या खिडकीला अर्धें भागावर

लोखंडाचे गज मारलेले होते, व वरचा भाग सबंध मोकळा होता. ह्या खिडकीच्या झडपा सर्व दिवसभर उघड्या असत, व रात्रीं दहा वाजतां बंद होत असत. ह्या खिडकी जवळ एक बकुलवृक्ष अगदीं गेंदाप्रमाणें गरगरीत व झुबकेदार असा वाढलेला होता. त्याची एक फांदी खिडकी बरोबर आली होती. वसंत ऋतूंत ह्या वृक्षाला फुलांचा मोठा बहार येत असे. बाकी बारमाही म्हणजे ह्या वृक्षावर कधीं फूल नाहीं असें क्वचितच होत असे. पांखरांचे थवेच्याथवे ह्या वृक्षावर नेहमीं चिवचिव करीत इकडून तिकडे उडत असत. बकुलीच्या फुलांतील मध व त्या झाडाचीं सुंदर फळें खाण्याकरितां हे सर्व प्राणी येत असत. कांहीं काम नसलें म्हणजे राणकदेवी त्या खिडकींत बसून त्या पांखरांकडे पाहत असे. त्यांच्या त्या नानाप्रकारच्या क्रीडा पाहून तिला मोठें कौतुक वाटत असे. राणकदेवीच्या ह्या बैठकीच्या खोलीजवळच डाव्या हाताकडे तिची अभ्यासाची जागा होती. त्या ठिकाणीं भारत, भागवत, रामायण, गीता, हितोपदेश, पंचतंत्र वगैरे ग्रंथ होते; सतार, सारमंडळ, विणा इत्यादि वाद्यें होतीं. चित्रें काढण्याकरितां लांकडांच्या पाट्या पांढरा रंग देऊन भिंतीजवळ ठेविलेल्या होत्या. कांहीं रंगांचे पेले होते. राणकदेवीचा अभ्यास त्या काळामध्यें राजघराण्यांतील स्त्रियांना योग्य असा झाला होता. नृत्य, गायन, वादन, चित्रकळा, भरतकाम, लेखन, वाचन, घोड्यावर बसणें, तिरंदाजी करणें वगैरे कामांत ती मोठी पटाईत होती. तिच्या सहवासानें इंदुमतीलाही हे बहुतेक विषय साधारणपणें अवगत

होते. चित्रकलेंत मात्र इंदुमती राणकदेवीच्या बरोबरीची होती असें म्हटलें असतां चालेल.

राणकदेवीच्या अभ्यासाच्या खोलीला लागून उजव्या हाताकडे तिची जेवणाची खोली होती. हा महाल तिसऱ्या मजल्यावर होता, हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. दुसऱ्या मजल्यावर ह्या महालाखालच्या भागांत राणकदेवीचा मुदबकखाना होता; तेथें जाण्याला जेवणाच्या खोलींतूनच परभारा जिना असल्यामुळें मुळींच अडचण पडत नसे. राणकदेवी इंदुमती बरोबर गोष्टी सांगत बसली असतां एकदम उठली आणि इंदुमतीला उद्देशून म्हणाली, 'जरा बस हां; मी जरा खालीं जाऊन येतें. आल्यावर तें चित्र आपण रंग भरून तयार करूं.' असें म्हणून ती तेथून निघून गेली. ती निघून गेल्यावर इंदुमती आपल्या जाग्यावरून उठली व अभ्यासाच्या खोलींत गेली. तेथें गेल्यावर तिनें एका फडताळांतून एक अर्धवट तयार झालेली तसबीर बाहेर काढिली, व रंगाचे पेले व कलमें घेऊन त्याच खोलींत त्या चित्राला रंग देत बसली. इतक्यांत मदनसिंह राणकदेवीच्या बैठकीच्या खोलींत आला. मदनसिंह हा स्वरूपानें सुंदर होता. ह्याचा वर्ण गोरा असून नाक व डोळे तरतरीत होते. ह्याचा चेहरा मोठा मोहक होता. ह्याला नुकत्याच मिशा फुटूं लागल्या होत्या. ह्याचें वय वीस वर्षांपेक्षां जास्त दिसत नव्हतें. ह्याच्या शरीराचा बांधा उंच असून सडसडीत होता. ह्याचें बोलणें मोठें गोड असून त्यांत सभ्यपणा व विनय होता. ह्याचा पोषाक साधा असून त्यांत नखऱ्यापेक्षां टापटीपच जास्त दिसून येत होती. हा करा-

री स्वभावाचा असून दिलदार व मायाळू होता. क्षात्रतेज ह्याच्या तोंडावर दिसत होतें. मदनसिंह महालांत आला, तों तेथें कोणी नाहीं असें पाहून राणकदेवीच्या अभ्यासाच्या खोलीकडे वळला; तों तेथें दाराकडे पाठ करून इंदुमती एकटी चित्राला रंग देण्याच्या कामांत अगदीं गढून गेली आहे असें त्यानें पाहिलें. राणकदेवीच्या महालांत दोन चार वेळा त्यानें इंदुमतीला पाहिलें होतें, पण तिच्याबरोबर बोलण्याचा प्रसंग कधीं आला नव्हता. इंदुमती राणकदेवी-प्रमाणें सुंदर नव्हती. तिचा रंग काळा सांवळा होता हें जरी खरें, तरी तिच्या अवयवांची ठेवण, डोळ्यांचें तेज, बसण्याची ढब, बोलण्यांतील रसिकता, ह्यांच्यायोगानें ती तेव्हांच दुसऱ्याला आपलेंसें करून टाकीत असे. प्रथम जेव्हां इंदुमतीची भेट झाली तेव्हांपासून मदनसिंहाच्या मनांत आजपर्यंत कधीं न उत्पन्न झालेले असे विचार उत्पन्न होऊं लागले. इंदुमतीला पाहून समाधान होतें असें त्याला वाटूं लागलें; तिच्याविषयीं त्याच्या मनांत लालसा उत्पन्न झाली होती. हिच्याबरोबर आपला विवाह झाला तर आपल्याला संसारसुख मिळेल, असे विचार त्याच्या मनांत खेळू लागले होते. लाजेमुळें व राणकदेवीच्या मर्यादेस्तव त्याला आपल्या ह्या विचारांना मोकळें सोडण्याचें धैर्य झालें नव्हतें, तरी तो चोरून तिच्याकडे पाहत असे. इंदुमतीचीही त्याला पाहून अशीच अवस्था झाली होती. तीं दोघें एकमेकांच्या दर्शनाकरितां भुकेलेलीं होतीं. समोर असतांना कोणी तरी एकानें चोरून पाहत असावें, इतक्यांत नजरानजर होतांच मटकन् दोघांनीं नजर फिरवावी, असे त्यांचे

व्यापार चालत असत. इंदुमतीचें लक्ष मदनसिंहाकडे आहे, ही गोष्ट राणकदेवीला समजून चुकली होती. इतकेंच नाहीं तर नदीवर तिनें ह्याबद्दल इंदुमतीला विचारिलेंही होतें, तें आमच्या वाचकांच्या ध्यानांत असेलच. मदनसिंह इंदुमतीच्या पाठीमागें चित्राप्रमाणें उभा होता. त्याचें लक्ष तिच्या कृतीकडे लागलें होतें. मधुन मधुन त्याची दृष्टि तिच्या शरिराकडे वळत असे.

इंदुमती एकटी आहे व ती आपलीच तसबीर काढीत बसली आहे, ह्यावरून तिचें मन तर आपणाकडे आहे, असें त्याला वाटणें स्वाभाविक होतें. पण आतां हिच्याबरोबर बोलण्याला सुरुवात कशी करावी, हाच त्याला मोठा विचार पडला. आपण बोलण्याला सुरुवात केली आणि ती लाजून जर येथून मुळींच निघून गेली तर हें दर्शनसुखही नाहींसें होईल, असा त्याला मोठा धाक वाटे. काय करावें, कसें बोलावें, ह्या विचारांत तो अगदीं चूर होऊन गेला. अखेर मनाचा धडा करून बोलण्याला सुरवात करावयाची, असा त्याचा निश्चय तर झाला. त्याच्या तोंडावर तजेलाही दिसूं लागला. आपण आतांच येथें आलों असा बाणा करून तो आपल्याशींच म्हणूं लागला. 'आज ताईसाहेब ह्या वेळीं महालांतून कोठें बरें गेल्या ? येथें तर कोणीच दिसत नाहीं ?' मदनसिंहाचे हे शब्द इंदुमतीच्या कानीं पडले. तिनें लगेच मागें वळून पाहिलें. मदनसिंहाची व तिची दृष्टादृष्ट झाली. त्याला पाहतांच ताबडतोब ती चित्राची फळी आपल्या पदराखालीं झांकून घेऊन ती फडताळाकडे गेली व तिनें ती फडतां-

ळांत ठेवून त्याला कुलूप लाविलें, व आपण तेथेंच मदन-सिंहाकडे तोंड करून पण खालीं मान घालून उभी राहिली. आपली दृष्टादृष्ट होतांच तिची कशी वृत्ति झाली, तिनें पदराखालीं तसबीर कशी झांकून घेतली, उठली तीही किती त्वरेनें, खालीं मान घातली पण चोरनजरेनें कशी पाहत आहे, पायाच्या आंगठ्यानें जमिनीला उगाच उकरण्याचा वहाणा कसा करीत आहे, इत्यादि हजारोंहजार तिच्या लिलेच्या गोष्टी पाहून मदनसिंहाला आनंदाच्या गुदगुल्या येऊं लागल्या. तिचे मधुर असे दोन शब्द तरी ऐकायाला सांपडावे असा विचार मनांत येऊन तो इंदुमतीला उद्देशून म्हणाला-' ताईसाहेब कोणीकडे गेल्या आहेत ? '

**इंदुमती**—कांहीं कामाकरितां खालीं गेल्या आहेत.

**मदनसिंह**—किती वेळ झाला ?

**इंदुमती**—बराच वेळ झाला आहे. इतक्यांत येतील.

**मदनसिंह**—तुमचें काय काम चाललें होतें; सांगण्याला कांहीं हरकत नसेल तर ऐकण्याची इच्छा आहे.

**इंदुमती**—त्यांत कसली हरकत! ताईसाहेबांनीं एक तसबीर काढली आहे, तिला मी रंग भरीत होतें.

**मदनसिंह**—आमच्या ताईसाहेबांनीं काढलेली तसबीर आम्हाला नाहींका दाखवावयाची ? [ ह्यावर काय उत्तर द्यावें हें तिला कांहीं समजेना. ती उगाच खालीं मान घालून फडताळाजवळ उभी होती. इतक्यांत राणकदेवी महालांत आली. मदनसिंहाला पाहून ती म्हणाली ] ' दादासाहेब, तुम्ही केव्हां आलां ? '

**मदनसिंह**—हा आतांच आलों.

**राणकदेवी**—(इंदुमतीकडे पाहून) सखे इंदुमती, तूं ग इथं काय करीत होतीस?

**मदनसिंह**—त्या येथें एका तसबिरीला रंग देत होत्या. मी आलों असें पाहून ती तसबीर त्या फडताळांत ठेविली. ताईसाहेब, आम्हांला नाहींका ती तसबीर दाखवावयाची?

**राणकदेवी**—हो, न दाखवायाला काय झालें? सखे इंदुमती, ती तसबीर बाहेरच घेऊन ये. आपण ती आजच्याआज पुरी करूं.

राणकदेवीनें सांगितल्यावरून इंदुमतीनें ती तसबीर फडताळांतून बाहेर काढून तिच्या हातांत दिली. ती तसबीर घेऊन राणकदेवी आपल्या महालांत गेली. तिच्या मागून मदनसिंह व इंदुमतीही बाहेर गेली. महालांत जाऊन बसल्यावर मदनसिंह राणकदेवीला म्हणाला, 'ताईसाहेब, आज एक गोष्ट विशेष महत्वाची सांगण्याकरितां मी आलों आहे. ती ही कीं, काठेवाडच्या सरहद्दीवर कोळी लोकांनीं मोठें बंड केलें आहे, त्या कामगिरीवर सेनापति साहेबांनीं आमची नेमणूक केली आहे. उद्यां सकाळीं आम्हीं येथून निघून जाणार!'

**राणकदेवी**—कधीं? उद्यां जाणार?

राणकदेवीच्या तोंडांतून वरील शब्द निघतात तों आपण कांहीं तरी बोलावें, असें इंदुमतीच्या मनांत आलें; व काय बोलावें हें देखील तिनें आपणाशीं ठरवून टाकलें. शब्द बाहेर फुटून प्रतिध्वनी उमटण्याचीच कायती बाकी राहिली होती. परंतु इंदुमतीचें तोंड बंद असल्यामुळें त्यांना बाहेर येण्याला

जागाच सांपडेना. ते तोंडांत एकत्र तुंबून राहिले होते. ते खोकल्याबरोबर बाहेर पडले, पण खोकल्याच्या आवाजामुळें ते कोणालाच ऐकूं गेले नाहींत. तिच्या चेहऱ्यावरून तिला वाईट वाटलें असावें असें स्पष्ट दिसत होतें. एका क्षणांत तोंडावरचा तजेला नाहींसा झाला. मदनसिंहजी लढाईवर जाणार हें ऐकून इंदुमतीची छाती अगदीं दुःखानें भरून गेली. लढाईवर जाणें म्हणजे मृत्यूच्या जबडयांत शिरण्यासारखें आहे. जिविताचा कांहीं नेम नसतो. केव्हां शस्त्रप्रहारानें मरण येईल ह्याचा नेम नाहीं. लढाई हा शब्दच मोठा भयंकर. आपली प्रीय वस्तु आपल्या समोरून जाणार हेंच केवढें तरी दुःख! तशांत पुन्हां नजरेस पडेल किंवा नाहीं ह्याची जेथें शंका, तेथें त्या दुःखाला काय पारावार! इंदुमतीच्या मनाची स्थिति ह्या वेळीं फारच भयंकर झाली होती. शोक कमी करण्याचें साधन रडणें हें आहे, पण लज्जेमुळें हेंही साधन तिला नाहीं असेंच झालें होतें. दुःखाचे उमाळयावर उमाळे येत होते. अनेक प्रकारच्या कुतर्कांची तिच्या अंतःकरणांत गर्दी उडून गेली होती. त्यांना बाहेर पडण्याला जागा नव्हती, म्हणून त्यांचा जोर आंत वाढत चालला. तशी तिची छाती धडधडूं लागली. अश्रूंनीं डोळे भरून गेले होते. तिनें खालीं मान घातल्यामुळें ते कोणाला दिसले नाहींत. त्यांचा प्रवाह सुरू झाल्याखेरीज राहणार नाहीं. व तो सुरू झाल्यावर ही गोष्ट उघडकीस खास येणार, असें वाटून ती आपल्या जाग्यावरून उठून खिडकीकडे मोठ्या घाईनें जात होती. राणकदेवी मदनसिंहाबरोबर बोलत बसली होती,

ह्यामुळें तसबिरीला रंग देण्याचें काम तसेंच राहिलें होतें. तिच्यासमोर तसबीर होती, व तसबिरीजवळ रंगांचे पेले होते. इंदुमती खिडकीकडे जात असतां त्या तसबिरीला अडखळून धाडकन् खालीं पडली. रंगांचे पेले सर्व उपडे होऊन तो सर्व रंग तिच्या चिरगुटांना लागला. इंदुमती पडल्याबरोबर मदनसिंहाची फारच धांदल उडाली. तो झपकर तिला उचलण्याकरितां धांवला. राणकदेवीही त्याच्या पूर्वीच उठली होती. इंदुमतीचा घुणघुणा फुटून त्यांतून रक्ताचा प्रवाह सुरू झाला. तिचें तोंड सर्व रक्तानें भरून गेलें. इंदुमती खालीं पडल्यावर तिला जो मोठा धक्का बसला त्याच्यायोगानें तिला मूर्छना आली होती.

राणकदेवी इंदुमतीचे डोकें आपल्या मांडीवर घेऊन बसली. मदनसिंहानें अंगावरच्या शेल्यानें तिचे तोंडावरचें रक्त पुसलें. सुरईतून पाणी आणून तिच्या तोंडावर व डोक्यावरही शिंपलें. शेल्याचा पदर फाडून तो पाण्यांत भिजवून त्याची डोक्यावर घडी ठेविली. जे उपचार केले त्यामुळें थोडक्याच वेळांत ती शुद्धीवर आली. रक्तही बंद झालें होतें. मदनसिंह तिच्या तोंडाकडे पहात होता. तिनें डोळे उघडतांच दोघांची दृष्टादृष्ट झाली. आपला प्रियकर जवळ बसला आहे असें पाहतांच तिनें डोळे मिटले, व तशीच कांहीं वेळ पडून राहिली. पुन्हां तिनें डोळे उघडिले, आपल्या प्रियकराच्या तोंडाकडे पाहिलें, व सलज्ज होत्साती धडपडून उठून उभी राहिली.

**राणकदेवी**—सखे, तुला कितीसें लागलें? रक्त बंद झालें

का पण? दुसरें चिरगुट नेसतेस? हें पहा अगदीं रंगानें खराब झालें आहे.

**इंदुमती**—मला कांहीं फारसें लागलें नाहीं. मी चिरगूट बदलून येतें. ( असें म्हणून ती अभ्यासाच्या खोलींत गेली, इतक्यांत एका दासीनें तिला दुसरें लुगडें नेऊन दिलें. )

**मदनसिंह**—ताईसाहेब, त्या पडल्या त्यावेळीं मला फारच भीति वाटली. पण एकाएकीं अशा कशा पडल्या?

**राणकदेवी**—तिला भोंवळ आली असावी. बाकी तसबिरीला अडखळून कांहीं पडणार नाहीं.

**मदनसिंह**—न पडायाला काय झालें?

**राणकदेवी**—दादासाहेब, बायकोचा कांहीं कैवार नको घ्यायाला.

**मदनसिंह**—ताईसाहेब, ह्यांत कसला कैवार?

**राणकदेवी**—कैवाराला काय शिंगें असतात?

**मदनसिंह**—बरें तसें कां म्हणाना?

**राणकदेवी**—आतां कसे ताळ्यावर आलां? मी बाबांना सर्व हकीकत सांगितली आहे. तुमचें इंदुमतीबरोबर लग्न करण्याचा विचार नक्की ठरला आहे. फक्त तुमची तेवढी संमति घ्यावयाची आहे.

**मदनसिंह**—ते जें करतील तें माझ्या बऱ्याकरितांच करतील.

**राणकदेवी**—तुमचा बेत उद्यां सकाळीं जाण्याचा ठरलाना? ठीक आहे. आपली करामत दाखविण्याला क्षत्रियाला समरासारखी दुसरी जागा नाहीं. तुम्ही

जय मिळवून लौकर परत या. वरचेवर समाचार कळवा. येतांना मोराचीं पिसें घेऊन या. इंदुमती मोरांच्या पिसांचे पंखे फारच सुंदर करिते. मलाही तें काम शिकावयाचें आहे. (इतक्यांत इंदुमती नवें लुगडें नेसून आली व राणकदेवीजवळ बसली.)

**राणकदेवी**—इंदुमती, दादा जाणार म्हणून का इतकें वाईट वाटलें? अहाग वेडे, शूरांनां दुसरें कसलें भूषण आहे? (इंदुमती कांहीं बोलली नाहीं, फक्त गालांतल्यागालांत मदनसिंहाकडे पाहून हंसली मात्र.)

**मदनसिंह**—ताईसाहेब, ही काय थट्टा? त्यांच्यावर केवढा प्रसंग आला होता, परमेश्वरानें निभावलें म्हणून. नाहीं तर का एकादा पेला फुटला असतां नी त्याच्या कांचा अंगांत शिरल्या असत्या तर मग कसें झालें असतें? तो प्रसंग पाहून अजूनसुद्धां माझी भीति कमी झाली नाहीं.

**राणकदेवी**—बायकोवर फार प्रीति आहे म्हणून इतकी भीति भरली.

**मदनसिंह**—संकटांत कोणी पडलें तरी त्याला मदत तर केलीच पाहिजे.

**राणकदेवी**—आणि बायकोला तर अवश्यच केली पाहिजे.

**मदनसिंह**—तुम्हाला थट्टेला विषय मात्र चांगला सांपडला.

**इंदुमती**—प्रसंग मात्र योग्य नाहीं.

**राणकदेवी**—अजून दादासाहेबच बोलत होते, आतां वहिनीसाहेबांचें तोंड सुरू झालें. मग दोघांबरोबर मी एकटी कशी टिकणार! मी हार घेतें.

**मदनसिंह**—ताईसाहेब, मला अजून व्यवस्था लावावयाची आहे. मी आतां रजा घेतों. ( असें म्हणून तो उठला त्याबरोबर इंदुमतीही उभी राहिली. मदनसिंह दाराबाहेर गेल्यावर त्या दोघीजणी पुन्हां नदीकडल्या खिडकींत गोष्टी सांगत बसल्याच, हें येथें सांगण्याची विशेष जरूर नाहीं. )

# भाग ८ वा.

## पूर्वपिठिका.

हल्लीं ज्याला काटेवाड असें म्हणतात त्याला पूर्वी सौराष्ट्र असें नांव होतें. येथें चंद्रवंशीय क्षत्रीय राजे प्राचीन काळापासून राज्य करीत होते. ज्या काळाचा आह्मी इतिहास सांगत आहों, त्या वेळीं येथें नोहानसिंग ह्या नांवाचा राजा राज्य करीत होता. तो राजा मोठा शूर व अभिमानी होता. ह्याचें राजधानीचें शहर जूनागड हें होतें. त्या शहराला भक्कम दगडीकोट असून ठिकठिकाणीं बुरूज केलेले होते. ह्या शहराच्या पुर्वेकडे ताम्रपर्णी नांवाची नदी वाहत होती. शहराबाहेर जिकडे तिकडे भयंकर जंगल माजलेलें होतें. ह्या शहरापासून जवळच गिरनार म्हणून एक प्रख्यात शंकराचें पवित्र स्थान होतें. नोहानसिंगाला पुष्कळ राण्या होत्या. वडील राणीला चार मुलगे होते.

सर्वांत धाकटा मुलगा हा ह्या सुमारास वीस वर्षांचा होता. सर्व भावांत हा मुलगा मोठा सुंदर असून, शौर्यांतही श्रेष्ठ होता. ह्याच्या अंगीं कोणताही दुर्गुण नव्हता, पण अनेक सुगुण वास करीत होते. ह्या चपळ व पाणीदार राजपुत्राला पाहून सर्वांना मोठा आनंद होत असे. आई-बापांचा तर तो केवळ प्राण होता. त्याचे वडील भाऊसुद्धां त्याच्यावर फारच प्रीति करीत असत. त्यांच्या बरोबर तो तसाच वागत असे. ह्या राजपुत्राचें नांव खेंगार असें असून हाच आमच्या चरित्राचा नायक आहे. भुवनसिंगांची व महीनदीच्या कांठीं उमेठा म्हणून एक शहर होतें, तेथील राजाची पुष्कळ दिवसांपासून लढाई चालली होती. नोहानसिंगानें आपल्या धाकट्या मुलाच्या पराक्रमानें त्या राजाला जर्जर करून टाकिलें होतें. सरते शेवटीं तहावर पाळी आला. नोहानसिंगानें सांगितलें कीं, तुमची मुलगी उपवर झालेली आहे ती आमच्या छावणींत पाठवून द्या म्हणजे आम्ही तह करूं. नोहानसिंगाचें मागणें उमेठा येथील राजानें मान्य केलें; पण त्याला हंसराज ह्या नांवाचा एक मुलगा होता त्याला हें अपमानाचें मागणें मुळींच कबूल झालें नाहीं. बापाचा निषेध करून पुढें लढाई चाल-विण्याबद्दल त्यानें आपल्या बापाला सल्ला दिला, व गुज-राथ प्रांताचा राजा जो सिद्धराज ह्याच्याजवळ मदत मागण्याचा निश्चय केला.

पुन्हां लढाई सुरू झाली. नोहनसिंगानें आपल्या सै-न्याचे पांच भाग करून चार मुलांच्या ताब्यांत चार भाग दिले व पांचव्यावर आपण मुख्य झाला. जिकडे तिकडे

लढाया सुरू झाल्या. सिद्धराजा मुलीच्या लालसेनें मदत करण्याकरितां हंसराजाकडे येऊन मिळाला. एके दिवशीं सिद्धराजानें नोहानसिंगाच्या छावणीवर रात्रीं बारा वाजतां छापा घालून नोहानसिंगाला कैद केलें व पुढें त्याच्याकडून आपल्या इच्छेनुरूप तह करून घेतला. ज्या दिवशीं सिद्धराजानें नोहानसिंगाला कैद केलें त्याच दिवशीं खेंगारानें सिद्धराजाच्या सैन्यावर मोठा जय मिळविला होता. सिद्धराजानें तह करून घेतल्यामुळें नोहानसिंगानें लढाई बंद करण्याविषयीं आपल्या मुलांना हुकूम पाठविला. तह झाल्यावर नोहानसिंग तडक आपल्या राजधानीकडे कूच करून गेला; सिद्धराजाकडून त्याचा जो अपमान झाला होता तो त्याला सारखा जाळीत होता. सूड केव्हां घेईन असें त्याला झालें होतें. अपेश असें कधींच नोहानसिंगाला माहीत नव्हतें; ह्यामुळें ह्या पराभवामुळें त्याला मरणप्राय दुःख झालें. त्याचें अन्नपाणी कमी झालें. चिंतेनें तो दिवसानुदिवस वाळत चालला. अखेर त्या स्थितींत त्याला क्षय झाला. वांचण्याची अगदीं आशा नाहीं असें वाटल्यावरून त्यानें एके दिवशीं मोठा दरबार भरविला. सर्व सरदार व राजपुत्र येऊन बसल्यावर सगळ्यांनां त्यानें सांगितलें कीं, मी आतां कांहीं फार दिवसांचा सोबती नाहीं. तेव्हां राज्यावर कोणाची तरी योजना केली पाहिजे. माझ्या तीन मागण्या आहेत व त्या पुऱ्या करण्याबद्दल जो शपथ घेईल त्याला मी गादीवर बसविणार. मला चार मुलगे आहेत त्यांतून कोण कबूल करितो. हें मला पाहिलें पाहिजे.

सिद्धराजाच्या राजधानीवर हल्ला करून तिचा मुख्य दरवाजा येथें आणून मिरविला पाहिजे. सिद्धराजाच्या पदरीं गुलाबसिंग बारोट आहे त्यानें माझी भर दरबारांत निंदा केली, सबब त्याची खोड मोडली पाहिजे. व सिद्धराजानें माझी स्त्री नाहींशी केली त्याबद्दल त्याची बायको पळवून आणली पाहिजे. ह्या माझ्या तीन मागण्या आहेत. सांगा तुमच्यापैकीं ह्या पुऱ्या करण्याला कोण तयार आहे? असा बापानें प्रश्न केल्यावरून आपले तिघे भाऊ विचार करीत बसले आहेत; पण कोणीच जबाब देत नाहीं असें पाहून खेंगार उभा राहून म्हणाला. महाराजांच्या तीन मागण्या पुऱ्या करण्यास मी तयार आहें. महाराज सांगतील ती शपथ घेण्यास माझी तयारी आहे. हें मुलाचें भाषण ऐकून नोहानसिंगानें आपल्या तीन मुलांना तीन निरनिराळ्या जहागिरी तोडून दिल्या, व जुनागडच्या गादीवर खेंगाराची योजना केली. हा प्रकार सर्व सरदार लोकांना पसंत पडला. दुसऱ्या दिवशीं राज्याभिषेकाची तयारी झाली, यथाविधि अभिषेक झाला. गादीवर बसण्यापूर्वी खेंगारानें अशी शपथ घेतली कीं, माझ्या परमपूज्य पित्याच्या ज्या इच्छा आहेत त्या मी पूर्णपणें शेवटास नेईन. त्या शेवटास जाईतोंपर्यंत मी ब्रह्मचर्य व्रतानें राहीन, कोणत्याही प्रकारचे राजभोग भोगणार नाहीं. माझ्या हातून जर ह्या गोष्टी झाल्या नाहींत तर शंभर ब्रह्महत्या केल्याचें पातक माझे माथीं पडो. खेंगार गादीवर बसल्यावर, पुढें दोन दिवसांनीं नोहानसिंग महाराजांचा अंत झाला. त्यांचें उत्तरकार्य यथाविधि खेंगार महाराजांनींच केलें.

हें उत्तरकार्य आटपल्यावर खेंगार महाराजांनीं मोठ्या ज्यारीनें लष्कराची तयारी सुरू केली. किल्लयांची दुरुस्ती चालविली. दाणा, गोटा व युद्धसामुग्रीची बेगमी करून ठेविली. त्यानें गुप्त हेर सिद्धराजाच्या राजधानींत पाठविले. आजूबाजूच्या मांडलीक राजांना आपल्या पक्षांत आणण्याचा उद्योग त्यानें सुरू केला. मिळून त्याचा सर्व वेळ आपण केलेली प्रतिज्ञा शेंवटास नेण्याच्या उद्योगांत खर्च होऊं लागला.

# भाग ७ वा.

## भुवनसुंदरी आणि बिरबल.

भुवनसुंदरीच्या मनांत दत्तक घेण्याचें फार होतें. महाराजाचा वृद्धापकाळ झाला होता. राज्यसूत्रें आपल्या हातांत घ्यावीं असा तिचा विचार होता, महाराजांनीं दत्तक घेतला असता तर तिच्या हातांत तीं येण्याचा संभव होता. भुवनसुंदरीनें आपला हेतू अनेक वेळां महाराजांना सांगितला, पण त्यांची नन्नाची बाराखडी कांहीं संपेना. आपला हेतू कोणत्या प्रकारें शेवटास न्यावा, ह्या संबंधानें तिच्या मनाची एकवाक्यता कांहीं होईना. राणकदेवीचा विवाह जर सिद्धराजाबरोबर ठरता तर तिचे दोन हेतू शेवटास जात होते. बिरबलाला सिद्धराजाकडून मोठी जहागीर मिळावयाची होती. बिरबलाला ही जहागीर मिळावी अशी इंदुमतीची फार इच्छा होती. राणकदेवीला ही गोष्ट मुळींच पसंत

पडेना. धैर्यसिंग महाराजांना सांगावें तर ते मुलीच्या इच्छे-विरुद्ध कोणतीही गोष्ट करण्याला तयार नव्हते. आपल्या मनांत असलेले दोन्ही विचारही मनांतल्या मनांत जिरून जाणार ह्याबद्दल तिला मोठी तळमळ लागली होती. दारिद्र्याचे मनोरथ जसे निष्फळ होतात, तसे तिचे विचार फुकट जाण्याचा प्रसंग आला होता. सरळ मार्गानें जर हें कार्य साधत नाहीं तर वांकड्या मार्गानें कां होईना कसें तरी साधलें पाहिजे, असे विचार तिच्या मनांत वरचेवर येऊं लागले. दत्तकाबद्दल तिला वाईट वाटत होतें. तशांत खेंगारावर राणकदेवीचें मन आहे हें ऐकल्यापासून तर तिला जास्तीच वाईट वाटूं लागलें. सिद्धराजाला कांहीं सिंधप्रांताचे राज्याची अपेक्षा नव्हती. त्याला फक्त राणकदेवीची जरूर होती. खेंगार हा राजपुत्र होता, तरी त्याला आपल्या बापाचें राज्य मिळण्याची आशा नव्हती. त्याच्यापेक्षां तीन भाऊ वडील होते. खेंगाराला घरचें राज्य नसल्यामुळें तो सहज सासुरवाडीस येऊन राहण्याला अनमान करणार नाहीं असा भुवनसुंदरीचा तर्क होता व तो खराही होता. सिद्धराजाबरोबर लग्न झालें तर भुवनसुंदरीला राज्यांत ढवळाढवळ करण्याला जास्ती सवड मिळाली असती. त्या स्वार्थपरायण राणीला आपल्या सावत्र मुलीच्या सौख्याची मुळींच कळकळ नव्हती. आपलें हीत कशांत हेंच तिला पाहणें होतें. आपल्या सौख्यांत कोणत्याही प्रकारची न्यूनता न येतां जर राणकदेवीला सौख्य मिळालें असतें तर तिनें त्याला विशेष हरकत घेतली नसती. इतका कांहीं तिचा मत्सर जाज्वल्य नव्हता. परंतु राणकदेवीनें जी

दिशा स्विकारली होती ती सर्व प्रकारांनीं भुवनसुंदरीला विरुद्ध होती. ह्याकरितां कोणत्या तरी प्रकारांनीं हा बेत सिद्धीस जाऊं द्यावयाचा नाहीं असा तिचा निश्चय होता. भुवनसुंदरीला हल्लीं सारखी तळमळ लागली होती. तिला जेवणखाण वगैरे कांहीं सुचत नसे. सर्व दिवस ती एकटी बसून विचार करीत असे. दोन प्रहरचा समय होता. भुवनसुंदरी आपल्या महालांत चोफाळ्यावर तक्याला टेंकून बसली होती. तिच्या अंतःकरणांत विचाराची गर्दी उडून गेली होती. बिरबलाचें कल्याण करावें हा तिचा मुख्य उद्देश होता. इंदुमतीजवळ त्याचें लग्न करून द्यावें असा तिचा अंतस्थ हेतू होता. मदनसिंहावर तिचें मन बसलें आहे ही गोष्ट राणकदेवीनें धैर्यसिंग महाराजांजवळ काढली होती. ही बातमी समजल्यापासून तर तिला जास्तच वाईट वाटूं लागलें. मी जो जो बेत करितें तो तो हाणून पाडण्याचा राणकदेवीनें जसा काय विडा उचलला आहे, असें तिला वाटूं लागलें. मदनसिंहावर तिचा अगोदर राग होताच. तशांत तो इंदुमतीचा पती होणार असें समजल्यापासून तर ती त्याला पाण्यांत पाहूं लागली मदनसिंहाला लढाईवर पाठविण्याला तरी भुवनसुंदरीचें कारस्थानच कारण झालें. सेनापतीला सांगून ही गोष्ट तिनें पार पाडली. मदनसिंह येथून निघून गेला म्हणजे राणकदेवीचाही एक जोर कमी होईल, लढाईवर तो कामास आला तर फारच उत्तम, कदाचित् जय मिळवून परत आला, तर एखादें कारस्थान करून त्याच्यावरची महाराजांची मर्जी सहज उडवितां येईल, असा तिला भरंवसा

होता. भुवनसुंदरी विचारांत अगदीं चूर होऊन गेली होती. इतक्यांत बिरबल महालांत येऊन तिला मुजरा करून चौंफाळ्याजवळ खालीं बिछायतीवर बसला. बिरबलाला येऊन बराच वेळ झाला तरी त्याच्याकडे तिचें लक्ष नव्हतें. मासाहेब आपणाकडे पहात नाहींत, अर्धवट डोळे मिटून त्या पडल्या आहेत, असें पाहून त्यानें मुद्दाम खोकल्याचें मिष केलें. त्याचें खोकणें ऐकून त्या शुद्धीवर आल्या व त्याच्याकडे त्यांनीं पाहिलें. 'आपली प्रकृति ठीक आहेना?' असा बिरबलानें प्रश्न केला. भुवनसुंदरी म्हणाली—'माझ्या प्रकृतीला आतां काय होणार आहे?' 'मासाहेबांना उदास होण्याचें काय कारण? असा कसला बिकट प्रसंग आपल्यावर येऊन पडला आहे'? असें पुनः बिरबलानें विचारल्यावरून त्या म्हणाल्या "काय सांगूं? मी जे जे विचार मनांत योजितें त्यांना कांहींना कांहीं तरी विघ्नें येतात. ह्यामुळें मला कांहींच सुचत नाहींसें झालें आहे. राणकदेवी माझ्या डोळ्यांत सारखी खुपत आहे. प्रत्येक बाबतींत ती माझ्या मार्गांत कांटा आहे. दत्तकाचा विचार रहीत होण्याला तरी तीच कारण. सिद्धराजाबरोबर लग्न करण्याचा तरी तिचाच हट्ट. इंदुमतीबरोबर तुझें लग्न करून द्यावें असा माझा विचार होता; त्याला हरकत तरी तिच्या कडूनच. तो मदनसिंह जर येथें आला नसता तर आतां मला इतकी पंचाईत करण्याची काय बरें जरूर होती? तिनें जर सिद्धराजाबरोबर लग्न करण्याचें कबूल केलें असतें तर एका कामांत दोन कामें साधलीं असतीं. मलाही वाईटपणा घेण्याची कांहीं जरूर नव्हती. महाराजांना

आतां म्हातारचळ लागला आहे. ती पोर सांगेल तसे ते वागतात. मी कांहीं सागूं लागलें तरी तें त्यांच्या मनास येत नाहीं. आजपर्यंत त्यांनीं माझा कधीं अपमान केला नव्हता, पण हल्लीं त्यांनीं तोच क्रम सुरु ठेविला आहे. आपलें जर कांहीं चालत नाहीं तर मग जगण्यांत तरी अर्थ काय? निर्माल्यवत् राहण्यापेक्षां मृत्यु बरा. राणकदेवीच्या मर्जीप्रमाणें सर्व गोष्टी व्हाव्यात आणि मीं मात्र चुरमुरे खात बसावें हें कसें सहन करावें, तूंच सांग.' बिरबल म्हणाला, 'मासाहेब, आपण कांहीं काळजी करूं नये. आपल्या मर्जीप्रमाणें सर्व गोष्टी यथास्थित पार पडतील. राणकदेवी जर खुषीनें सिद्धराजाबरोबर लग्न करण्याला तयार नसेल तर तिला जबरदस्तीनें आपल्याला भाग पाडलें पाहिजे. सगळयांत महत्वाची गोष्ट म्हटली म्हणजे राणकदेवीचा विवाह सिद्धराजाबरोबर झाला पाहिजे. मुख्य ही गोष्ट साधली म्हणजे बाकीच्या गोष्टी सहज साध्य झाल्या म्हणून समजा. माझ्या शहाणपणावर आपण भरंवसा ठेवून स्वस्थ बसा; मी सर्व गोष्टी सहज घडून येतील अशी तजवीज करून ठेविली आहे.

बिरबलाचें हें भाषण ऐकून भुवनसुंदरी म्हणाली, 'पण एक गोष्ट पक्की ध्यानांत ठेव कीं, माझें नांव कोणत्याही गोष्टींत पुढें येतां कामा नये. नावानिराळी राहून पाहिजे ती मदत मी करीन. पैसा अडका वगैरे जें कांहीं लागेल तें सर्व मजपासून घेऊन जा. पण फार संभाळून काम झालें पाहिजे. महाराजांचा राग फार कठीण आहे. माझा नुस्ता संशय सुद्धां येता उपयोगी नाहीं, हें तुला बजाऊन सांगतें.

जर कदाचित् ही बातमी बाहेर फुटली तर मी एक पळसुद्धां जिवंत राहणार नाहीं. माझी खातरी आहे कीं, राणकदेवीच्या संबंधाच्या कारस्थानांत माझें अंग आहे असें जर त्यांना समजलें, नुस्ता जरी संशय आला, तरी सुद्धां मला मृत्यु आपखुषीनें पत्करावा लागेल. ते मला क्षमा करणार नाहींत. विटंबना मात्र करतील. तुम्हाला जरी त्यांचें मजवर मोठें प्रेम आहे असें वाटत असलें, तरी तें एका क्षणांत सर्व नाहींसें होईल. राणकदेवीपेक्षां त्यांना जगांत दुसरें कांहीं प्रिय नाहीं. राज्य नको, बायको नको, कांहीं नको, अशी त्यांच्या मनाची खरी स्थिति आहे. म्हणून सांगतें बाबारे जपून वाग. जें काय करण्याचा तुझा विचार असेल तें फार सावधगिरीनें कर. तुजवर पुढें मागें संकट येऊं नये अशी योग्य खबरदारी घे. मांजराच्या पायानें आठीळ काढावी. मिळाली तर आठीळ मिळेल, भाजला तर मांजराचा पाय भाजेल. नावानिराळें राहून जें काय होईल तें करावें. निदान मला तरी ह्या संबंधानें खबरदारी घेणें जरूर आहे. आजपर्यंत मी ज्या धोरणानें महाराजांजवळ वागलें आहे तें धोरण जर ह्या कामांत उघडकीस आलें तर मागील सर्व प्रयत्न फुकट गेले म्हणून समजलें पाहिजे. स्वतंत्रपणें मी ह्या राज्याची मालकीण होणार असें धोरण ठेवून मी आजपर्यंत महाराजांची मर्जी संभाळिली आहे. तें धोरण जर चुकलें तर मला ह्या जगांत सौख्य मुळींच न मिळतां उलट विटंबना व अपमान मात्र होणार आहे. म्हणून तुला पुन्हः पुन्हा सांगतें कीं, फार जपून वाग. मदतीकरितां जी मंडळी अनुकूळ करून घेशील किंवा घेतली असशील ती

चांगली प्रामाणिक पाहून घे. नाहीं तर तेच सर्वस्वी नाशाला कारण होतील.' भुवनसुंदरीचें सर्व भाषण ऐकून घेतल्यावर बिरबल म्हणाला, 'मासाहेबांना भिण्याचें कांहींच कारण नाहीं. सर्व गोष्टी सुरळीत पार पडतील. आपला संशय सुद्धां येणार नाहीं, अशी खबरदारी मी घेतली आहे. बहुधा काम उत्तम रीतीनें पार पडेल अशी माझी योजना आहे. कदाचित् जर आपली गोष्ट बाहेर फुटली; व एखादा वेडावांकडा प्रसंग आला; तरी आपल्या संबंधानें भीति बाळण्याचें मुळीच कारण नाहीं. मी आपल्या नांवावर सर्व कारस्थान रचलें आहे.' हें ऐकून भुवनसुंदरी म्हणाली, 'जरी असें झालें तरी सुद्धां मला वाईटच. तुझें नांव पुढें आल्यावर पर्यायानें माझे बद्दल त्यांना शंका येणारच; आणि तसें झालें म्हणजे आज जो मला मान आहे तो नाहींसा होणार.' बिरबल म्हणाला, 'मासाहेब, आपण उगाच घाबरतां. ह्यांत भिण्याचें कांहींच कारण नाहीं. कोणतीही साहसाची गोष्ट करण्याला तयार व्हावयाचें म्हणजे असल्या कुत्सित विचारांना अगोदर रजाच दिली पाहिजे. काय होईल तें होवो, असा मनाचा धडा करावा लागतो तेव्हां कित्येक गोष्टी साध्य होतात. आपण शगदीं बेफिकीर असा; मी आहें आणि तें काम आहे. आपल्याला त्यांतलें कांहींच माहीत नाहीं, व तें मी सांगतही नाहीं. विनाकारण आपल्या मनाला काळजी नको.'

बिरबलाचें भाषण भुवनसुंदरी शांत चित्तानें ऐकत होती. त्याचें भाषण झाल्यावर ती म्हणाली, 'बरें तर तुझ्या

विचाराप्रमाणें होऊं दे. इंदुमतीचें मन मदनसिंहावर आहे हें तुला समजलें का?'

बिरबल ह्मणाला—'होय ही गोष्ट मला समजली आहे; पण ह्याबद्दल मला कांहीं वाईट वाटत नाहीं; नाक दाबलें ह्मणजे तोंड आपोआप उघडतें. इंदुमतीचा विचार करण्याची मुळींच जरूर नाहीं. ती जाते कोठें? राणकदेवीच्या जिवावर ती उड्या मारीत आहे. राणकदेवीची एकदां व्यवस्था लागली ह्मणजे ती अर्थात फिकी पडणार. मदनसिंह लढाईवर गेला आहे तो परत येईल त्याच्या पुढची गोष्ट. इंदुमतीचा बाप हा ताबेदार आहे. त्याला मासाहेबांचा शब्द मोडण्याचें कांहीं धैर्य होणार नाहीं; पण ह्या गोष्टीची इतकी घाई नको. हातांत घेतलेलें काम एकदां पार पडलें ह्मणजे, ह्याबद्दल मागाहून विचार करण्याला कितीसा उशीर लागणार आहे.'

बिरबल व भुवनसुंदरी ह्यांचीं ह्या विषयावर बोलणीं चाललीं होतीं तेव्हां महालांत कोणीही तिसरें मनुष्य नव्हतें. सर्व दासी महालाबाहेर बसल्या होत्या; बिरबलाला पाहण्याकरितां कोणी बाहेर आलें आहे असा निरोप घेऊन एक दासी महालांत आली; ह्मणून बिरबालानें भुवनसुंदरीचा निरोप घेतला व मुजरा करून तो महालाबाहेर निघून गेला.

# भाग ८ वा.

## भातुकली.

मागील भागांत सांगितलेली गोष्ट झाल्यावर दुसरे दिवशीं सकाळीं महाराज शिकारीकरितां निघून गेले. दिवाण, सेनापती, मानकरी, मोठमोठाले सरदार वगैरे सर्व मंडळी महाराजांबरोबर गेली होती. तीन दिवसपर्यंत त्यांचा मुक्काम बाहेर होणार होता, अशी वर्दी असल्यामुळें सगळे कारखाने अगोदरच मुक्कामाच्या ठिकाणीं पाठविण्यांत आले होते. महाराज गेल्यानंतर राणकदेवीचा भातुकलीचा समारंभ जनानखान्यांत करण्याचें ठरलें होतें. म्हणून शहरांतील मानकरी, सरदार, मुत्सद्दी व आश्रित ह्यांच्या समवयस्क मुलींना राजवाड्यांतून आमंत्रणें गेलीं होतीं; दोनप्रहरीं एक वाजण्याच्या सुमारास राजवाड्यांत तरुण मुलींचे मेळ्यांवर मेळे जमूं लागले. राणकदेवी व इंदुमती ह्या त्यांच्या बसण्याची व्यवस्था लावण्यांत गढून गेल्या होत्या. स्वतः यजमानीण जर इतकी कामांत गढून गेली होती तर बाकीच्या नोकर लोकांची काय तारंबळ विचारावी; सगळ्या दासी घारीसारख्या फिरत होत्या; आमंत्रण केल्याप्रमाणें सर्व मंडळी जमल्यावर फराळाचीं पानें मांडलीं. राजाच्या लाडक्या मुलीच्या घरीं भातुकली, तेथें पदार्थांना थोडीच कमतरता असणार आहे? निरनिराळ्या प्रकारच्या चटण्या, कोशिंबिरी, रायतीं, अनेक प्रकारच्या भाज्या, उंचीं पक्वान्नें एकापाठीमागून एक येऊं लागलीं; राणकदेवीच्या सर्व दासी मोठा थाटमाट करून

वाढावयाला तयार झाल्या होत्या. राणकदेवी व तिची सखी इंदुमती ह्या पंक्तींतून फिरत होत्या व अतिशय आग्रह करून वाढवीत होत्या.

सर्व मुलींचे फराळ झाल्यावर त्यांना पानपट्टी, अत्तरगुलाब वगैरे देण्यांत आलें. संध्याकाळपावेतों त्या सर्व मुलींनीं तो राजवाडा अगदीं दणाणवून सोडला होता. कोणी गोष्टी सांगत बसल्या होत्या; कोणी गाणीं म्हणत होत्या; कोणी झोंपाळ्यावर बसून ओंव्या म्हणत होत्या; कोणीं फुगड्या घालीत होत्या; असे निरनिराळे व्यवसाय त्यांचे चालले होते. संध्याकाळीं पांच वाजतां सर्व मुली राणकदेवीचा व इंदुमतीचा निरोप घेऊन आपापल्या घरीं जाण्यास निघाल्या. सहा वाजतां सर्वजणीं निघून गेल्यामुळें राजवाड्यांत सर्वत्र शांतता झाली. राणकदेवीला त्रास फार झाला होता ह्यामुळें तिनें स्नान करण्याचा विचार केला, व आपल्या दासींना स्नानाची तयारी करण्याला सांगितलें.

राणकदेवीचें स्नान झाल्यावर इंदुमती व राणकदेवी फराळाला बसल्या. गुलाबी त्यांना वाढूं लागली. गुलाबी ही स्वयंपाक करणारी उत्तम असल्यामुळें तिची योजना स्वयंपाकघरांत झाली होती. आपण केलेले पदार्थ कसे रुचकर झाले आहेत; आपली धनीन स्वयंपाकाला काय म्हणते हें जाणण्याची तिला उत्सुकता झाली असावी असें दिसलें. कारण त्या दिवशीं तिच्या चेहऱ्यावर स्वस्थपणाचें चिन्ह कांहींच दिसत नव्हतें. तिची धनीण फराळाला बसल्यावरसुद्धां तिला वाढण्याचें भान नव्हतें. जेव्हां दुसरें कोणीतरी तिला सांगे तेव्हां तिला समजत असे. इंदुमती व

राणकदेवी ह्या शांतपणानें पोटभर फराळ केल्या. फराळ झाल्यावर राणकदेवी आपल्या महालांत गेली. इंदुमतीही तिजबरोबर होती. त्यांचीं सर्व भाषणें त्यांच्या भातुकलीविषयीं होतीं. सुमारें नऊ वाजतां त्या दोघींना झोंप येऊं लागली, तेव्हां राणकदेवी म्हणाली, 'सखे इंदुमती, आज आपणाला फारच श्रम पडले बरें का. हीं गात्रें कशीं अगदीं थिजल्यासारखीं होत आहेत. झोंप तर अगदीं अनावर येत आहे.'

इंदुमती—खरेंच. माझी देखील अशीच अवस्था झाली आहे. मला वाटतें आतां झोंप घ्यावी हें उत्तम. आज येथें राहण्याबद्दल मी बाबांना सांगितलें आहे.

राणकदेवी—मलाही असेंच वाटतें. झोंप घेतल्यावर सर्व थकवा जाईल. ह्या प्रमाणें दोघींचें भाषण झाल्यावर त्या आपल्या पलंगावर जाऊन निजल्या. पडल्या बरोबर त्यांना गाढ झोंप लागली. दहा वाजतां सर्व दासी आपलीं कामें करून निजावयाला गेल्या. गुलाबीची पाहरा करण्याची पाळी आल्यामुळें ती मात्र जागत बसली. अकरा वाजतां सर्व राजवाड्यांत शांतता होती. पाहरेकरी मात्र आपल्या पाहऱ्यांवर, अफिणीच्या नादांत डुलक्या खात होते. प्रत्येक दालनातून मंदमंद दिवे जळत होते; राजवाड्यांत ह्या प्रकारांची व्यवस्था चालली होती तेव्हां नदीच्या घाटावर दहाबारा असामी एका होडींतून खालीं उतरले. त्यांचे पेहराव अगदीं काळ्या रंगाचे होते. ते कोण असावेत, ह्या ठिकाणीं उतरण्याचा त्यांचा हेतू काय हें कांहींच समजण्यासारखें नव्हतें. तेव्हां आपण त्यांच्या बरोबरच राहूं म्हणजे हे काय करणार

आहेत हें सर्व समजेल. होडींतून उतरल्यावर त्यांनीं राजवाड्याचा रस्ता धरिला; एकजण मागें होडींत राहिला होता. ज्या ठिकाणीं राणकदेवी व इंदुमती गोष्टी सांगत बसल्या होत्या त्याच ठिकाणीं त्यांची होडी उभी राहिली होती. राजवाड्याकडे जे इसम निघाले ते थेट राकणदेवीच्या महालाखालीं आले. राकणदेवीच्या महालाजवळ नदीकडच्या बाजूला एक बकूलवृक्ष होता, त्याची फांदी अगदीं महालांतील खिडकीबरोबर गेली होती.

ते लोक तेथपर्यंत आल्यावर त्यांपैकीं चार असामी झाडावर चढले. तेथें गेल्यावर महालाची खिडकी उघडी आहे असें त्यांना दिसलें; त्या बारींतून ते महालांत गेले. तेथें गेल्यावर त्यांनीं त्या खिडकीला दोरीची एक शिडी बरोबर आणिली होती ती बांधली. दोन असामी त्या खिडकी जवळ उभे राहिले व दोघे पुढें चालले. प्रथम त्यांना पलंगावर निजलेली इंदुमती दिसली. तिला गाढ झोंप लागली होती. फक्त तिचा श्वासोच्छ्वास मात्र मंदमंद असा चालला होता. त्यांनीं तिच्याकडे विशेष लक्ष दिलें नाहीं. ते तसेच पुढें राकणदेवीच्या छप्परपलंगाजवळ गेले. त्यांनीं हळूच अच्छरदाणी वर केली. राणकदेवी आपला उजवा हात उजव्या गळ्या खालीं ठेवून स्वस्थ निजली होती. तिचे काळेभोर केंस उशीवरून खालीं लोंबत होते. ती शालू पांघरून निजली होती. फक्त तोंड मात्र उघडें होतें. तें पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणें महालांतील मंदमंद जळणाऱ्या दिव्यांच्या उजेडांत दिसत होतें; जे दोघे इसम राणकदेवीच्या पलंगाजवळ गेले होते, ते वर्णानें अगदीं

काळे कभिन्न होते. त्यांनीं आपल्या डोक्यांत शंखासुरासारख्या काळ्या टोप्या घातल्या होत्या, फक्त डोळे तेवढे उघडे दिसत होते. अंगांत तसाच काळा डगला होता; पायांत इजार असून तिचा रंगही काळा होता. हाताचे पंजे मात्र मोकळे होते. तेवढ्या वरूनच त्यांच्या शरीराचा मूळचा वर्ण ओळखिता येत असे. राणकदेवीजवळ गेल्यानंतर ते आपल्या उद्योगाला लागले. राणकदेवीच्या पलंगाजवळ एका खुंटीवर एक स्वच्छ चादर होती, ती त्यांनीं घेतली. तिची घडी मोडली व तिला जमिनीवर पसरिलें. नंतर दोघेजण पुढें सरले. एकानें हळूच तिच्या अंगावरची शाल काढून टाकिली. नंतर दुसऱ्यानें दोन पाय धरले व पहिल्यानें डोकें धरून तिला अलगत उचलून त्या चादरीवर निजविलें. तेथें तिची मोट बांधिली. फक्त तोंड मात्र मोकळें ठेविलें होतें. इतका जरी प्रकार झाला तरी तिनें हां का चूं सुद्धां केलें नाहीं. त्या दोघांनीं ती मोट उचलून त्या खिडकी जवळ आले; खिडकी जवळ जे दोघे इसम होते ते झटकर त्या शिडीवर चढले, व एका खालीं एक असे उभे राहिले. बाकीची मंडळी जी बकुलवृक्षाखालीं होती तीही ह्यांच्या मदतीला धांवत आली आणि त्यांनीं ती मोट सहज रीतीनें खालीं आणून होडीचा रस्ता धरिला. जे इसम वर होते त्यांनीं शिडी सोडून घेतली व त्या बारींतून झाडावरून खालीं उतरले व आपल्या टोळीला जाऊन मिळाले. इतका प्रकार त्यांनीं अर्ध्या तासांत उरकला. होडींत ती मोट नीट व्यवस्थेनें ठेवून त्यांनीं होडी हांकारिली. एक कोस ती होडी नदीच्या कांठानें चालवून त्यांनीं होडी

धांवविली. इतक्यांत चार घोडेस्वार तेथें तयार होते. एका घोडेस्वारानें ती मोट आपल्या पाठीशीं बांधिली व घोडा पिटाळला. त्याच्याबरोबर बाकीचे स्वारही निघून गेले. ते स्वार निघून गेल्यावर ते काळे लोक होडीची व्यवस्था करून निघून गेले. ते जंगलांत चालले तेव्हां त्यांच्या बरोबर अपरात्रीं जाण्यांत अर्थ नाहीं ह्मणून आह्मी आपल्या वाचकांना तसदी देत नाहीं. बरें त्या घोडेस्वारांबरोबर आमचे पादचारी वाचक किती दौड करणार ह्मणून आह्मी तेथेंच त्यांना सोडून देतों.

# भाग ९ वा.

## गुजराथची राजधानी.

सिद्धराज राज्य करीत होता तेव्हां गुजराथ प्रांताची राजधानी पट्टण येथें होती. तें शहर व्यापाराकरितां मोठें प्रसिद्ध होतें. ह्या शहराला सभोंवार मोठा मजबूत कोट असून ठिकठिकाणीं बुरूज बांधले होते. पूर्वेकडच्या बाजूला जो दरवाजा होता तो मुख्य दरवाजा, असें सर्व लोक मानीत असत. त्या दरवाजानें आंत गेल्यावर मोठमोठाल्या व्यापारी लोकांच्या हवेल्या सारख्या लागून गेल्या होत्या. शहरच्या मध्यभागीं राजवाडा होता. एकेदिवशीं सकाळीं सूर्योदय होण्यापूर्वीं ह्या राजवाड्यांतून दोन गृहस्थ बाहेर पडले. त्यांतील एकाचें वय सुमारे चाळीस वर्षांचें असून चेहरा सुंदर होता. ह्याच्या शरीराचा बांधा ठेंगणा असून

पुष्ट होता. तरी त्यांत बोजडपणा नव्हता. ह्याच्या डोक्याला तांबड्या रंगाचें पिळदार पागोटें होतें. अंगांत लांब अंगरखा होता. पायांत सुरवार होती. जोडा चढाऊ असून सुबक होता. कमरेला एक पट्टा असून त्यांत म्यानांत घातलेली तरवार खालीं लटकत होती. ह्याच्या मिशा फार मोठ्याही नव्हत्या व लहानही नव्हत्या. ह्यांच्यामागून जो गृहस्थ बाहेर पडला त्याचें वय सुमारें पन्नास वर्षांचें असून वर्ण काळा होता. नाक डोळे वगैरे अवयव नीट होते. ह्याला लांब दाढी असून मोठमोठाल्या कल्लेदार मिशा होत्या. ह्याचा पोषाक पहिल्या मनुष्यासारखाच होता. फरक इतकाच कीं, ह्याच्या डोक्याला पांढऱ्या रंगाचें पागोटें होतें. पहिल्याचें नांव सिद्धराज असें होतें. हे गुजराथ प्रांताचे महाराज होते. ह्यांचा दरारा आजूबाजूच्या राजांना फार होता. हे स्वभावानें वेळ पडेल त्याप्रमाणें वागणारे होते. ह्यांना विद्येचा मोठा नाद होता. हे विद्वानांचे पोशिंदे होते. ह्यांच्या पदरीं पुष्कळ पंडीत व कवी होते. त्यांत एक भाट शीघ्रकवित्वाविषयीं फारच प्रख्यात होता. ह्यांच्या मागून जो दुसरा इसम राजवाड्यांतून बाहेर पडला तो त्यांचा सेनापती होता. त्याचें नांव किरणसिंग असें होतें. ह्या सेनापतीवर महाराजांचा मोठा लोभ होता व तो तसाच शूर व राजनिष्ठही होता. दाराबाहेर दोन घोडे तयार होते. दोघेही अरबी जातीचे असून वर्णानें पांढरे होते. त्यांचा बांधा सुंदर असून लठ्ठ होता. त्यांचीं जिनें भरगचीची असून सर्व सामान चांदीचें होतें. त्या घोड्यांवर बसून ते दोघे बाहेर निघाले. शहरांतून हळू हळू त्यांचे

घोडे चालले होते. पूर्वेकडील दरवाजानें ते बाहेर पडले व तसेच पुढें चालले. घोड्यांच्या गतींत कांहीं फरक पडला नव्हता. शहराबाहेर पडतोंपर्यंत त्यांचें कांहींच भाषण झालें नव्हतें. बाहेर आल्यावर सेनापती म्हणाला, 'सरकार, सिंधुराजाच्या दरबारीं आपण मुलीची मागणी केली असतां त्यांनीं नाकारावी, ही गोष्ट जरा आश्चर्य करण्यासारखी खरीच.'

**सिद्धराज**—मला आश्चर्य तर वाटत नाहीं, पण त्यांनीं माझा अपमान केला असें मी समजतों. 'मुलीनें दुसरा वर पसंत केला ह्याकरितां आपली तसबीर परत पाठविण्याला मोठी दिलगिरी वाटते परंतु इलाज नाहीं.' अशा प्रकारचें उत्तर मला पाठविलें. ह्यांत त्यांनीं माझा अपमान केला असें नाहींका होत?

**सेनापती**—हें काय सांगावें महाराज! अपमान म्हणजे किती पण! आज त्रिभुवनांत तरी त्यांना महाराजांप्रमाणें जांवई मिळेल का! संपत्ति, राज्य, स्वरूप, यौवन, शहाणपणा, विद्वत्ता इत्यादि गुणांत आमच्या महाराजांशीं साम्यता करणारा असा पुरुष सगळ्या पृथ्वीवर मिळणार नाहीं असें मी खात्रीनें सांगतों. मी तोंडासारखें बोलतों असें मात्र सरकारांच्या मनांत न यावें. मी जें बोलत आहें हें खऱ्या दिलानें व अनुभवानें बोलत आहें.

**सिद्धराज**—त्यांनीं आपलें कर्तव्य केलें, आपलें कर्तव्य तर अजून करणें बाकी आहे. साम, दाम, भेद व दंड ह्या चार उपायांनीं इच्छित हेतू शेवटास न्यावे असें राजनीतिवेत्त्यांचें मत आहे. साम करून कार्य साधलें नाहीं.

आतां दाम व भेद ह्या गोष्टींनीं कार्य होतें कीं नाहीं हें पाहणें आहे. ह्याही कामांत यश आलें नाहीं तर शेवटचा उपाय आहेच; एक दोन दिवसांत कांहींतरी समाचार कळावा असें आहे. पाहावें आतां काय होतें तें.

ह्याप्रमाणें गोष्टी बोलत ते दोघेजण चालले होते, इतक्यांत कांहीं अंतरावर एक मेणा व त्याच्या बरोबर चार स्वार येत आहेत असें त्यांनीं पाहिलें. सेनापती नीट न्याहाळून पाहून म्हणाला, 'सरकार, ते चार स्वार इकडे येत आहेत ते पाहिलेका! त्यांच्या पोशाकावरून ते आपलेच स्वार असावेत असें वाटतें; बरोबर एक मेणाही आहे. कामगिरी बरोबर साधली असें वाटतें.'

**सिद्धराजा** (तिकडे पाहून ह्मणाला)—'मलाही असेंच वाटतें; आपण आतां येथेंच थांबूं.' असें ह्मटल्यावर ते दोघे रस्त्याच्या बाजूला एक आंब्याचें झाड होतें, तेथें जाऊन घोड्यावरून खालीं उतरले. घोडे दोरीनें बांधल्या प्रमाणें उभे राहिले होते. हे दोघे आंब्याच्या एका मोठ्या मुळकं-ड्यावर बसले. खालीं बसल्यावर सिद्धराज ह्मणाला: 'कदा-चित् राणकदेवीला ते घेऊन आले असले तर तिला कोणत्या ठिकाणीं ठेवावी? तिला कांहीं दिवस बरें वाटणार नाहीं. तिच्या राहण्याची व्यवस्था चांगली ठेवून तिच्या तैनातीला जीं मनुष्यें द्यावयाचीं तीं देखील मोठी इमानी असलीं पाहिजेत. कांहीं दिवस ही गोष्ट आमच्या जनानखान्यांत कळतां कामा नये. मला वाटतें आपल्या मोतीबागेंतील बंगल्यांत तिची व्यव-स्था ठाविली असतां कांहीं हरकत पडणार नाहीं.'

**सेनापती**—आपली योजना फारच उत्तम आहे. मोतीबागेंतील बंगला चांगला सुंदर असून तेथें सर्व सोई आहेत. पुन्हां शहराबाहेर असल्यामुळें आपला इच्छित हेतू सहज पार पडेल. त्याच आहेत अशी एकदां खातरी झाल्यावर मग पुढील व्यवस्थेला किती उशीर लागणार आहे? मी खानगी कारभाऱ्यांच्या मदतीनें सर्व व्यवस्था हां हां ह्मणतां लावून देईन; इतकीं ह्यांचीं बोलणीं होत आहेत तों एक स्वार महाराजांसमोर येऊन घोड्यावरून खालीं उतरला व मोठ्या लीनतेनें मुजरा करून ह्मणाला, 'सरकार, बाईसाहेबांची स्वारी आली आहे. कोणत्या ठिकाणीं घेऊन जाण्याचें त्याबद्दल हुकूम व्हावा.' महाराजांनीं—'मोतीबागेंतील बंगल्यांत घेऊन जा. इतक्यांत सेनापति साहेब पुढील व्यवस्थेला येत आहेत असें सांगितलें.' हा हुकूम मिळतांच मुजरा करून तो स्वार घोड्यावर बसून निघून गेला. राजा व सेनापती हे दोघे घोड्यांवर बसले व भरधांव घोडे सोडून राजवाड्यांत दाखल झाले. राजवाड्यांत आल्यावर सेनापती, महाराजांना मुजरा करून निघून गेला व महाराज एकटेच आपल्या महालांत बसले. इतक्यांत एक जासूद मोहरबंद लखोटा घेऊन आला. त्यानें जमिनीला हात लावून त्रिवार महाराजांना मुजरा केला व तो लखोटा त्यांच्या हातांत दिला व आपण बाहेर जाऊन उभा राहिला. महाराजांनीं तो लखोटा फोडला व वाचण्याला सुरवात केली; कागद वाचीत असतां त्यांची चर्या अगदीं फिरून गेली. डोळे लालभडक होऊन गेले. मिशांचे केंस तांठ झाले. अंगाला दरदरून घाम सुटला; त्याचे उच्छ्वास मोठ्या

जोरानें सुरू झाले. अखेर मोठा सुस्कारा टाकून व तो कागद जमिनीवर आपटून आपल्याशींच ह्मणाले; 'माझ्या वकिलाचा अपमान आणि भर सभेंत, माझी निंदा? हे कांहीं सामान्य अपराध नाहींत. हे अपराध क्षम्य आहेत असा कोणता राज्यकार्यधुरंधर ह्मणणार आहे? झाला निश्चय. याच्यावर स्वतः स्वारी करणार. त्याच्या राज्याची धुळधाणी करून टाकीन तर मी नांवाचा सिद्धराज. राणकदेवीच्या दर्शनाविषयीं माझें मन उत्सुक झालें आहे, पण तें आवरलें पाहिजे. राज्यकारभार आणि त्यांत असला मोह मुळींच उपयोगी नाहीं. ती आतां जाते कोठें; आपल्याला असा किती अवधी लागणार आहे. त्या दुष्टांचें शासन केल्याखेरीज राणकदेवीचें दर्शनच घ्यावयाचें नाहीं.' इतकें भाषण केल्यावर त्यानें एका खिजमतदाराला हाक मारून सांगितलें कीं 'आतांच्या आतां तूं दिवाणजीकडे जाऊन त्यांना वाड्यांत घेऊन ये.' असा हुकूम करून महाराज त्या दिवाणखान्यांतून उठून मागच्या अंगाला एक दार होतें त्या दारांत शिरले व तें दार परत लावून घेतलें.

# भाग १० वा.

## तपास सुरू झाला.

सकाळचा दोन घटका दिवस आला होता; राणकदेवीच्या महालांत राणी भुवनसुंदरी, बिरबल, गुलाबी व इतर

दासी जमल्या होत्या; भुवनसुंदरीच्या तोंडावरचा तजेला अगदीं नाहींसारखा झाला होता. इंदुमती ह्यांच्या गडबडीनें जागी होऊन डोळे चोळीत आपल्या अंथरुणावर बसली होती; तिची मुद्रा अगदीं धुंद दिसत होती; डोळे लालभडक झाले होते; तोंडाची चव अगदीं नाहींशी होऊन गेली होती. राणकदेवीच्या महालांत ही गडबड कसली असावी या विचारांत ती पडली होती. भुवनसुंदरी राणी इंदुमतीला म्हणाली: इंदुमती, रात्रीं तुम्ही किती वाजतां निजल्यात?

**इंदुमती**—आमचा फराळ झाल्यावर कांहीं वेळानें निजलों, निदान आठ घटका तरी रात्र झाली असावी.

**भुवनसुंदरी**—राणकदेवी काल तुजजवळ कांहीं बोलत होती का?

**इंदुमती**—कशाविषयीं?

**भुवनसुंदरी**—कोठें तरी निघून जाण्याविषयीं?

**इंदुमती**—म्हणजे मला आपण काय म्हणत अहा हें समजलें नाहीं! ताईसाहेब महालांत नाहींत काय?

**भुवनसुंदरी**—ती महालांत नाहीं म्हणून तर ही चौकशी. मला गुलाबीनें सांगितलें कीं, ताईसाहेब महालांत नाहींत म्हणून मी येथें आलें.

**इंदुमती**—काय बाई तरी हें मोठेंच आश्चर्य! त्या आपण होऊन कोठें जातील असें आपल्याला वाटतें का?

**भुवनसुंदरी**—हल्लींच्या मुली तुम्ही. तुमचा काय बाई नेम सांगावा?

**इंदुमती**—छीः हें तर कधींच होणार नाहीं! त्यांना असें जाण्याला काय कारण पण?

**भुवनसुंदरी**—खेंगाराविषयीं तुजजवळ ती कांहीं बोलत नव्हती का?

**इंदुमती**—त्यांचा त्यांना ध्यास लागला होता; ही कांहीं गोष्ट खोटी नाहीं, तरी त्या अशा जातींत कसें घडावें?

**भुवनसुंदरी**—न जाण्याला काय झालें!

**वीरबल**—मा साहेब ह्मणतात हें संभवनीय दिसतें खरें! आपण होऊनच ती गेल्याखेरीज ह्या महालांतून तिला कोण घेऊन जाऊं शकेल!

**गुलाबी**—मासाहेब मी अकरावाजेपर्यंत त्यांच्या जवळ बसलें होतें मग मला झोंप येऊं लागल्यामुळें मी बाहेर जाऊन निजलें. काल मला स्वयंपाक करण्याचे भारीच श्रम पडले होते, त्यामुळें उजाडे पर्यंत मला मुळींच जाग आली नाहीं. आमच्या ताईसाहेब अकरावाजे पर्यंत महालांत होत्या हें खास. जेव्हां मी निजावयाला गेलें तेव्हां त्यांना स्वस्थ झोंप लागली होती.

**इंदुमती**—ज्याला असें जावयाचें असेल त्याला स्वस्थ झोंप कोठून येणार? हें कांहीं तरी मोठें गूढ असलें पाहिजे. कोणी तरी दगाबाजीनें त्यांना नेण्याचा घाट केल्याखेरीज त्या ह्मणून बाहेर जाणाऱ्या नव्हत! असें ह्मणत असतां ती बिरबलाच्या तोंडाकडे निरखून पाहत होती. पण त्याच्या

चेहऱ्यांत कांहीं फरक झालेला तिला वाटला नाहीं. शेवटीं ती ह्मणाली–'मासाहेब महाराज साहेबांना कळवावयाला उशीर होऊं नये; ते आले ह्मणजे शोधाची तावडतोब व्यवस्था लागेल.'

**भुवनसुंदरी**–मला कांहींसुद्धां सुचत नाहीं. महाराज आल्यावर ते काय म्हणतील नी काय करतील ह्याचा कांहीं नेम नाहीं; मी आतां स्वार रवाना करत्यें. सध्या तर मोठें संकट येऊन पडलें आहे. देवाला सर्व काळजी. मलाही हें आश्चर्य वाटतें. राणकदेवी जाणार नाहीं असें एकदां वाटतें, व पुन्हा मनांत येतें कीं जाईलही. नाद मोठा वेडा आहे; सारासार विचार तो अगदीं नाहींसा करितो.

**इंदुमती**–पण माझें मन मला खास सांगतें कीं कांहीं तरी कपट झालेलें आहे.

**बिरबल**–ही शंका व्यर्थ. कपट कोण करणार? त्यांनीं कोणाचें काय वाईट केलें होतें? सगळ्यांचा त्यांच्यावर जीव कीं प्राण. मासाहेबांना तर ही बातमी समजल्यापासून सारखें वेड लागलें आहे. सगळ्यांना प्रीय असणाऱ्या अशा मनुष्याबरोबर कपट कोण करील?

**इंदुमती**–कपटजाळ्यांत आमच्या ताईसाहेब सांपडल्या खऱ्या; मग तें कपट कोणाचें आहे ह्याची कायतो चौकशी.

**बिरबल**–हें तुमच्या मनानें कांहीं तरी घेतलें आहे.

**इंदुमती**–माझ्या नुसतें मनानें घेतलें आहे इतकेंच नाहीं, आतां सर्व गोष्टी हळू हळू माझ्या ध्यानांत येऊं लागल्या आहेत.

भुवनसुंदरी—ह्या गोष्टीचा वाद करण्यांत अर्थ काय? कपट होऊन जावो किंवा आपखुषीनें जावो, तपास तर केला पाहिजेना? बिरबलजी तुम्ही हुजुरातीच्या सरनोबताला जाऊन सांगा, कीं निरनिराळ्या दिशांना पांचशें स्वार शोधाकरितां पाठवा. बारीक रीतीनें त्यांनीं तपास करावा. जो ही बातमी आणील त्याला मोठें बक्षीसही मिळेल. त्याचप्रमाणें सांडणीस्वारांची रवानगी महाराजसाहेबांकडे करा. तुम्ही सविस्तर मजकुराचें पत्र लिहून द्या. जा तर लौकर!

असें सांगून भुवनसुंदरी राणी आपल्या महालाकडे निघून गेली. बिरबल स्वारांची रवानगी करण्याकरितां गेला, व गुलाबी व इंदुमती ह्याच विषयावर बोलत बसल्या.

# भाग ११
## राणकदेवीचा बंदिवास.

राणकदेवीला पाठीशीं बांधून एक स्वार निघाला म्हणून मागें एका भागांत सांगण्यांत आलें आहे. त्याच्याबरोबर दुसरे स्वारही निघाले. हे स्वार राणकदेवीला घेऊन मोठमोठाल्या मजला करून गुजराथ प्रांतांत आले. राणकदेवीला तीन दिवसपर्यंत कांहींसुद्धां समजलें नाहीं. ती शुद्धीवर आल्यावर आपली स्थिति काय आहे ह्याचा तिला बोध झाला. तीन दिवसपर्यंत पोटांत अन्न नसल्यामुळें ती अगदीं गळून गेली होती. ज्या इसमानें तिला पाठीशीं बांधलें

होतें तो शरीरानें धिप्पाड असून फार वळकट होता. त्यानें आपल्या पाठीशीं एवढें ओझें बांधलें होतें तरी त्याला त्याचें कांहींच वाटत नव्हतें. हा मनुष्य जरी शरीरबळानें भीमासारखा होता, तरी त्याचें अंतःकरण अगदीं कोंवळें होतें. एका राजकन्येला अशा स्थितींत आपण घेऊन जात आहों ह्याबद्दल त्याला वाईट वाटत होतें. जेवढी काळजी घेण्यासारखी होती तेवढी त्यानें घेतली होती. मागून पाठलाग होण्याची भीति होती म्हणून ते सिंधप्रांतांतून मोठमोठाल्या मजला करून गुजराथ प्रांतांत दाखल झाले होते. गुजराथची सरहद्द लागल्यावर राणकदेवीच्या प्रवासाला निराळें स्वरूप प्राप्त झालें. गुजराथेंतील पहिल्याच ठाण्यावर पूर्वींच सगळी व्यवस्था लागून चुकली होती. नोकर, चाकर, दासी, मेणा, भोई वगैरे व्यवस्थेची जय्यत तयारी होती. तेथपर्यंत त्या स्वारांच्या जिवांतजीव नव्हता; तेथें आल्यावर त्यांनीं दोन चार दिवस विश्रांती घेतली. राणकदेवीला दासी करवीं स्नान घालून नवीं वस्त्रें नेसण्याकरितां दिलीं. ती अगदीं म्लान झाली होती. शोकानें विव्हळ होऊन गेली होती. खाणें, पिणें तिनें सोडून दिलें व रडून रडून डोळे सुजवून घेतले होते. अशी जरी तिची स्थिति होती तरी त्या मुख्य स्वारानें तिचें समाधान होईल अशा गोष्टी सांगून तो तिला अळेंबळें कसें तरी खाऊं घालीत असे. ह्या स्वाराचें नांव केसरीसिंग असें होतें. गुजराथेंतील पहिल्या ठाण्यावर आल्यावर चार दासी राणकदेवीच्या तैनातींत दाखल

झाल्या. त्यांत शेवंती ह्या नांवाची एक दासी वयानें वीस बावीस वर्षांची असून स्वरूपानें फारच सुंदर होती. जशी ती सुंदर होती तशी मनानेंही चांगली होती. तिचा स्वभाव मोठा मनमिळाऊ होता. दुसऱ्याचें मन कसें वळवावें ही कला तिला उत्तम साधली होती. शेवंतीनें पहिल्याच भेटीला राणकदेवीला मोह घातला. शेवंतीनें जें जें सांगावें तें तें राणकदेवी मुकाट्यानें कबूल करीत गेली. विश्रांति घेतल्यामुळें व शेवंतीच्या सहवासानें राणकदेवी खाण्यापिण्याची अबाळ करिनाशी झाल्यामुळें ती चांगली हुशार झाली. मेण्यांत बसून राणकदेवीचा प्रवास सुरू झाला. तिच्या मेण्याबरोबर घोडयावर बसून तिच्या दासी चालत असत. शेवंती व केसरीसिंग हीं दोन मनुष्यें राणकदेवीचा शब्द झेलण्याला तयार असत. शेवंतीनें चमत्कारिक गोष्टी सांगत असाव्या; केसरीसिंगानें लढायांच्या व शिकारीच्या गोष्टी सांगाव्या; कधीं भुतें, वेताळ, चुडेल ह्यांच्या रसभरीत गोष्टी सांगाव्या; असें करून तीं दोघेजणें राणकदेवीचें दुःख कमी करीत होतीं. तिलाही त्यांच्या गोष्टी मनापासून आवडूं लागल्या. बहुतकरून ह्यांचा मुक्काम साधारण मोठ्याच गांवीं होत असे. मुक्काम होतांच स्थानिक अंमलदार ह्यांच्या स्वारीची तजवीज ठेवण्याला तयार असत. राहण्याची जागा खानपानाची व्यवस्था ते सुरेख लावून देत असत. कित्येक हांजी हांजी करणारे अधिकारी एकवार राणकदेवीला आमचा मुजरा तरी व्हावा म्हणून

शेवंतीची किंवा केसरीसिंगाची मनधरणी करीत असत. राणकदेवीनें एकदांसुद्धां हें त्यांचें म्हणणें मान्य केलें नाहीं.

ह्याप्रमाणें प्रवास करीत करीत एकेदिवशीं सकाळीं पट्टण शहराजवळ ही मंडळी आली इतक्यांत समोरून घोड्यावर बसून दोन इसम येत असल्याचें त्यांच्या दृष्टीस पडलें. तेव्हां हे कोण असावेत असा त्यांच्यांत प्रश्न निघाला. बराच वेळ वाद होऊन अखेर केसरीसिंगानें ठरविलें कीं महाराज व सेनापती आहेत. दुसरे म्हणाले, महाराज असते तर त्यांच्याबरोबर पुष्कळ मंडळी असती ते तर दोघे आहेत. केसरीसिंग म्हणाला, महाराज व सेनापती असे दोघेच नेहमीं सकाळीं फिरावयाला ह्या बाजूला येत असतात, मी त्यांना पक्कें ओळखिलें. असें म्हणून त्यानें आपला घोडा फेंकला; तो महाराजांजवळ दाखल झाला असें मागें सांगण्यांत आलेंच आहे. राणकदेवीला घेऊन मोतीबागेच्या बंगल्यांत गेले. मोतीबाग हा पट्टण शहरच्या दक्षिणेकडच्या अंगाला शहरच्या कोटाबाहेर होता. हा बाग मोठा असून त्यांत सुंदर व्यवस्था होती. मधोमध एक भव्य बंगला होता. त्यांत राजवैभवाला शोभण्यासारखी सगळी व्यवस्था होती. महाराज कधीं कधीं ह्या ठिकाणीं येऊन रहात असत. राणकदेवीला घेऊन केसरीसिंग मोतीबागेच्या बंगल्यांत गेला. तिची सर्व व्यवस्था दुसऱ्या मजल्यावर लावून दिली. शेवंती फराळाची तयारी करण्याकरितां गेली. इतर दासी राणकदेवीच्या स्नानाच्या तजविजीला लागल्या. सरकारवा-

ड्यांतून खानगीवाले व सेनापती मोतीबागेच्या बंगल्यांत आले. त्यांनीं सर्व व्यवस्था बरोबर लावून दिली. राणक-देवीच्या तैनातींत एकंदर शंभर मनुष्यें होतीं. बंगल्यावर शिबंदीच्या दोनशें लोकांचा पाहरा येऊन बसला. बागेच्या दारावरही पाहरे बसले. सेनापती व्यवस्था लावून खानगी कारभाऱ्याबरोबर निघून गेले. राणकदेवीचें स्नान व पूजा होऊन त्या जेवावयाला बसल्या. जेवण झाल्यावर राणकदेवी दिवाणखान्यांत येऊन बसली. जवळ शेवंती होतीच. राणकदेवीच्या डोळ्यांतून अश्रु चालले आहेत, असें पाहून शेवंती म्हणाली 'बाईसाहेब आपण असें दुःख कां करितां? आपल्याला येथें कांहींसुद्धां कमी पडणार नाहीं.'

**राणकदेवी**—कमी पडणार म्हणून मला वाईट वाटतें असें कां तूं समजतेस?

**शेवंती**—बाईसाहेब रागावणार नाहींत तर बोलतें.

**राणकदेवी**—बाई येथें मी कोणावर रागवावें? माझी येथें काय हुकमत आहे? कैदेंत पडलेल्या मनुष्याच्या रागाची किंमत काय? मी रागावलें तरी माझ्याहातून तुमचें काय होणार आहे?

**शेवंती**—महाराज आपण असें कसें म्हणता? आपण काय नाहीं करणार? आपण यजमान आणि आम्ही तर नोकर मनुष्यें.

**राणकदेवी**—गडे शेवंती, मी कांहीं येथें तुमची यज-मानीण होण्याकरितां आलें नाहीं. मला कांहीं तरी दगा

करून येथें आणिलें आहे. मी येथें कैदी आहे असें समजतें. मग तुम्हाला काय वाटत असेल तें वाटो.

**शेवंती**—आमचे महाराज कांहीं वाईट नाहींत. देखणे आहेत, विद्वान् आहेत, शूरही तसेच. बोलण्याचालण्याची ढब उत्तम, रसीकपणाही कांहीं कमी नाहीं. मोठें राज्य, विपूल संपत्ति, सर्वत्र दरारा, अगणीत सैन्य, सोळा राण्या, शिवाय उपस्त्रिया निराळ्या. असें वैभव असून शिवाय वयही फार नाहीं. मग आपण कां नाकारितां हें समजत नाहीं.!

**राणकदेवी**—जिकडे जाणें नाहीं तिकडला रस्ता तरी विचारण्याची काय गरज? बाईग माझें लग्नाचें ठरलें आहे. बहुतेक झाल्यासारखेंच आहे. फक्त शास्त्रोक्त विधि मात्र व्हावयाचा बाकी आहे. मग मला दुसऱ्याचें वैभव, रूप, व पराक्रम पाहून तरी काय करावयाचे आहे?

**शेवंती**—मला जितके राजे ऐकून माहीत आहेत, त्यांत कोणीसुद्धां आमच्या महाराजांच्या तोलाचा नाहीं.

**राणकदेवी**—माझा कांहीं वाद नाहीं. तुमचे महाराज चांगले असतील, पण मला काय त्यांचें? 'बहुरत्नावसुंधरा.' एकापेक्षां एक सरस असे पुरुष व स्त्रिया जगांत शेंकडों पडल्या आहेत.

**शेवंती**—असतील. मी नाहीं म्हणत नाहीं; पण आमच्या महाराजांचे आपल्यावर फार प्रेम आहेत. पट्टराणी करण्याकरितां त्यांनीं आपणाला येथें आणिलें आहे. अनायासें जर एका सार्वभौमाची पट्टराणी होण्याचा योग येत आहे, तर तो कां घालवावा इतकेंच माझें म्हणणें आहे.

**राणकदेवी**–तुमच्या महाराजांचें वय किती आहे ?

**शेवंती**–चाळीस वर्षांचें.

**राणकदेवी**–त्यांना राण्या किती आहेत?

**शेवंती**–सोळा जणी.

**राणकदेवी**–शिवाय उपस्त्रिया आहेतना ?

**शेवंती**–होय कितीतरी आहेत.

**राणकदेवी**–म्हणूनच मला आवडत नाहींत. माझे वयाशीं ताडून पहातां ते मला पित्यासारखे आहेत. ही आधीं मोठी हरकत. दुसरी हरकत अशी आहे कीं, एक सवतसुद्धां सहन होणें कठीण; मग ह्या ठिकाणीं त्या कितीतरी आहेत. मग तूंच सांग बरें, हा प्रकार कोणालातरी पसंत पडेल कां? ज्यांना म्हणून कांहीं कळतें आहे, त्यांना कांहीं मनापासून आवडणार नाहीं; जबरदस्तीनें झालेले विवाह जमेस धरावयाचे नाहींत.

**शेवंती**–आपण म्हणतां हें खरें आहे.

शेवंतीची भेट झाल्यापासून राणकदेवीच्या मनाचा ओढा तिच्याकडे लागत चालला होता. शेवंतीही मोठ्या प्रेमानें वागत असे. राणकदेवीच्या मनांत अनेक कल्पना येत असत, त्यापैकीं कांहीं ती शेवंतीलाही सांगत असे. शेवंतीला अनुकूळ करून घेतलें, तर येथून आपली सुटका करून घेणें साध्य आहे असें तिला वाटूं लागलें. गोड भाषण, इच्छानुकुलता, शहाणपण इतक्या गोष्टी ज्याला

अनुकूळ आहेत, त्याला कोणतीही गोष्ट साध्य होणें अशक्य नाहीं; असा तिचा समज होता. व ह्या समजाप्रमाणें तिनें आपलें वर्तनही ठेविलें होतें. प्रथम तिला जें येथें आल्याबद्दल दुःख वाटत होतें तें पुढें तिनें अगदीं बाहेर दाखविलें नाहीं. तिच्या वृत्तींत फरक पडलेला पाहून जवळच्या मंडळीला मोठें समाधान वाटूं लागलें.

## भाग १२ वा.

### धैर्यसिंह महाराजांचें शिकारीहून आगमन.

राणकदेवी नाहींशी झाल्यावर दुसरे दिवशीं भुवनसुंदरी राणीनें महाराजांना बोलावणें पाठविल्यावरून ते आपल्या सर्व मंडळीसह संध्याकाळीं राजवाड्यांत दाखल झाले. वाड्यांत आल्यावर प्रथम ते राणीच्या महालांत गेले. तेथें गेल्यावर त्यानें प्रथम राणीला सर्व हकीकत विचारिली; तिनें महाराज गेल्यापासून झालेली सर्व हकीकत सांगितली. तिच्या शोधाबद्दल काय काय तजविजी केल्या तेंही सांगितलें. राणकदेवी गेल्यापासून मला अन्न सुद्धां गोड लागत नाहीं असें सांगतांना तिच्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा चालल्या होत्या. अखेर ती इतकेंही ह्मणाली कीं, कितीही मी केलें तरी लोक ह्मणतील सापत्न मातेच्या त्रासाला कंटाळून तर ती कोठें गेली

असेल; पण मी तिला कशी वागवीतहोतें हें त्या सर्व परमेश्वराला माहीत आहे. मी भिऊन वागत असतां शेवट लोकांनीं नांवें ठेवावीं असा दिवस तर येऊन ठेपला. जेथें गेली असेल तेथें परमेश्वर तिला सुखी ठेवो. इतकी मी त्या प्रभूजवळ प्रार्थना करत्यें.

धैर्यसिंगाचा चेहरा उतरून गेला होता; राणीच्या भाषणाकडे त्याचें सगळें लक्ष होतें. तिच्या चेहेऱ्यावर बोलत असतां कसे फेरफार होतात, हें तो फार बारकाईनें पहात असतांही त्यांत त्याला कांहीं समजून आलें नाहीं. राणीला राणकदेवी गेल्याबद्दल खरें दुःख झालें आहे असें राजाला तर वाटलें. तिचें सर्व भाषण ऐकून घेतल्यावर मोठा सुस्कारा टाकून तो म्हणाला—'आपण जर धर्माला स्मरून वागत असलों तर मग लोकापवादाची भीति बाळगण्याचें प्रयोजन नाहीं. 'सत्यमेव जयते' हें वाक्य नेहमीं ध्यानांत ठेवावें. कितीही आरोप आले तरी शेवटीं सत्याचा जय होतो, व तुह्मी तिच्या बरोबर प्रेमभावानें वागत असतां तुह्मांला लोक नांवें ठेवतील अशी गोष्ट कधींही होणार नाहीं. लोक हे खऱ्या खोट्याचा न्याय करणारे मोठे वस्ताद परीक्षक आहेत. त्यांच्या दृष्टीपासून कांहीं ही गुप्त कृत्यें चोरून ठेवितां येत नाहींत. आजपर्यंत जगांत कोणतीही गुप्त गोष्ट उघडकीस आल्याखेरीज राहिली नाहीं. आतां मी जो सर्व वृत्तांत तुमच्या तोंडून ऐकिला

त्यावरून माझी लाडकी आपण होऊन गेली असावी, असें निदान मला तरी वाटत नाहीं. मजसारख्या ज्ञात्याच्या बापाला विरहांत टाकून ती कोठें तरी निघून जाईल इतकी कां ती निर्दय आहे? तिला आपल्या कुळाची व जनापवादाची अगदींच पर्वा नव्हती असें ह्मणणारा कोण आहे? खेंगारावर तिचें मन होतें हें मला समजलें होतें. असें असतांना कुलीन मुलींना कलंक लावणारें वर्तन माझ्या मुलीच्या हातून कालत्रयीही होणें नाहीं. कोणी तरी दुष्टानें कपट करून तिला नेलें आहे. पाहरेकरी ह्यासंबंधानें कांहींच सांगत नाहींत. गुलाबी अकरा वाजेपर्यंत जागत बसून मग निजते; पण दुसऱ्या दासीला पाहऱ्यावर बसविल्याखेरीज निजते, असें तुमच्या सांगण्यांत आलें आहे. वाड्यांतील दुसऱ्या कोणाला ती कशी गेली, केव्हां गेली, कोणीकडून गेली, तिच्या बरोबर दुसरें कोण आहे, ह्या प्रश्नांचें उत्तर देतां येत नाहीं. तेव्हां हिला कोणी गंधर्वानें किंवा यक्षिणीनें अंतराळीं नेलें असावें! जर मनुष्य घेऊन जाईल तर तिला तिची संमत्ती असली पाहिजे, पण असली संमत्ती राणकदेवीपासून कधींही मिळणार नाहीं हें आह्मी खातरीनें सांगतों. जर तिला मनुष्यानें नेलें असें मानिलें, तर तिला कांहीं तरी अमली पदार्थ चारून व तिच्या तैनातींतील मनुष्यांना फितूर करून नेलें असलें पाहिजे. आतां नेणारांचें दोन वर्ग आहेत. त्यापैकीं यक्ष किंवा गंधर्व ह्या कलियुगांत असलीं कृत्यें करीत नाहींत. निदान आह्मी तरी कधीं असें उदाहरण झाल्याचें ऐकिलें

नाहीं. अर्थात दुसरा प्रकारच घडला असला पाहिजे असा माझा तर्क आहे. आतां आपलें कर्तव्य एवढेंच आहे कीं, आमच्या वाड्यांत असलीं फितुरी मनुष्यें कोणी आहेत कीं काय, ह्याचा तपास करावयाचा. माझी मुलगी ह्मणजे जीव कीं प्राण! तिच्या बरोबर कपट करणाराचीं पाळेंमुळें मी खणून काढीन. ह्या कामांत जे कसूरदार असतील त्यांना क्षमा ह्मणून मिळणार नाहीं. बाहेर स्वारी पाठविण्याचे पूर्वी येथेंच चौकशी केली पाहिजे, असें मला वाटतें. महाराजांचें भाषण चाललें होतें, तेव्हां त्यांचा चेहरा अतीशय खवळून गेला होता. त्यांची दाढी थरथरत होती. डोळे लाल भडक होऊन गेले होते! राणी साहेब अगदीं निस्तेज दिसत होत्या, त्यांच्या डोळयांतून अश्रु वाहत होते, नाक व डोळे लाल होऊन गेले होते, त्यांचा पदर ओला झाला होता. इतक्यांत मदनसिंग राणीच्या महालांत आला. त्यानें महाराज व राणी ह्यांस मुजरा केला व तो महाराजांपासून थोडया अंतरावर उभा राहिला. ह्याचा पोषाक अगदीं विचित्र होता. डोक्याला पोलादी टोप होता. अंगांत गुढघ्यापर्यंत पोलादी चिलखत होतें. कमरेला चामडयाचा पट्टा असून त्यास म्यानांत घातलेली तरवार लटकत होती. पाठीवर गेंडयाच्या कातडयाची मोठी ढाल होती; पायांत भक्कम चढाऊ जोडा होता. ह्याच्या मूळच्या चेहऱ्यांत बराच फरक पडला होता. पूर्वीचा गोरेपणा जाऊन काळा सांवळा रंग आला होता. अतिशय श्रमानें व उन्हांत फिरावें लागल्यामुळें अशी त्याची स्थिति झाली होती. हा महालांत आला तेव्हां त्याचा चेहरा शोकाकुल दिसत होता.

मदनसिंगाला पाहून धैर्यसिंग ह्मणाले–'मदनसिंगजी तुह्मी बंडवाल्यांचा पराजय करून विजय मिळवून आलेत हें पाहून मला संतोष झाला आहे. तुमचा गौरव तुमच्या बहिणीनें किती तरी केला असता? पण काय! ती कोठें गेली नी तिची काय अवस्था झाली परमेश्वराला माहीत. तुमची योजना ह्या कामावर केली आहे. तुह्माला लागेल ती मदत द्या. हें तुमचें आवडतें काम आहे व तें तुह्मी मनापासून कराल अशी माझी खातरी आहे. तुमच्या बहिणीला तिच्या महालांतून कोणी दुष्टानें पळवून नेलें आहे; ह्याचा शोध तुह्मी करा. ह्या कामांत कोणी तरी येथले मनुष्य अनुकूळ असल्याखेरीज ही गोष्ट झाली नाहीं. तुह्मी जर राणकदेवीचा तपास करून चोरांचा पत्ता लावाल तर तुह्माला मोठेंच बक्षीस मिळेल.' मदनसिंग ह्मणाला 'सरकार मला ताईसाहेब नाहींशा झाल्याची खबर येथें येतांच समजली आहे. प्रथम मी ताईसाहेबांना भेटण्याकरितां त्यांच्याच महालांत गेलों होतों, व हा तेथून आपल्याला भेटण्याकरितां आलों. ताईसाहेब एकाएकी नाहींशा झाल्याची गोष्ट मोठी आश्चर्य वाटण्यासारखी आहे. मी ह्या गोष्टीचा तपास करतों, पण मला पाहिजे त्या मनुष्याच्या घराचा झाडा घेण्याचा व वाटेल त्या मनुष्याला कबज करण्याचा अधिकार असावा.' महाराज ह्मणाले–' तुह्माला वाटेल त्या मनुष्याला तपासण्याचा अधिकार आहे. मग तो मनुष्य कोणीही असो. माझी खातरी आहे कीं तुह्मी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करणार नाहीं.' मदनसिंग ह्मणाला–

'नाहीं नाहीं, सरकार मजकडून निरापराधी मनुष्यावर कधींही जुलूम होणार नाहीं.' महाराज म्हणाले—'चलातर तुह्मी आपल्या कामाला सुरुवात करा. राणीसाहेबांनीं जिकडे तिकडे स्वार रवाना केले आहेतच. मीही स्वस्थ बसत नाहीं; पण ह्या गोष्टीची सर्व जबाबदारी तुमच्यावर सोंपवितों.'

**मदनसिंग**—'रजा घेतों सरकार' असें ह्मणून महाराजांना मुजरा करून तो निघून गेला.

## भाग १३ वा.

## कपटस्फोट.

राणकदेवीच्या महालांत दोन मनुष्यें हळू हळू आपसांत कांहीं बोलत होतीं, हीं काय बोलत आहेत हें समजण्याची आमच्या वाचकांना इच्छा झाली असेल ह्मणून आपण त्यांच्या मागें जाऊन उभे राहूं, म्हणजे अनायासें सर्व ऐकावयास सांपडेल. इंदुमती व मदनसिंग हीं दोघेजणें बोलत आहेत असें त्यांच्या शब्दावरून तर आपण ओळखिलें.

**मदनसिंग**—ज्या दिवशीं तुमची भातुकली झाली त्या दिवशीं स्वयंपाक गुलाबीनें केला असें तुह्मी सांगितलें; आणि त्या दिवशीं तिची चर्या फिरल्यासारखी पण दिसत होती. आणखी काय? जेवण झाल्यावर थोड्याच वेळांत तुह्माला झोंप आली, आणि ती तरी कांहीं अम्मल करावा आणि जशी सुस्ती येते तशी आली असें तुह्मी सांगितलेंना?

ठाणे.

इंदुमती–होय. शिवाय गुलाबीच त्या दिवशीं पाहऱ्यावर होती.

मदनसिंग–बरें, सकाळीं तुह्मी किती वाजतां उठलां?

इंदुमती–मासाहेब आणि सर्व मंडळी जेव्हां येथें आली तेव्हां मी जागी झालें, तरी पण माझ्या डोळ्यावर झोंप होतीच. घसा कोरडा पडला होता व डोळे तारवटल्यासारखे झाले होते.

मदनसिंग–ह्या एकंदर गोष्टीचा विचार केला ह्मणजे गुलाबीवर संशय घेण्याला कांहीं हरकत दिसत नाहीं.

इंदुमती–तिचा लोभ ताईसाहेबावर फार दिसत होता.

मदनसिंग–पण त्याचा उपयोग काय?

इंदुमती–ताईसाहेब सांगत होत्या कीं, गुलाबीकडे नेहमीं बिरबल जात असे, नी तो तिच्या जवळ लग्न करणार आहे असेंही त्या कांहीं सांगत होत्या.

मदनसिंग–बस्स, बस्स, इतकी माहिती कांहीं गुलाबीला कैद करण्याला थोडी नाहीं. ती एकदां आमच्या ताब्यांत आली ह्मणजे मग तिच्यापासून पाहिजे ती माहिती काढतां येईल.

इंदुमती–भातुकली करण्याबद्दल आमचा विचार ठरला होता, पण त्याच दिवशीं करण्याबद्दल उत्तेजन प्रथम गुलाबीकडूनच मिळालें.

मदनसिंग–त्यांची कांहीं तरी योजना पूर्वी ठरलेली पाहिजे. गुलाबीनें तुमच्या जेवणांत कांहीं तरी अमली पदार्थ घातला असावा असें मानण्याला कांहीं हरकत नाहीं.

**इंदुमती**—बिरबलाला पकडण्याचा प्रसंग आला तर मग कसें ?

**मदनसिंग**—मी अगोदरच महाराजांची परवानगी घेऊन ठेविली आहे. असल्या गोष्टी ज्या घडतात त्याला बाहेरचे लोक कारण नसतात. हीं सर्व घरांतलींच कुलंगडीं असतात.

**इंदुमती**—मासाहेबांचें ह्या कामांत अंग असेल कां ?

**मदनसिंग**—पुरावा पुढें आल्याखेरीज जरी खातरीनें कांहीं सांगतां येत नाहीं, तरी ज्या अर्थी त्यांचा भाचा ह्या कामांत आहे, त्या अर्थी त्यांचा संशय घेण्याला जागा आहे.

**इंदुमती**—मग बाई मोठाच प्रसंग आला आहे. महाराजांचा राग मोठा कठीण आहे.

**मदनसिंग**—राणी साहेबांचें अंग आहे असें जर पुढें आलें तर मोठाच भयंकर प्रसंग. महाराज त्यांच्यावर सुद्धां दया करणार नाहींत. सखे मी आतां रजा घेतों. मला जी तूं माहिती दिली तेवढ्यावरून मी ताईसाहेबांचा शोध लावीन अशी मला उमेद वाटत आहे. प्रथम गुलाबीला तपासली पाहिजे. ह्याकरितां तुह्मी आतां येथून दुसऱ्या ठिकाणीं जावें हें उत्तम. प्रसंगीं आह्मांला शिपाईबाणाही दाखविण्याचा प्रसंग येणार !

इतकें मदनसिंगानें सांगितल्यावरून इंदुमती त्या महालाच्या शेजारच्या खोलींत जेथें भातुकलीच्या दिवशीं त्या दोघी यादी करण्याकरितां बसल्या होत्या त्या खोलींत निघून

गेली. मदनसिंग व इंदुमती ह्यांच्या गोष्टी चालल्या होत्या, तेव्हां गुलाबी बाहेर आपली चोळी घेऊन कशिदा काढीत बसली होती. तिचा चेहरा अगदीं काळा ठिक्कर पडला होता. चिंतेनें तिला पूर्ण ग्रासल्याप्रमाणें तों दिसत होता. ती खालीं पाहून आपलें कशिद्याचें काम करीत होती. इतक्यांत तिला मदनसिंगानें हाक मारिली. ती हाक कानीं पडतांच तिच्या अंगाला दरदरून घाम सुटला, हात पाय कापूं लागले. जाग्यावरून उठण्याचें सुद्धां अवसान राहिलें नाहीं. हातांतील सुई खालीं गळून पडली. पहिली हाक ऐकूं गेली नसेल असें समजून त्यानें विशेष जोरानें दुसरी हाक मारिली. ही हाक ऐकतांच 'जी महाराज, आलें' असें ह्मणून ती जाग्यावरून उठली, पण डोळयांपुढें अंधारी आल्यामुळें तिला नीटसा रस्ता देखील दिसेना. कसें तरी करून ती एकदाची मदनसिंगापुढें जाऊन उभी राहिली, पण त्याच्या चेहऱ्याकडे पाहण्याचें तिला धैर्य होईना. ती खालीं मान घालून हळूच ह्मणाली 'मला कशाला हांक मारिली?'

**मदनसिंग**–गुलाब! तुला कशाला हाक मारिली तें सांगण्यापूर्वी मी सांगतों इकडे नीट लक्ष असूं दे. मनुष्यें जगामध्यें लोभामुळें किंवा विषयवासना तृप्त करण्याकरितां किंवा अन्य कांहीं कारणांनीं एकाद्या भयंकर गोष्टीला प्रवृत्त होतात. त्यांना वाटत असतें कीं, आह्मी जीं कांहीं चोरून व गुप्त कृत्यें करीत आहोंत हीं कोणाला दिसणार नाहींत; पण हा त्यांचा समज चुकीचा असतो. सर्व जगाला पाहणारा परमेश्वर आहे. त्याला सर्व दिसतें हें त्याच्या ध्यांनीं मनींही

नसतें. तीं आपल्याकडून मोठ्या सावधगिरीनें कामें करीत असतात, तरी ईश्वराला असल्या अघोरे कृत्यांबद्दल त्यांना शासन ह्या जगीं व पुढें दुसऱ्या लोकीं द्यावयाचें असतें म्हणून तो कोणाच्या मनांत तरी असलीं कृत्यें उघडकीस आणण्याची प्रेरणा करितो व तो मनुष्य असलीं सर्व कृत्यें बाहेर काढितो॰ आमच्या ताईसाहेब आपल्या महालांतून नाहींशा झाल्या, ह्या कामांत तुझें पूर्णपणें अंग आहे, अशाबद्दल मी भक्कम पुरावा मिळविला आहे. तूं नाहीं म्हटलेंस तरी तेवढ्यावर कांहीं तें भागणार नाहीं हें खूप ध्यानांत ठेव. तुजवर आमच्या ताईसाहेबांचा पूर्ण लोभ होता असें असून तूं फितुरांत सामील झालीस हें चांगलें केलें नाहींस. त्यांच्या जेवणांत अमली पदार्थ घातलास हेंही उघडकीस आलें आहे. तरी हें करण्याला तुला दुसऱ्या कोणीतरी मनुष्यानें सांगितल्यावरून तूं हें केलें आहेस, इतका पुरावा तुला सुळी देण्याला पुरें आहे. तरीपण तूं आमच्या ताईसाहेबांच्या मोठ्या मेहेरबानींतली सबब तुजवर दया करावी असें माझ्या मनांत येतें. म्हणून तुला एकवार सांगतों कीं, तूं जर सगळा प्रकार खरा मजजवळ सांगशील तर तुला क्षमा करण्याबद्दल मी महाराज साहेबांच्या वतीनें वचन देईन, आणि हें जर तुझ्या हातून न झालें व ही वेळ जर चुकली, तर मग पुढें कांहीं उपयोग होणार नाहीं. ह्या करितां नीट विचार कर! आपल्या आवडत्या यजमानणीला अमली पदार्थ घालून तिला ह्या जगांतून नाहींसें करण्याचा हा तुमचा विचार किती भयंकर आहे? असल्या

अपराधाला शिक्षाही फारच कडक आहेत. तुझ्या अंगाला चिंध्या बांधून वरतीं तेल ओतून जीवंत जाळण्याची शिक्षा देण्याला मी कधीं कमी करणार नाहीं. तूं आपल्या तारुण्या-कडे पहा. एका क्षणांत ह्या तुझ्या सुकुमार शरिराची राखरां-गोळी होऊन जाईल. तुला वेदना किती होतील ह्याचा नीट विचार कर; एक शब्द खोटा निघाला तरी क्षमा मिळणार नाहीं.'

अशा प्रकारें मदनसिंगाचें भाषण चाललें असतां गुलाबी-ची अगदीं गाळण उडून गेली होती; ती एक सारखी थरथर कांपत होती; तिच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा चालल्या होत्या. मदनसिंगाचें सर्व भाषण ऐकून घेतल्यावर, ती शांतस्वरानें म्हणाली 'मी आपणाला खरें सांगतें, मी कांहीं ताई साहेबांना अमली पदार्थ घातला नाहीं. मला ह्यासंबंधानें कांहींएक माहीत नाहीं. विनाकारण जर माझा छळ करणें असेल तर खुशाल करा; मला जाळा, भाजा, सुळीं द्या, काय पाहिजे तें करा, मला ह्मणून ह्यांतील कांहीं एक माहीत नाहीं.

**मदनसिंग**—ज्या दिवशीं ताईसाहेब नाहींशा झाल्या त्या दिवशीं स्वयंपाक कोणी केला ?

**गुलाबी**—मी केला.

**मदनसिंग**—रात्री पाहऱ्यावर राहण्याची पाळी कोणाची होती ?

**गुलाबी**—माझी होती.

**मदनसिंग**—तूं पाहऱ्यावर होतीस तेव्हां ताई साहेब कशा नाहींशा झाल्या, हें तुला माहीत पाहिजे?

**गुलाबी**—पण मी अकरा वाजतां निजलें ह्मणून मला माहीत नाहीं.

**मदनसिंग**—तूं दुसऱ्या कोणाला पाहऱ्यावर बसण्याला सांगितलें होतें कीं नाहीं?

**गुलाबी**—नाहीं. मी कोणाला सांगितलें नाहीं.

**मदनसिंग**—हें सांगण्याचें तुझें काम होतें कीं नाहीं?

**गुलाबी**—ताईसाहेबांना झोंप लागली होती ह्मणून सांगितलें नाहीं.

**मदनसिंग**—बिरबलानें तुजबरोबर लग्न करण्याचें कबूल केलें आहे कीं नाहीं?

**गुलाबी**—नाहीं, मला स्मरत नाहीं.

**मदनसिंग**—त्याचें तुझ्या घरीं येणें जाणें आहे कीं नाहीं?

**गुलाबी**—तें मी सांगत नाहीं.

**मदनसिंग**—हें तूं सांगितलें पाहिजेच?

**गुलाबी**—बरें, होतें; पण त्याचें काय?

**मदनसिंग**—त्यानें तुला ताई साहेबांच्या जेवणांत अमली पदार्थ घालण्याला सांगितलें कीं नाहीं?

**गुलाबी**—नाहीं. मुळींच नाहीं.

**मदनसिंग**—तर तूंच आपल्या बुद्धीनें हें काम केलेंस?

**गुलाबी**—मी ते मुळींच घातले नाहींत.

**मदनसिंग**—तर दुसऱ्या कोणी घातले?

**गुलाबी**—मला काय माहीत!

**मदनसिंग**—इंदुमतीला अमली पदार्थ देण्यांत आले होते कीं नाहीं?

**गुलाबी**—मला माहीत नाहीं.

**मदनसिंग**—भातुकली झाली त्या दिवशीं रात्री ताईसाहेबांना फराळाला कोणी वाढलें?

**गुलाबी**—मी वाढलें.

**मदनसिंग**—त्या दिवशीं तुझी चर्या फिरल्यासारखी दिसण्याचें कारण काय?

**गुलाबी**—माझी मुद्रा फिरली होती असें मला तर स्मरत नाहीं! व तशी असण्याला कांहीं कारणही नव्हतें.

**मदनसिंग**—गुलाबी, तुझी एकंदर उत्तरें ऐकून मला वाटतें कीं तुझें आयुष्य संपलें. विनाकारण कां आपल्या जिवावर उदार होतेस? अजून विचार कर, अजून थोडा वेळ देतो. नीट विचार कर.

**गुलाबी**—माझा निश्चय झालेलाच आहे. ह्यांत कांहीं सुद्धां फरक होणार नाहीं.

गुलाबी पक्की बिलंद आहे, ही चवदाव्या रत्नाखेरीज ताळ्यावर येणार नाहीं, असें मदनसिंगाला वाटल्यावरून त्यानें शिपायाला हांक मारली. तेव्हां एक शिपाई आंत आला व मुजरा करून तो त्याच्या समोर उभा राहिला. त्याला मदनसिंग म्हणाला; 'ह्या रांडेला त्या खांबाला जख-

डून बांध !' त्यानें मदनसिंगाच्या हुकमाप्रमाणें गुलाबीला त्या महालांतील एका खांबाला जखडून बांधिलें. तिचें तोंड खांबाकडे केलें, दोन्ही पाय एकत्र जुळून त्यास खांबाबरोबर आटी दिली; दोन्ही हात जुळून ते खांबाबाहेर घेऊन करकचले. हा प्रकार चालला असतां गुलाबीचें सारखें रडणें चाललेंच होतें. पण त्या रडण्याकडे कोण लक्ष देतें ? बांधून झाल्यावर तिच्या पाठीवर कोरडे मारण्याला हुकूम झाला. गुलाबी मुळचीच नाजूक, तशांत ताईसाहेबांच्या मेहेरबानींतली असल्यामुळें तिला लहानपणापासून दुःख कसें तें माहीत नव्हतें. तिचें शरीर सुखानें अति नाजूक झालेलें होतें. शिपायानें करकरून बांधल्यामुळेंच आधीं तिच्या हातापायांना रग लागली होती. इतक्यांत कोरडे मारण्याचा हुकूम सुटला. मग काय विचारतां! एका पाठीमागून एक असे कोरडे उडूं लागले. त्याबरोबर ती मोठमोठ्यानीं ओरडूं लागली! पांच चार कोरडे बसतांच अंगांतून रक्तांच्या चिळकांड्या उडूं लागल्या तरी कोरडे मारण्याचें काम सुरू होतेंच. मारानें ती गयावायां करूं लागली व शेंवटीं 'मला मारू नका मी सर्व सांगतें,' असें म्हणाली. तेव्हां त्या शिपायाला मदनसिंगानें थांबण्याचा हुकूम केला. शिपायानें कोरडे मारण्याचें बंद केल्यावर मदनसिंग म्हणाला—'सांग तर लौकर तूं ताईसाहेबांना अमली पदार्थ खाऊं घातलास कीं नाहीं ?'

**गुलाबी**—पण मला जीवदान द्याल ना ?

**मदनसिंग**—तें आतांच मी सांगत नाहीं. तूं जर सर्व हकीकत सांगशील, तर मागून विचार करीन; बोल काय तें लौकर!

**गुलाबी**—मी ताईसाहेबांच्या जेवणांत अमली पदार्थ घातला होता.

**मदनसिंग**—कोणाच्या सांगीवरून तूं हा अमली पदार्थ घातलास ?

**गुलाबी**—बिरबल महाराजांच्या सांगण्यावरून!

**मदनसिंग**—असें करण्याचा हेतू काय ?

**गुलाबी**—तें मला कांहीं माहीत नाहीं. त्यांनीं सांगितल्यावरून घातला खरा.

**मदनसिंग**—हा पदार्थ तुला कोणी आणून दिला?

**गुलाबी**—करुणाशंकर वैद्यानें!

**मदनसिंग**—ताईसाहेबांना कोणीकडे नेण्याचा त्यांचा विचार होता ?

**गुलाबी**—तें मला कांहीं त्यांनीं सांगितलें नाहीं.

**मदनसिंग**—ह्या कटांत आणखी कोण कोण मंडळी आहे ?

**गुलाबी**—तें मला माहीत नाहीं.

**मदनसिंग**—ताईसाहेबांकडून तुला कधीं त्रास झाला होता ?

**गुलाबी**—कधीं नाहीं. माझेवर त्यांचा भारीच लोभ होता.

**मदनसिंग**—मग तूं त्यांना विष देण्याला कशी तयार झालीस ?

**गुलाबी**—बिरबल महाराजाबरोबर लग्न करावें असें माझे मनांत होतें व त्यांनीं सांगितलें कीं, जर तूं असें करशील तर मी तुझ्याबरोबर लग्न करीन.

**मदनसिंग**—तूं आपल्या सुखाकरितां आपल्या यजमानणीचा घात करण्याला तयार झालीस ?

**गुलाबी**—त्यांचा घात करण्याचा इरादा नव्हता.

**मदनसिंग**—तर काय करण्याचा होता ?

**गुलाबी**—सिद्ध राजाला नेऊन देण्याचा होता.

**मदनसिंग**—ह्या कामागिरीबद्दल त्यांना काय मिळणार होतें ?

**गुलाबी**—सिद्ध राजाकडून बिरबल महाराजांना मोठी जहागीर मिळणार होती.

**मदनसिंग**—मग ताईसाहेबांना सिद्धराजाकडे पोंहोंचते करण्यांत आलें कीं काय ?

**गुलाबी**—तें मला समजलें नाहीं.

**मदनसिंग**—जनानखान्यावरील पाहरेकरी फितूर केले होते कीं काय ?

**गुलाबी**—नाहीं.

**मदनसिंग**—मग ताईसाहेबांना नेतां कसें आलें ?

**गुलाबी**—मी सगळ्या पाहरेकऱ्यांना अंमल घातलेलें अन्न घाढून दिलें होतें. ह्यामुळें ते सर्व गुंगींत होते.

**मदनसिंग**—ताईसाहेबांना जेव्हां घेऊन गेले तेव्हां तूं काय करीत होतीस ?

**गुलाबी**—मी बाहेर जाऊन बसलें होतें.

**मदनसिंग**—कितीजण त्यांना नेण्याकरितां आले होते?

**गुलाबी**—दहा बारा असामी होते. त्यांतील चौघे मात्र वरती महालांत आले होते.

**मदनसिंग**—त्यांना दार कोणी उघडिलें?

**गुलाबी**—मी खिडकी उघडी ठेविली होती, तींतून ते बकुलवृक्षावरून वर आले व दोरीच्या शिडीवरून ताई-साहेबांना घेऊन गेले.

गुलाबीनें इतकी हकिकत सांगितल्यावर तिला सोड-ण्याचा हुकूम दिला व तिला महालांतील जेवणाच्या खो-लींत कोंडून ठेवण्यास सांगितलें. हिच्या खाण्यापिण्याची व्यवस्था खोलींतल्या खोलींतच व्हावी, बाहेर जाऊं नये; असा नीट बंदोबस्त करून मदनसिंग तावडतोब महालांतून निघून शेजारच्या खोलींत गेला. तेथें इंदुमती बसली होती. तिनें हा सर्व प्रकार पाहिला होता. मदनसिंग आंत जातांच ती म्हणाली 'बहुतेक तपास लागल्यासारखाच आहे. आतां त्यांना कोठें नेऊन ठेविलें आहे हें समजलें म्हणजे पुढील तजवीज करण्याला ठीक पडेल.'

**मदनसिंग**—आज मी महाराजसाहेबांची भेट घेऊन त्यांना सर्व हकिकत सांगतों व बिरबल व तो वैद्य ह्यांना कैद करण्याची तजवीज करतों.

**इंदुमती**—ताईसाहेबांच्या जिवाला कांहीं अपाय झाला नसला म्हणजे बरा.

**मदनसिंग**—त्याबद्दल काळजी करण्याचें कारण नाहीं. त्यांचा हेतू त्यांच्या जिवाला अपाय करण्याचा दिसत नाहीं, फक्त सिद्धराजाला नेऊन देण्याचाच त्यांचा उद्देश दिसतो.

**इंदुमती**—तरी देखील त्यांत मोठें जोखम आहेच!

**मदनसिंग**—तें कोणतें?

**इंदुमती**—सिद्धराजाबरोबर लग्न करण्याचा त्यांचा विचार मुळींच नाहीं. खेंगाराखेरीज इतर पुरुष पित्यासमान आहेत अशी त्यांनीं कडकडीत शपथ घेतली आहे. जर कदाचित् तो जबरीनें लग्न करण्याला तयार होईल तर त्या आत्महत्त्या करण्याला कमी करणार नाहींत! ह्याकरितां त्यांच्या सुटकेची तजवीज लौकर झाली पाहिजे.

**मदनसिंग**—ही सूचना खरोखरच विचार करण्यासारखी आहे. आतां प्रसंग तर मोठ्याबरोबर येऊन पडला आहे. अंगजोरानें सिद्धराजापासून परत आणणें हें काम कांहीं सोपें नाहीं. त्याच्याबरोबर सामना करण्याचें सामर्थ्य कांहीं आमच्या महाराजांच्या अंगांत नाहीं. कांहींतरी युक्ति केल्याखेरीज हें काम शेवटाला जात नाहीं. महाराजसाहेबांच्या सल्ल्यानें कांहींतरी योजना करतां येईल. मी आतां महाराजांकडेच जातों.

**इंदुमती**—मीही पण आतां घरीं जातें. ताईसाहेब गेल्यापासून वाड्यांतून मी मुळींच घरीं गेलें नव्हतें.

**मदनसिंग**—आतां पुन्हा भेट केव्हां? तुमच्या सल्ल्याची आम्हाला वारंवार जरूर पडणार!

**इंदुमती**—हा आपला उगाच मोठेपणें [illegible] वा-यकांनीं तो काय सल्ला द्यावयाचा आहे?

**मदनसिंग**—पण ह्या कामांत खरोखरच तुमच्या अनुमानावरूनच आम्ही बहुतेक काम केलें आहे. ह्यांत खरी करामत आमची कांहींच नाहीं. आम्हाला जी बातमी मिळाली त्यावरूनच इतक्या थराला ही गोष्ट आली आहे.

**इंदुमती**—ह्यांत काय मोठेंसें मी काम केलें आहे? मला जें ठाऊक होतें तें सांगितलें. नी दुसरें काय?

**मदनसिंग**—पण त्या सांगण्याभें किती काम केलें तें पाहिलेंतना?

**इंदुमती**—काम झालें खरें. आतां पुढें पत्ता लावण्याला कांहीं कठीण नाहीं.

**मदनसिंग**—आतां बोलत बसून उपयोग नाहीं. तुमच्याजवळ बसलें म्हणजे उठावेसें मुळींच वाटत नाहीं.

**इंदुमती**—आणि मला तरी कुठें उठावेंसें वाटतें आहे? पण इलाज काय? कोणी आल्यावर उठून एकीकडे व्हावें लागतें. कधीं सुदीन उगवेल तो खरा.

**मदनसिंग**—ताईसाहेबांचा शोध लावून झाल्यावर मग कांहीं उशीर नाहीं. ( असें म्हणून मदनसिंग महालाबाहेर पडला, ) व त्याच्यामागून थोड्याच वेळानें इंदुमतीही निघून गेली.

# भाग १४ वा.

## बिरबलाला कैद करितात.

बिरबल हा इंदुमती राणीचा मानकरी होता असें मागें सांगण्यांत आलेंच आहे. तो नेहमीं राणीसाहेबांच्या तैनातींत असे. त्याचें जेवणसुद्धां राणीसाहेबांच्याच पंक्तीला होत असे; त्याला राहण्याकरितां त्यांनीं आपल्या महालाजवळ एक महाल दिला होता. मागील भागांत सांगितलेला प्रकार झाल्यावर सुमारें दोन तासांनीं बिरबलाच्या महालाला हत्यारबंद शिपायांचा गराडा पडला. त्या शिपायांबरोबर मदनसिंग होता. त्याचा पोषाक ह्या प्रसंगीं, तो जेव्हां बंडवाल्यांचा पराभव करून महाराजांना भेटण्याकरितां भुवनसुंदरीच्या महालांत आला होता, त्यावेळीं जसा होता तसाच होता. तो एकदम दरवाजा उघडून बिरबलाच्या महालांत शिरला. हा महाल फार मोठा नव्हता तरी त्यांतील सर्व सामान मोठ्या श्रीमंती थाटाचें होतें. मदनसिंग जेव्हां महालांत गेला, तेव्हां बिरबल एका चांदीच्या कोचावर बसलेला असून तो कांहीं वाचीत होता. मदनसिंग एकदम आंत आलेला पाहून तो प्रथम जरा चपापला व हातांतला कागद त्यानें घडी करून फाडून टाकिला. मदनसिंग आंत गेल्यावरोबर त्यानें त्याला सांगितलें कीं;–'तुम्ही सरकारचे गुन्हेगार अहां. ताईसाहेबांना पळवून नेण्याच्या कामांत तुमचें अंग असल्याबद्दल तुमच्यावर आरोप ठेवण्यांत आला आहे. सरकारच्या हुकुमानें मी तुम्हाला कैद करण्याकरितां

आलों आहें निमूटपणें तुम्ही स्वाधीन व्हाल असें मी इच्छितों.' मदनसिंगाचें हें भाषण ऐकून तो मोठ्या रागानें म्हणाला.—तुम्ही काय मला अपराधी समजतां? हें म्हणणें निवळ खोटें आहे. मी राणीसाहेबांचा नौकर आहें. मला कैद करण्याचा कोणालाही अधिकार नाहीं. तुम्ही निमूटपणें माझ्या महालांतून निघून जा, नाहीं तर मला स्वतःच्या बचावाकरितां हातांत शस्त्र घ्यावें लागेल.' असें म्हणून झटकर त्यानें खुंटीला लटकविलेल्या तरवारीला घात घालून ती नागवी करून हातांत घेतली. मदनसिंग म्हणाला.—'बिरबलजी मला तुह्मी दबकावण्याच्या गोष्टी सांगूं नका. तुम्ही आपल्या बचावाकरितां हातांत तरवार घेतलीत तरी त्या तुमच्या तरवारीपासून तुमचा बचाव होणार नाही हें खूप ध्यानांत ठेवा. बचावाकरितां तुम्ही जशी आपली तरवार बाहेर काढिलीत तशी सरकारी कामाकरितां मलाही आपली तरवार बाहेर काढावी लागेल. उगाच बखेडा माजविण्यांत कांहीं निष्पन्न होणार नाहीं. जरा बाहेर दृष्टी द्या. शंभर नागव्या तरवारी माझ्या हुकुमाची वाट पाहत आहेत. इतक्या तरवारीपासून तुम्ही आपला बचाव कसा करूं शकाल? जर तुम्ही गडबड कराल तर तुम्हाला जबरदस्तीनें कबज करण्याला आम्ही कमी करणार नाहीं; व इतका प्रकार झाल्यावर तुम्ही राणीसाहेबांचे कोणी आप्त आहां, किंवा मानकरी आहां, ह्याचाही विचार न करितां एकदम साधारण कैद्याप्रमाणें हातकड्या घालून भर रस्त्यांतून मिरवीत नेण्याला आम्ही मुळींच कमी करणार नाहीं. बोला काय तें? तुम्ही आपल्या तरवारीला म्यान करतां कीं, नाहीं?'

**बिरबल**–करीत नाहीं, साफ करीत नाहीं.

बिरबल आपल्या हातांत तरवार घेऊन कोचावर बसला होता व मदनसिंग त्याच्यापासून चार हातांवर उभा होता. बिरबलाच्या तोंडांतून शेंवटचा शब्द बाहेर निघतो न निघतो, इतक्यांत मदनसिंगानें अतिशय चपळतेनें बिरबलाच्या मनगटावर आपल्या तरवारीच्या पाटीचा इतक्या जोरानें रट्टा दिला कीं, त्या सरशीं बिरबलाच्या हातांतून तरवार एकदम खालीं पडली. तरवार खालीं पडतांच तिच्यावर जोडयाचा पाय देऊन त्यानें बिरबलाला जोरानें उलथून कोचावर पाडिलें व बाहेरच्या शिपायांना मदतीला बोलावलें. मदनसिंगाबरोबर बिरबलानें बरीच दांडगाई चालविली होती, पण तरवारीच्या रट्यानें त्याला भिरभिरी आली होती, ह्यामुळें त्याचा कांहीं जोर चालला नाहीं. इतक्यांत बाहेरचे शिपाई मदतीला येऊन पोंहचले. त्यांनीं ताबडतोब त्याच्या हातांत हातकड्या ठोकल्या, व दंडाला दोरी बांधून त्याला घेऊन गेले. जातांना फक्त चालीपुरते कपडे मात्र त्याला दिले होते. बिरबलाला कैद करून घेऊन गेल्याची खबर ताबडतोब भुवनसुंदरीला कळली. ही बातमी ऐकल्याबरोबर तिच्या पोटांत धस्स झालें, तोंडावरचा तजेला अगदीं गेला. बिरबलाला कैद करण्याचें कारण तरी काय ह्मणून तिनें चौकशी करण्याकरितां एका दासीला पाठविलें. तिनें खबर आणिली कीं ताई साहेबांना पळवून नेण्याच्या कामांत त्यांचें अंग होतें ह्मणून मदनसिंगानें त्यांना कैद करून नेलें आहे.

मदनसिंगाचें नांव ऐकतांच तिला अतिशय राग आला. माझ्या मनुष्याला कैद करण्याला मदनसिंगाला महाराजांनीं सांगितलें तरी कसें, हें तिला नीटसें कळेना सुद्धां. कांहीं तरी कळ लावून मदनसिंगानें दिली असेल आणि त्यामुळें महाराजांनीं त्यास हा हुकूम दिला असेल असें ती आपल्याशींच पुटपुटत होती. महाराज आल्यावर त्यांना सांगतें कसें काय आहे तें; असें ह्मणून तिनें एका दासीला महाराजांना बोलविण्याकरितां पाठविलें. हा सर्व प्रकार ऐकल्यापासून राणी साहेबांना कांहीं सुचेनासें झालें होतें. रागानें व काळजीनें त्यांचें डोकें भणभणून गेलें होतें. अखेर झोंपाळ्यावर तक्याला टेकून विचार करीत त्या पडल्या. इतक्यांत महाराजांना बोलावण्याकरितां जी दासी गेली होती ती परत आली. तिनें सांगितलें—'मासाहेब महाराज आपल्या महालांत मदनसिंगाबरोबर कांहीं खलबत करीत बसले होते. कांहीं वेळपर्यंत मला तेथें कोणी जाऊं दिलें नाहीं. अखेर मी फारच अर्जवें केलीं तेव्हां एका खिजमतगारानें महाराजांना कळविलें कीं, मासाहेबांकडून एक दासी आली आहे. हें त्याचें बोलणें ऐकून महाराज मोठ्या संतापानें ह्मणाले.—'कशाला आली आहे विचार तिला ?' मी जरा पुढें जाऊन सांगितलें कीं, 'मासाहेब सरकार स्वारीचें दर्शन घेऊं इच्छितात.' माझें बोलणें ऐकून कपाळाला आंठ्या घालून व डोळे वटारून म्हणाले.—'जा आपल्या धनिणीला सांग, आज भेटण्याला सवड नाहीं. पुन्हां त्रास देण्याला येथें कोणाला पाठवूं नका !' मासाहेब सरकारच्या तोंडचे हे शब्द ऐकून मी त्याच पायीं परत फिरलें. दासीचें हें भाषण ऐकून क-

पाळावर हात मारून राणी म्हणाली—'महाराज देखील असें म्हणालेना! मला भेटण्याला सवड नाहींना! आणि माझ्या बोलण्याचा त्यांना त्रास वाटतो! राणकदेवीसंबंधानें माझा देखील महाराजांना संशय आला तर! नशीव माझें. मी ज्या कर्माला भीत होतें, तें अखेर पुढें आलें. अखेर माझ्या तोंडाला काळोखी येण्याचा प्रसंग आला तर! आतां हें तोंड जगांत दाखविणें लाजिरवाणें आहे. हा बेत मनांत योजिला तेव्हांच माझे मनांत निरनिराळे कुतर्क येत होते. महाराजांना आतां तोंड काय दाखवूं?'

'कर्माप्रमाणें फळें मिळतात. मला हे धंदे कोणी सांगितले होते? मला कांहीं तरी जरूर होती कां? पण कर्माप्रमाणें बुद्धि होणार! विरबलानें भर दिल्यामुळें माझे मनांत विचार येऊं लागले. अखेर परिणामावर गोष्ट आली! विरबलाला कैद करून तो मदनसिंग घेऊन गेला. तो मेला लढाईतूनही परत आला. माझे सर्व बेत स्वप्नवत् झाले. अपमान, विटंबना, हाल, शिव्या, शाप, ह्यांखेरीज आतां माझ्या वांट्यास कांहीं येणार नाहीं. मृत्यूला शरण जाण्याखेरीज आतां दुसरा उपाय नाहीं. माझें नांव फुटल्याखेरीज राहणार नाहीं. कदाचित् त्यांना समजलें देखील असेल. मी आतां राणी नाहीं, असेंच समजावयाचें. आतां सुखाचे दिवस येण्याची आशा नाहीं; वाईटाचा परिणाम वाईट हा व्हावयाचाच असा ईश्वरी नेमानेम आहे. मनुष्याला वाटत असतें कीं, यंव करीन, त्यंव करीन, अशीं कारस्थानें करीन, हें नुस्तें पटल आहे. मी जर आपल्या धर्माप्रमाणें वागलें असतें तर मजवर हा प्रसंग कशाला आला असता!

महाराजांच्या इच्छेविरुद्ध वागण्याचा संकल्प केल्यापासून माझे मनाची शांतता नाहींशी झाली. एकाद्या भ्रमिष्टा-प्रमाणें माझी स्थिति झाली होती. धर्मशास्त्राप्रमाणें मी प-तीजवळ बेमान झालें. आपल्या मुलीच्या विरुद्ध कटांत सामील झालें. मरतांना डोळ्यांत पाणी आणून राणकदे-वीच्या आईनें माझ्या ओटींत त्या पोरीला घालून सांगितलें कीं, 'आतां हिचें लालनपालन तुह्मीच करा, माझ्या ठि-काणीं तुम्हीच अहां' असें सांगतांना तिच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा चालल्या होत्या. मीही सांगितलें होतें कीं, तुम्ही कांहीं काळजी करूं नका, मी आपल्या मुलीप्रमाणें तिचें रक्षण करून तिला सुख होईल असें करीन. देवा! ते शब्दही मी मोडले. दिलेलें वचनही मी पाळलें नाहीं. त्या पोरीला सुख मिळूं नये म्हणून उलट प्रयत्न चालविले. माझ्या हेतूंना ती अनुकूळ झाली नाहीं ह्मणून तिचा द्वेष करूं लागलें. किती तरी मी चांडाळीण! कुलीन स्त्रियांना पतिआज्ञा मान्य असते. मी पतीच्या आज्ञेविरुद्ध वागण्याला प्रवृत्त झालें! ईश्वराला अपराध कसा सहन होईल? माझ्या प्रिय भगिनींनो! माझ्या भयंकर स्थितीकडे पहा; मला जसा कृतकर्माचा पश्चाताप झाला आहे असा प्रसंग तुम्ही कधीं आपणांवर येऊं देऊं नका. मीं कपट केलें त्याचें फळ मला मिळालें. संसारांत स्त्रियांना निरनिराळ्या अवस्था प्राप्त होतात. अनेक प्रकारच्या मनुष्यांबरोबर वागावें लागतें. सवती असल्या तर कित्येक स्त्रिया त्यांच्याबरोबर भांडणें करून संसाराची राखरांगोळी करून टाकितात. एकमे-कीविरुद्ध नाना प्रकारच्या खटपटी करून एकमेकींना हा-

णून पाडण्याचा प्रयत्न करितात. अखेर इष्टहेतू साधण्याकरितां अन्यायानें वागण्यालाही तयार होतात. त्याचा परिणाम अखेर कांहीं तरी भयंकर होऊन ज्या सुखाकरितां त्यांचे प्रयत्न चालले असतात तें सुख तर मिळत नाहींच, पण उलट परिणाम मात्र वाईट होतो. मीच पूर्वी किती सुखी होतें ? राणकदेवी मजवर किती प्रेम करीत असे ? आमचें प्रेम पाहून महाराजांना तरी किती आनंद होत असे ? राज्यलोभाची झुळूक माझे अंगांत शिरतांच सर्व सुखांचा अंत झाला ! प्रेम पार नाहींसें झालें. सारासार विचार अस्तास गेला. कुलीन स्त्रियांचे पतिप्रेम इत्यादि सद्गुणांची पार फारकत झाली. द्वेषाग्नि धुमसूं लागला. त्याला बिरबलाच्या विचारांची भर पडतांच तो फारच वाढला व त्यांतच शेवटीं माझा अंत होणार हें नक्की ठरलें. आतां जिवंत राहणें योग्य नाहीं. मृत्यु पत्करिला पाहिजे. देवा मी अपराधी आहें. अझूनपर्यंत अनेक अपराध केले असून आत्मघात करून आणखी एका अपराधाची त्यांत भर घालीत आहे, पण इलाज नाहीं. असें केल्याखेरीज आतां दुसरी तोड नाहीं. अब्रूकरितां असें करणें भाग झालें आहे. परमेश्वरा हे अपराध पोटांत घाल. मला कृतकर्माचा पश्चाताप झाला आहे. हें देहांत प्रायश्चित्त घेण्याचा माझा संकल्प आहे. ह्याला तुझी मदत असावी इतकीच शेवटची प्रार्थना आहे.' भुवनसुंदरी झोंपाळ्यावर तक्याला टेकून पडली होती. तिच्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा चालल्या होत्या. चेहरा कोमेजून गेला होता. भुवनसुंदरीनें आपल्या बोटांतील हिऱ्याची आंगठी काढली व उजव्या हातांत घे-

ऊन म्हणाली—' आजपर्यंत मी तुला आपल्याजवळ बाळ-गिलें. तुजवर माझा फार लोभ होता. मी तुला कधींसुद्धां विसंवलें नाहीं. माझे प्राणाची मैत्रिण तूंच आहेस. अखेर-पर्यंत मी तुला विसरणार नाहीं. हे सूर्यनारायणा, ह्या अभागीवर दया कर. हे अष्टदिग्पाळांनो ह्या पापिणीला पुढील रस्ता दाखविण्याची कृपा करा. हे यमधर्मा मी पति-द्रोहाचें पातक केल्यामुळें पतीत झालें होतें ह्मणून हें भयंकर प्रायश्चित करून मोकळी होत आहे, तेंव्हां आतां मजवर दया कर. हे पृथ्वीमाते ह्या कन्येवर लोभ असूं दे. मी तुह्मास शेवटचा नमस्कार करितें. हे लोपामुद्रे महासती, हे परमपवित्रे सुलोचने, हे पवित्रे सावित्री, पतीबरोबर राना-वनांत फिरणार सीते; ही पातकी, दुष्ट, पतीबरोबर कपट करणारीण चांडाळीण द्रव्यलोभानें आपल्या मुलीचा घात करणारीण अनन्यभावानें तुम्हाला शरण आली आहे. स्त्री-जातीला कलंक लावण्यासारखें कृत्य माझ्या हातून झालें म्हणून कोप करूं नका. मला पुरापुरा पश्चात्ताप झाला आहे. विकारवश होऊन माझे हांतून जी गोष्ट झाली तिचें क्षालन करीत आहे. मजवर तुम्ही कोप केल्यास माझी गती काय होईल. महाराज ही अभागी तुमच्या दर्शनसु-खाला अंतरली. माझीं कृत्यें तुम्हाला समजल्यावर तुम्हाला मजविषयीं काय वाटेल! मी ह्यापुढें तुमच्याजवळ राहण्याला योग्य नाहीं. माझी सावली घेतली असतां ती देखील आपणाला अपवित्र करील इतकी मी दुष्ट आहे. माझ्या कर्माप्रमाणें फळें मिळालीं. ही पातकी दासी शेंवटचा प्रणि-

पात करीत आहे, ह्याचा स्वीकार करा.' ह्यावेळीं भुवनसुंदरीची स्थिति केविलवाणी झाली होती. ओंठ अगदीं सुकून गेले होते. छाती धडधडत होती. डोळे अर्धवट मिटलेले होते. नासाग्रीं दृष्टि होती. डोळ्यांतील पाण्याची धार गालांवरून चालली होती. एका दासीला हांक मारून ती म्हणाली, 'मला कोणी उठवूं नका.' असें सांगून तिनें हातांतली आंगठी गिळली व झोंपाळ्यावर सर्व अंगावरून शाल पांघरून निजली. थोड्याच वेळांत विषाचा परिणाम तिला जाणवूं लागला. पण मोठ्या निश्चयानें तिनें आपलें दुःख अगदीं बाहेर पडूं दिलें नाहीं.

# भाग १५ वा.

## जासूद येतो.

सूर्योदय होण्याची वेळ होती. गांवांतून गुराखी गुरें घेऊन जंगलाकडे चालले होते. शेतकरी आपआपल्या शेतांत काम करण्याकरितां निघाले होते. इतक्या संधीला एक मनुष्य जुनागडाकडे मोठ्या घाईनें चालला होता. ह्याच्या अंगांतून घामाच्या धारा वाहत होत्या; गुढग्यापर्यंत त्याचे पाय धुरळ्यानें भरून गेले होते. ह्याचे कपडे मलीन दिसत होते. डोक्याला एक लहानसें पांढरें पागोटें कसें तरी गुंडाळलेलें होतें. अंगांत खादीचा अंगरखा होता; नेसलेल्या धोतराचा त्यानें कांच्या मारिला होता. पायांत

एक लठ्ठ कांठेवाडी तऱ्हेचा जोडा होता. हातांत एक वांबू-ची भक्कम काठी असून तिला खालच्या अंगाला लोखंडा-ची मापणी मारलेली होती. ह्याचें वय सरासरी चाळीस वर्षांचें तरी असावें असें दिसत होतें. ह्याचा बांधा मजबूत होता. शरीराची काठी उंच होती. वर्ण निमगोरा असून चेहरा सुंदर होता. मिशा मोठ्या असून ह्यानें दाढी राखि-ली नव्हती. हा मोठ्या दवडीनें लांबून आला असावा असें दिसत होतें. ह्याच्या बरोबरच आपण जाऊं या म्हणजे हा कोण आहे तें समजेल. जुनागडच्या कांटा खालीं आ-ल्यावर तो जरा विश्रांति घेण्याकरितां खालीं बसला. त्यानें आपल्या पुटकुळीची एक जस्ताची डबी बाहेर काढिली व ती उघडून तींतून कांहीं एक प्रकारचा काळा पदार्थ बाहेर काढून त्याची हरभऱ्या एवढी गोळी त्यानें तोंडांत टाकिली. ती गोळी तोंडांत टाकल्यावर त्यानें तोंड जरा चमत्कारिक केलें. पुन्हा ती डबी बंद करून त्यानें पुटकुळीला लाविली. नंतर त्यानें आपली काठी हातांत घेतली व शहराचा रस्ता धरिला.

शहरांत शिरतांना त्याला एक मोठा दरवाजा लागला; त्या दरवाज्याला मोठमोठाले लोखंडी खिळे मारलेले असून त्याचीं बोंडें सरासरी टीचभर तरी बाहेर राहिलेलीं होतीं. त्या दरवाज्याला एक दिंडी होती. त्या दिंडींतून सर्व लो-क जात येत होते. बाकीचा दरवाजा लाविलेला होता. त्या दिंडींतून आंत गेल्यावर त्यानें तेथें दोन शिपाई पाहिले ते खांद्यावर तरवारी टाकून पाहरा करीत होते. त्यांना ह्या प्रवाशानें 'राजवाड्याला रस्ता कोणता जातो' म्हणून प्रश्न

केला. त्यांपैकीं एका पहारेकऱ्यानें. ‘सरळ जा म्हणजे नेमका राजवाड्याजवळ जाशील’ असें सांगितलें. तो त्या रस्त्यानें पुढें चालूं लागला. राजवाड्याजवळ आल्यावर त्यानें पुन्हा एका मनुष्याला विचारिलें–‘राजवाडा कोठें आहे?’ तो म्हणाला–‘बाबारे तुला राजवाडा ओळखूं येत नाहीं? हे पहा शेंकडों स्वार येथें उभे राहिले आहेत. जागजागीं शिबंदीचे लोक पाहरा करीत आहेत. मोठमोठाले हत्ती डुलत उभे राहिले आहेत, हें ऐश्वर्य राजाखेरीज दुसऱ्या कोणाच्या घरीं असणार आहे?’ इतकें भाषण ऐकून तो राजवाड्याच्या पुढील दरवाज्याकडे गेला. हा दरवाजा पूर्वेकडच्या अंगाला होता. त्या दरवाज्यावर नागव्या तरवारींचा खडा पाहरा होता. ह्या प्रवाशानें त्या पाहरेकऱ्यांच्या कानांत कांहीं मजकूर सांगितला व त्याबरोबर त्याला आंत जाऊं दिलें. हा वाडा तीन मजली असून ह्याला चौदा चौक होते. पहिल्या चौकांतून दुसऱ्यांत, दुसऱ्यांतून तिसऱ्यांत, असा जात जात तो दहाव्या चौकांत गेला. तेथें त्यानें एका पाहरेकऱ्याला विचारलें–‘मला महाराजांना भेटावयाचें आहे, ते कोठें बसले आहेत?’ त्या पाहरेकऱ्यानें सांगितलें–‘हा जिना दिसतो ह्यानें वर जा. तेथें दुसरा जिना लागेल, त्या जिन्यानें तूं तिसऱ्या मजल्यावर जाशील, त्या ठिकाणीं पाहरेकरी आहेत, त्यांना विचार म्हणजे ते तुझी वर्दी लावतील.’ त्या मनुष्यानें सांगितल्याप्रमाणें तो तिसऱ्या मजल्यावर गेला. तेथें पाहरेकऱ्यानें दरडावून विचारिलें–‘कोठें जावयाचें आहे?’ प्रवाशानें मोठ्या धिटाईनें उत्तर दिलें. ‘मला महाराजांना भेटावयाचें आहे.’

हें त्या गांवढळ मनुष्याचें भाषण ऐकून ते शिपाई हसूं लागले. शिपाई आपल्याला हंसतात असें पाहून तो किंचित रागानें म्हणाला. 'माझ्या पोषाकाला पाहून हसूं नका तुमच्या महाराजांना मला पाहून आनंद होणार आहे.'

पहिला शिपाई—मग तुला मोठें बक्षीस मिळेल, मग तूं आम्हाला काय देशील?

प्रवासी—निम्मे भाग तुम्हाला देईन मग तर झालें ना!

त्या शिपायांचा अम्मलदार, शिपायाला म्हणाला—'उगाच चावटपणा काय चालविला आहे. जा वर्दी देऊन ये.' अमलदाराचा असा हुकूम झाल्यावरून तो वर्दी देण्याकरितां गेला. थोड्याच वेळांत परत येऊन त्या शिपायानें त्या प्रवाशाला सांगितलें—' चला तुम्हाला महाराज बोलावीत आहेत.' तो प्रवासी त्या शिपायाबरोबर गेला. शिपाई त्याला घेऊन एका महालाच्या दाराजवळ गेला, व त्यानें महाराज कोणते तें दुरून दाखविले. महाराज दाराच्या तोंडाशींच एका पाटावर गादी टाकून लोडाला टेंकून एका मनुष्याजवळ गोष्टी सांगत बसले होते. त्या मनुष्याचें वय सुमारें पंचवीस वर्षाचें असून चेहरा सुंदर होता. मिशा बेताबाताच्या होत्या. वर्ण गोरा असून शरीराचा बांधा सडपातळ व बळकट होता. प्रवासी दाराजवळ गेल्यावर त्यानें लवून मोठ्या नम्रपणानें महाराजांना मुजरा केला, व आपल्या पागोट्यांतून एक मोहरबंद लखोटा काढून तो महाराजांच्या हातांत दिला. महाराजांनीं सील फोडिलें व वाचण्याला सुरुवात केली. तो कागद वाचीत असतां आनंद, रोष, आवेश, अशा भावना त्यांच्या

चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होत्या. सर्व कागद वाचून झाल्यावर महाराजांनीं त्या जवळच्या मनुष्यास (हा महाराजांचा भाचा होता व ह्याचें नांव धीरवल होतें) ह्या जासुदाच्या खाण्यापिण्याची व्यवस्था कोठीकडे तावडतोब लावण्यास सांगितलें. व आपण नंतर त्या प्रवाशाकडे वळून ह्मणाले—'भल्या मनुष्या तूं आपलें काम फारच चोख बजाविलेंस ह्याबद्दल तुला बक्षीस योग्य मिळेल. तूं फार थकला असशील ह्याकरितां विश्रांति घेऊन व खाऊनपिऊन जरा हुशार हो. जातेवेळीं तुझ्या पत्राचें उत्तर मिळेल व तुला बक्षीसही मिळेल. असा हुकूम होताच महाराजांना मुजरा करून तो मनुष्य त्याबरोबर निघून गेला. निघून गेल्यावर महाराजांनीं पुन्हां एकवार तें पत्र वाचण्याला सुरुवात केली; त्यांतील मजकूर येणेंप्रमाणें होता.

श्री.

**'सकल गुणैश्वर्य सौराष्ट्राधिपती महाराजाधिराज खेंगारजी महाराज यांच्या सेवेशी—**

आज्ञांकित **दासी राणकदेवी** हिचा कृतानेक प्रणिपात. विज्ञापना ऐसीजे, मला पत्र कसें ल्याहावें हें कांहीं नीटसें कळत नाहीं. ह्यामुळें अनेक चुका होतील अशी मनाला भीति वाटते, तरी प्रसंगच तसा पडल्यामुळें हें पत्र मलाच ल्याहावें लागत आहे. मी सिंधुनृपाळ धैर्यसिंगजी ह्यांची कन्या आहें. कांहीं कपट प्रयोगानें सिद्धराजानें मला माझ्या महालांतून येथें आणून मोतीबागेंत बंदींत ठेविलें आहे. माझ्या पित्याच्या घरीं सर्व

राजपुत्रांच्या तसबिरा आल्या होत्या, त्यांत आपलीही आली होती. ती तसबीर पाहून व आपल्या गुणांचें वर्णन द्विज मुखांनीं ऐकून मी आपल्या गुणाच्याठायीं अनुरक्त झालें आहे. नुसती अनुरक्त होऊनच मी राहिलें नाहीं, तर मनें-करून मी आपणास वरिलें आहे. आपणाखेरीज जगांतील सर्व पुरुष मी पित्यासमान मानिले. कुलीन मुलींना असें पत्र पाठविणें अनुचित आहे असा मजवर दोष येईल, पण मी काय करूं? माझे सुटकेचा उपाय त्यांच करावा असाच मजवर प्रसंग आहे. मी आपल्या पायांचें चिंतन करीत मार्गप्रतीक्षा करीत बसलें आहें. मला ज्या दिवशी पट्टणास घेऊन आले, त्याच दिवशीं सिद्धराज माळव्या-वर स्वारी करण्याकरितां निघून गेले आहेत. मी येथून पळून जावें असा विचार केला होता, पण क्षत्रियाच्या मुलीला चोरासारखें पळून जाणें लज्जास्पद आहे, असा विचार करून मी आपल्याकडे धांव घेतली आहे. मी मनेंकरून आपणाला वरलें आहें तेव्हां माझ्या रक्षणाची काळजी आपणाला असली पाहिजे. आपण माझी सुटका कराल अशी मला खातरी आहे. माझे दुर्दैवानें जर सुटका न होईल तर खऱ्या क्षत्रियाच्या कन्यांना उचित असें वर्तन करून मी आपल्या देहाचा त्याग करीन; अधिकोत्तराची माफी असावी. कळावें लोभाची वृद्धि व्हावी हे विज्ञापना.

आपल्या गुणांना लुब्ध झालेली दासी

राणकदेवी.

हें पत्र वाचून झाल्यावर खेंगार आपल्याशींच म्हणाला 'ही संधी फारच उत्तम आहे. बाबासमोर मी जी प्रतिज्ञा केली आहे ती कोणत्याप्रकारें शेवटास न्यावी ह्याबद्दल आमचे विचार चालू होते. आम्ही सैन्याची व्यवस्था व तयारी मोठ्या झपाट्यानें चालविली होती. बारा वर्षें लढाई चालली तरी युद्धसामुग्री संपणार नाहीं इतकी व्यवस्था आम्ही लाविली आहे. मोठ्या तडाक्यानें गुजराथेवर स्वारी करून त्या देशाची राखरांगोळी करावी असा आमचा बेत होता. त्यांत आतां सिद्धराज स्वारीला सैन्य घेऊन गेला आहे, तेव्हां आपले मनोरथ अनायासें शेवटास जातील. प्रतिज्ञा शेवटास नेण्याची संधी व लग्नाचा मुहूर्त एकच विधात्यानें नेमिला असावा असें मला ह्या पत्रावरून वाटूं लागलें आहे. राणकदेवीच्या सौंदर्याचा लौकिक सर्वतोमुखीं आहे. तिची तसबीर पाहतांच मी अगदीं चकित होऊन गेलों. ती रमणीय मूर्ति माझ्या हृदयांत गुप्तपणानें वास करीत आहे. प्रतिज्ञा शेवटास नेल्याखेरीज लग्नाच्या गोष्टी बोलण्यालासुद्धां मला लाज वाटते. म्हणून मी तिच्या संबंधानें कोणाजवळ एक शब्दही बोललों नाहीं. सखे, आतां मी एक पळाचाही अवधी लावणार नाहीं. एकदम तुझ्या महालांत मी दत्त म्हणून उभा राहीन, तेव्हां तुला किती आश्चर्य वाटेल ?

ह्याप्रमाणें खेंगार महाराजांचे आपल्या मनाशीं विचार चालले होते. इतक्यांत धीरवळ पुन्हां परत येऊन आपल्या जाग्यावर बसला. त्याला पाहून खेंगार महाराज म्हणाले, 'धीरवळजी, एक आनंदाची बातमी सांगावयाची आहे.'

**धीरबल**–ती कोणती महाराज?

**खेंगार**–सिद्धराज माळव्याच्या राजावर स्वारी करण्या-करितां गेला आहे. तेव्हां आपला हेतू शेवटास नेण्याला ही संधी उत्तम आहे असें मला वाटतें.

**धीरबल**–मग अशी संधी आपण कां फुकट दवडावी? तयारीचा हुकूम करा.

**खेंगार**–माझा तर विचार ठरला आहे, उद्यां कुच करण्याचा हुकूम द्यावयाचा. बरोबर फार सैन्य घेण्याची जरूर नाहीं. फक्त पांच हजार निवडक घोडेस्वार बरोबर घेऊन मीच स्वतः जाणार.

**धीरबल**–हें करणें साहसाचें आहे. असें मला वाटतें.

**खेंगार**–साहस कसलें? पांच हजार स्वार कांहीं थोडे नाहींत.

**धीरबल**–पण आपण स्वतः शत्रूच्या मुलुखांत जाणार हें थोडें जोखमेचें दिसतें.

**खेंगार**–त्याचा मी पूर्ण विचार करूनच पांच हजार स्वार घेऊन जाण्याचा बेत केला आहे.

**धीरबल**–निदान सरहद्दीवर तरी बरेंचसें सैन्य तयार ठेवावें.

**खेंगार**–आम्हाला ह्या खेपेला कांहीं मोठी कडाक्याची लढाई करावयाची नाहीं. छापा घालून आपलें काम उर-कून घेण्याचा विचार आहे.

**धीरबल**–पण लढाईचा प्रसंग आला तर मग कसें?

**खेंगार**—माझे पांच हजार स्वार शत्रूच्या पांचपट सैन्याला हार जाणार नाहींत. आलाच प्रसंग तर मदत येण्यास कितीसा वेळ लागणार आहे ?

**धीरवल**—येथील व्यवस्था कोणाकडे सोंपवून जाणार ?

**खेंगार**—दिवाणजी आहेत. तुम्ही अहां.

**धीरवल**—आम्ही असून काय कामाचे ? आमच्या हातांत काय अधिकार आहे ?

**खेंगार**—अधिकार कां नाहीं ? तुम्ही आमचे मानकरी असून आमचे भाचे अहां. तेव्हां तुमच्या शब्दाला सर्व कामदार मान देतील हें उघड आहे.

**धीरवल**—पण हातांत कांहीं सत्ता नसून आम्ही नुसते विचार सुचवावयाचे मालक !

**खेंगार**—थोड्या दिवसांत तुम्हाला अधिकार मिळेल. कामाची माहिती तर झाली पाहिजेना ?

**धीरवळ**—कामाला काम शिकावितें. त्यांत काय मोठें शिकावयाचें आहे ?

**खेंगार**—हा तुमचा समज चुकीचा आहे. काम आल्याखेरीज काम देतां येत. नाहीं. किल्ल्याच्या शिबंदीचें काम तुम्हाला थोड्याच दिवसांत सोंपण्यांत येईल. त्या कामाची तुम्ही माहिती मिळवा.

**धीरवल**—महाराजांनीं माझी परीक्षा घ्यावी. मला सर्व कामांची माहिती आहे.

**खेंगार**—ठीक आहे. ह्या स्वारींतून परत आल्यावर तुम्हाला काम सांगूं. चला आतां दरबारांत जाण्याची वेळ

झाली. सर्व सरदार लोकांना तयारीचे हुकूम द्यावयाचे आहेत.

असें म्हणून ते दोघे जागेवरून उठले व त्या महालाला लागून मागच्या बाजूला एक जिना होता त्या जिन्यानें दुसऱ्या मजल्याकडे निघून गेले.

## भाग १६.

## करुणाशंकर आणि ललितागौरी.

ज्या दिवाणखान्यांत प्रथम त्रिरबल व वैद्यराज ह्यांची प्रथम भेट झाली त्याच ठिकाणीं करुणाशंकर आपल्या बायकोजवळ कांहीं हळू हळू बोलत होता. त्या वेळीं त्याचा चेहरा अगदीं उतरून गेला होता. त्याचें भाषण चाललें होतें तेव्हां ललितागौरी मोठ्या उत्सुकतेनें त्याचें भाषण ऐकत होती, असें तिच्या मुद्रेवरून दिसत होतें. त्या भाषणांत तिच्या मनाला वाईट वाटेल असा कांहीं तरी भाग असावा असें तिचे दीर्घ सुस्कारे चालले होते, ह्यावरून समजण्यासारखें होतें. त्याचें सगळें भाषण ऐकून घेतल्यावर ती म्हणाली 'पण एवढें आपल्याला सांगितलें होतें कोणी ? त्या पैशाला काय करावयाचें होतें ? आपलें करणें हें मला कांहीं आवडलें नाहीं; पण त्या विचारचा आतां उपयोग काय? हें जर मला प्रथमच कळलें असतें, तर मी आपल्याला असें कधीं सुद्धां करूं दिलें नसतें. आतां पळून जाऊन काय होणार? जास्ती संशयाला मात्र जागा होते.'

**वैद्यराज**–आतां येथें राहून कांहीं निभाव लागेल असें वाटत नाहीं. आज नाहीं उद्यां, केव्हां तरी ह्या गोष्टीचा त्यांना पत्ता लागल्याखेरीज राहणार नाहीं. सगळ्या कामांत मी सामील आहें ही गोष्ट पुष्कळजणांना माहीत झाली आहे. तेव्हां षड्कर्णी झालेली गोष्ट कधींही गुप्त राहत नाहीं. मागील गोष्टींचा विचार करण्याची ही वेळ नव्हे. आपल्यावर कोणतेंही संकट आलें नाहीं तोंच आपला रस्ता सुधरावा, हें उत्तम. तुला कांहीं कमी नाहीं. नीट व्यवस्थेनें रहा. सर्व गोष्टींची विल्हेवाट लागली ह्मणजे मी परत येईन. राणकदेवीचा विवाह सिद्धराजाबरोबर झाला ह्मणजे मग कांहीं भीति बाळगण्याचें कारण राहणार नाहीं. मी तरी पट्टणासच जाणार. तेथें जाऊन मी स्वस्थ बसणार नाहीं. सिद्धराजाच्या दरबारांत माझ्या विद्येची चांगली बूज होईल अशी माझी खातरी आहे. माझें तिकडे नीटसें जमल्यावर तुलाही घेऊन जाईन. पण पैशाला नीट जप. उगाच जास्ती खर्च करूं नको. ह्या किल्ल्या घे. ( असें ह्मणून त्यानें किल्ल्यांचा जुडगा ललितागौरीच्या हातांत दिला. ) हीं फडताळें आहेत ह्यांत गहाणाचे सर्व दागिने आहेत. ज्यावर सिलें केलेलीं आहेत त्यांत नक्त रुपयांच्या थैल्या आहेत. चाळीस हजार रुपये रोख व दोन लक्षांचे दागिने इतका ऐवज ह्या फडताळांत आहे. ह्या रकमेला हात लावावयाचा नाहीं. देवघरांत तीन हांडे खुर्दाचे आहेत व एक हांडा चवल्या पावल्या अधेल्या ह्यांचा आहे. त्यांतून फार काटकसरीनें खर्च करीत जा. रात्री त

दिवाणखान्यांत दिवाळीला सोबतीला घेऊन निजत जा. कोणालाही आपल्या घरीं येऊं देऊं नको.

वैद्यबुवा वारंवार आपल्या बायकोला कसें वागावें, कसा खर्च करावा, हें सांगत होते. इतक्यांत खालच्या दारावर कोणी मोठ्यानें धक्का मारिलाव 'वैद्यराज,अहो वैद्यराज, दार उघडा' ह्मणून कोणी ओरडत असल्याचें वैद्यराजांच्या कानावर पडलें. ते शब्द ऐकून ते चपापल्यासारखे झाले; पण दार उघड ह्मणून त्यांनीं बायकोला हुकूम केला. ललितागौरी जिना उतरून खाली गेलीं व तिनें दार उघाडिलें. दार उघडून कोण आलें आहे ह्मणून बाहेर पाहिलें तों बाहेरचा प्रकार पाहून तिची कमरच बसली. परत माडीवर जाण्याला तिचे पायच उचलेना. चित्रासारखी ती जागच्याजागीं उभी राहिली. करुणाशंकर वैद्याच्या घराला लष्करी लोकांचा गराडा पडलेला असून मदनसिंग दाराच्या तोंडाशी उभा होता. ललितागौरीनें दार उघडल्याबरोबर तो आपल्याबरोबर दहा हत्यारबंद शिपाई घेऊन घरांत घुसला. ललितागौरी खालच्या खालीं राहिली. तिला वर जाण्याची बंदी झाली. मदनसिंग लष्करी लोक घेऊन महालांत आलेला पाहून वैद्यबुवांची काय स्थिति झाली असेल ह्याची कल्पना वाचकांनींच करावी. आंत शिरतांच मदनसिंगानें त्याला प्रश्न केला. 'करुणाशंकर वैद्य हें तुमचेंच नांव ना?' तो कांपत कांपत ह्मणाला 'होय महाराज' 'तुह्मी राजकन्येला विष दिलेंत असा तुमच्यावर आरोप आहे, ह्याकरितां तुम्हांला कैद करण्याचा व तुमची सर्व

मिळकत जप्त करण्याचा महाराजांचा हुकूम आहे.' असें मदनसिंग म्हणाला.

**वैद्यराज**—पण हें कोणी तरी बालंट घेतलें आहे. मला ह्यांतलें कांहींसुद्धां माहीत नाहीं. 'थोडयाच वेळांत आम्ही तुम्हाला माहीत करून देऊं! चला लौकर कपडे करा.' असें दरडाऊन मदनसिंग म्हणाला. वैद्यराज कपडे करण्याकरितां जाग्यावरून उठला, पण त्याला कोठें जावें तें सुचेना. भ्रम झाल्याप्रमाणें तो करूं लागला; 'सरकार माझी मिळकत जप्त करणार? मी पै पै करून ती जमविली आहे. मी कधीं पोटभर जेवलोंसुद्धां नाहीं. महाराज एवढी दया करा! सांगाल तेथें मी येतों, पण माझा पैसा नेऊंनका.

'तुमची रडकथा ऐकण्याकरितां आलों नाहीं. आत वटवट बंद करा, नाहींतर आम्हाला सक्तीचा उपाय करावा लागेल.' असें मदनसिंग रागानें ह्मणाला. हे शब्द ऐकून तर वैद्यबुवांची मेटेंच बसलीं. ते पुन्हा मटकन खालीं बसले. हा वैद्य लोंचट आहे बऱ्या बोलानें निघणार नाहीं असें दिसतांच मदनसिंगानें त्याच्या हातांत कडया घालण्याचा हुकूम केला. बिड्या घालून झाल्यावर मदनसिंगानें त्याला वाड्यांत घेऊन जाण्याचा हुकूम केला. माडीवर जे दहा असामी शिपाई आले होते, त्यांपैकीं पांचजण त्याबरोबर जाण्याकरितां निघाले. बाकीचे पांच असामी मदनसिंगाबरोबर राहिले. करुणाशंकर वैद्याला कैद करून घेऊन गेल्यावर मदनसिंगानें ललितागौरीला दिवाणखान्यांत आणवून तिच्यापासून सगळ्या किल्ल्या मागून घेतल्या; सग-

ळीं फडताळें उचकलीं, पेट्या तपासल्या, वरांतील कोपऱ्यान कोपऱ्याची झडती करून पुन्हां जागचेजागीं पूर्वीप्रमाणें व्यवस्था केली. दिवाणखान्यांत पांच शिपाई व एक अंमलदार असे पाहऱ्याकरितां बसविले. खालच्या दारावरही दहा शिपायांचा पाहारा बसवून मदनसिंग वाड्यांत जाण्याकरितां निघाला. जातांना त्यानें वैद्यराजाच्या घरांतून पुष्कळसे कागद मात्र आपल्याबरोबर नेले. त्यांत कांहीं पत्रें होतीं व कांहीं हिशेबाच्या चोपड्या होत्या. हा प्रकार घरांत चालला होता तेव्हां ललितागौरी गोरीमोरें तोंड करून मुळुमुळु रडत होती. रडून रडून तिचे डोळे व नाकाचा शेंडा लाल झाला होता, पण तिचें शांतवन करण्याकरितां तेथें कोणीही नव्हतें. जिकडे तिकडे निरवानिरव झाल्यावर दिवाळी दिवाणखान्यांत आली. हिचें वय अगदीं उतार होतें, हिचे केंस पिकून त्यांची आंबाडी झालेली होती. त्यांना कधीं तेलाचा स्पर्श होत नसल्यामुळें व वेणीफणी होत नसल्यामुळें ते अगदीं मळकट पिळवा झाल्यासारखे दिसत होते. ते तिनें कसे तरी गुंडाळून त्यांना गांठ मारिली होती. हिचे डोळे बारीक असून वृद्धपणामुळें त्यांना अंधत्व आलें होतें. तोंडांतील दांत पडून त्याचें अगदीं बोळकें झालें होतें. हिचें नेसलेलें लुगडें जाडसर असें होतें, तिनें कच्छ घातला नव्हता. अंगांत एका जाड खणाची चोळी होती. ती अगदीं सईल असून तिच्या बाह्या कोंपरापर्यंत येऊन भिडल्या होत्या. हिचा वर्ण काळा होता. शरीर उंच असून पोंक आलें होतें. ही दिवाणखान्यांत आली तेव्हां ललितागौरी दिवाणखान्यांत देवघराच्या दाराशीं रडत बसली

होती; पाहरेकरी शिपाई दिवाणखान्यांत गप्पा मारीत बसले होते ही दिवाणखान्यांत आल्यावर तिला एका शिपायानें 'म्हातारे ह्या घरांत तुझें काय काम आहे?' म्हणून प्रश्न केला.

**म्हातारी**–मी ह्या घरांत मोलकरीण आहे.

**शिपाई**–किती वर्षें तूं येथें आहेस?

**म्हातारी**–दहा वर्षें झालीं; मी ह्या घरांत आहे.

**शिपाई**–तुला दुसरीं कोणी मनुष्यें नाहींत कां?

**म्हातारी**–कोणी नाहीं. मी एकटी आहे, आतां माझे तरी किती दिवस राहिले आहेत?

**शिपाई**–तुला येथें रोजमुरा काय मिळतो?

**म्हातारी**–रोजमुरा कांहीं नाहीं; फक्त जेवण व धडोती मात्र मिळते!

**शिपाई**–आणि तूं रोजमुऱ्याखेरीज नोकरी करतेस?

**म्हातारी**–तर काय करूं? ह्या पोटाकरितां करावी लागते. दादा आमच्या धनीसाहेबांना आतां कोठें घेऊन गेले?

**शिपाई**–सरकारवाड्यांत घेऊन गेले.

**म्हातारी**–दादा! आतां परत केव्हां येतील?

**शिपाई**–आतां कसले ते परत येतात. त्यांची आतां धडगत नाहीं!

**म्हातारी**–त्यांनीं असें केलें तरी काय?

**शिपाई**–ताई साहेबांना अम्मल घालून पळवून नेण्याच्या कामांत ह्यांचें अंग होतें!

**म्हातारी**–देवा! अशी कशी त्यांना दुष्ट बुद्धि झाली? आतां बाईसाहेबांचें काय होईल?

**शिपाई**–त्यांचें काय होणार? त्यांना पोटापुरतें देऊन सर्व मिळकत सरकारांत जाणार!

**म्हातारी**–वैद्य महाराजांना शिक्षा तरी काय होईल?

**शिपाई**–तें कांहीं सांगतां येत नाहीं. पण जन्मभर तुरुंगांत राहवें लागेल! असें वाटतें.

ह्या दोघांचा संवाद आंतून ललितागौरी ऐकत होती. 'जन्मभर कैदेंत राहवें लागेल' हे शब्द तिला फारच झोंबले. नानातऱ्हेचे विचार तिच्या मनांत येऊं लागले. 'आईबापांनीं म्हाताऱ्याला पैशाच्या लोभानें मला दिलें; आतां पैशापरी पैसा गेला. म्हातारा तर म्हातारा! तेवढ्यावर मी आनंदानें दिवस घालवीत होतें, आतां मी हे दिवस कसे घालवूं? सरकार पोटापुरते पैसे देणार! ह्या वयांत मी एकटीनें कसें राहवें? पैसा पुरेसा नाहीं. तिकडूनही मनाला वाईट वाटणार! कोणाचा आधार नाहीं, आई नाहीं! बाप नाहीं! आतां जगांत सुख तरी कसलें? जिकडे तिकडे थट्टा होणार! विपत्ती पाठीशीं लागणार? पतिविरह क्षणोक्षणीं मनाला दुःख देणार! भुताप्रमाणें मी आतां ह्या घरांत राहणार!. नको नको मला हें असलें राहणें. तिकडे काय शिक्षा होणार नी काय नाहीं ह्या विवंचनेंत सगळा वेळ जाणार. अशा संकटांत दिवस कंठणें कांहीं सोपें नाहीं. स्त्रिया एकट्या आहेत त्यांना कोणाचा आधार नाहीं असें पाहून लुचे लोक त्यांच्या हात धुवून मागें लागतात. देवा नको! नको

तो छळही नको, ती विटंबनाही नको. असल्या स्थितींत जिवंत राहणेंही नको. अशा विचारांत ती गढून गेली. होती. इतक्यांत दिवाळी पुढें येऊन ह्मणाली—बाईसाहेब आतां दुःख करून काय होतें ? असले प्रसंग धैर्यानेंच टाळले पाहिजेत. उठा येथें बसून काय कारितां ? स्वयंपाक घरांत चला.

**ललितागौरी**—आतां स्वयंपाकघरांत येऊन तरी काय करावयाचें आहे ? आमच्या हातांत आतां राहिलें आहे काय ? जिकडे तिकडे सरकारी कुलुपें लागलीं आहेत ! आह्मी आमच्या घरांत कैद्याप्रमाणें आहोंत. बाईगे आतां आह्मी कांहीं मुखत्यार नाहीं. कारकून येऊन आमची व्यवस्था लावून देईल तेव्हां स्वयंपाकघरांत चलावयाचें ना ? ज्या ठिकाणीं मुखत्यारीनें मी व्यवस्था लावीत होतें तेथें एका पैला सुद्धां मी महाग व्हावें आणि सरकारांतून जो कोणी कारकून येईल त्याच्या ओंजळीनें पाणी प्यावें हें बाई मग कसें सहन करावें ?

**दिवाळी**—मग काय करावें ? जशी ईश्वराची मर्जी असेल तसें आपणाला वागलें पाहिजे.

**ललितागौरी**—नको, पुढें काय करावयाचें ह्याबद्दल मी तुला सांगणार आहे. पण येथें नको, आपण निजावयाच्या खोलींत जाऊं चल. (असें ह्मणून ती देवघराच्या डाव्या बाजूला एक खोली होती तिकडे चालली. तिच्या मागून दिवाळीही निघून गेली.)

# भाग १७ वा.

## मदनसिंग व धैर्यसिंग महाराज.

ज्या दिवशीं वैद्याला कैद केलें त्या दिवशीं रात्रीं नऊ वाजण्याच्या सुमारास राणकदेवीच्या महालांत मदनसिंग व धैर्यसिंग महाराज बोलत होते. त्यावेळीं त्यांच्याजवळ चाकर मनुष्यें कोणी उभीं नव्हतीं.

**धैर्यसिंग**—मदनसिंगजी एकंदर तपासावरून तुह्माला काय समजलें ?

**मदनसिंग**—बिरबल हा सिद्धराजाकडून ह्याच खटपटीकरितां येथें आला होता. राणकदेवीचा सिद्धराजाला वरण्याचा हेतू नाहीं असें जेव्हां त्याला समजलें तेव्हां त्यानें करुणाशंकर वैद्याला एक औषध तयार करण्याला सांगितलें. त्या वैद्यानें जें औषध तयार केलें होतें त्या औषधाचा असा गुण होता कीं, तें पोटांत गेल्यापासून दोन तासांनीं शरिरावर त्याचा अम्मल बसावा. ज्या मनुष्याच्या पोटांत तें औषध जाईल तो मनुष्य अगदीं गुंग होऊन जावा असा त्याचा प्रभाव होता. ती गुंगी तीन दिवसपर्यंत राहावी अशी औषधाची योजना केलेली होती. एक गुंजभर जर तें पोटांत गेलें, तर बारा तासपर्यंत अम्मल असणार. ह्याप्रमाणें चढत्या प्रमाणानें गोळ्या दिल्या ह्मणजे स्थिति व्हावयाची. तीन दिवसांपेक्षां जास्ती अम्मल राहील इतकें औषध दिलें तर त्यांतून तें मनुष्य मृत्यु पावेल अशी योजना होती. इंदुमतीला एक गोळी, व राणकदेवीला तीन

गोळ्या घालाव्या असें गुलाबीला सांगितल्याबद्दल त्या वैद्यानें मजजवळ कबूल केलें. गुलाबीनें बिरबलाच्या सांगीवरून जनानखान्यावरच्या सर्व पाहरेकऱ्यांना जें अन्न वाढून दिलें, त्यांत एकेक गोळी घातली होती असें समजलें. काळ्या ह्मणून एक भिल्ल आहे त्याला बिरबलानें अनुकूल करून घेऊन राजवाड्यांतून राणकदेवीला नदींतून एक कोस नेऊन जे स्वार तेथें त्यावेळीं हजर असतील त्यांच्या स्वाधीन करावें अशी व्यवस्था केली होती. बिरबलाच्या महालाची झडती कारितांना कांहीं पत्रें सांपडलीं आहेत, त्या पत्रांवरून सिद्धराजाला स्वार पाठविण्याविषयीं त्यानें सुचविलें असावें असें उघड दिसून येत आहे. बिरबळ, करुणाशंकर व काळ्या इतके इसम तुरुंगांत आहेत. गुलाबीला मी माफी दिली आहे. चौकशीच्या कामांत तिनें चांगली मदत केली होती.

**धैर्यसिंग**—ह्या गोष्टीला राणीसाहेबांचें अनुमोदन होतें कीं नाहीं ?

**मदनसिंग**—राणीसाहेबांचें ह्या कामांत कोणत्याही प्रकारचें अंग दिसून येत नाहीं.

**धैर्यसिंग**—हें सर्व कृत्य बिरबलानें आपण होऊनच केलें काय ?

**मदनसिंग**—त्यानें सर्व गोष्टी स्वमुखानें कबूल केल्या आहेत. तो ह्मणाला, राणकदेवीच्या कल्याणाकारितांच असें करण्याचा माझा उद्देश होता. तिच्या कल्याणांत माझें कल्याण होणार होतें ह्मणून मला असें करावें लागलें,

**धैर्यसिंग**—किती तरी पाजीपणा हा! त्यानें हें सर्व तिच्या कल्याणाकरितांच केलें अं!

**मदनसिंग**—महाराज, ह्यांना शिक्षा काय करावयाच्या?

**धैर्यसिंग**—ह्याबद्दल मागाहून विचार करण्यांत येईल.

ह्या दोघांचीं बोलणीं चाललीं होतीं, इतक्यांत एक दासी धांवत धांवत महालांत आली ती अगदीं घामाघूम झाली होती. तिच्या तोंडांतून नीट शब्दही उमटत नव्हता. ती महालांत येतांच मोठ्या उतावळीनें ह्मणाली 'सरकार घात झाला हो, घात झाला!' हे तिचे शब्द ऐकून महाराज ह्मणाले 'काय झालें तरी काय, असें संदिग्ध काय बोलतेस? स्पष्ट काय असेल तें सांग.'

'काय सागूं सरकार? आमचें कपाळ फुटलें! आह्मीं अनाथ झालों हो अनाथ झालों' असें ह्मणून ती मोठमोठ्यानीं रडूं लागली. राणीला कांहीं तरी झालें असावें असें मनांत येऊन राजाच्या चेहेऱ्यावर भीतीचीं चिन्हें दिसूं लागलीं. तो दासीला ह्मणाला—'अग सांग एकाएकी त्यांना काय झालें? मला कसें कोणी सुद्धां कळविलें नाहीं?'

**दासी**—सरकार, मासाहेब निजल्या आहेत असें आह्मीं समजत होतों, निजतांना मला कोणी उठवूं नका ह्मणून त्यांनीं सांगितलें होतें आह्मीं संध्याकाळपर्यंतों वाट पाहिली. दिवे लागले तरी त्या कांहीं उठतना! त्यांचा नित्य नेम होता कीं संध्याकाळीं तुळशीला दिवा दाखवावयाचा. तो नेम टळेल ह्मणून आह्मी त्यांना उठविण्याकरितां गेलों तों सगळाच प्रकार विपरीत दिसला! ही वर्दी देण्याकरितां मी तशीच इकडे आलें.

हें ऐकून त्या म्हाताऱ्याची कंबर बसली. राणकदेवीच्या दु:खानें तो अगोदरच काहून गेला होता तशांत राणीची वार्ता ऐकतांच त्याला कांहीं सुचेनासें झालें. एकाएकीं राणीची ही स्थिति कशी झाली ह्याबद्दल त्याला कांहीं तर्क करितां येईना. मदनसिगानें पुष्कळ धैर्याच्या गोष्टी सांगितल्या; समक्ष पाहिल्याखेरीज 'कांहीं समजणार नाहीं, कदाचित् त्यांना वायूचा झटका आला असेल, औषधोचार करून त्या हुशार होतील,' असा धीर देऊन मदनसिंग त्यांना घेऊन राणीच्या महालांत जाण्यारितां निघाला. धैर्यसिंग महाराजांचा महाल राणीच्या महालापासून कांहीं लांब नव्हता. तरी तेथपर्यंत जाण्याला त्यांना फार कष्ट पडले. मदनसिगानें हात देऊन हळू हळू तो त्यांना घेऊन महालांत गेला. राणीवर महाराजांचें प्रेम होतें. त्याला ती मनापासून आवडत असे. तिची स्थिति ऐकल्यापासून त्याच्या मनांत भलभलत्या कल्पना येऊं लागल्या. राणकदेवीच्या संबंधांत तर हिचें कांहीं अंग नसेलना ? असाही विचार त्याच्या मनांत आला, पण हा विचार फार वेळ राहिला नाहीं. राणकदेवी नाहींशी झाली ह्या दु:खानेंच तिची अशी अवस्था झाली असावी असें त्यास वाटूं लागलें, व ह्यामुळें राणीविषयीं जास्ती दु:खाचा वेग येऊं लागला. कसे बसे महाराज राणीसाहेबांच्या महालांत येऊन दाखल झाले. महालांत महाराज गेले तों तेथें सगळा गोंधळ माजून राहिला होता. राणीसाहेबांच्या तैनातींतील सर्व मनुष्यें त्यांच्याजवळ रडत बसलीं होतीं. मूर्तिमंत शोकरस

तेथें अवतरला होता. महाराज राणीसाहेबांच्या प्रेताकडे पाहून एखाद्या मुलाप्रमाणें रडूं लागले. त्यांच्या वृत्ति शोकसागरांत उचंबळूं लागल्या. ह्या म्हाताऱ्याचें समाधान करणें फारच कठीण आहे, ह्याला काय सांगितलें असतां शोक कमी होईल, ह्या विचारांत मदनसिंग अगदीं चूर होऊन राणीसाहेबांकडे पहात स्तब्ध उभा राहिला होता. अशा स्थितींत कितीवेळ गेला असेल ह्याचें त्याला भानही नव्हतें. कितीएक वेळपर्यंत हा प्रकार चालला होता. दुःख शोकाचा अतिरेक झाल्यामुळें व रडण्याच्या श्रमानें महाराजांना शेवटीं मूर्छना आली. सर्व गोष्टींची व्यवस्था करण्याला ही संधी बरी आहे असा विचार करून मदनसिंगानें कांहीं शहाण्या व अनुभविक मनुष्यांच्या मदतीनें प्रेताची व्यवस्था लावण्याची सर्व तयारी करविली. राजवाड्याजवळ अठरा कारखाने जमा झाले. जिकडे तिकडे मशाली चमकूं लागल्या. सर्व सरदार, मानकरी व कामदार मंडळ जमलें. राणीसाहेबांच्या जवळच्या ज्या त्यांच्या दासी होत्या त्यांनीं त्यांना स्नान घातलें. त्यांना शुभ्रवस्त्र नेसविलें, कपाळीं कुंकवाचा मळवट भरिला. अंगावर सर्व अलंकार घातले. त्यांची शेवटची ओंटी भरिली, सौभाग्य वायनें वांटलीं; नंतर पालखी तयार होऊन महालांत आली. त्या पालखींत त्यांना ठेवून वरती जरीकांठीं शालजोडी घातली; राणीच्या तैनातींतली मानकरी मंडळी पालखी उचलण्याकरितां तयार होती. ताशे, मरफे, सनया इत्यादि वाद्यें वाजूं लागलीं. सर्व मनुष्यांची पुन्हां मोठी रडारड सुरू झाली. इतक्यांत ती पालखी घेऊन मंडळी वाड्याखालीं

उतरली. दुरस्ता घोडेस्वारांच्या रांगा उभ्या होत्या; पायदळाचे लोक बरोबर जाण्याकरितां आपल्या मिसलीवर व्यवस्थेनें उभे होते. हजारों मशालींच्या उजेडाखालीं ही स्वारी मोठ्या थाटानें स्मशानाकडे चालली. ह्या स्वारीचा हा उदात्त देखावा पाहून एखाद्या पाषाणहृदयी मनुष्याला सुद्धां द्रव उत्पन्न व्हावा इतका तो हृदयद्रावक होता. पालखीच्या मागून पादचारी सर्व मंडळी निघाली. सर्वांच्या चेहऱ्यावर दुःखाची कळा दिसत होती. अधोवदन करून व वरचेवर डोळे पुशीत प्रत्येक मनुष्य चालला होता. मोंग शहरांतील राजवंशीय लोकांची दहन करण्याची जागा पश्चिमेकडे नदीकांठीं होती. तेथें शंकराचें देवालय असून त्याच्या सभोंवार पुष्कळ राजवंशीयांच्या छत्र्या बांधलेल्या होत्या. त्या ठिकाणीं ते आले तों पाहटेचे चार वाजून गेले होते; कापूर, चंदन व तुलसीकाष्टें ह्यांचें सरण तयार केलें होतें. स्मशानांत प्रेत आणून सरणासन्निध पालखी उतरली. सुवासिनी बायांना त्यांच्या अंगावरचे सर्व अलंकार वाटून टाकिले व मग प्रेताला सरणावर नेऊन ठेविलें; वर पुन्हां चंदनाचीं इंधनें व कापूर घालून तें अगदीं दिसत नाहींसें करून मंत्रोक्त त्या प्रेताला अग्नि देण्यांत आला; चिता पेटतांच वाद्यें मोठ्या जोरानें वाजूं लागलीं. थोड्याच वेळांत सर्व चिता पेटून तिच्या ज्वाला नभोमंडळाला जाऊन लागल्या; भुवनसुंदरी राणीचें चैतन्य केव्हांच नाहींसें झालें होतें. ह्या भयंकर ज्वालांनीं हां हां ह्मणतां त्यांच्या जड देहाची रक्षा करून टाकिली. सर्व चिता

जळून गेल्यावर मंडळी घरीं येण्याकरितां निघाली. राणीसाहेबांच्या गुणवर्णनाखेरीज कोणाच्याही बोलण्यांत दुसरा विषय आला नाहीं. तिसऱ्या दिवसापासून महाराजांनीं त्यांच्या नांवानें मोठाच दानधर्म करण्याला सुरवात करून क्रियाही चालू केली.

ग्रंथ संग्रहालय ठाणे.

## भाग १८

## पट्टण शहरावर खेंगाराची स्वारी.

सूर्योदय होण्याची वेळ होती. पट्टण शहरांतील कांहीं लोक शौच व मुखमार्जन करण्याच्या गडबडींत होते. किल्यावरचे पहारेकरी रात्रभर जागल्यामुळें अगदीं म्लान होऊन गेले होते. पाहरा केव्हां बदलतो ह्या काळजींत ते होते. शहरच्या दरवाज्याच्या दिंड्या मोकळ्या होऊन नुकतीच रहदारी सुरू झाली होती. व्यापारी लोक आपलीं दुकानें उघडीत होते. भंगीलोक तोंडाखालून जाड कापडाचा धट्टा बांधून व डोक्यावर मळाच्या पाट्या घेऊन चालले होते; इतक्या संधीस पट्टणच्या पूर्वेकडच्या बाजूला मोठीच गडबड सुरू झाली होती. सुमारें पांच हजार घोडेस्वार मोठ्या वेगानें चाल करून किल्ल्याच्या दरवाज्यापर्यंत येऊन थडकले होते. दरवाज्यावरच्या पाहरेकऱ्यांनीं प्रथम बरेच हातपाय हालविले, पण मोठ्या संख्येपुढें त्यांचा नाइलाज होऊन त्यांनीं पलायन केलें होतें. दरवाजावरचे पाहरेकरी पळून गेल्यामुळें शत्रूच्या लोकांचा सहज रीतीनें

शहरांत प्रवेश झाला. एकदम पांच हजार स्वारांचें पथक शहरांत शिरलें. ह्या पथकांतील घोडे सर्व काठेवाडी असून मोठे सुंदर व पुष्ट होते. बहुतेक घोडे तांबड्या रंगाचे असून त्यांवर जे स्वार होते तेही शरीरानें धष्टपुष्ट असून एकसारखा पोषाक केलेले होते. प्रत्येक स्वाराजवळ तरवार व भाला अशीं हत्यारें होतीं. सर्वांच्या डोक्याला पोलादाचे टोप असून अंगांत चिलखतें होतीं. घोड्यांच्या अंगावरही चिलखतें होतीं. पांचपांचशें स्वारांच्या अशा दहा टोळ्या करून त्यांनीं शहरांत प्रवेश केला होता. शहरांतील निरनिराळ्या भागांत ते शिरूं लागले, ह्यावरून त्यांचा कांहींतरी संकेत पूर्वी झालेला असावा असें दिसे. राजवाडयाकडे जी टोळी चालली तिच्यावर जो मुख्य सेनानायक होता त्याचा चेहरा फारच सुंदर होता. त्याच्या चेहऱ्यावर वीरश्री खेळत होती. ह्याचा घोडा कुमाईत रंगाचा असून फारच पाणीदार होता. ह्या घोड्यावरचें जीन भरगच्चीचें असून बाकीचें सामान चांदीचें होतें. ह्या घोड्याच्या पायांत चांदीचे घुंगुरवाळे होते. त्यांच्या नादावर तो मोठ्या दिमाखानें मान उंच करून चालला होता. ह्या घोडयावर जो स्वार होता त्याचें वय वीसबावीस वर्षांपेक्षां जास्ती दिसत नव्हतें. ह्याचा रोंख राजवाडयावर चाल करून जाण्याचा होता. सौराष्ट्राचे महाराज खेंगारजी आपल्या बापाजवळ केलेली प्रतिज्ञा खरी करण्याकरितां पट्टणावर स्वारी करून आले होते. शहरांत कांहीं फारसें लष्कर नाहीं व जें आहे त्याचा समाचार आम्ही सहज घेऊं अशी मनाची खातरी असल्यामुळें जितकी मिळेल तितकी लूट मिळवून परत जाव-

याचें असा त्यांचा विचार होता. राजवाड्याकडे जी टोळी चालली होती तीवर स्वतः खेंगार महाराजच मुख्य होते. राजवाड्याला कोणत्याही प्रकारें त्रास द्यावयाचा नाहीं असा त्यांचा विचार होता. राजवाड्याजवळ गेल्यावर त्यांनीं शहरांतील मोठमोठ्या सावकार लोकांना बोलावून आणविलें. ते आल्यावर खेंगार महाराजांनीं त्यांना सांगितलें कीं, तीस लाख रुपये तुम्ही शहराची खंडणी द्या नाहींतर आम्ही सर्व लोकांपासून ती वसूल करून घेऊं; पण त्या व्यवस्थेनें लोकांवर जुलूम होईल; आम्ही गरीब लोकांना विनाकारण त्रास देणार नाहीं. हें त्यांचें मागणें फार आहे असें त्या सावकारांनां वाटून त्यांनीं विनंती केली कीं, आम्ही वीस लाख रुपये खंडणी भरतों; महाराजांनीं आ-मच्यावर दया करावी; ह्यापेक्षां जास्ती शक्ति नाहीं. खेंगार महाराजांनीं हें त्यांचें म्हणणें मान्य करून ऐवज ताबडतोब आणावयाचा हुकूम केला.

शहरांतील वसूलबाकी करण्यापेक्षां त्यांना एक मोठ्या महत्वाचें काम करावयाचें होतें. व्यापारी लोकांचा ठराव झाल्यावर त्यांनीं जीमूती भाटाला पकडून आणण्याचा हुकूम केला; राजवाड्याजवळ खेंगार महाराज आले तेव्हां राजवा-ड्यासभोंवार त्यांनीं आपल्या लोकांचा गराडा घातला होता. वाड्यांतून कोणी बाहेर जाऊं नये अशी त्यांची व्यवस्था होती. शहराच्या सर्व दरवाजांवर त्यांच्या लोकांचे पाहरे बसले होते. परशत्रु येण्याची भीति नसल्यामुळें शहरांतील बहुतेक लष्कर सिद्धराजाबरोबर गेलें होतें. आगाऊ कांहींच सूचना नसतां एकदम छापा पडल्यामुळें पट्टण शहरांतील

लोकांच्या हांतून कांहींच होऊं शकलें नाहीं. शिवाय खेंगारानीं सांगितलें कीं, तुह्मी जर गडबड कराल तर मात्र मला सक्तीचे उपाय करावे लागतील. मी राजवाड्याला हात लावणार नाहीं; कोणालाही लुटणार नाहीं; अशीं अश्वासनें दिल्यामुळें रयतेनें किंवा राजवाड्यांतील लोकांनीं कांहीं गडबड केली नाहीं. गडबड करून चांगला परिणाम न होतां उलटा वाईट मात्र झाला असता हें त्यांनां समजलें होतें. जीमूतीला धरून आणल्यावर खेंगार महाराजांनीं त्याला सांगितलें,—'अरे नीच मनुष्या मोठा अब्रूदार गृहस्थ विपत्तींत पडला असतां त्याची निंदा करून आपल्या जिव्हेला तूं विटाळिलें आहेस; त्या गोष्टीचा सूड घेण्याकरितां मला येथपावेतों यावें लागलें. मला माहित आहे, तूं धनलोभास्तव असल्या कृत्यास प्रवृत्त झालास. ह्या अपराधाबद्दल तुझा मी शिरच्छेद केला असता पण तूं भाट आहेस. भाट लोकांना क्षत्रिय कधीं ठार मारीत नाहींत. ह्यासाठीं तुला अशी शिक्षा करितों कीं, तूं पुन्हां असें कधीं काम करणार नाहींस.' असें ह्मणून खेंगार महारजांनीं त्या भाटाच्या तोंडांत पुष्कळ जवाहीर भरलें. ह्याच्या योगानें त्याचे गाल फाटून गेले. त्यांतून रक्त वाहूं लागलें. तोंड बंद झाल्यामुळें तो अगदीं कासावीस होऊं लागला, तेव्हां त्याच्या तोंडांतून तें जवाहीर काढून त्याला सांगितलें कीं जा हें जवाहीर तुला मी बक्षीस दिलें आहे. पुन्हां जन्मांत कधीं असलें नीच काम करूं नको. माझ्या पित्याला जेव्हां सिद्धराजानें कैद केलें, तेव्हां भर दरबारांत तूं निंदा प्रचूर असें नवीन काव्य करून म्हटलेंस त्याबद्दल तुला इतकी शिक्षा बस्स आहे. तुला ह्यापेक्षां

जास्ती शिक्षा करण्याचें सामर्थ्य माझ्या बाहूंत आहे, पण आ मी तुला मी क्षमा केली आहे. तो भाट तें जवाहीर घेऊन महाराजांना मुजरा करून निघून गेला. इतक्यांत रुपयांचे छकडे तयार होऊन आले. सिद्धराजानें त्या छकड्या बरोबर दोनशें स्वार देऊन त्यांची रवानगी करून दिली व आपण आपल्या लोकांसह राजवाड्यापासून परत फिरला. तो पुन्हां पूर्व दरवाजाजवळ आला. तेथें खुणेचें निशाण होतांच सर्व तुकड्या त्यांना येऊन मिळाल्या. सर्व तुकड्या आल्यावर त्यांनीं पट्टण शहरचा पूर्वेकडचा दरवाजा उखळून गाड्यांवर घातला व त्यांनीं कूच केलें. पट्टण शहरांत तीन तास पावेतों त्यांचा मुक्काम होता. खेंगार मात्र आपल्या तुकडीसुद्धां मागें राहिला होता. त्यानें मोतीबागेचा रस्ता धरला. त्याच्यामागून सर्व स्वारही निघाले. नऊ वाजण्याचा सुमार होता, राणकदेवी स्नान करून पुजेला बसली होती. शेवंती फुलें, बेल, तुळशी, वगैरेची तयारी करून देत होती. इतक्यांत पांचशें स्वार एकदम दौड करून घुसले. ह्या समयीं पाहऱ्यावर एक शिपाई होता. बाकीचे कुसुंबा करण्याच्या गडबडींत होते. खेंगारानें सर्व लोकांना कैद करून सर्व महालाभोंवता आपल्या लोकांचा पाहरा बसविला व आपण एकदम माडीवर जाण्याकरितां निघाला. खालीं ही गडबड चालली होती, तेव्हां सर्व प्रकार शेवंती खिडकींतून पाहत होती. तिनें सर्व हकीकत, राणकदेवीला सांगितली. तिनें कशीबशी एकदांची भराभर पूजा आटपली. इतक्यांत खेंगार एकदम येऊन तिच्यासमोर उभा राहिला. तो समोर येऊन उभा राहिला तेव्हां राण-

कदेवी झटकन् उठून उभी राहिली. तिच्या चेहऱ्यावर लागलीच टवटवी आली. आपण आतां बोलावें काय हाच तिला मोठा विचार पडला; पण हा तिचा विचार पुढें चालविण्याची पाळीच आली नाहीं. कारण खेंगार महाराजांनींच बोलण्याला सुरवात केली.

**खेंगार**—आमच्या येण्यापासून आपल्या पुजेला तर हरकत नाहींना झाली ?

**राणकदेवी**—माझी पुजा आटपली आहे.

**खेंगार**—आतां कशी काय मर्जी आहे ? आपल्या हुकुमाप्रमाणें आह्मी तर सेवेला हजर झालों आहों.

**राणकदेवी**—माझ्या विनंतीकडे लक्ष गेलें-ह्याबद्दल मी आपणाला धन्य मानितें ?

**खेंगार**—माझ्या प्रश्नाचें पुरें उत्तर मिळालें नाहीं.

**राणकदेवी**—माझी मी आतां मुकत्यार नाहीं. तेव्हां मर्जी तरी काय उपयोगाची ?

**खेंगार**—ह्या संदिग्ध उत्तराचा आह्माला कांहीं बोध होत नाहीं.

**राणकदेवी**—बाजवीपेक्षां जास्तीच असें मी उत्तर दिलें आहे.

**खेंगार**—पण तें आह्माला समजेल तेव्हांना !

**राणकदेवी**—जागयाला जागें कोण करील ? आतां जास्ती काय सांगावें ? तसबीर पाहिली तेव्हां पासूनच, ह्याच चरणीं मी आपलें तनमन धन अर्पण केलें आहे.

ह्या देहावर माझी कांहीं आतां सत्ता नाहीं. जें वाटेल तें करण्याची मुकत्यारी आतां इकडे आहे.

**खेंगार**—हा आमच्यावर मोठा अनुग्रह ह्मणावयाचा. सिद्ध राजासारखे भूपाळ प्रयत्न करीत असतां त्यांना न अनुसरतां आमच्याकडे धांव घेतली ह्यावरून आमचें भाग्य मोठें थोर! असें आह्मी कां समजूं नये ?

**राणकदेवी**—इकडे काय तोटा होता ? मजसारख्या हजारों मिळाल्या असत्या; पण गरीबाच्या शब्दाला मान देऊन येणें झालें, ह्मणून मी मात्र आपल्याला दैववान समजतें!

**शेवंती**—बाईसाहेब आपण दैववान व महाराजही दैववान आहेत. दोघांच्याही मनाप्रमाणें योग घडून आला, मी मात्र दुर्दैवी खरी! आपल्या सारख्याची नोकरी करण्याचें मात्र आतां माझे नशीबीं नाहीं.

**राणकदेवी**—पण असें तूं तरी कशावरून समजलीस ? मी तुला घेऊन जाणार नाहीं कां ?

**खेंगार**—आतां निघण्याची त्वरा केली पाहिजे; वेळ घालविण्यांत अर्थ नाहीं.

**राणकदेवी**—इथें कोणाकडून खोटी आहे ? .

**खेंगार**—घोड्यावर बसतां येतें कीं नाहीं ?

**राणकदेवी**—येतें थोडें बहुत, पण एक विनंती आहे.

**खेंगार**—हा दास पाहिजे तो हुकूम मानण्याला तयार आहे.

**राणकदेवी**–असें काय हें बोलणें ? शेंवतीला बरोबर घ्यावें असा विचार आहे, मग जशी मर्जी.

**खेंगार**–मर्जी कोणी मोडावी ?

राणकदेवी व खेंगार हीं दोघेजणें माडीवरून खालीं येण्याकरितां निघालीं. इतक्यांत शेवंतीही तयार होऊन आली. खेंगार, राणकदेवी व शेवंती हीं घोड्यावर स्वार झालीं; खेंगाराच्या घोड्याबरोबर राणकदेवीचा घोडा चालूं लागला. त्यांच्या मागें शेंवतीचा घोडा होता. हीं तिघेही निघाल्यावर त्यांच्यामागून सगळे स्वार चालूं लागले. ह्याप्रमाणें ह्यांची स्वारी कूच करून जुनागडाला परत जाण्याकरितां निघाली. पूर्वेकडील दरवाजावर जी चकमक उडाली त्यांत खेंगार महाराजांकडील दोन इसम ठार मारले गेले होते. त्यांचे घोडे रिकामे होते, तेच ह्या दोघींना बसण्याच्या उपयोगीं पडले. वाटेंत राणकदेवी व खेंगार ह्यांच्या पुष्कळ गोष्टी चालल्या होत्या, त्या येथें देण्यांत कांहीं अर्थ नाहीं; पण त्यांत एवढी मात्र गोष्ट आमच्या वाचकांना सांगण्यासारखी होती कीं, खेंगाराकडे जो जासूद गेला होता त्याला महाराजांनीं ठेवून घेतलें होतें. व त्याला त्यांनीं आपल्याजवळ खिजमतगाराची जागा दिली होती. त्यानें जी कामगिरी केली होती त्याबद्दल त्याला त्यांनीं दोन सोन्याचीं कडीं कंठी, वगैरे दागिने देऊन शिवाय मंदील व दुपेटा असा पोषाक दिला होता. हें ऐकून राणकदेवीला फारच आनंद झाला. मोतीबागेंतून निघाल्यापासून पंधराव्या दिवशीं खेंगार महाराज मोठ्या थाटानें आपल्या राजधानींत दाखल झाले.

महाराज अमुकवेळीं येणार अशी सूचना पूर्वी आली होती, ह्यामुळें सर्व शहर गुड्या व तोरणें उभारून शृंगारलें होतें. महाराजांची स्वारी पाहण्याकरितां हजारों लोकांची गर्दी राजवाड्यांत जाण्याच्या रस्त्यावर झाली होती. महाराजांबरोबर एक सुंदर स्त्री घोड्यावर बसून चालली आहे, तेव्हां ही महाराजांनीं कोणीतरी राजकन्या लग्न करण्याकरितां आणिली असावी असें लोकांचे तर्क चालले होते. महाराजांनीं जो दरवाजा आणिला होता तो मोठ्या थाटानें वाजतगाजत सर्व शहरांतून मिरविला. त्याच्यामागून रुपयांचे छकडे चालले होते. त्याच्यामागें घोडेस्वारांची एक तुकडी चालली होती, त्या तुकडीच्या मागें महाराज व राणकदेवी हीं बरोबर घोड्यावर बसून चाललीं होतीं. ह्यांच्यामागें शेवंती होती व तिच्यामागून बाकीचे स्वार चालले होते. ह्याप्रमाणें ती स्वारी राजवाड्यांत दाखल झाली. राणकदेवीला घेऊन महाराज जनानखान्यांत आपल्या मातेला नमस्कार करण्याकरितां गेले. राणकदेवीला पाहून राजमातेला मोठा आनंद झाला. तिनें तिला नमस्कार केला तेव्हां तिनें तिला 'अखंड सौभाग्यवती हो' असा आशीर्वाद दिला. राणकदेवी उभी होती तिला तिनें आपल्याजवळ बसवून घेतलें. राखेंगार मातेचा निरोप घेऊन दरबारांत आला. तेथें सर्व सरदार, मानकरी व दरकदार आपापल्या मिसलीवर पूर्वींच येऊन बसले होते. महाराज येतांच भालदारांनीं पुकारलें; सर्वांनीं एकदम खडी-ताजीम दिली. महाराज मुजरे घेत घेत आपल्या सिंहासनावर जाऊन बसले. कलावंतिणींचा नाच सुरू होता,

थोडावेळ नाच पाहून झाल्यावर नजराण्याला सुरुवात झाली सर्वांचें नजराणे झाल्यावर अत्तर गुलाब व पानसुपारी झाल्यावर दरबार बरखास्त झाला. जुनागडांत विजयोत्साह सुरू करावा म्हणून दवंडी पिटविण्यांत आली. जिकडे तिकडे घरोघर तीन दिवसपर्यंत मोठ्या कडाक्यानें उत्साह करण्यांत आले. गेजवान्या, नाच व रंग ह्यांची रेलचेल चालली होती. तीन दिवसपर्यंत रोजरात्रीं सर्व शहरांत रोषनाई करण्यांत येत होती.

# भाग १९ वा.

## विवाहाची तयारी.

मागील भागांत सांगितलेला प्रकार झाल्यावर थोड्याच दिवसांनीं जुनागड शहरांत मोठ्या कडाक्यानें विवाहाची तयारी चालली होती. राजवाड्याला रंगरोगण करून व ध्वजापताका लावून तो अगदीं सजविला होता. शहरांतील मोठमोठ्या रस्त्यांवर दुतर्फा पताका लावून मधून मधून कमानी केल्या होत्या. शहरांतील सर्व घरांना रंग लावण्याचे हुकूम सुटले होते. वऱ्हाडी मंडळी येऊं लागली होती. माघ शुद्ध पंचमीला विवाहाची तिथी ठरलेली होती. खेंगारांनीं सिंधु देशाच्या राजाकडे आमंत्रण करण्याकरितां सांडणीस्वार रवाना केला होता. काठेवाडांतील व गुजराथेंतील सर्व लहान लहान राजांना आमंत्रणें गेलीं होतीं. लग्नाच्या आदल्या दिवशीं मदनसिंग, धैर्यसिंगमहाराज

व इंदुमती अशीं त्रिवर्ग मोठ्या लवाजम्यानिशीं लग्नाला आलीं होतीं. खेंगार एक कोस सामोरा जाऊन धैर्यसिंह महाराजांस राजवाड्यांत घेऊन गेला. वाड्यांतील दुसऱ्या चौकांत त्यांच्या उतरण्याची व्यवस्था केली होती. इंदुमती राणकदेवीच्या महालांत राहण्याकरितां गेली. मदनसिंग महाराजांजवळच राहिला; इंदुमतीची व राणकदेवीची भेट झाल्यावर त्यांना मोठाच आनंद झाला. त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहूं लागले. त्या एकमेकींना कडकडून भेटल्या. राणकदेवी नाहींशीं झाल्यापासून ज्या ज्या गोष्टी घडल्या त्या सर्व तिनें राणकदेवीला सांगितल्या. गुलाबी बिरबलाला अनुकूल होऊन तिला अमली पदार्थ देण्याला प्रवृत्त झाली, ही गोष्ट ऐकून तिला मोठेंच आश्चर्य वाटलें. मा साहेबांच्या मृत्यूची हकीकत ऐकून तिला फारच वाईट वाटलें. ती कितीवेळ तरी रडत होती. इंदुमती व शेवंती तिला समजावीत होत्या. कांहींवेळानें तिचा शोकभार कमी झाल्यावर तिनें शेवंतीची फार तारीफ करून सांगितलें कीं, जशी तूं मला प्रिय तशीच ही आहे. ही माझ्या फार उपयोगी पडली आहे. ह्याप्रमाणें त्यांची बोलणीं चाललीं होतीं. इतक्यांत मदनसिंग व धैर्यसिंग महाराज राणकदेवीला भेटण्याकरितां आले होते. ह्यांची मुद्रा आनंदीत दिसत होती. महाराज महालांत आल्यावर सर्वजणीं उभ्या राहिल्या. धैर्यसिंहाला पाहून राणकदेवीनें कडकडून बापाला मिठी मारिली. तो देखावा खरोखर मोठा प्रेक्षणीय होता. त्या वृद्ध पित्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहत होते. राणकदेवीला दुःखाचा मोठा आवेश आला होता. तो आंवरून रडक्या

स्वरानें ती म्हणाली, 'बाबा तुम्ही आलां पण मा नाहींत' हे शब्द उच्चारतांना तिला रडयाची मोठी उकळी आली. तिनें ती दाबण्याचा बराच प्रयत्न केला तरी दाबली गेली नाहीं. धैर्यसिंहालाही बायकोचें स्मरण होऊन रडें कोसळलें. दोघे अशा स्थितींत कांहींवेळ होतीं इतक्यांत मदनसिंग म्हणाला, 'महाराज आतां गत गोष्टीबद्दल शोक करण्यांत अर्थ नाहीं. आपण ताईसाहेबांच्या विवाहाकरितां आलों आहोंत, असल्या मंगल कृत्यांत हें अमंगल कशाला पाहिजे ? जरा विवेक केला पाहिजे. मदनसिंगाचें भाषण ऐकून महाराजांनीं डोळे पुसले. राणकदेवीही आपल्या पित्याला सोडून इंदुमतीजवळ गेली. मदनसिंग व महाराज बराच वेळ पावेतों राकणदेवीच्या महालांत बसले होते, त्यांचीं बोलणीं सर्व एकाच विषयावर होतीं. आमच्या वाचकांना सांगण्यासारखें त्यांत नवीन कांहींच निघालें नाहीं. माघ शुद्ध पंचमीच्या दिवशीं गोरज मुहूर्तावर राणकदेवीचा खेंगाराशीं विवाह झाला. धैर्यसिंग महाराजांनीं जांवयाला आंदणही पुष्कळ दिलें. चांदीच्या अंबाऱ्याचे हत्ती, चांदीच्या सरंजामाचे दहा सुंदर घोडे व जडजवाहीर सुमारें तीन लक्ष रुपयांचें दिलें. शिवाय भरगच्चीचें व किनखापाचे पोषाक, चांदीचीं व सोन्याचीं भांडीं, पांच दासी, इतका सरंजाम धैर्यसिंग महाराजांनीं दिला. सोळादिवस पर्यंत मोठ्या कडाक्याचा थाट चालला होता. जुनागडांत सर्व लोकांना गोड खाण्याचा अगदीं वीट येऊन गेला. खेंगार महाराजांनीं लग्न समारंभाच्या शेवटीं सर्व वऱ्हाडी मंडळीला ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें पोषाक दिले. ह्या लग्न समारंभांत एक गोष्ट मात्र विशेष लक्षांत

ठेवण्यासारखी झाली. लग्नाच्या मेजवान्या चालल्या होत्या त्यांत शहरांतील सर्व लोकांना आमंत्रणें असत. एके दिवशीं कांहीं वाघरी लोक मडकीं विकण्याकरितां जुनागडास आले होते त्यांना जेवावयास चला ह्मणून आमंत्रण केलें, तेव्हां त्यांनीं विचारिलें कीं, 'आज तुमच्या राजाच्या घरीं कसला समारंभ आहे? राजसेवकांनीं सांगितलें सिद्धराजाकडून राणकदेवीला सोडवून आणून तिच्याबरोबर महाराजांनीं लग्न केलें त्याच्या मेजवान्या चालल्या आहेत. 'सिद्धराजाच्या भावी बायकोला हरण करून तुमच्या राजानें तिच्या बरोबर लग्न केलें काय? आणि मग आह्मीं येथें कसें जेवावें.' आमच्या राजाला ही हकिकत समजली तर तो आमचीं पाळें मुळें खणून काढील. आह्मांला तुमच्या जेवणाची जरूर नाहीं.' असें ह्मणून ते वाघरी लोक जुनागडाहून निघून गेले. सिद्धराजाचा हा दरारा ऐकून ते सेवक अगदीं चकित होऊन गेले. लग्न समारंभ पुरा झाल्यावर आलेले वऱ्हाडी हळूहळू आपल्या घरीं परत जाऊं लागले. एक महिनाभर जुनागडास धैर्यसिंग महाराजांचा मुक्काम होता. मदनसिंगाचें लग्न फाल्गुन मासांत उरकून घेण्याचा त्यांचा विचार होता ह्मणून त्यांनीं जांवयाला मोठ्या आग्रहानें आमंत्रण केलें. खेंगारानेंही येण्याचें कबूल केलें. राणकदेवीला बरोबर घेऊन जाण्याची त्यांनीं इच्छा दर्शविली, पण मी बरोबर घेऊन येईन असें त्यानें सांगितल्यावरून राणकदेवीचा विचारही तसाच पडल्यामुळें त्यांनीं विशेष आग्रह केला नाहीं. खेंगार धैर्यसिंग महाराजांना एक कोसपर्यंत पोंचविण्याकरितां गेला होता. जातांना

धैर्यसिंग महाराजांना व त्यांच्या बरोबरच्या मंडळीला खेंगार महाराजांनीं मोठ्या किंमतीचे पोषाक दिले. धैर्यसिंग जुनागडाहून निघून गेल्यावर तेथें विशेष कांहीं घडलें नाहीं.

# भाग २० वा.

## ललितागौरी व दिवाळी.

वैद्यराजाला कैद करून नेल्यावर ललितागौरी दिवाळीला घेऊन आपल्या निजावयाच्या खोलींत गेली ह्मणून मागें सांगण्यांत आलेंच आहे. तेथें गेल्यावर त्या दोघींचें जें बोलणें झालें तें ऐकण्याची उत्सुकता आमच्या वाचकांना झाली असेल. ललितागौरी आपल्या खोलींत गेल्यावर तिनें दाराला कडी लावून घेतली व त्या दोघीजणी जमिनीवर बसल्या. प्रथम बोलण्याला सुरवात कशी करावी हें तिला मुळींच सुचेना. तिच्या मनाला जो उद्वेग झाला होता त्या भरांत तिचे तोंडांतून कांहीं तरी शब्द निघून गेले होते. त्या गोष्टीबद्दल तिचा निश्चय झाला नव्हता. गृहकृत्यांत अडचणी कोणत्या येतील ह्या बद्दल तिनें जे उद्गार काढले होते. ते एक देशीय होते. अद्याप सरकारांतून किती रक्कम मिळावयाची हें नक्की झालें नव्हतें. सगळा पैसा तिच्या हातांत असता तर असले वेडे विचार तिच्या मनांत आले नसते, पण घरांतील सर्व इष्टेट सरकारांत गेल्यासारखीच होती. तिच्या अंगावर सरासरी दोन हजार रुपयांचे दागिने होते, एवढीच कायती पुंजी तिच्या ताब्यांत होती. ही पूंजी

तिच्या थोर दृष्टीला अगदींच अल्प वाटत होती. आजपर्यंत आपण शेजाऱ्यांपाजाऱ्यांबरोबर मोठ्या श्रीमंती थाटानें वागलों, आपल्याजवळ पैसा आहे, हें सर्व लोकांना माहीत असल्यामुळें ते आपणाला मान देत असत, आतां पैसा गेला तेव्हां त्याच्याबरोबर मानही गेलाच असें तिला वाटूं लागलें. एकापरीनें तिला वाटे आतां कांहीं जिवंत राहूं नये, पण पुन्हां ती आपल्या सुंदर शरीराकडे पाहून ह्याचा आपण नाश करणार, असा विचार मनांत आला ह्मणजे तिला रडूं येई. अशा स्थितींत दिवाळी जवळ काय बोलावें व तिला काय सांगावें, ह्याबद्दल तिचा विचार नक्की ठरेना; कोठल्या कोठें मी अभद्र शब्द काढले असेंही तिला वाटूं लागलें. अशा गोंधळांत ती पडली होती, इतक्यांत खोलीच्या दारावर कोणी मोठ्यानें थाप मारिली. ‘ कोण आहे बाहेर ? ’ असा दिवाळीनें प्रश्न केला. दार उघडा मी आहें असें उत्तर मिळालें. हा शब्द ओळखीचा आहे असें ललितागौरीला वाटलें; दिवाळीनें दार उघडलें व तो येणारा इसम आंत शिरला. त्याला पाहून ललितागौरीला बरें वाटलें. तिनें त्याला विचारिलें कसें काय नानाभाई, तुह्मी आज कोणीकडे वाट चुकलां?

**नानाभाई**—मला मदनसिंग महाराजांनीं येथें पाठविलें आहे.

**ललितागौरी**—कशाकरितां पाठविलें आहे?

**नानाभाई**—तुमच्या इस्टेटीची व्यवस्था पाहण्याकरितां माझी नेमणूक सरकारांतून झाली आहे.

**ललितागौरी**—ह्मणजे ह्या तुमच्या बोलण्याचा अर्थ मला समजला नाहीं!

**नानाभाई**—मदनसिंग महाराजांनीं तुमची इस्टेट जप्त करण्याचा हुकूम केला होता; पण महाराजांनीं सांगितलें कीं, वैद्याच्या कुटुंबांतील मनुष्यांनीं कांहीं अपराध केला नाहीं. तेव्हां इस्टेट जप्त करण्याचा हुकूम रद्द केला, पण वैद्याला कोणी वारस नाहीं, असें त्यांना माहीत होतें, तेव्हां त्यांनीं तिची व्यवस्था पाहण्याला माझी नेमणूक केली.

**ललितागौरी**—माझ्या खर्चाची नेमणूक किती ठरविली आहे?

**नानाभाई**—तें ठरविण्याचें काम आपलें आहे. आपलें उत्पन्न किती आहे तें पाहून त्या मानानें आपल्या खर्चाचें मान बसवावें. मला नेमण्याचा उद्देश इतकाच आहे कीं, बायका मनुष्यांच्या हातून इस्टेटीची अफरातफर होऊं नये.

**ललितागौरी**—मग ही व्यवस्था करण्याचें सरकाराला कारण काय?

**नानाभाई**—सगळ्यांचें संरक्षण करणें हें सरकारचें काम आहे.

**ललितागौरी**—मग आतां हा पाहरा उठून जाईल कीं नाहीं?

**नानाभाई**—नाहीं. पाहारा तर येथें राहणार आहे. त्याचा खर्चही आपल्यापासून घेण्याचा ठराव झाला आहे.

**ललितागौरी**—असें कां पण?

**नानाभाई**—कारण तुमच्या जवळ पैसे पुष्कळ

आहेत असें सर्व लोकांना माहीत आहे. एखाद् वेळेस दरोडा पडून तें चोरीस जाण्याची भीति आहे.

**ललितागौरी**—मग सरकार माझी फारच काळजी घेतात !

**नानाभाई**—इंदुमती बाईंची आणि तुमची ओळख आहे कां ?

**ललितागौरी**—कां बरें ? आहे; चांगली ओळख आहे. आह्मी मैत्रिणीच आहोंत !

**नानाभाई**—त्यांच्या भिडेनें हा सर्व प्रकार झाला आहे. येथें माझी नेमणूक करण्याला तरी त्याच कारण.

**ललितागौरी**—आतां सगळें जमलें; माझें माहेर तिच्या घराशेजारींच होतें. ती आणि मी लहानपणीं एकच ठिकाणीं खेळत असूं. लग्न झाल्यापासून आतां मात्र वारंवार भेटी होत नाहींत; कारण आतां माहेरीं कोणीच राहिलें नाहीं. तेव्हां तेथें जाणें अर्थात् बंद झालें. बरें पण, नानाभाई तुह्मी आलां हें एक दुःखांत सुख ह्मणावयाचें. अजूनपर्यंत माझे जिवांत जीव नव्हता, कांहीं तरी वेडे विचार माझ्या मनांत येत होते.

**नानाभाई**—सगळ्या मिळकतींच्या यादी करण्याला उद्यांपासून सुरवात करावयाची.

**ललितागौरी**—जेव्हां तुम्हाला वाटेल तेव्हां करा.

**नानाभाई**—सरासरी दर महिन्याला तुह्माला खर्च किती लागेल?

**ललितागौरी**—निदान आम्हाला दोघींनां जरी ह्मटलें तरी पन्नास रुपये तर खरे. ह्याशिवाय धडोती ती निराळीच.

**नानाभाई**—तुमचें सालीना सगळें उत्पन्न पंधरा हजारांचें आहे. आह्मी तुमच्या घरचे सर्व जमा खर्चाचे कागद पाहिले आहेत, त्यावरून मी ह्मणतों. ह्या उत्पन्नांत खर्च भागला ह्मणजे झालें. मूळ शिलकेला हात लावायाचा नाहीं. आतां पहा, माझा दरमहाचा पगार वीस रुपये. पांच पाहेरेकऱ्यांचा पगार पन्नास रुपये मिळून पन्नास नी वीस सत्तर; नी तुमचे पन्नास मिळून एकशेंवीस रुपये दर महाचा खर्च झाला. आपण वर्षाचा खर्च दोन हजार धरूं या. तरीसुद्धां दर वर्षास तेरा हजार रुपये निव्वळ शिल्लक राहण्याला हरकत पडणार नाहीं.

**ललितागौरी**—आपण खर्चाच्या यादी उद्यां ठरवूं मला किती खर्च लागेल हें कांहीं मी नक्की आतांच ठरवीत नाहीं. वर्षाचे सरासरी हजार दोन हजार शिल्लक राहिले तरी चालेल ना?

**नानाभाई**—हो न चालण्याला काय झालें? आपल्या मर्जीप्रमाणें वागावयाचा हुकूम आहे.

**ललितागौरी**—मग झालें तर. दिवाळी आमची आतां ह्मातारी झाली आहे, तेव्हां दुसरी एखादी गोलकरीण ठेवावी लागेल. स्वयंपाक करण्याला कोणी तरी बाई पाहिजेच. भाजीपाला आणण्याला एखादा कोणी मनुष्य नको का? देवधर्म, आला गेला, वगैरे सगळ्या गोष्टी आल्या ह्मणजे मग कांहीं फार नाहीं शिल्लक राहणार! बरें पण तुह्मी आतां उद्या सकाळीं या. पण कायहो ते सुटणार नाहींत का?

**नानाभाई**—अजून कांहीं नेम नाहीं सांगवत. शिफारस जर चांगली लागली तर सुटतीलही खरे. हें काय धर्म-राज्य आहे ?

**ललितागौरी**—तुह्मी शोधांत असा हो पण. इंदुमती बाईच्याच वशिल्यानें काम होईल असें मला वाटतें.

**नानाभाई**—पण अजून अवधी आहे. पुढें असा दिवस येईल.

**ललितागौरी**—बरें तर तुह्मी जा आतां.

नानाभाई त्या खोलींतून निघून गेला. ललितागौरी व दिवाळी आपापल्या कामांना निघून गेल्या. नानाभाईनें सांगितलेली हकिगत ऐकून तिला फारच आनंद झाला. नवरा तुरुंगांत गेला ह्याबद्दल तिला खेद कांहींच वाटला नाहीं. आतां आपण काय घ्यावें नी कसें वागावें ह्याबद्दल तिचे विचार सुरू झाले होते.

---

# भाग २१ वा.

## लग्न समारंभ.

---

फाल्गुन वद्य दशमीच्या दिवशीं मोंगशहरांतील मोती चौकांतील एका घरांत मोठी गडबड उडून गेली होती. हें घर दोन मजली असून बरेंच मोठें होतें. मोती चौकाच्या रस्त्याकडच्या अंगाला ह्याचा पुढला भाग होता. रस्त्यांतून त्या घरांत जातांना प्रथम ज्या पायऱ्या लागत त्या अगदीं रस्त्याबरोबर होत्या. त्या चढून वर गेलें ह्मणजे एक पडवी

लागे; त्या पडवींत सुमारें दहाबारा शिपाई बसले होते. त्या पडवींतून घराच्या आंतल्या भागांत जाण्याला एक दार होतें; त्या दाराच्या उजव्या अंगाला भिंतींत एक जिना होता. तो फारसा रुंद नव्हता. तरी दोन मनुष्यांना एक-मेकाच्या शेजारून जाण्याला कांहीं हरकत पडण्यासारखी नव्हती. दार ओलांडून आंत गेल्यावर एक सोपा लागे; तो सोपा सलग लांब होता. त्याची लांबी कमींतकमी पंधरा हात तरी असावी. ह्या सोप्यांत एक मोठी सतरंजी हांतर-लेली असून भिंतीशीं एक मोठा लोड ठेविलेला होता. त्या लोडाला अभ्रा नव्हता. त्या ठिकाणीं सुमारें दहावीस मंडळी बसली होती. त्या सोप्याच्या उत्तरेकडच्या अंगाला तसाच दुसरा सोपा होता. पण त्याची रुंदी पहिल्या सो-प्या इतकीच असून लांबी मात्र जरा कमी होती. ह्याच-प्रमाणें दक्षिण व पश्चिम ह्या दिशांकडेही सोपे होते. दक्षिणे कडला सोपा उत्तरेच्या सोप्याप्रमाणेंच होता. पश्चिमेकडच्या सोप्यांत बऱ्याच स्त्रिया जमल्या होत्या. दुसऱ्या मजल्यावर खा-लच्या मजल्याप्रमाणें व्यवस्था होती. पहिल्या दिवाणखान्यांत गालिचा पसरलेला होता. ठिकठिकाणीं तक्ये मांडले होते. भिंतीबरोबर मधोमध एक मोठा लोड स्वच्छ अभ्रा घालून मांडलेला होता. त्या दिवाणखान्याला वरतीं पांढरें छत होतें. भिंतीला पांढरा चुन्याचा रंग दिलेला होता. बाकी कांहीं सामान त्या दिवाणखान्यांत नव्हतें. त्याच्या उत्तरेच्या अंगाला तसाच एक दुसरा दिवाणखाना होता. त्या दिवाण-खान्यांत खालीं चुनेगच्ची केलेली होती. वरती पांढरें छत होतें. उत्तरेकडच्या भिंतीबरोबर एक छप्परपलंग होता,

त्यावर पांढऱ्या जाळीदार कापडाची मच्छरदाणी असून तिचा संजापही पांढऱ्या कापडाचाच होता, पण तें कापड बरेंच जाड होतें. पलंगावर दोन गाद्या होत्या, पण त्यांवर अभ्रा नव्हता. त्यांचा वर्ण तांबूस होता. पलंगाजवळ उजव्या हाताकडे एकावर एक अशा दोन बऱ्याच मोठ्या पेट्या होत्या; त्यांना पितळेची मोठमोठालीं कुलुपें लाविलेलीं होतीं. एका कोनांत एक हातभर उंचीची पितळेची समई होती. ती स्वच्छ होती. तींत बीन जळलेली अशी वातींची जुळी असून, ती तेलानें भरलेली होती. खालच्या मजल्यांत चार सोपे होते. त्यांच्या मधोमध एक चौक होता. त्या चौकांत विटांचें एक बहुलें घातलेलें असून त्यावर रंगीत खांब उभे करून चांदवा पसरला होता. पूर्वेकडच्या अंगाला केळीचीं तोरणें बांधलेलीं होतीं, आह्मी जेव्हां ह्या घरांत प्रवेश केला तेव्हां दोन प्रहरचे दोन वाजून गेले होते. ज्या घराचें आह्मी वर्णन केलें आहे तें घर इंदुमतीच्या बापाचें असून त्याचें नांव मोहनसिंग असें होतें. इंदुमतीचा विवाह मदनसिंगाबरोबर आज व्हावयाचा होता, ह्याकरितां ह्या वाड्यांत ही तयारी चालली होती. आह्मी जेव्हां घरांत प्रवेश केला, तेव्हां चौकांत एक गृहस्थ उभा होता. त्याचा वर्ण काळा सांवळा असून बांध्यानें मजबूत होता. ह्याचा चेहरा वाटोळा होता. ह्याच्या मिशा मोठाल्या असून त्यानें दाढीही ठेविली होती. ह्याचें वय चाळीस वर्षांचें होतें. आजूबाजूची मंडळी त्याला मोहनसिंग महाराज ह्या नांवानें हाका मारीत होते. ह्यावरून इंदुमतीचे हे तीर्थरूप असावेत असें आमच्या वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. ते कामाची देखरेख करीत हिंडत

होते. ह्यांच्या अंगांत मलमलीचा लांब तंगदार अंगरखा होता, पायांत पांढरी सुरवार होती व डोक्याला तांबड्या रंगाचें पिळदार चंदेरी पागोटें होतें. त्यांच्या गळ्यांत एक मोत्यांची तीन पदरीं कंठी होती. कानांत मोटमोठाल्या मोत्यांची भिकबाळी असून मध्यें पाचूचा लोलक होता. हाताच्या बोटांत एक पाचूच्या खड्याची आंगठी होती. संध्याकाळीं दोन घटका दिवसास मोंगशहराच्या राजवाड्यांतून वऱ्हाड वाजतगाजत शहरांत येण्याकरितां निघालें. सर्वांच्यापुढें बाजेवाले व सनईवाले चालले होते. त्यांच्यामागून हत्तीवर चांदीच्या अंबारींत बसून नवरदेव चालले होते. त्याच्यामागून धैर्यसिंग महाराज व खेंगारजी आपापल्या मानकरी मंडळीसह चालले होते, ह्यांच्या मागून मोंगशहरांतील मोठमोठाले सरदार, मानकरी व दरकदार लोक चालले होते. सर्वांच्या मागून जनानखान्यांतील बाया मेण्यांत व रथांत बसून चालल्या होत्या. राणकदेवीचा रथ चांदीचा असून त्याला वर सोन्याचे कळस होते. त्या रथाला बैल जुंपले होते; त्यांचीं शिंगें चांदीच्या पत्र्यांनीं मढविलेलीं होतीं. अंगावर भरगच्चीच्या झुली होत्या. ह्याच्या मागून घोडेस्वारांच्या रांगा चालल्या होत्या. ह्याप्रमाणें ही स्वारी राजवाड्यांतून निघून मोठ्या थाटानें शहराकडे चालली. अर्ध्या रस्त्यावर ही स्वारी गेल्यावर इंदुमतीच्या माहेरची मंडळी ह्यांना सामोरी आली होती. दिवसमावळण्याच्या पूर्वीं सुमारें एक घटका ही स्वारी इंदुमतीच्या घरीं दाखल झाली. नवरदेव हत्तीवरून खालीं उतरल्यावर त्याच्या अंगावरून लिंबलोण उतरून त्यांचा हात धरून चौकां-

तील बहुल्यावर घेऊन गेले. स्वारीबरोबरची वडीवडी मंडळी माडीवरच्या दिवाणखान्यांत गेली. बाकीची साधारण मंडळी खालच्या सोप्यांत बसली. शिपाई प्यादे बाहेरच्या पडवींत उभे राहिले होते. बाया मागील सोप्यांत गेल्या. घोडेस्वार हारबंद लग्नगृहाजवळ दुरस्ता उभे राहिले होते. बाजेवाले बाहेरच्या पडवींत जाऊन बसले. नवरामुलगा बहुल्यावर गेल्यावर मंत्र म्हणण्याला ब्राह्मणांनीं सुरवात केली. सूर्य मावळण्याच्या संधीला मंगळाष्टकें सुरू झालीं. सर्व मंगळाष्टकें म्हणून झाल्यावर मधला अंतरपाट गुंडाळून घेतला. नवऱ्यामुलानें नवरीच्या गळ्यांत पुष्पांची माळ घातली, नवरीनेंही तसेंच केलें. माळा गळ्यांत पड-तांच वाद्यें वाजूं लागलीं. ब्राह्मण वेदांतील मंत्र म्हणूं लागले. अत्तरगुलाब व पानसुपारी वांटणारांची एकच धांदल उडून गेली. बायांकडे ओंटया सुरू झाल्या. वरती दिवाणखा-न्यांत अत्तर गुलाब पानसुपारी झाल्यावर नवरानवरी ह्यांना पाहण्याकरितां उभयतां महाराज चौकांत आले, तेथें आल्या-वर त्यांनीं अहेर केला. महाराजांचा अहेर झाल्यावर एका पाठीमागून एक असे अहेर सुरू झाले. महाराजांचा अहेर झाल्यावर ते परत जाण्याकरितां निघाले. मोहनसिंग जरी कन्यादान करण्याच्या गडबडींत होता तरी तितक्यांतल्या ति-तक्यांत तो बाहेर महाराजांना पोंहचविण्याकरितां पुढील दरवाजा पावेतों गेला. महाराजांनीं त्याला परत जाण्याविषयीं मोठ्या आग्रहानें सांगितल्यावरून तो परत फिरला. महाराज बहुतेक मंडळीसह परत राजवाड्यांत गेले. इकडे अकरा वाजेपर्यंत मारी गर्दी चालली होती. राणकदेवी

वगैरे जनानखान्यांतील मंडळी अकरा वाजतां राजवाड्यांत गेली. दुसऱ्या दिवसापासून मेजवान्यांना सुरुवात झाली. इंदुमतीच्या बापानें आपल्या शक्तीप्रमाणें कार्य फारच उत्तम केलें. चार दिवसपर्यंत हा समारंभ चालला होता. रीतीप्रमाणें चवथ्यादिवशीं झाल घेऊन गेले. मदनसिंग व इंदुमती हीं उभयतीं राजवाड्यांत आलीं; पुढें मांडवपरतणें वगैरे सर्व शिष्टाचार रीतीप्रमाणें झाले. लग्न समारंभ आटपल्यावर एकेदिवशीं राणकदेवीच्या महालांत राणकदेवी, इंदुमती व मदनसिंग हीं तिघेंजणें बोलत बसलीं. मदनसिंगानें राणकदेवीला मागील सर्व वृत्तांत सांगितला. वैद्य, बिरबल व काळ्या हे तुरुंगांत आहेत असेंही सांगितलें; व गुलाबीला नोकरींतून कमी केलें आहे हेंही कळविलें.

राणकदेवी स्वभावतांच दयाळू होती, तशांत हा प्रसंग तिच्यावर आल्यापासून ती जास्तीच दयाळू झाली होती. तो वैद्य झातारा असून त्याची बायको अगदींच तरूण आहे हें तिला माहीत होतें, ह्यामुळें त्या वैद्यावर दया करून त्याची बंदीखान्यांतून मुक्तता करावी असें प्रथम तिला वाटलें, पण मग बाकीच्या दोघांनीं तरी काय केलें आहे, असा प्रश्न तिच्या मनांत उभा राहिला.

मदनसिंगाचा काय विचार पडतो हें पाहण्याकरितां ती ह्मणाली,—'मदनसिंगजी परमेश्वराच्या कृपेनें आपले सर्वांचे मनोरथ तर शेवटास गेले; मग त्या गरिबांना आतां बंदींत ठेवण्यांत तरी काय अर्थ आहे? मला वाटतें त्यांना सोडून द्यावें. त्या बिचाऱ्या वैद्याच्या बायकोची मला भारीच दया

येते. बिचाऱ्याची तिसरी बायको आहे. तिचें वय कांहीं फार नाहीं.'

**इंदुमती**—फार कसलें ? आपल्यापेक्षां दोन एक वर्षांनीं वडील असेल ! ती माझी बाळमैत्रीणच आहे.

**मदनसिंग**—ह्मणूनच तिच्याबद्दल रदबदली चालली होती.

**राणकदेवी**—काय ? वैद्याला सोडण्याबद्दल इंदुमतीनें रदबदली केली होती एकूण ?

**मदनसिंग**—वैद्याला सोडण्याबद्दल रदबदली केली नव्हती. तिच्या ताब्यांत सर्व मिळकत देण्याबद्दल होती.

**राणकदेवी**—ह्मणजे तिची मिळकत जप्त केली होती कीं काय ?

**मदनसिंग**—होय, ती सरकारांत घेण्याचा आमचा विचार होता; पण तुमच्या मैत्रिणीच्या आग्रहावरून ती तिला परत सोपण्यांत आली आहे. आतां फक्त सरकारची देखरेख आहे.

**राणकदेवी**—मग असें करण्याचें कारण काय ?

**मदनसिंग**—कारण असें आहे, त्या वैद्याचें सालिना पंधरा हजार रुपायांचें उत्पन्न असून त्याच्याजवळ अडीच लक्ष रुपायांची रोख जिनगी आहे. वैद्याला तर जन्मभर कैदेंत ठेवण्याचा ठराव झाला ! मागें संतान वगैरे कांहीं नाहीं; एक तरूण पत्नी ! बायकांच्या हातांत एवढी मोठी मिळकत गेल्यावर ती लुच्चे लोकांच्या नादीं लागून सर्व उडवून टाकील. ह्या करितां सरकारांतून एका कारकुनाची नेमणूक करण्यांत आली आहे. त्याला असा हुकूम आहे

कीं, त्या बाईच्या सल्ल्यानें खर्च करावा, पण आयापेक्षां खर्च जास्ती होऊं नये, व मूळच्या रकमेला हात लावूं नये. दरसाल कांहीं तरी रक्कम शिलकेंत गेलीच पाहिजे.

**राणकदेवी**–हें कांहीं करणें मला नाहीं बरें वाटत. त्या वैद्याला मुक्त करून त्याची मिळकत त्याला सोंपून द्यावी. गडे इंदुमती तुला कसें काय वाटतें ?

**इंदुमती**–असें झालें, तर आपण त्याच्यावर मोठेच उपकार केले असें होईल.

**राणकदेवी**–आणि त्याला कृतकर्माचा पश्चात्तापही होईल. तो पुन्हां कधीं सुद्धां असल्या फंदांत पडणार नाहीं. मदनसिंगजी मी बाबांना सांगून हें करविणारच. एका वैद्यालाच सोडावयाचें असें नाहीं, पण त्या दोघांनांही सोडावयाचें.

**मदनसिंग**–हें करणें न्यायाच्या दृष्टीनें बरोबर होणार नाहीं.

**राणकदेवी**–राजाला कांहीं आनंद झाला ह्मणजे कैदी सोडतात कीं नाहीं ?

**मदनसिंग**–होय, सोडतात.

**राणकदेवी**–बाबांना आनंद मानण्यासारखी गोष्ट झाली आहे. हें कांहीं तुह्मी नाकबूल करणार नाहीं; मग त्या लोकांना सोडण्याला काय हरकत आहे ?

**मदनसिंग**–असले जर वकील कैद्यांचें वकीलपत्र घेऊन भांडूं लागले, तर मग त्यांच्या सुटकेची मुळींच शंका नको. मी कांहीं तुमच्या विचाराबाहेर नाहीं; पण

माझी एवढी तरी विनंती ऐका! विरबलाला ह्या राज्याच्या हद्दपार तरी करावें. तो स्वस्थ असणारा मनुष्य नाहीं.

**राणकदेवी**--ही गोष्ट मला कबूल आहे, पण आजच्या आज त्यांची सुटका झाली पाहिजे. मी आतांच बाबांना बोलावणें पाठवितें.

राणकदेवीच्या इच्छेप्रमाणें सर्व गोष्टी घडून आल्या. वैद्यबुवाची सुटका होऊन तो आपल्या घरीं गेला. काळ्या आपल्या कारभारणीला जाऊन भेटला. विरबलाला मोकळें करून तावडतोब त्या राज्यांतून निघून जाण्याचा हुकूम झाला. गुलाबीला तो जातांना भेटला सुद्धां नाहीं. मात्र राणकदेवीनें तिला दरमहा दहा रुपये वेतन करून देवविलें. राणकदेवीनें हें मोठेंच परोकाराचें कृत्य केलें ह्मणून तिची सर्व शहरांत तारीफ चालली होती. खेंगार महाराज आपल्या देशीं जाणार ह्मणून धैर्यसिंग महाराजांनीं त्यांना एक टोलेजंग मेजवानी दिली. त्या मेजवानीला सर्व राज्यांतील मोठमोठ्याल्या लोकांना बोलावणें पाठविलें होतें. शहरांतील प्रमुख शेट सावकार आले होते. मेजवानी झाल्यावर धैर्यसिंग महाराजांनीं दरबार केला. त्या दरबारांत, खेंगार महाराजांना ते आपल्या शेजारीं घेऊन सिंहासनावर बसले होते, त्यावेळीं सर्व मंडळीला उद्देशून त्यांनीं पुढील भाषण केलें. ' माझ्या राज्यांतील तमाम सरदार, मुत्सद्दी, जमेदार--शेटसावकार व इतर गृहस्थहो, मी जें कांहीं सांगणार आहे इकडे तुमचें अवधान असावें. परमेश्वरानें मला ज्या प्रमाणें बुद्धि दिली, त्याप्रमाणें आजपर्यंत मी तुमचें रक्षण केलें. मनुष्य चुकीला पात्र आहे. माझ्या

हातून चुका झाल्या असतील, कोणाचें नुकसान झालें असेल, कोणाचा अपमान झाला असेल, त्याबद्दल मी तुमची खऱ्या अंतःकरणानें क्षमा मागतों. माझें आतां वय झालें, पोटीं पुत्रसंतान नाहीं, तेव्हां आतां हा राज्यशकट कसा चालावा, ह्याबद्दल मला मोठी काळजी वाटणें अगदीं स्वाभावीक होतें. पण परमेश्वराच्या कृपेनें हें नररत्न मला लाधलें आहे. हे आमचे जामात आपल्या बाहुबळानें सर्व प्रकारांनीं तुमचें रक्षण करण्यास योग्य आहेत. सबब आजपासून मी हें आपलें राज्य ह्यांच्या स्वाधीन करितों. हे योग्य प्रकारें तुमचें पालन मुलाप्रमाणें करतील; माझें अवशिष्ट राहिलेलें आयुष्य मी ईश्वर भजनांत घालविणार.' असें ह्मणून धैर्यसिंग महाराजांनीं आपली तरवार खेंगाराच्या स्वाधीन केली. तिचा स्वीकार करून खेंगार महाराज बोलण्याकरितां उभे राहिले. ते म्हणाले--

"सरदार व इतर गृहस्थ हो, धैर्यसिंग महाराजांनीं मला जो अधिकार दिला, त्याचा मी कृतज्ञतापूर्वक स्विकार करितों. ह्या अधिकाराबरोबर मजवर केवढी जबाबदारी येऊन पडली आहे हें मी पूर्णपणें जाणतों. ती जबाबदारी ओळखून मी आपला कारभार चालवीन. ह्या देशांतील चाली व रीती ह्यांना अनुसरून मी वागेन. सर्व सरदार लोकांचे व जहागिरदारांचे जे जे हक्क असतील ते मामूल वहिवाटीप्रमाणें चालविण्यांत येतील. मामूल वहिवाटींत कोणत्याही प्रकारचा फेरफार करणार नाहीं. त्याचप्रमाणें सरदार, जहागिरदार व इतर लोक ह्यांनींही आमच्याबरोबर असेंच वागावें असें आह्मी इच्छितों. आह्मी

नेहमीं येथें राहूं शकणार नाहीं, ह्याकरितां आमच्या वतीनें काम चालविण्याकरितां आह्मी धैर्यसिंग महाराजांच्या फार प्रीतींतले, परम विश्वासू व कर्तव्यदक्ष असे जे आमचे मित्र मदनसिंगजी ह्यांना मुतालीक नेमितों. सर्वांनीं ह्यांच्या आज्ञेंत वागावें असें आह्मी फर्मावितों. वारंवार आमच्या आज्ञा ह्यांच्या मार्फत तुह्माला कळविण्यांत येतील."

ह्याप्रमाणें त्यांचें भाषण झाल्यावर अत्तरगुलाब व पानसुपारी होऊन दरबार बरखास्त झाला. पुढें थोड्याच दिवसांनीं खेंगार महाराज राणकदेवीसह आपल्या देशीं निघून गेले. मदनसिंग राज्यकारभार पाहूं लागला, धैर्यसिंग महाराज ईश्वरोपासना करूं लागले, त्यांनीं पुनः राज्यकारभारांत कधीं सुद्धां लक्ष घातलें नाहीं. पुढें धैर्यसिंग महाराज ह्या नश्वर जगाचा त्याग करून अक्षयीं सुख भोगण्याकरितां स्वर्गास गेले.

## भाग २२ वा.

## गुलाबी.

बिरबलाची कैदखान्यांतून सुटका झाल्यावर त्याला ह्या राज्यांतून निघून जाण्याचा हुकूम झाला होता. त्याप्रमाणें तो ताबडतोब मोंग शहर सोडून निघाला. राणकदेवी नाहींशी झाल्यापासून गुलाबीवर एका पाठीमागून एक संकटें येऊं लागलीं होतीं. आपल्या आवडत्या धनिणीच्या विरुद्ध कटांत ती बिरबलाला अनुकूळ झाली होती, ती

त्याच्याबरोबर लग्न व्हावें ह्मणून झाली होती. बिरबलाला कैद केलें, तो तुरुंगांत गेला ही बातमी तिला समजल्यावर तिच्या आशेचा अंकुर बहुतेक करपून गेला होता. राणी-साहेब आपल्या भाच्यास कैदेंत राहूं देणार नाहींत एवढीच काय ती तिला आशा होती. परंतु राणीसाहेब आत्महत्या करून मरण पावल्या हें वर्तमान ऐकून तर तिची कंबरच खचली. तिचा आशांकुर जळून खाक झाला. तरी बिर-बलावरील तिची प्रीति मात्र कमी झाली नाहीं. त्याच्या-करितां ती रडत बसली. रडून रडून तिनें आपले डोळे सुज-वून घेतले. अश्रूंनीं तिचा पदर अगदीं भिजून चिम्ब झाला. इतकी जरी तिची स्थिति झाली होती, तरी तिच्या त्या घरांत तिचें समाधान करावयास कोणीच नव्हतें. पोटांत आग पडली ती शमविण्याकरितां तिला विस्तव पेटवावा लागला. राणकदेवी होती तेव्हां गुलाबीचें जेवण वाड्यांतच होत असे, ह्यामुळें तिच्या घरांत आमच्या वाचकांना स्वयंपा-पाकांचें सामान कांहींच दिसलें नाहीं; पण हल्लीं तो प्रकार अगदीं नाहींसा झाला होता. तिची चौकशी झाल्यावर तिला मदनसिंगानें माफी दिली होती. तरी सरकारी नोक-रांतून तिचें नांव कमी केलें होतें. ह्यामुळें तिला आपल्या बिऱ्हाडांत सर्व संसार थाटावा लागला होता. ज्या प्रसं-गाचें आह्मी वर्णन करीत आहों, त्यावेळेस तिच्या बिऱ्हा-डांत पुष्कळच फेरफार झालेला होता. पूर्वीची बहुतेक व्यवस्था नाहींशी झाली होती. पुढल्या भागांत एका कोपऱ्यांत चूल होती; तिच्याजवळच एक लांकडाची झारी पडली होती, नवीन घेतलेला एक माठ दिसत असून

त्याच्याखालीं थोडेसे तांदळाचे दाणे पडलेले होते. त्याच्या वरतीं बाजरीचें भरलेलें एक लहानसें मडकें दिसत होतें. चुलीजवळच पाण्याच्या दोन घागरी व तांब्याची एक कळशी होती. तीसुद्धां नवीन घेतलेली होती. बारीकसारीक भांडीं, तांब्या, पितळी वगैरे इकडे तिकडे पडलेलीं होतीं. रडून रडून थकल्यावर ती स्वयंपाकास लागली. जेमतेम-करून तिनें भात उतरला व एका ताटांत उकरून घेतला. डोळयांतून पाण्याची धार चालली होती. हातांत घांस घेतला, तोंडांत घातला, पण तो कांहीं खालीं उतरेना. किती वेळ तरी ती चघळीत बसली होती, एक घांस घ्यावा थो-डेसें पाणी घ्यावें, असें करून त्या दिवशीं तिचें कसेंबसें जेवण झालें.

पुढेंही तिचा जेवण्याचा प्रकार असाच होत असे. तिचा चेहरा अगदीं सुकून गेला. त्यावरची टवटवी अगदीं नाहींशी झाली. चिंतेनें व दुःखानें ती अगदीं निस्तेज व अशक्त होऊन गेली. वेणीफणी करण्याचेंही तिला भान नसल्यामुळें तिचें तें सुंदर केंस अगदीं मळून गेले होते; तिच्या वस्त्रांचीही तीच दशा झाली होती. बिरबल तुरुंगां-तून सुटला त्याच दिवशीं तिला बातमी समजतांच तिला नवा दम आला. तिच्या तोंडावर हुशारी दिसूं लागली. आपले केंस नीटनेटके करून व नवें लुगडें नेसून ती त्याला पाहण्याकरितां निघाली. राजवाडयांत तिला बातमी समजली कीं तो तुरुंगांतून सुटतांच त्याच्याबरोबर शिपाई देऊन ह्या राज्याच्या हद्दीबाहेर त्याला घालवून देण्याचा हुकूम झाला आहे असें तिला समजलें. हा हुकूम समज-

तांच घरीं जाण्याचें तिला भान राहिलें नाहीं. त्याचा तपास करण्याकरितां जावयाचें; मोठाल्या मजला करून त्याला कोठें तरी गाठावयाचें, असा तिनें आपल्या मनाशीं पक्का निश्चय केला. आता घरीं जाण्याचें कारण काय असें ह्मणून ती निघाली. सिद्धराजाच्या दरबारीं गेलें असतां त्याची व आपली खास भेट होईल. तिला रस्ता माहीत नव्हता, जवळ प्रवासाचीं साधनें नव्हतीं, कधीं चालण्याची संवय नव्हती. भूकतहान सहन करण्यापुरता कंटकपणा नव्हता, अशी जरी स्थिति होती तरी निघण्याचा तिचा निश्चय पक्का दिसला. सिंधप्रांताच्या दक्षिणेकडे गेलें ह्मणजे गुजराथ लागेल, नाहीं तर कोणी तरी सांगणारें भेटेल, परमेश्वर मला मदत करील, अशा भरंवशावर ती निघाली. त्या दिवशीं सायंकाळपावेतों चालली. साऱ्या दिवसांत ३ कोसांपेक्षां तिच्यानें अधीक चालवलें नाहीं. पायांत जोडा नसल्यामुळें कांटें रुपून ते रक्तबंबाळ झाले. तिनें लुगडें फाडून त्याच्या चिंध्या पायांना गुंडाळल्या. आणि जेमतेम मोठ्या कष्टानें तीन कोस प्रवास केला. संध्याकाळीं एका खेडेगांवांत तिचा मुक्काम झाला. ती एका धर्मशाळेंत जाऊन पडली. जवळ रोकड पैसा नाहीं, खाण्याची सामुग्री नाहीं, हांतरावयाला किंवा पांघरावयाला चिरगूट नाहीं! दिवस उन्हाळ्याचे असल्यामुळें भुकेनें जीव अगदीं कासावीस झाला होता. वाटेच्या श्रमानें व भुकेनें अगदीं म्लान झाली होती. तिची ही स्थिति पाहून त्या धर्मशाळेंत एक प्रवासी तिच्या पूर्वीच येऊन उतरला होता त्यास दया आली. वयानें लहान, स्वरूपानें सुंदर, अशी ही स्त्री प्रवासाला कां निघाली असावी, ह्याचें

त्याला अनुमान होईना. जवळ सरंजाम तर कांहीं नाहीं; लग्न झालें असावें असेंही दिसत नाहीं, ह्यावरून ही कोठें पळून तर जात नसावी ? आपण हिला विचारूं ह्मणजे कायतें समजेल. हा गृहस्थ तरूण होता. वय तीस वर्षांचें दिसत होतें. स्वरूपानें दहाजणा सारखा होता. हा व्यापारी होता. ह्याच्याबरोबर दुसरे नोकर चाकर होते. धर्मशाळेच्या बाहेर बरेचसे बैल बांधलेले होते. त्यांत कांहीं घोडेही होते. धर्मशाळेंत कापडाचे बरेच गठ्ठे पडले होते. ह्या व्यापाऱ्याला पट्टणास जावयाचें होतें. तो गुलाबीजवळ जाऊन तिला म्हणाला, 'बाई तुह्माला कोठें जावयाचें आहे?' गुलाबीला कोणाची तरी मदत पाहिजे होती. अनायासें हा गृहस्थ आपली चौकशी करीत आहे तर आपण ह्याला आपली सर्व हकिगत सांगावी असें तिच्या मनांत आलें. ती ह्मणाली, 'मला पट्टणास जावयाचें आहे.' गृहस्थ ह्मणाला 'तेथें तुमचें कोण आहे?' हा प्रश्न ऐकून गुलाबीनें थोडक्यांत त्याला आपला वृत्तांत नीट नेटका जुळवून सांगितला. तो मजकूर ऐकून तिच्या ह्या साहसाचें व दृढ निश्चयाचें त्याला मोठें कौतुक वाटलें. तो ह्मणाला, 'बाई तुह्मी कांहीं काळजी करूं नका. मी तुमचा मोठा भाऊ आहे असें समजा. मजबरोबर तुह्मी पट्टणास चला. तुह्माला कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाहीं. माझ्या हातून जितकी मदत होईल तितकी करण्याला मी अगदीं आळस करणार नाहीं. तुह्मीं अगदीं थकून गेला आहां. तुह्माला भूकही लागली असेल. ह्याकरितां तुह्मी आमच्याबरोबर जेवावयाला चला.' तिनें आपल्या पायांत कांटे रुतले आहेत, असें सांगितल्यावरून त्यानें मोठ्या

चातुर्यानें सुई घेऊन ते कांटे काढले व त्यांत पाणी शिरूं नये ह्मणून बिब्याचे चांगले चुरके दिले. पायांतले कांटे निघतांच तिला पुष्कळ बरें वाटलें. रात्रौ त्याच्या बरोबर तिचें जेवण झालें. तिच्या हांतरण्या पांघरण्याची व्यवस्था त्यानें करून दिली. दुसरे दिवशीं सकाळीं तो व्यापारी निघाला तेव्हां त्यानें एक घोडा गुलाबीला बसण्याकरितां दिला. तिच्या बरोबर तोही घोड्यावर बसून चालला. ह्याप्रमाणें कूच दरकूच करीत तीं पंधरा दिवसांनीं पट्टण येथें जाऊन दाखल झालीं. गुलाबीही त्या व्यापाऱ्याच्या घरींच जाऊन उतरली. ह्या व्यापाऱ्याचें घर राजवाड्याजवळ होतें. ह्या व्यापाऱ्याचें नांव हिरालाल असें असून तो घरचा चांगला सधन होता. घरांत त्याची बायको व दोन लहान मुली इतकींच काय तीं घरचीं मनुष्यें होतीं. ह्याच्या बायकोचें नांव चंचळ असें होतें. ही ठेंगणी असून लठ्ठ होती, वर्ण गोरा होता, नाकडोळे बरे होते, नवऱ्यावर हिचा मोठा वरचष्मा होता. हिचें वय तीस वर्षांचें होतें तरी ती चाळीसपंचेचाळीस वर्षांच्या पोक्त बायकोप्रमाणें दिसत असे. हिच्या डोक्याला टक्कल पडून पुढले केस बहुतेक गेले होते. हिचे पुढले दोन दांत पडले होते. गाल बसून गेले होते. हिच्या अर्ध्यावचनांत नवरा होता. बायकोवर त्याचें प्रेम दिसत होतें, पण तें तिच्या गुणाकरितां किंवा रूपाकरितां होतें असें मात्र नव्हे. हिरालाल हा पूर्वी गरीब स्थितींत होता. त्याचे आईबाप मरण पावल्यावर तो चंचळच्या बापाच्या येथें गुमास्ता राहिला. पुढें हिरालालाचे चांगले गुण पाहून त्यानें चंचळबरोबर ह्याचें लग्न करून

दिलें व त्याला घरजांवई केलें. लग्न झाल्यावर कांहीं वर्षांनीं हिरालालाचा सासरा मरण पावला. बायकोच्या माहेरचे पैसे असल्यावर त्या नवऱ्याला ताब्यांत ठेवल्याखेरीज कधींच राहणार नाहींत. चंचळ स्वभावानें कांहीं वाईट नव्हती तिचा स्वभाव दयाळू होता. गुलाबीचा सर्व वृत्तांत हिरालालानें सांगितला तो ऐकून तिच्याबद्दल तिची पूज्यबुद्धि झाली. तिला आपण घेऊन आला हें चांगलें केलें. असें ती म्हणाली. गुलाबी पट्टणास आल्यावर तिनें तपास करण्याला सुरवात केली, पण बिरबलाचा कांहीं तिला पत्ता लागला नाहीं. तिला मोठा विचार पडला. आतां काय करावें त्याला कोठें शोधावें असें तिला झालें. तो कोणीकडे गेला हें समजण्याचें साधन तिला कांहीं दिसेना. हिरालालानें व चंचळनें तिला सांगितलें, तूं जरा धैर्य धर. आज नाहीं तरी केव्हां तरी तो येथें आल्याखेरीज राहणार नाहीं सिद्धराज महाराज माळव्यावर स्वारी करण्याकरितां एकदम निघून गेले. ह्याला कारण असें झालें कीं, माळव्याच्या राजाच्या दरबारीं सिद्धराजाचा जो वकील होता त्याला सिद्धराजानें कळविलें होतें. कीं "सरहद्दीचा तंटा चालला होता त्यासंबंधें दोघांनीं सारखी घीस सोसून तो मिटवावा. असें आमचें म्हणणें आहे. ह्या बाहेर आम्हाला जास्ती कांहीं करितां येत नाहीं. माळव्याच्या राजाच्या मनांत आपल्या पदराला चट्टा लागेल अशी गोष्ट करण्याचें मुळींच येईना. ह्याकरितां दरबारांत एकेदिवशीं जरा कमीजास्ती बोलणें झालें. सिद्धराजाच्या वकिलानें साफ सांगितलें कीं, आम्ही सगळें नुकसान कधींही सोसणार नाहीं. माळ-

ळ्याच्या राजाला हें भाषण ऐकून मोठा राग आला. तो म्हणाला, ' तुम्ही खुषीनें जर न ऐकाल तर आम्ही मणगटाच्या जोरावर तें ऐकावयाला लावूं.' हें बोलणें ऐकून सिद्धराजाचा वकील म्हणाला आमच्या सरकारच्या हातांतही भक्कम जोर आहे. एवढ्यावरून त्या राजानें सिद्धराजाच्या वकिलाच्या तोंडांत मारिली व सिद्धराजाला म्हणाला 'सिद्धराजानें काय पराक्रम गाजवावा ? त्यानें सोळा राण्याच्या जनानखान्यांत फिरावें आणि स्तुतिपाठकांच्या तोंडचीं गाणीं ऐकावीं.' वकिलानें तावडतोब सांडणीस्वाराबरोबर ह्या वर्तनाचें सिद्धराजाकडे पत्र पाठविलें. ज्या दिवशीं राणकदेवी आली त्याचदिवशीं तो स्वारीला निघून गेला. दोघांच्या मोठमोठाल्या लढाया झाल्या हजारों वीर धारातीर्थी पडले. तरी लढाई आटपण्याचें कांहींच दिसेना. चैत्रमास लागला, लष्करें छावणीवर जाण्याची वेळ झाली, तेव्हां लढाईला कंटाळून शेवटीं दोघांमध्यें तह ठरला. सरहद्द सिद्धराजाच्या म्हणण्याप्रमाणें कायम करण्याचें नक्की ठरलें. ह्या लढाईत सिद्धराजानें मोठा पराक्रम केला होता. दोन मोठमोठाल्या लढायांत माळव्याच्या राजाचा पराभव झाला होता तरी तोही कांहीं कमी नव्हता. ज्या ठिकाणीं सिद्धराजा नव्हता त्या ठिकाणीं त्यानेंही विजय मिळविले होते. बहुतेक बरोबरी होती. जर लढाई लांबली तर सिद्धराजाला जय मिळेल असें धोरण माळव्याच्या राजाला वाटून त्यानें तह करण्याचें बोलणें सुरू केलें. प्रथम बोलणें त्याच्याकडून सुरू झाल्यामुळें सरहद्दीच्या प्रकरणांत त्याला हार घ्यावी लागली. तह झाल्यावर सिद्धराज आपल्या राजधानींत दाखल झाला.

सर्व राज्यांत मोठा उत्साह सुरू झाला. दीपोत्साहाची पर्वणी कित्येक दिवस सारखी चालली होती.

बिरबल सिंध देशांतून गुजराथेंत येण्याकरितां निघाला तेव्हां त्याची चर्या अगदीं फिरून गेली होती.तुरुंगांत असतां त्याचा बराच छळ झाला होता खाण्याची आपत्ती होती,मानखंडणा, राणीचा मृत्यु, तुरुंगांतून सुटका होण्याची निराशा, इत्यादि गोष्टींनीं तो अगदीं वाळून गेला होता. एकदम अशा स्थितींत सिद्धराजाला भेटावयाचें नाहीं असा विचार करून तो गुजराथेंत आल्यावर एका मित्राच्या घरीं कांहीं दिवस राहिला. स्वारी करून सिद्धराज महाराज राजधानींत आले अशी बातमी समजतांच तो येऊन त्यांना भेटला. खेंगारानें आपल्या राजधानीवर स्वारी करून राणकदेवी पळवून नेली व दुसऱ्या अपमानकारक अशा बऱ्याच गोष्टी केल्या ह्यामुळें सिद्धराज अगदीं खवळून गेला होता. ते दिवस जर स्वारीला अनुकूळ असते व सैन्य जर थकलेलें नसतें तर त्यानें एकदम स्वारी केली असती; पण ती वेळ सर्व प्रकारांनीं प्रतिकूळ असल्यामुळें तो विचार त्याला पावसाळा संपल्यावर टाकावा लागला. बिरबलानें आपलें काम चांगलें केलें म्हणून त्याच्याबद्दल सिद्धराजाला प्रथम आनंद झाला होता, परंतु राणकदेवी नाहींशीं झाल्यामुळें त्याच्यावर इतराजी झाली होती. त्याला सिद्धराजाकडून कांहीं सुद्धां मिळालें नाहीं. त्याच्या बापाची दहा हजारांची जहागिर होती ती मात्र ह्याच्या नांवावर होती. बिरबलाला आणखी एक भाऊ होता. त्याचें नांव धीरबल. बाप मरण पावल्यावर मोठ्या भावाच्या नांवावर ती जहागीर चालली होती.

धीरबल व बिरबल हे खेंगार महाराज ह्यांच्या सख्या बहिणीचे मुलगे होते. खेंगारानें धीरबलाला जुनागडची किल्लेदारी दिली होती, व मोठी नेमणूकही केली होती. बिरबल पट्टण शहरांत आल्याबद्दलची खबर गुलाबीला समजल्यापासून केव्हां एकदां जाऊन त्यांना भेटेन असें तिला झालें होतें. बिरबल आपल्या वाड्यांत होता. सकाळची वेळ होती. इतक्यांत गुलाबी त्याच्या वाड्याचा शोध करीत आली. मोठ्या संकटानें भेट झाली. गुलाबीला पाहून त्यानें कपाळाला आंठ्या घातल्या. मोठ्या रागानें तिला ह्मणाला, तूं येथें कशाला आलीस? तुला कोणी बोलविलें होतें?

**गुलाबी**—महाराज असें काय बोलतां! हाल व अपेष्टा सोशीत मी इतके लांब आलें ती उगाच कां! मला आशा होती कीं मला पाहून तुह्मांला मोठा आनंदच होईल.

**बिरबल**—तुला पाहून मला मोठा राग येतो. आमचा कट फुटण्याला तूंच कारण झालीस, आमचे हाल होण्याला तरी तूंच कारण!

**गुलाबी**—माझा त्यांत इलाज नव्हता; जीव जाईतोंपर्यंत त्यांनीं मारझोड केल्यामुळें मला कबूल करावें लागलें. राणीसाहेबांच्या वशील्यामुळें तुह्माला कांहीं भीति नाहीं; असें मला वाटलें ह्मणून आपल्या बचावाकरितां मी सर्व सांगितलें; ह्यांत माझा काय दोष?

**बिरबल**—त्याबद्दल वादविवाद करण्याची मला जरूर नाहीं. तूं आलीस तशी निघून जा. मला तुझी जरूर नाहीं!

**गुलाबी**—तुह्मी मला वचन दिलें होतें. शपथ घेतली होती, ती देखील फुकटचना?

**बिरबल**—तुझ्याबरोबर लग्न करण्याचा माझा कधींच विचार नव्हता. जेव्हां वचन दिलें तेव्हां सुद्धां नव्हता. फक्त आपलें कार्य उरकून घेण्याकरितांच तो कावा होता.

**गुलाबी**—महाराज; काय भाषण करतां हें? एका अबलेला लग्नाचें वचन देऊन तिचें कौमार्य भ्रष्ट केल्यावर तिच्याबरोबर असले शब्द बोलण्याला तुह्माला मुळींच शंका वाटूं नयेना? तुह्मी जर आपलें वचन सत्य न कराल तर ह्या पायांजवळ जीव देईन. (असें ह्मणतांच तिच्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा चालल्या. रागानें चेहरा लाल दिसूं लागला. ती थरथर कांपत होती.) गुलाबीची अशी चर्या पाहून बिरबल ह्मणालाः—'राख ह्मणून राहत असशील तर रहा, त्याला मी नाहीं ह्मणत नाहीं.'

**गुलाबी**—काय मी तुमची राख होऊन राहूं? नाहीं असें कधीं होणार नाहीं. मी! आणि तुमची राख?

**बिरबल**—नाहीं मर्जी तर आपला रस्ता धर. येथें उभें राहण्याचें कांहीं कारण नाहीं!

**गुलाबी**—काय ह्मणतां? कारण नाहीं! कारण नाहीं कसें? मोठें कारण आहे. तुह्मी क्षत्रिय ह्मणवितां आणि तुमचे हे असले धंदे? वाघरी किंवा कोळी लोक देखील दिलेलें वचन सत्य करण्याकरितां आपला प्राण खर्च करितात; आणि तुह्माला तें मोडण्याला कांहींच शंका वाटूं नये?

**बिरबल**—त्यांत कसली आली आहे शंका? असल्या

वटकीच्या पोरीसरोबर कसलें वचन पाळावयाचें नी कसलें काय?

**गुलाबी**—अरे नीचा, अधमा! तुला असें बोलतांना शरम कशी वाटत नाहीं? मी वटकीची पोर आहें. तूं मोठा सरदार आहेस व क्षत्रिय कुळांत जन्म घेतला आहेस, तरी त्याचा उपयोग काय? मी आपल्या धर्मास स्मरून येथपर्यंत आलें तीं कशाकरितां? वटकीची पोर ह्मणून काय? माझे प्रेमाची अशी अवस्था करतोस काय? ह्याचा सूड घेईन, कधीं सोडणार नाहीं.

**बिरबल**—चल नीचरांडे! खबरदार पुनः येथें येशील तर!

**गुलाबी**—ह्या पातकाचें क्षालन देहान्त प्रायश्चित्ताखेरीज होणार नाहीं. सूड! सूड! (असें ह्मणत ती मोठ्या रागानें त्याच्या वाड्यांतून बाहेर पडली).

# भाग २३ वा.

## ललितागौरी.

करुणाशंकर वैद्य कैदेंतून सुटल्यावर थोड्याच दिवसांत मरण पावला. ललितागौरी मुखत्यारीनें कारभार करूं लागली. तिचा थाटमाट मोठ्या भपक्याचा होता. नोकर चाकर बरेचसे तिच्या घरांत दिसूं लागले. नानाभाई पूर्ण कारभारी झाला होता. तो तिच्या मर्जीप्रमाणें वागत असे. नानाभाईवर ललितागौरीची मोठी मेहेरबानी होती. त्याच्या शब्दाला ती मान देत असे. मदनसिंगाच्या परवानगीनें

ललितागौरीनें एक दहा वर्षांचा मुलगा दत्तक घेतला. त्याचें कौतुक करणें, नानाभाईबरोबर गोष्टी सांगणें, ह्यांतच तिचा बहुतेक वेळ जाऊं लागला. कित्येक दिवस पर्यंत ललितागौरीचे दिवस मोठ्या आनंदानें गेले. ती कधीं कधीं इंदुमतीला भेटण्याकरितां वाड्यांत जात असे. सृष्टिक्रमाप्रमाणें तो दत्तक मुलगा मोठा झाला; त्याला पंधरावें वर्ष लागलें; त्याला घरांतल्या बऱ्याच गोष्टी कळूं लागल्या; कित्येक लोक त्याला ललितागौरीविषयीं निरनिराळ्या गोष्टी सांगूं लागले व त्यालाही त्या गोष्टी खऱ्या वाटूं लागल्या. त्या मुलाचें नांव जयशंकर असें होतें. एके दिवशीं तो आपल्या आईला ह्मणाला, 'आपणाला लोक नांवें ठेवितात असें वागणें कांहीं चांगलें नाहीं. माझ्या ह्मणण्याकडे तुह्मी लक्ष द्यावें असें मला वाटतें.'

**ललितागौरी**—लोक काय ह्मणतात ?

**जयशंकर**—तुह्मी नानाभाईच्या तंत्रानें चालता हें कांहीं चांगलें नाहीं. सारा दिवस तो तुमच्या जवळ बसलेला असतो, हें नीट दिसतें कां ?

**ललितागौरी**—लोक मूर्ख आहेत. लोक कधीं कोणाला चांगलें ह्मणणार आहेत ! रामचंद्राला देखील त्यांनीं नांवें ठेविलीं, मग माझी कथा काय ?

**जयशंकर**—तें असो, पण नानाभाईनें आतां आमचा कारभार न पाहतां घरीं बसावें असें मला वाटतें.

**ललितागौरी**—ही गोष्ट कधीं होणार नाहीं. संकटांत असतांना त्यानें किती खटपट केली त्याचा मोबदला त्यांना

असा देणें कधीं न्यायाचें होणार नाहीं. मला लोकांशीं काय करावयाचें आहे ?

**जयशंकर**—तुह्माला जरी कांहीं करणें नसलें तरी मला करणें आहे. मी त्याला पुन्हां आमच्या वाड्यांत येऊं देणार नाहीं. तुमच्याबरोबर वैर पडूं नये एवढ्याकरितांच मी अगोदर ही गोष्ट तुह्माला सांगितली.

**ललितागौरी**—बाबारे, तुला ह्या उठाठेवी कोणी सांगितल्या आहेत ? देवानें दिलें आहे. खावें, प्यावें नी आनंदानें असावें, तें सोडून तुला भिकेचे डोहाळे कां होऊं लागले ? तूं भिकाऱ्याचा मुलगा; दत्तक झालास ह्मणून ही श्रीमंती. माझे मर्जीविरुद्ध वागून कांहीं सुद्धां बरें होणार नाहीं.

**जयशंकर**—मला संपत्ति नको नी कांहीं नको. तूं माझी आई आहेस असें मी मानितों. तुला लोकांनीं नांवें ठेवावीं आणि मी तें ऐकावें हें मला पत्करत नाहीं. नानाभाई पुन्हां वाडयांत येतां कामा नये, इतकीच विनंति आहे. तो जर पुन्हां वाडयांत आला तर मी भलतेंच कांहीं तरी करून बसेन !

**ललितागौरी**—येणार, येणार; हजार वेळा येणार ! मी कांहीं तुला विचारीत नाहीं. टाकलेला तुकडा खाऊन तूं असावेंस.

**जयशंकर**—'मर्जी आपली. परिणाम मात्र भयंकर होणार !' असें ह्मणत तो निघून गेला. हें बोलणें झाल्यावर पंधरा दिवसांनीं जयशंकर एकाएकीं मृत्यु पावला. त्याच्या मृत्युसंबंधानें गांवांत निरनिराळ्या कंड्या चालल्या होत्या. जयशं-

कर मेल्यावर सहा महिन्यांनीं ललितागौरीला उदर झालें असें तिचे नोकर ह्मणूं लागले. ती आपल्या खोलीच्या बाहेर कधीं पडत नसे. एक मोठ्या प्रितींतील दासी किंवा नानाभाई ह्याखेरीज ती कोणाला भेटत नसे. त्या रोगाचे शांतर्थ्य तिनें जीं औषधें घेतलीं त्यापासून उदर नाहींसें झालें, पण तिला तीं औषधें फारच घातक झालीं. त्या औषधाच्या योगानें पुढें ती मरण पावली! कोणी म्हणत तिनें गर्भपात केला त्यामुळें मरण पावली; कोणी ह्मणत मुलाला विष देऊन मारिलें ह्मणून देवाचा कोप होऊन उदर झालें, असे निरनिराळे तर्क लोकांचे चालले होते. ललितागौरी मरण पावल्यावर त्या इस्टेटीला कोणी वारस नाहीं असें समजून ती सर्व इस्टेट सरकारांत गेली. नोकर लोकांना वेतनें सरकारांतून करून देण्यांत आलीं. नानाभाईला मात्र कांहीं नेमणूक मिळाली नाहीं. जयशंकराला विष घालण्याच्या कामांत ह्याचें अंग असावें असा मदनसिंगाला संशय आला होता. त्यानें बारीक तपास करून असें ठरविलें कीं, ललितागौरी व नानाभाई ह्यांनीं एक विचारानें जयशंकराला विष दिलें होतें, इतका पुरावा मिळतांच मदनसिंगानें नानाभाईला जन्मपर्यंत सक्त मजुरीची शिक्षा दिली. कोणतीहीं कृत्यें जगांत कधींही गुप्त राहत नाहींत वाइटाचीं फळें वाईट मिळा-वयाचींच व तीं ह्याच लोकीं भोगावीं लागतात! करितां मनुष्यानें नीतीनें वागावें हेंच उत्तम आहे व त्यांतच खरें कल्याण आहे.

# भाग २४ वा.

## संग्राम.

दसऱ्याचा सण झाल्यावर मोहिमांना सुरवात होण्याची चाल ह्या देशांत अनादि काळापासून चालत आलेली आहे. खेंगारानें राणकदेवीबरोबर लग्न केलें, ही गोष्ट ऐकल्यापासून सिद्धराजाला हृद्रोग लागला होता. सूड घेण्याच्या प्रसंगाची तो वाट पाहत होता. स्वारीची तयारी मोठ्या झपाट्यानें चालली होती. खेंगारही कांहीं स्वस्थ बसला नव्हता. आपणाला सिद्धराजाबरोबर मोठा घनघोर संग्राम करावा लागेल, हें त्याला पुरें समजून चुकलें होतें. सरहद्दीवर जे त्याचे किल्ले होते त्यांचा त्यानें पक्का बंदोबस्त केला होता. प्रसंग पडतांच उपयोगीं पडावें म्हणून त्यानें आपल्या सैन्याचा बराच मोठा भाग सरहद्दीवर ठेविला होता. शेजारच्या राजांपासून प्रसंगीं मदत मिळावी म्हणून त्यानें व्यवस्था करून ठेविली होती. दसऱ्याच्या मुहूर्तावर सिद्धराज अगणीत सैन्य बरोबर घेऊन निघाला अशी खबर खेंगाराला समजतांच सरहद्दीवर त्यानें आपल्या सेनापतीला जाण्याचा हुकूम केला. मागून सैन्याचा पुरवठा करण्याचें काम त्यानें आपल्या हातांत घेतलें. सिद्धराजाच्या लष्करांत फक्त घोडेस्वारच एक लक्ष होते. पायदळाची तर गणती नव्हती! जागजागीं तळीं (ठाणीं) बांधीत सिद्धराजाची स्वारी काठेवाडावर चढाई करून चालली. खेंगाराचे लोक आपल्या देशाच्या रक्षणाकरितां हातावर शिरें घेऊन तयार

झाले होते. कांहीं दिवसांनीं सिद्धराजाचें सैन्य कांठेवाडाच्या सरहद्दीपावेतों येऊन दाखल झालें. हळू हळू लढाईला सुरवात झाली. लहान लहान चकमकी उभय पक्षांत उडूं लागल्या. कधीं सिद्धराजाचा जय व्हावा, कधीं खेंगाराचा जय व्हावा असे प्रकार होऊं लागले. खेंगार आपल्या लोकांना वारंवार मदत पाठवींत असे. कोणत्या ठिकाणीं हल्ले करावे, कसे करावे, ह्या संबंधाच्या सुचना तो वारंवार आपल्या सेनानायकांना करीत असे. दिपवाळीपासून चैत्र शुद्ध प्रतिपदेपर्यंत लढाया झाल्या. परंतु कोणत्याही पक्षाला विशेष फायदा झाला नाहीं. दोन्ही पक्ष समान असल्यामुळें पूर्णपणें जय मिळविणें कोणालाच साध्य होण्यासारखें नव्हतें. छावणी करण्याची वेळ आली असें पाहून सिद्धराजाचें लष्कर आपल्या मुलखांत छावणीकरितां गेलें. खेंगाराचें लष्कर सरहद्दीवरच छावणी करून राहिलें. पुन्हां दसरा होतांच युद्धाला सुरुवात व्हावी. चैत्र महिन्यांत लढाई बंद करावी. असें हें युद्ध दहा वर्षेपर्यंत सिद्धराज व खेंगार ह्यांच्यामध्यें चाललें. अकराव्या वर्षी सिद्धराजाचा प्रवेश खेंगाराच्या राज्यांत झाला. त्यानें खेंगाराचे कित्येक किल्ले सर केले. सिद्धराजाच्या मनांत खेंगारानें तह करावा असें होतें, परंतु त्या मानी राजपुत्राला कमीपणा घेऊन तह करणें कसलें पत्करणार! खेंगारानें मदनसिंगाला सैन्य घेऊन येण्याविषयीं हुकूम केल्यावरून तोही येऊन खेंगाराच्या सैन्याला मिळाला होता. मदनसिंग आल्यावर खेंगाराच्या सैन्याचा जोर विशेष वाढून त्यांनीं सिद्धराजाला आपल्या देशांत परत जाण्याला भाग पाडलें!

पुढें पावसाळा नजीक आल्यामुळें युद्ध बंद होऊन दोन्ही बाजूकडील सैन्यें छावण्यांत गेलीं. बाराव्या वर्षीं पुन्हां सिद्धराजानें मोठा कडेकोट सरंजाम घेऊन खेंगारावर स्वारी केली. गुजराथ व काठेवाड ह्या राज्यांत अकरावर्षें सारखे युद्धप्रसंग सुरू असल्यामुळें दोन्ही देश उजाड होऊन गेले होते. दोन्ही पक्षांकडील हजारों वीर धारातीर्थी पतन पावले होते. हजारों कुटुंबें देशोधडीला लागलीं होतीं. दोन्ही देशांतील हजारों लोक शोकसागरांत बुडून गेले होते. कोणाचा बाप, कोणाचा मुलगा, कोणाचा भाऊ अशा प्रकारें कोणाचा कोणी तरी लढाईत पडला म्हणून विलाप करीत होता, शेंकडों पोरकीं झालेलीं पोरें धाई धाई रडत भटकत असलेली दिसत होती. हें भारती युद्ध कधीं संपतें असें दोन्ही पक्षांकडील वीरांना झालें होतें. दोन्ही राजे मानी; हार घेण्याला कोणीही तयार होईना. सिद्धराजाच्या मनांत खेंगाराचा पक्का सूड घेण्याची इच्छा होती व खेंगाराच्या मनांत आपल्या बापाच्या शत्रूचा पूर्ण पराजय व्हावा असें होतें. दोन्हीही राजे पहिल्या प्रतीचे योद्धे सारखे फौजबंद, असा प्रकार असल्यामुळें इतके दिवस युद्ध लांबणें स्वाभाविकच होतें. प्रयत्नांत कोणीही कसर केली नाहीं. युद्धकलेंत दोघेही पटाईत होते; इतकें जरी होतें तरी दैव मात्र दोघांचें सारखें नव्हतें. ह्या युद्धांत खेंगाराचा पराभव व्हावा असा ईश्वरी संकेत होता; बाराव्या वर्षीं सिद्धराजानें जी स्वारी केली ती अशा निर्धारानें केली होती कीं, एक जय तरी मिळवीन किंवा धारातीर्थीं मरून तरी जाईन; पण परत माघारा जाणार नाहीं. ह्या खेपेला

सिद्धराजाचा युद्धोपयोगीं सरंजामही फार उत्तम होता. सिद्धराजानें पहिल्या तडाक्याला खेंगाराच्या राज्यांतील मोठमोठाले लढाऊ किल्ले सर केले. मोठाले किल्ले हस्तगत झाल्यामुळें काठेवाडांत त्याचा सहज प्रवेश झाला; त्यानें मोठी धुमश्चक्री उडवून दिली. गांवचे गांव जाळीत पोळीत तो थेट जुनागडपर्यंत चाल करून गेला. खेंगाराच्या मोठमोठ्या सरदारांनीं आपली पराकाष्टा करून पाहिली, तरी ह्या खेपेला त्यांना कोठेंही यश मिळालें नाहीं. सिद्धराजानें जुनागडाला वेढा घातला. खेंगार जुनागड किल्ल्याचें संरक्षण स्वतः करण्याकरितां तयार झाला. सहा महिने सिद्धराजा वेढा घालून बसला होता, परंतु कांहींसुद्धां त्याचा उपाय चालेना. सिद्धराजाचे बारा हल्ले खेंगारानें मोठ्या शूरपणानें व चातुर्याने मागें फिरविले. सिद्धराजाचे हजारों वीर ह्या हल्ल्यांत विनाकारण मारले गेले. खेंगाराच्या छाप्यानीं सिद्धराज अगदीं काहीर होऊन गेला. वेढा उठवून परत फिरावें असें त्याच्या मनांत येऊं लागलें; इतक्यांत त्याला एक मसलतगार मिळाला. त्यानें थोड्याच दिवसांत किल्ला सर करून देतों ह्मणून सिद्धराजाजवळ प्रतिज्ञा केली. ह्यामुळें त्याचा बेत रहीत झाला. ज्या मनुष्यानें ही प्रतिज्ञा केली, तो मनुष्य आमच्या वाचकांच्या पुरा ओळखीचा आहे. राणकदेवीला पळवून नेण्याच्या कामावरून ज्याला शिक्षा झाली होती व ती शिक्षा राणकदेवीच्याच मध्यस्तीनें कमी झाली होती; त्या परोपकारी साध्वीच्या सौभाग्यावर हल्ला करण्याकरितां हा नराधम पुढें सरसावला. क्षत्रियाला योग्य असें समर कर्म करून किल्ला

सर करून देतों, अशी जर त्यानें प्रतिज्ञा केली असती तर त्याला आम्ही शाबासकी दिली असती, परंतु हें सामर्थ्य त्याच्या अंगीं होतें कोठें ? तो कांहीं द्रोणाचार्यांच्या किंवा भीष्माचार्यांच्या शाळेंत तयार झालेला नव्हता, तर कणाद किंवा शकुनीमामा ह्यांच्यापासून त्यानें शिक्षण घेतलें होतें; पण तें शिक्षण देखील मोठेंसें तारीफ करण्यासारखें नव्हतें. बिरबल पुढें सरला आहे असें पाहून सिद्धराजाला बराच धीर आला. त्याच्या हातून कार्यभाग होईल असें त्याला वाटलें व असें वाटण्याला त्याला कारणेंहीं होतीं. बिरबलावर सिद्धराजाची मोठीशी मेहरबानी नव्हती. तो एक लहानसा सरदार होता. त्याच्या अंगीं विशेष शौर्यही नव्हतें ह्याकरितां ह्या भारती युद्धांत त्याचा गौरव करण्याचा सिद्धराजाला प्रसंगच आला नव्हता. पण जुनागडाला वेढा पडल्यावर बिरबलानें तो प्रसंग आणिला; किल्ला सर करून देतों असें ह्मटल्याबरोबर तो राजाला फार प्रिय झाला त्याचा त्यानें मोठा बहुमान केला. त्याला मोठमोठालीं अश्वासनें दिलीं. खेंगाराचें सर्व राज्य तुझ्याच स्वाधीन करीन असेंही सांगितलें; मग बिरबलाच्या आनंदाला तर सीमाच नाहींशी झाली. तो मनोराज्यांत अगदीं गढून गेला. सिद्धराजाबरोबर रोज त्याचीं खलबतें दोन दोन घटका होऊं लागलीं. सर्व सरदारांना हा कसा किल्ला सर करून देणार ह्याचा कांहींच तर्क होईना. खेंगाराच्या शस्त्रास्त्रांचा तीव्रपणा सिद्धराज्याच्या मोठ्या शूर सरदारांनां पुरा समजला होता. एकही मनुष्य जाया झाल्याखेरीज किल्ला सर होणार हें ऐकून त्यांना बरेंच समाधान वाटलें.

बिरबलाला ते पूज्य मानूं लागले. त्यानें जी युक्ति काढिली आहे तिच्या योगानें प्राण जाणारे हल्ले तरी बंद होतील, एवढ्याचखातर ते त्याला मानीत होते. ह्याच्या हातून काम झालें तर किल्ला मिळेल, नाहींतर सिद्धराज देशीं परत तरी जाईल, मिळून लढाई बहुतेक आटपल्यासारखी झाली असें त्यांना वाटूं लागलें. पुढें बिरबलाच्या कारस्थानाला सुरवात झाली.

# भाग २५ वा.

## राणकदेवी व खेंगार.

जुनागडाला वेढा पडल्यावर एके दिवशीं खेंगारमहाराज राणकदेवीच्या महालांत बसले होते. दोन मुलें जवळ खेळत होतीं. ते दोन्ही मुलगे असून त्यांतील वडील मुलांचें वय सहा वर्षांचें व धाकट्याचें तीन वर्षांचें होतें. दोघेही राजपुत्र मोठे पाणीदार दिसत असून सौंदर्यानें आपल्या आईप्रमाणें होते. त्या मुलांच्या बालक्रीडा चालल्या होत्या, त्यांच्याकडे पाहून त्या उभयतांना आनंद वाटत होता. कांहीं वेळपर्यंत त्या मुलांविषयींच भाषण चाललें होतें. इतक्यांत राणकदेवीनें आपल्या बोलण्याचा ओघ फिरवून चालू प्रसंगासंबंधानें बोलणें सुरू केलें. ती ह्मणाली 'अकरा वर्षे पुरीं होऊन बारावें वर्ष सुरू झालें आहे तरी अद्याप लढाईचा कांहींच शेवट होत नाहीं! दोन्ही पक्षाकडील हजारों शूर योद्धे मातीला मिळून गेले. प्रजा ह्या लढायांच्या यो-

गानें त्रासून गेल्या आहेत. पाऊस चांगला पडत असतांही महागाई कमी होत नाहीं, गरीब लोकांचे फार हाल होऊं लागले आहेत. दिवसानुदिवस आपला पक्ष निर्बळ होत चालला आहे. शत्रू आपल्या राजधानीला वेढा घालून बसला आहे. आपल्या शहरावर केव्हां भयंकर प्रसंग येऊन कोसळेल ह्याचा नेम नाहीं. ह्मणून मी ह्मणतें कीं, आपण तह करावा, हें योग्य आहे. सिद्धराजाही लढाईला कंटाळला आहे.' राणकदेवीचें भाषण शांत चित्तानें खेंगार ऐकून घेत होता. तिचें भाषण आटपल्यावर तो ह्मणाला, 'तह करावा हें ह्मणणें कांहीं गैर आहे, असें मी ह्मणत नाहीं. आमच्या इभ्रतीला कमीपणा न येतां तह झाला तर मी देखील मोठ्या खुषीनें करीन; परंतु असें होणें मात्र अशक्य दिसतें. सिद्धराज आमच्या शहराला शह देऊन बसला आहे एवढ्यावरून आमचें शहर त्याच्या हस्तगत होईल असें मानण्याला कांहीं कारण दिसत नाहीं. जोंपर्यंत आमचे लोक आपल्या सत्त्वापासून ढळणार नाहींत, तोंपर्यंत सिद्धराजाचें येथें कांहीं चालणार नाहीं.

आजपर्यंत शत्रूचे पुष्कळ हल्ले झाले, पण प्रत्येक खेपेला मार खाऊन त्यांना परत जावें लागलें. पावसाळा लागेतोंपर्यंत फार तर सिद्धराज येथें वेढा देऊन बसेल; पावसाळ्यांत तर त्याला परत जावें लागणारच. आमच्या लोकांजवळ धान्य व युद्ध सामुग्री अजून दोन वर्षेपर्यंत पुरेल इतकी शिल्लक आहे. शहरांत जी फौज आहे, तींतील प्रत्येक शिपाई खरा देशभक्त आहे. किल्लेदार धीरवल असून तो तर माझा भाचा आहे. ह्या संग्रामांत त्यानें

आपला पराक्रम चांगलाच दाखविला आहे. अशी कार्यकर्त्री मंडळी आपआपलीं कामें करीत असतां आम्ही होऊन शत्रूजवळ तहाचें बोलणें लावणें, म्हणजे पदरीं भितरेपणा घेतल्यासारखें होणार! सखे, विचार कर. मी म्हणतों ह्यांत कांहीं अर्थ आहे कीं नाहीं तो पहा. शत्रू हताश झाल्यावर त्याच्या बरोबर तह करावा म्हणजे आपला मान राखला जातो. मदनसिंग सिद्धराजाचीं ठाणीं एका मागून एक उठवीत राजधानीकडे चाल करीत येत आहे. तो येऊन दाखल झाला म्हणजे सिद्धराजावर आमचा दुजोरा झाला. मग त्याला निमूटपणीं आपला रस्ता सुधारावा लागणार. असल्या कामांत घाई उपयोगी नाहीं. घाई करून कार्य बिघडतें. शत्रूला पेंचांत आणून दडपला पाहिजे. सिद्धराज विजय मिळवून उन्मत्त झाला आहे असा प्रकार नाहीं. त्यालाही वेढ्याच्या कामांत यश मिळणार नाहीं असें वाटत आहे. अद्याप पावेतों दोन्ही पक्ष सबळ आहेत. मी आपल्या देशाला कमीपणा येईल असा तह कधींही करणार नाहीं; मारतां मारतां मरावें हा आमचा अनादि धर्म आहे. आम्ही आपला धर्म कधींही सोडणार नाहीं. शत्रू प्रबल झाला, आमचा कांहीं उपाय चालत नाहीं, अशी आमची स्थिति झाली तर आम्ही केसरिया करूं. शत्रूला दे माय धरणी ठाव असें करून टाकूं. अद्याप तसा प्रसंग आला नाहीं.'

खेंगाराचें भाषण ऐकून राणकदेवीला हुशारी वाटली. तह करण्याचा विचार तिनें मोठ्या आनंदानें परत घेतला. आपल्या आवडत्या पत्नीला आपलें भाषण आवडलें ह्या बद्दल खेंगारालाही धन्यता वाटली; परमेश्वरानें आपल्याला

योग्य वानी दिली म्हणून त्यानें त्याचे आभार मानिले; व आपल्या लहान मुलांच्या अंगीं असेच गुण उत्पन्न होतील असें त्याला वाटलें. बहुधा आईचे गुण मुलांमध्यें उत्पन्न होत असतात असा त्याचा समज होता. ह्या विषयावर ह्यापुढें राणकदेवी कांहीं बोलली नाहीं; दोघांचें हें भाषण चाललें होतें, इतक्यांत एक गुप्त हेर खेंगाराला कांहीं महत्वाची माहिती सांगण्याकरितां राणकदेवीच्या महालाबाहेर येऊन राजाच्या भेटीची इच्छा- करीत उभा होता. राजाला ही बातमी समजतांच खेंगार आपल्या राणीच्या महालांतून उठून गुप्त मसलती करण्याच्या जागेंत जाण्याकरितां निघाला. त्या जासुदाला तिकडे येण्याविषयीं सूचना करण्यांत आली. खेंगार महाराजांना त्या हेरानें कांहीं गुप्त गोष्ट सांगितली. ती ऐकल्याबरोबर त्याचा चेहरा उग्र दिसूं लागला. ह्या गोष्टीचा प्रतिकार अवश्य केला पाहिजे असे उद्गार त्याच्या तोंडांतून निघाले. खेंगार महाराज तेथून निघून गेले व तो हेरही दुसऱ्या दरवाजानें राजवाड्याबाहेर गेला.

# भाग २६ वा.

## धिरबल व धीरवल ह्यांची भेट.

जुनागडाला वेढा पडलेला होता, शहरांतील लोकांचें दळणवळण शहराबाहेर अगदीं बंद पडलें होतें. ठिकठिकाणीं बुरजांवर चौक्या बसल्या होत्या, शिपाई डोळ्यांत तेल घालून रात्रंदिवस पहारा करीत होते; धीरवल किल्ले-

दार असल्यामुळें त्याच्यावर सर्व कामाची जबाबदारी विशेष होती, ह्यामुळें त्याला अगदीं फुरसूद मिळत नसे. शत्रूचा पराभव करून त्याला हांकून लावूं अशी उमेद लहाना-पासून थोरांपर्यंत सर्वांस सारखी असल्यामुळें कितीही कठीण कामगिरी पडली तरी कोणीही त्रासत नसे. वेढा पडून सहा महिने झाले होते तरी सिद्धराजाला किल्ला सर करण्याची कांहींच युक्ति सुचली नव्हती. ह्याकरितां सौराष्ट्रां-तील वीर त्याची थट्टा करीत असत. वद्य अष्टमी—फाल्गुना-चा महिना; जुनागडच्या किल्ल्यावरच्या एका बुरजांत दोन प्रहर रात्रीं दोघे इसम हळूहळू कांहीं बोलत होते. बोल-णाऱ्या पैकीं एक इसम फारच सावधपणानें पण साशंक मुद्रेनें बोलत होता, दुसऱ्याचा चेहरा मोठ्या विचारांत पड-ल्याप्रमाणें दिसत होता. पहिला गृहस्थ हा बिरबल असून त्याच्या बरोबर बोलणारा हा धीरवल, खेंगाराचा किल्लेदार होता. धीरवल व बिरबल हे दोघे सख्खे बंधु असून खेंगा-राचे भाचे होते. विरवल हा आपल्या बापाजवळ भांडून आतेकडे गेला होता. सिंध देशांत गेल्यावर राणकदेवी-विषयीं लालसा त्यानें सिद्धराजाच्या मनांत उत्पन्न करून त्याची मर्जी प्रसन्न करून घेण्याचा त्याचा विचार होता. पण तो नीटसा साधला नाहीं. विरबल त्या कारस्थानांत गुतला असतां इकडे त्याचा बाप मृत्यु पावला, तेव्हां धीरवल आपल्या मातोश्रीला घेऊन काठेवाडांत आपल्या मामाकडे आला. खेंगारानें त्याला आपल्याजवळ ठेवून त्याची नेम-णूक किल्लेदाराच्या जाग्यावर केली होती. धीरवल कांहीं मनानें वाईट नव्हता; परंतु आपले मनोविकार त्याला

दाबांत ठेवण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें त्याच्या हातून एखाद वेळ दुसऱ्याच्या सांगीवरून चुका होत असत. खेंगारानें त्याला मोठी जागा दिली नाहीं, ह्याकरितां त्याला वाईट वाटत असे, तरी खेंगाराचें नुकसान करून सूड उगवावा अशी दुष्ट कल्पना स्वयमेव त्याच्या डोक्यांत कधींच आली नव्हती. चालू युद्धांत त्यानें मोठा पराक्रम केला होता. सिद्धराजाच्या पदरीं जी अमोलिक नररत्नें होतीं त्यांपैकीं जरी हा नव्हता; तरी त्यांच्या जवळजवळ ह्याची योग्यता आहे असें खेंगार मनांत समजत असे.

वरप्रमाणें दोघे बंधु एकत्र भेटल्यावर बिरबलानें धीरबलाचें मन मोठ्या युक्तीनें वळविलें. तो म्हणाला 'मी जें सांगत आहे तें उगीच सांगत नाहीं; त्यापासून आपलें जन्माचें कल्याण होणार आहे. नोकरी करून कधीं तरी चांगले दिवस येण्याची आशा आहे काय? ह्याचा निश्चय करणें विशेष अगत्याचें आहे. कदाचित् तूं माझ्या म्हणण्याला अनुकूळ झाला नाहींस तर सौराष्ट्राचें राज्य सिद्धराजाच्या हातून बचावलें जाईल असें तुला वाटतें कां? खातरीनें ही गोष्ट अशक्य आहे. राज्य राखणें जर शक्य नाहीं तर मग आपला तरी स्वार्थ कां न साधावा?'

**धीरबल**—क्षत्रियाला अनुचित अशी गोष्ट करण्याला तूं मला सांगत आहेस; शत्रूच्या पक्षाला फितूर होऊन स्वार्थ साधण्यापेक्षां धारातीर्थीं मृत्यु आलेला काय वाईट? आपलें कर्तव्य तरी बजाविलें असें होईल.

**बिरबल**—मरण्यांत फायदा काय?

**धीरबल**—स्वर्गप्राप्ति आणखी काय पाहिजे?

**बिरबल**—असल्या काल्पनीक गोष्टींवर विश्वास ठेवून कधींतरी सुज्ञ मनुष्य आपल्या स्वार्थाचा त्याग करण्याला तयार होईल कां? भीष्म, द्रोण, शल्य हे कोण होते क्षत्रियच ना?

त्यांचीं नांवें जीं अजरामर झालीं आहेत तीं कां? त्यांनीं आपल्या शत्रूंना मदत केली नाहीं काय? दुर्योधनाचा सर्व मदार कर्णावर होता हें खरें ना? तो दुर्योधनाचा अगदीं प्रिय मित्र होता असें असतां त्याचें आचरण तरी शुद्ध होतें असें कोण म्हणेल? कृष्ण पांडवांचा पक्षपाती असतां अभिमन्यूचा वध कां झाला; त्याचें रक्षण करणें हें कृष्णाचें कर्तव्य नव्हतें कां? त्यानें एका गोष्टींत दोन कार्यें साधलीं. पुन्हां विचार कर, खेंगार हा प्रत्यक्ष मामा आहे; मग तुला असली हलकी नोकरी कां रे बाबा करावी लागते? जगामध्यें पैसा श्रेष्ठ आहे; खून, विश्वासघात, कपट, दगाबाजी, बालहत्या, स्त्रीहत्या, राजद्रोह, पितृद्रोह व मातृद्रोह वगैरे गोष्टी खुशाल कराव्या, पण पैसा मिळवावा. एक पैसा असला म्हणजे इंद्राची रंभा, स्वर्गांतील अमृत, पृथ्वीच्या पोटांतील रत्नें, चालून आपल्या घरीं येतात. बाबारे सौराष्ट्राचें राज्य आपल्या घरांत येत आहे, असें असतां एकाद्या पापभिरू मनुष्याप्रमाणें तूं अनमान कां करतोस? होय म्हण; दोन दिवसांत तुला राज्याभिषेक करवितों; मला राज्य करण्याची मुळींच इच्छा नाहीं. तुलाच राज्यावर बसवून मी आपला तीर्थयात्रा करण्याकरितां जाणार. मग सांग तुला तुझा फायदा करून घेणें आहे कीं नाहीं?

बिरबलाचें हें मायावी भाषण ऐकून धीरबलाच्या म-

याची वृत्ति द्विधा झाली. मामाचा लोभ, क्षात्रधर्माचा अभिमान एका बाजूला व दुसऱ्या बाजूस राज्यलोभ त्याला ओढूं लागले. दोघांचें मोठें युद्ध सुरू झालें. अखेर राज्य-लोभाची सरशी होऊन त्यानें बिरबलाच्या ह्मणण्यास रुकार दिला. धीरवलाचा रुकार पडल्यावर पुढें कशी व्यवस्था करावयाची हें बिरबलनें त्यास सांगून ठेविलें, व धीरवलाचा निरोप घेऊन तो उठला. त्यास किल्ल्याच्या दारापर्यंत पोंहचविण्याकरितां धीरवल गेला. बिरबलानें वेषांतर केलें होतें. धीरवलाचा मी गुप्त हेर आहें असा बहाणा करून तो शहरांत आला होता व त्याच बहाण्यानें तो परत निघून गेला. धीरवल आपल्या मसलतीस सामील होताच बिरबलाचें मनोराज्य चालू झालें. हल्ला करतेवेळीं संधी साधून धीरवलासही मारून टाकावें ह्मणजे सर्व राज्य आपल्यासच मिळेल! गुप्त रीतीनें ही व्यवस्था लाविली पाहिजे. असा विचार करीत तो मार्ग क्रमीत होता. राज्यावर बसल्यावर काय काय करावयाचें ह्याबद्दलही त्याचे विचार चाललेच होते. व अशा विचारतरं-गांतच तो सिद्धराजाच्या छावणींत दाखल झाला; त्यानें राजाची भेट घेऊन झालेला सर्व प्रकार निवेदन केला व उद्यां रात्रीं बारा वाजतां छापा घालावयाचा संकेत करून आलों आहें, 'आमचे लोक किल्ल्याच्या दाराजवळ जातांच त्यानें दार उघडावें अशी व्यवस्था लावून आलों आहे.' वगैरे सांगून आपली शिताफी होईल तितकी वाढवून सांगितली. ती सर्व हकीकत ऐकून सिद्धराजास पुष्कळ समाधान वाटलें व त्यानें 'तुह्मास योग्य मोबदला मिळेल, तुमचे श्रम वांया जाणार नाहींत' असें आश्वासनही तत्काळ दिलें.

# भाग २७ वा.

## गुलाबीचें वेषांतर.

गुलाबी पट्टण शहरांत कालक्रमणा करीत होती. बिरबलानें तिचा धिःकार केल्यापासून तिचें मन भ्रमिष्टासारखें झालें होतें; पण हिरालालाच्या घरीं तिला कोणत्याही गोष्टीचा तोटा नव्हता, हिरालालाच्या बायकोला ती फार आवडत असे. गुलाबीचें आयुष्य राजवाड्यांत गेल्यामुळें तिच्या ठिकाणीं धूर्तपणा विशेष होता, कामकाजांत ती मोठी हुशार होती. दुसऱ्यांचें मन कसें वळवावें ही कला तिला चांगली साधली होती. राजदरबारांत वागणाऱ्या मंडळीला तोंडपुजेपणा कसा करावा हें शिकण्याची मुळींच जरूर नसते. तशांत जनानखान्यांत राहणाऱ्या नोकरांच्या ठिकाणीं तर हांजीहांजीचा प्रकार पदोपदीं दिसून येतो. बैल गाभणा आहे असें शब्द यजमानाच्या तोंडांतून निघतांच जवळची मंडळी 'हां महाराज, नववा महिना लागला आहे.' असें ह्मणण्याला तयार असते. गुलाबीची लहानपणापासून शाळा ह्याच प्रकारची होती. राजकारभारांत ढवळाढवळ करणाऱ्या मुत्सद्दी राजघराण्यांतील बायांना घटकाभर आपल्या वाक्पटुत्वानें थक्क करणारी अशी दासी एका वाण्याच्या बायकोला प्रीय झाली ह्यांत नवल काय? गुलाबी घरांत वावरत असे, काम करण्याला आळस करीत नसे; तरी तिचें मन एका गोष्टीकडे अगदीं पूर्णपणें वेधून राहिलें होतें. बिरबलानें माझा अपमान केला आहे, त्याचा

सूड केव्हां घेईन असें तिला झालें होतें. अकरा वर्षे पर्यंत हा बेत तिच्या मनांत धुमसत राहिला होता. तिला योग्य संधी कधींच मिळाली नाहीं. खेंगाराबरोबर जें भारती युद्ध सुरू झालें होतें, त्या स्वारींत बिरबल गुंतल्यामुळें तो अकरा वर्षांत पट्टण शहरांत मुळींच आला नव्हता. पावसाळ्यांत सर्व लष्कर छावण्याकरितां गेलें म्हणजे त्याला लष्करांतच राहवें लागत असे. सिद्धराजाच्या सैन्याचा मोठा भाग काठेवाड्याच्या हद्दीवर छावणी करून राहत असे. इतके दिवस वाट पाहून आपले मनोरथ शेवटास नेण्याची संधी येत नाहीं, ह्याबद्दल गुलाबीला वाईट वाटत असे. गुलाबीचा बिरबलावर जरी राग झाला होता, तरी तिनें आपला धर्म सोडला नव्हता. एकवार ज्या पुरुषाशीं संबंध झाला त्याखेरीज अन्य पुरुष आपल्याला पित्यासमान आहेत असा संकल्प होता. तिचें आचरण सुद्धां ह्या नियमाप्रमाणें अगदीं कडकडीत पातिव्रत्याचें होतें. बिरबलानें धिःकार केल्यापासून तिनें रंगाचें वस्त्र अगदीं वर्ज केलें. विलासाच्या पदार्थांचा त्याग केला. नटणें, मुरडणें अगदीं सोडून दिलें. एखाद्या तपस्विणीप्रमाणें ती अगदीं साध्या व पवित्र मार्गानें राहूं लागली. ईश्वराची आराधना करावी: तुळशीला प्रदक्षणा घालाव्या, किंवा वेळ मिळाला तर एखाद्या देवालयांत पुराणश्रवणास किंवा हरिकीर्तनास जावें असा तिचा परिपाठ असे. तिच्या ह्या प्रेमळ आचरणामुळें तिच्या त्या सुंदर चेहऱ्याला व तारुण्याला फारच शोभा आली होती. तिला पाहतांच तिच्यावर लोभ करावा असें कोणाही मनुष्याला वाटत असे. गुलाबी घरांत आ-

त्यापासून हिरालालाची भरभराट विशेष रीतीनें होऊं लागली. व्यापारांत त्याला चांगलाच फायदा होऊं लागला. ह्यामुळें त्या देवभोळ्या व्यापाऱ्याला असें वाटूं लागलें कीं, साक्षात लक्ष्मीच दासीच्या रूपानें आपल्या घरांत नांदत आहे.

बिरबलाचा सूड घ्यावा असा विचार गुलाबीच्या मनांत पुष्कळ दिवसांपासून घोळत होता; तिला योग्य संधी मिळाली असती तर तिनें अती साहस करून त्याचा घात केला असता, पण तिच्या हातून असलें अघोर कर्म घडावें असा ईश्वरी संकेतच नव्हता. जसे पुष्कळ दिवस त्या गोष्टीला झाले तसा त्या द्वेषाचा जोरही कमी होत चालला. ईश्वर भजनाच्या योगानें तिच्या मनाला बरीच शांतता आली होती व तें पुष्कळ प्रेमळ झालें होतें. अर्थात् तिला पुढें असें वाटूं लागलें कीं, आपण त्यावर दया करावी. एकानें गाय मारिली ह्मणून आपण वांसरू मारण्याचा प्रयत्न करूं नये. सर्व जगाला पाहणारा परमेश्वर आहे तो त्याला शिक्षा करील. त्यावर आपली प्रीति होती, तोच माझा भ्रतार असें मी मानिलें होतें, इतकेंच नाहीं, तर अद्याप सुद्धां मानीत आहें, असें असून त्याचा सूड कसा घेऊं! सूड कोणाचा? नवऱ्याचा! देवा नको नको, हा विचार! नर्कांत नेणारा आहे, इतके दिवस मी हा विचार मनांत ठेविला हें अगदीं गैर केलें! परमेश्वर जाणें बिरबलजी मला क्षमा करा! मी तुह्माला दुरुत्तरें बोललें! मनापासून तुमचा द्वेष केला त्याची मला क्षमा करा. तुमचें परमेश्वर कल्याण करो! मला तरी आतां काय करावयाचें आहे? राहिलेलें आयुष्य ईश्वर भजनांत घालावावयाचें! माझें लग्न

झालें नाहीं हाच मोठा देवाचा उपकार मी मानितें, लग्न झालें असतें तर मी संसारांत पडलें असतें, मुलाबाळांच्या परिवारांत गढून गेल्यामुळें परमेश्वराचें चिंतन करण्याचा प्रसंग मला कधींच आला नसता. झालें हेंच उत्तम झालें. परमेश्वरानें माझें रक्षण करणारा, माझ्या भावापेक्षां जास्ती असा हा हिरालाल उत्पन्न केला; त्याची बायकोही उत्तम स्व-भावाची, मला ह्या ठिकाणीं कोणत्याही प्रकारचा त्रास नाहीं. ही तरी, ईश्वराची आराधना माझे हातून व्हावी अशी त्या जगन्नियंत्याचीच इच्छा दिसते ह्मणून त्यानें हे सर्व योग जुळवून आणिले. बस आजपर्यंत झालें तें पुष्कळ झालें. आजपासून ऐहिक विषयांचा त्याग करून मी ईश्वर भजनांत रत होणार !

पुढें गुलाबी ईश्वर भजनांत रत होऊन गेली. हिरालालानें तिचें संगोपन उत्तम प्रकारें केलें. तिनें हळू हळू अन्न-पाणी अगदींच वर्ज केल्यामुळें ती थोड्याच महिन्यांत मृत्यु पावली. हीन कुलांत जन्म घेऊन व दासीचा धंदा करीत असतांही कुलीन स्त्रियांनीं गिरवावा असा कित्ता घालून गुलाबी अक्षयी सुख भोगण्याकरितां स्वर्गास गेल्या-वर हिरालालानें हजारों रुपये खर्च करून तिचें उत्तरकार्य मोठ्या थाटानें केलें. गुलाबीचा अंत ऐकून त्या पाषाण-हृदयीं बिरबलासही वाईट वाटलें. आपल्यावर प्रेम कर-णाऱ्या स्त्रीचा आपल्या हातून छळ झाला ह्याबद्दल त्यानेंही आपणास दोष लावून घेतला. गोष्ट होऊन गेल्यावर मागाहून विचार केलेला कांहींच उपयोगाला येत नाहीं. जगामध्यें नेकीनें रहावें, परमेश्वर ठेवील त्या स्थितींत संतोष मानावा, इतकेंच मनुष्याच्या हातांत आहे. ह्याप्रमाणें जो

वागतो त्यासच खरें सुख मिळतें. ज्याला संतोष नाहीं त्याला कधींच सुख होत नाहीं. अपार संपत्ति असतांनाहीं तो दुःखीच असतो. आमच्या साधूंमध्यें तुकाराम हा खरा सुखी होऊन गेला, त्याचें वर्तन ह्याच नमुन्याप्रमाणें होतें. तोच कित्ता सर्वांनीं गिरवावा.

# भाग २८ वा.

## दुष्टपणाची कमाल.

दुसऱ्या दिवशीं रात्रीं बिरबल आपल्याबरोबर पांचशें निवडक लोक घेऊन गुप्त कटाची समाप्ती करण्याकरितां सिद्धराजाच्या छावणींतून निघाला. सिद्धराज बाकीच्या सैन्यासह तयार होऊन त्याच्यामागून चालला. रात्र काळोखी होती; सिद्धराजाचें सैन्य सावकाश, आडरस्त्यानें वळणांतून व दाट जंगलांतून सांकेतिक ठिकाणीं जाण्यां-करितां निघालें होतें, ह्यामुळें त्याची गडबड किल्ल्यावरच्या लोकांना समजण्याचा मुळीच संभव नव्हता; जुनागडचा किल्लेदार फितुर असल्यामुळें त्या दिवशीं त्यानें मुख्य मुख्य नाक्यांवर आपले भरंवशाचे लोक ठेविले होते. मुख्य दरवाजावर धीरवल संकेताच्या खुणेची मार्गप्रतीक्षा करीत बसला होता. किल्ल्यांत व किल्ल्याबाहेर हा प्रकार चालला होता तेव्हां खेंगार आपल्या किल्लेदाराच्या प्रामाणिकपणावर विश्वास ठेवून आपल्या आवडत्या राणीच्या महालांत स्वस्थ-पणानें विश्रांति घेत होता. भावी प्रसंगाची त्याला मुळींच

कांहीं कल्पना नव्हती. मध्यरात्रीचा समय झाला होता. जुनागड शहरांत सर्वत्र शांतता होती; पाहेरकरी लोक मात्र ठिकठिकाणीं बुरुजावर पाहरे करीत होते; इतक्या संधीस किल्ल्याचा पूर्वेकडील दरवाजा एकदम उघडला गेला. दरवाजा उघडतांच बाहेरचे लोक एकदम आंत शिरले. आंत शिरतांच त्यांनीं मोठ्या क्रूरपणानें कापाकापीला सुरवात केली. दरवाजा उघडणारे लोक अगदीं गाफील होते. आपला विश्वासघात करून शत्रूचे लोक आपल्या बरोबर असें वर्तन करतील, हें त्यांच्या ध्यानींमनींही नव्हतें. पहिल्या तडाक्यासें ब्रिरबलानें धीरबलावर तरवारीचा वार केला. त्याचा कित्ता सर्व अनुयायांनीं गिरविल्यामुळें जिकडे तिकडे मोठी आरडाओरड सुरू झाली. पाहेरकरी सावध होऊन मोठ्या वेगानें शत्रूच्या लोकांवर घुसले. हां हां म्हणतां ही बातमी सर्व शहरांत पसरली; खेंगारही तयार होऊन आपल्या लोकांना मिळाला. सिद्धराज आपलें लष्कर घेऊन शहरांत शिरला. जुनागडच्या रस्त्यांत घोर संग्राम सुरू झाला, दोन्ही पक्षाकडील हजारों वीर धारातीर्थीं मृत्यु पावले. खेंगार महाराजांचे व सिद्धराजाचें युद्ध सुरु झालें. दोघेही वीर खड्गयुद्धांत प्रवीण होते. बचरावेळ पावेतों कोणी कोणाला हार जाईना. शेंवटीं खेंगारानें मोठ्या चपळाईनें सिद्धराजाला दोन वार केले; ह्या दोन वारांनीं सिद्धराज अतिशय खवळून गेला; त्यानें मोठ्या शिताफीनें खेंगाराच्या डोक्यावर तरवारीचा वार केला तो मर्मी लागल्यामुळें खेंगार महाराजांना मूर्च्छना येऊन ते जमिनीवर पडले; सिद्धराजालाही जबर जखमा

लागल्यामुळें त्याच्या अंगांतून पुष्कळ रक्त गेलें; ह्यामुळें तोही मूर्च्छना येऊन खालीं पडला; पण खेंगाराचें प्राणोत्क्रमण लागलेंच झालें !

सिद्धराजाचें सैन्य शहरांत शिरल्यावर त्यांनें जे अनर्थ केले त्यांचें वर्णन ऐकून अंगावर कांटाच उभा राहतो. त्या नराधमांनीं कित्येक स्त्रियांच्या अब्रूवर धाड घातली; कित्येक लूट मिळविण्यांत गर्क होऊन गेले; व कित्येक विघ्नसंतोषी लोकांनीं मौजेखातर घरांना आगी लाविल्या ! खेंगार पडल्याची बातमी त्यांच्या लोकांत पसरतांच त्यांचें धैर्य खचलें. त्यांनीं युद्ध करणें सोडून दिलें व पळण्याला सुरवात केली. पुढें सिद्धराजाच्या लोकांनीं ससेहोलपट सुरू केली. जुनागडचे सर्व रस्ते प्रेतांनीं भरून गेले. ठिकठिकाणीं रक्ताचीं तळीं सांचलीं; शहरांतील लोकांना दे माय धरणी ठाय, असें होऊन गेले; सिद्धराजाला उचलून छावणींत घेऊन गेले, व बिरबलानें शहरचा बंदोबस्त करण्याला सुरवात केली. अद्याप त्याला एक महत्त्वाचें काम करावयाचें होतें. राणकदेवीला कैद करून सिद्धराजाकडे पाठवावयाचें व तिच्या दोन मुलांना ठार मारून काठेवाडच्या गादीला कोणी वारस राहूं द्यावयाचा नाहीं. हीं दोन कामें करण्याकरितां तो मोठ्या उतावळीनें जनानखान्यांत शिरला.

खेंगाराच्या मृत्यूची वार्ता राणीवशांत समजल्यामुळें तेथें आधींच मोठा हलकल्होळ उडाला होता. राणकदेवी धाई धाई रडत होती. तिच्या शोकानें तो राजवाडा शोकमय झाला होता. इतक्यांत त्या साध्वीच्या दुःखावर

डाग देण्याकरितां हा नराधम तिच्या महालांत शिरला. गाईंच्या गोठ्यांत जसा व्याघ्र शिरावा तसा तो तेथें दिसला. राणकदेवी जमिनीवर अस्ताव्यस्त पडली होती. तिचे केंस मोकळे सुटले होते. डोळ्यांतून पाण्याच्या धारा चालल्या होत्या. मोठमोठ्यांनीं तिचा रुदन स्वर चालला होता. जवळ दासी बसल्या होत्या त्याही रडत होत्या. तिची दोन मुलें दीनवाणीनें आपल्या आईकडे पहात डोळ्यांतून अश्रू ढाळीत होतीं. दुःखानें व्याप्त झालेल्या त्या मंडळीला ह्या दुष्टाचें आगमन अधिकच भयंकर वाटलें. ह्या वेळचा त्याचा वेष व मुद्रा फारच भयंकर होती. अंगावर खून चढल्यामुळें त्याचे डोळे इंगळाप्रमाणें लाल दिसत होते. अंगावरचे सर्व कपडे रक्तानें भिजल्यामुळें वसंतऋतूंत जसा पळस फुलतो तसा तो दिसत होता. त्याच्या हातांत नग्न तरवार होती. दिव्याच्या उजेडांत ती चमकत होती. आकंठ रक्त प्राशन केल्यामुळें ती रुधिराचें वमन करितें कीं काय असें दिसत होतें. गाईच्या गोठ्यांत व्याघ्र शिरला म्हणजे किंवा हत्तींच्या वनांत वनराजाचें गमन झालें म्हणजे जशी भीतीनें त्यांची तारंबळ उडून जाते त्याप्रमाणें ह्या राक्षसाला पाहून सर्वांची गाळण झाली. हा कांहीं चांगला हेतू मनांत धरून ह्या ठिकाणीं आला नाहीं असें त्याला पाहतांच सर्वांची खात्री झाली. राणीच्या महालाला सिद्धराजाच्या लोकांचा गराडा पडला होता. बिरबलानें आपल्याबरोबर बरेच शिपाई आणिले होते. ह्या प्रसंगांतून सुटण्याला उपाय नसल्यामुळें देवावर हवाला ठेवून त्यांना स्वस्थ राहणें भाग पडलें!

बिरबलानें प्रथम राणकदेवीच्या वडील मुलावर चाल करून त्याचे दोन्ही हात धरून त्याला महालाच्या मध्यभागीं आणिलें; तें सहा वर्षांचें पोर, भीतीनें अगदीं गांगरून गेलें. मोठ्या दीनवाणीनें मला मारूं नकाहो, मी तुमचा काय अपराध केला आहे? सोडा हो मला. अशा अनेकप्रकारानें त्या मुलानें त्या दुष्टाच्या विनवण्या केल्या. त्या खाटकाला कसली दया नी कसलें काय! मोठ्या उर्मटपणानें तो म्हणाला, " पोरा तूं सर्पाचा कारटा आहेस तुला जीवंत ठेवून उपयोग नाहीं. सापाच्या पोरावर कोण दया करील ? राणकदेवी शोकसागरांत अगदीं बुडून गेली होती; मुलावर हा आलेला प्रसंग पाहून त्या साध्वीला काय बरें वाटलें असेल ? कशी झाली तरी ती सुक्षत्रियाची कन्या असून वीरपत्नी होती. ती आपल्या शीलाला योग्य असेंच आचरण करणार! ती कांहीं भटाभिक्षुकाची किंवा वाण्याची बायको नव्हती; ती आपल्या मुलाला म्हणाली, " बाळा जो प्राणी जन्मास आला त्याला मृत्यू हा आहेच. तो कधीं टळत नाहीं. ह्या नराधमाच्या तूं विनवण्या कशाला करतोस? तूं क्षत्रियाचा बच्चा आहेस. मरण हें तुझ्या सटीला पुजलेलें आहे. प्राणाकरितां तूं ह्या नीचाची प्रार्थना करितोस ? बाबारे हें तुझ्या कुळाचें ब्रीद नाहीं. तूं परमेश्वराचें स्मरण कर. त्या दुष्टाला बाळहत्या करण्यांत मोठा पुरुषार्थ वाटत असेल तर त्याला आपली दुष्ट वासना पुरी करून रौरव नरकाची तयारी करून ठेवूं दे. राणकदेवीचें बोलणें ऐकून त्या नरपशूला मोठा राग आला, तो म्हणाला

'इतकें झालें तरी अजून तुझा ताठा जात नाहींका? थोडया-वेळांत समजेल.'

हें विखलाचें भाषण ऐकून राणकदेवी म्हणाली, 'नीचा तुझ्या हातून जें कांहीं होण्यासारखें असेल तें करून घे. उगाच तोंडाची वटवट करूं नको.' राणकदेवीचें हें भाषण ऐकून काळसर्पाप्रमाणें तो खवळला; त्यानें त्या मुलाला लाथ मारून जमिनीवर उलथें पाडिलें; हें भयंकर कृत्य पाहून सर्व बायांनीं जो आक्रांत केला, तो न भूतो न भविष्यतिः. राणकदेवीला मूर्छना आली. मुलानें मोठ्यानें हंबरडा फोडिला. मला वांचवा हो वांचवा; असें तो बोलत आहे इतक्यांत त्या काळसर्पानें ती भयंकर तरवार वर उचलली. हाय हाय! कोण तो प्रसंग! मातेला आपल्या मुलाचा वध कसा पाहवेल? ज्याप्रमाणें वीज मोठ्या वेगानें पृथ्वीचें तळ फोडून पार निघून जाते, त्याप्रमाणें त्या दुष्टाची तरवार त्या मुलाच्या मानेवर बसतांच एक घाव नी दोन तुकडे झाले. घाव बसतांच त्या मुलानें एकदांच कायती आरोळी मारिली; पुढें सामसूम झालें. हें अमानूष कृत्य झाल्यावर त्या काळसर्पानें आपली नजर त्या धाकल्या मुलाकडे फिरविली! कोण अधमपणा हा! मनुष्य द्रव्याकरितां काय करणार. नाहीं? प्रत्यक्ष आपल्या मामाच्या कुळाचा क्षय करण्यास जो नरपशू तयार झाला इतकेंच नव्हे तर त्यानें स्वतः त्या अर्भकाचा निर्दयपणानें प्राण घेतला! हें कृत्य राज्यलोभानें केलें. जळो तो लोभ!! असल्या लोकांना मानव अशी पदवी कशी देतां येईल? राक्षस म्हटलें असतां विशेष शोभण्यासारखें आहे.

राणकदेवीच्या मोठ्या मुलाला ठार मारल्यावर, त्यानें धाकट्याला मारण्याचा विचार केला; राणकदेवी जरी दुःखानें बेहोष होऊन गेली होती, तरी अतिशय दुःख झालें म्हणजे मनुष्याला एका प्रकारचें अवसान येत असतें, त्याप्रमाणें तिची स्थिति झाली. धाकट्या मुलाला आपल्या मांडीवर घेऊन ती बसली व म्हणाली तुला जर ह्याला मारणें असेल तर अगोदर मला मार! मग ह्याचें जें काय तुला वाटेल तें कर. बिरबलानें पुष्कळ प्रयत्न केला, तरी ह्या कामांत त्याला यश आलें नाहीं. राणकदेवीजवळ कमीजास्ती प्रकार करण्याला त्याला धैर्य झालें नाहीं. सिद्धराजाचा जीव राणकदेवीवर होता. तिचीं मुलें मात्र त्याला नको होतीं, त्यांना ठार मारिलें तरी त्याला राग येण्याचा संभव नव्हता, पण राणकदेवीसंबंधानें तसा प्रकार नव्हता. धाकट्या मुलाला मारण्याला साधन नाहीं असें पाहून बिरबलानें राणकदेवीला कैद करून सिद्धराजाच्या छावणींत पाठवून दिलें.

सिद्धराजाला जखम लागल्यावर तो आपल्या छावणींत परत गेला होता. बिरबलाबरोबर मोठमोठाले सरदार शहरची व्यवस्था लावण्यांत व लूट करण्यांत चूर झाले होते. इतक्यांत सिद्धराजाच्या सैन्यावर अकस्मात छापा आला. छावणींतील लोकांना छापा येण्याची मुळींच भीति नव्हती, ह्यामुळें ते स्वस्थ होते. एकाएकीं छापा आल्यामुळें त्यांची फारच धांदल उडून गेली. ज्याला जो रस्ता सांपडला तिकडे तो पळाला, सिद्धराजाच्या सैन्याची अगदीं वाताहत

झाली. मोठमोठाले सर्व सरदार कैद झाले. स्वतः सिद्धराजावरही तोच प्रसंग आला. शहरांत जे लोक होते त्यांना छावणींतील माहिती मिळण्यापूर्वींच त्यांचीं ही व्यवस्था बाहेरच्या सारखींच झाली. छापा घालणाऱ्या लोकांनीं शहरांत पुन्हां स्थीरस्थावर केलें.

# भाग २९ वा.

## सती.

मागील भागांत सांगण्यांत आलें आहे कीं, सिद्धराजाला कैद करण्यांत आलें म्हणून; पण हा कैद करणारा इसम कोण, त्यासंबंधानें आमच्या वाचकांना अगोदर सांगितलें पाहिजे. मदनसिंग खेंगाराला मदत करण्याकरितां सिंधु देशांतून आला होता. सिद्धराजाच्या सैन्यावर मोठमोठाले जय मिळवीत तो जुनागडाकडे चाल करून येत होता. एक दिवस जर सिद्धराजाचा चुकला असता तर त्याला चुरमुरे खात आपल्या देशीं जावें लागलें असतें पण ईश्वरी संकेत निराळा होता. राणकदेवीच्या कपाळीं वैधव्य विधात्यानें लिहिलें होतें तें कसें चुकणार ? मदनसिंगानें सिद्धराजाचे सर्व सरदार कैद केल्यावर तो राणकदेवीला भेटला. मदनसिंगाला पाहतांच त्या साध्वीला दुःखाचे उमाळे येऊं लागले. तिचा कंठ भरून आला; तोंडांतून शब्दही निघेना! खेंगाराच्या मृत्यूची बातमी ऐकून मदनसिंगही शोक

करूं लागला; राणकदेवीनें मुलाची हकिगत सांगितली. ती ऐकून तर त्याच्या अंगावर कांटा उभा राहिला. त्या नराधमाच्या नरडीचा घोंट केव्हां घेईन असें त्याला होऊन गेलें.

लढाईंत सांपडलेले कैदी पुष्कळ होते त्यांची व्यवस्था आणि सिद्धराजानें तहाचें बोलणें लाविलें होतें, त्याचा निकाल करण्याकरितां मदनसिंगानें दुसरे दिवशीं दरबार भरविला. सर्व सरदार लोकांना दरबार भरण्याचें कारण सांगितलें. सिद्धराजापासून लढाईचा खर्च भरून घेण्याचें कबूल करून त्याच्याबरोबर तह केला. मदनसिंगानें सिद्धराजास विरबलाचा पूर्वीचा सर्व इतिहास सांगितला. खेंगाराच्या वडील मुलाला ज्यानें विनाकारण ठार मारिलें; राज्यलोभाकरितां ज्यानें आपल्या भावाचाही खून केला! असल्या महान अपराधी मनुष्यास योग्य शासन झालें पाहिजे असें मदनसिंगानें बोलून दाखविलें. मदनसिंगाच्या मताला सगळ्या सरदारांचें अनुमोदन मिळाल्यावर बिरबलाला कैद करून दरबारांत आणिलें. त्यावेळची त्याची स्थिति अगदीं दीनवाणी होती. त्याचा चेहरा अगदीं काळा ठिक्कर पडला होता. त्यानें जे घोर अपराध केले होते, ते त्याच्यासमोर मूर्तिमंत उभे राहिले. मदनसिंग आपला पूर्वीचा वैरी, तो कांहीं आपल्याला जीवंत सोडणार नाहीं, हें त्याला पक्कें समजलें होतें. त्यानें भर दरबारांत मोठ्या ऐटीनें आपले सर्व अपराध कबूल केले. मी पैशाकरितां एवढाले अपराध करण्यास तयार झालों, पण परमेश्वराला अन्याय कधीं सहन होत नाहीं; तो शिक्षा केल्याखेरीज कधीं राहणार नाहीं; मी महान अपराधी आहे,

महाराज मजवर दया करा असें मी मुळींच म्हणत नाहीं, व तसें म्हणण्याचा मला अधिकारही नाहीं. महाराज राज्यलोभाकरितां मी प्रत्यक्ष आपला भाऊ ठार मारिला! पण मी कसला मारिला? तो आपल्या कर्मानें नष्ट झाला; आपल्या धन्याबरोबर जो बेमान झाला, ज्याचें अन्न खाल्लें त्याच्या सर्वस्वी नाशाला जो कारण झाला, त्यास मृत्यु-खेरीज दुसरी कसली शिक्षा मिळणार? महाराज माझ्या तोंडावर थुका:, मला शेणमार करा, मला सांडसानें भाजा; माझे डोळे फोडा; जीभ कापा, तापलेल्या तव्यावर उभें करा, तुम्ही कोणतीही व कितीही भयंकर शिक्षा मला केलीत तरी ती फारच थोडी होईल, एवढाले माझे अपराध आहेत. प्रत्यक्ष मी आपल्या मामाच्या नाशाला कारण झालों. परमेश्वरा! कशी मला बुद्धि झाली? हे सति राणक-देवी, मी महान अपराधी आहें! मजवर त्वां जे उपकार केले होते त्याचा मोबदला मी चांगलाच फेडला; मी तर रौरव नरकांत जाणारच आहे. शिवाय ह्या लोकीं जी कांहीं शिक्षा मला होईल तीही मला भोगावी लागणार आहे. पण ही शिक्षा कशाकरितां? नीतीला व धर्माला सोडून वागलों ह्यामुळें मजवर हा प्रसंग आला आहे. वाईटाचा परिणाम वाईट झालाच पाहिजे. मनुष्य विकारवश होऊन भलभलते विचार करीत असतो, पण हा त्याचा अगदीं मूर्खपणा आहे. परमेश्वरानें जी स्थिति दिली असेल, तींत संतोषानें राहिलें पाहिजे. जे कोणी विकारवश होऊन मनोराज्याच्या तडाक्यांत सांपडतील त्यांना मजसारखीं फळें

भोगावीं लागतील ह्याप्रमाणें त्यानें आपल्या पापाचा पश्चातापपूर्वक पाढा वाचून दाखविला.

शेवटीं मदनसिंगानें बिरबलाला किल्ल्याच्या तटावर सुळावर चढविण्याची शिक्षा दिली. हा तमाशा पाहण्याकरितां हजारों लोक जमले; पण त्याच्याबद्दल कोणालाही वाईट वाटलें नाहीं. बिरबलाला सुळीं दिल्यावर मदनसिंगानें राणकदेवीची सती जाण्याचीही तयारी करून दिली. मदनसिंगानें अनेक प्रकारें तिला सती न जाण्याविषयीं विनविलें, पण तिचा निग्रह कांहीं सुटला नाहीं. नदीच्या कांठीं चिता तयार केली होती. राणकदेवीनें मंगल स्नान केलें, कुंकवाचा मळवट भरिला, रत्नांचे सर्व अलंकार धारण केलें, शुभ्रवस्त्र परिधान करून तिनें सौभाग्य वायनें दिलीं. राजवाड्यात ताशे मरफे वाजूं लागले, राजवाड्यापासून चितेपावेतों दुतर्फी स्वारांच्या रांगा उभ्या राहिल्या. राणकदेवी पालखींत बसून निघाली, ताशेमर्फे वाजूं लागले, हजारों लोक सती पाहण्याकरितां नदीकडे जाऊं लागले. सिद्धराज आपल्या सरदारांसह ह्या समारंभांत हजर होता. त्याच्या डोळ्यांतून पाण्याच्या सारख्या धारा चालल्या होत्या. राणकदेवीवर त्याचा जीव होता. तिच्या प्राप्तीकरितां त्यानें एवढें भारती युद्ध केलें, हजारों कुटुंबें उघडीं पाडलीं, खेंगाराच्या कुळाचा नाश केला, इतकें करून अखेर राणकदेवी नाहीं ती नाहीं! अशा स्थितींत कोणास गोड लागेल? त्या दुःखानें जखमांचें दुःख देखील तो विसरून गेला; अखेरचें तरी त्या सतीचें दर्शन घ्यावें असा विचार करून तोही नदीवर आला. राणकदेवी चितेजवळ आल्यावर पालखींतून खालीं उतरली; रंगशिले-

वर बसली; सर्व अलंकार काढून सुवासिनी बायांना वाटून दिले, गळयांत कापराच्या माळा घातल्या, सर्व वडील मनुष्यांना नमस्कार केला. इतक्यांत तिचा मुलगा घेऊन एक दासी तिजजवळ आली. त्याला कडेवर घेऊन ती म्हणाली, 'बाळा आतां मी जातें बरें, रडूं नको. (मदनसिंगाकडे बोट करून ती म्हणाली) हे तुझे मामा तुला कांहीं कमी पडूं देणार नाहींत.' असें म्हणून तिनें त्याचा मुका घेतला. त्याला कडेवरून खालीं ठेवूं लागली, पण तो कांहीं केल्या उतरेना. रडून रडून त्यानें आकांत केला. अखेर मदनसिंगानें मोठ्या मुष्किलीनें त्याला एकीकडे नेलें.

चितेची सर्व तयारी झाल्यावर राणकदेवी सर्व स्त्रियांना उद्देशून म्हणाली, 'मी तर आतां जातें; पण माझे एवढे चार शब्द तुमच्याजवळ असूं द्या. स्त्रियांना मुख्य भूषण पातिव्रत्य. त्याच्याकरितां त्यांनीं देह टाकावा, पण तें सोडूं नये. पती सेवा करणें; त्यांच्या आज्ञेंत वागणें, गृहकृत्यांत त्याला मदत करणें, हींच कुलीन स्त्रियांचीं आदि कर्तव्यें होत. पति हाच परमेश्वर, तोच गुरु. स्त्रियांनीं त्याच्या सुखाला तसेंच दुःखाला विभागी झालें पाहिजे. माझे नाथ वाट पाहत असतील. मी आतां रजा घेतें. सर्वांनीं मजवर लोभ ठेवावा. न समजतां किंवा समजून मजकडून कांहीं अपराध झाले असतील तर ते सर्वांनीं क्षमा करावे. घेतें आतां निरोप. हे सूर्यनारायणा, ह्या कन्येवर लोभ असूं दे. हे अष्टदिग्पाळांनों मला माझ्या नाथाचा रस्ता दाखवा. हे भूमाते ह्या माझ्या जड शरिराला तूं आपल्या तत्वांत आश्रय दे.'

ह्याप्रमाणें सर्व प्रकार आटोपल्यावर ती शांत चित्तानें चितेवर जाऊन बसली त्याबरोबर वाद्यें मोठमोठ्यांनीं वाजूं लागलीं. तिनें डोळे मिटले, एक निष्ठेनें परमेश्वराचें ध्यान केलें आणि हात चोळण्याला सुरवात केली. हातांतून अग्नी उत्पन्न होऊन तिच्या गळ्यांत ज्या कापुराच्या माळा होत्या त्या पेटल्या. सिद्धराजा अजूनपर्यंत खालीं मान घालून उभा होता तो हा शेंवटचा प्रकार पाहतांच एकदम चितेजवळ धांवत गेला आणि त्यानें आपलें उत्तरीयवस्त्र चितेंत टाकिलें, आणि म्हणाला, 'ह्या जन्मीं जरी तूं मला मिळाली नाहींस, तरी पुढल्या जन्मीं तरी मिळशील म्हणून तुजवरोबर मी आपलें वस्त्र टाकितों.' परंतु याचें हें वस्त्र जाऊन पडण्यापूर्वीच राणकदेवीचा आत्मा ब्रह्मांडास जाऊन मिळाला होता. हां हां म्हणतां तिच्या जड देहाची राख होऊन पंचप्राण पंचमहाभूतास जाऊन मिळाले, व सर्व लोक हळहळत आपापल्या घरीं गेले. सिद्धराजाला राणकदेवीचें वेड लागलें, तो राणकदेवी, राणकदेवी असें करीत थोड्याच दिवसांत मृत्यु पावला! मदनसिंगानें खेंगाराच्या धाकट्या मुलाला गादीवर बसवून उत्तम राज्यकारभार चालविला, पुढें तो मोठा झाल्यावर आपल्या मुलाला प्रधानाच्या जाग्यावर स्थापून तो इंदुमतीसह गिरनार पर्वतावर हरी हरी म्हणत राहता झाला.

समाप्त.



# प. … थी

ऐतिहासिक … महाराज … कृपेंच … ने कल रा … यांनी … केला, न्यायमूर्त … गो … टिळक, डॉ. ग… प्रो. … अनुकूल अभिप्राय … केली; … यांनी अनुक्रमे १०० व ५०० … ग्रंथाच्या उत्तमपणाबद्दल ग्रंथकारास बक्षिस देऊन जी … ती आम्ही ग्रंथकारास … आभार …